# अनुक्रमणिका


**संचालक**
हेमन्त टकले
---
**संपादक**
डॉ. सुधीर भोंगळे
---
या अंकात प्रसिद्ध झालेल्या मतांशी संपादक व संचालक सहमत असतीलच असे नाही.
---
**संपादकीय पत्रव्यवहार**
ठाकरसी हाऊस,
जे.एन.हेरेडिया मार्ग,
बॅलार्ड इस्टेट,
मुंबई-४०० ०३८
०२२-३५३४७४००/०१
**कला निर्देशन**
धनंजय सस्तकर
**मांडणी सहाय्य**
दिलीप रोडे
**फोटो**
मयूर बोराडे
---
**वर्गणीचे दर-**
**वार्षिक रु. ५००/-**
**वर्गणीचा धनादेश**
**'हेमन्त मल्टिमीडिया ओपीसी प्रा.लि.'**
या नावाने काढावा.
**www.ncp.org.in**
यावर मासिक उपलब्ध
---
**मुद्रक, प्रकाशक**
हेमन्त प्रभाकर टकले यांनी 'हेमन्त मल्टीमीडिया ओपीसी प्रा.लि.' च्या वतीने मीडिया आर अँण्ड डी., १३, अमृत मधुरा, प्लॉट नं. ३, सेक्टर-३, आरएससी-२८, चारकोप, कांदिवली (पश्चिम), मुंबई-४०००६७ येथे छापून ७८, रेशमभवन, ६ वा मजला, वीर नरिमन रोड, चर्चगेट, मुंबई-४०००२० येथून अंक प्रकाशित केले.



**4** अध्यक्षीय- जयंत पाटील- महायुती सरकारने लोटले महाराष्ट्राला अधोगतीकडे

**5** संपादकीय- डॉ. सुधीर भोंगळे- नव्या लोकसभेची अभद्र सुरुवात

**10** आलेख भारतीय बचतीच्या वाटचालीचा- अभय टिळक

**18** महाविकास आघाडी संयुक्त पत्रकार परिषद, मुंबई, भाषणे :-
१) लोकसभा निवडणुकीतील घवघवीत यशाबद्दल जनतेने आभार- जयंत पाटील
२) विधानसभेला महाराष्ट्रात सत्तापरिवर्तन होणारच : पृथ्वीराज चव्हाण
३) देशाची जनता जागी झालीय : उद्धव ठाकरे
४) सरकारच्या धोरणांविरोधात नाराजी : शरद पवार

**26** गाफीलपणाला थारा नको- अनंत बागाईतकर

**32** शरद पवार यांचा बारामती तालुक्यातील जनतेशी संवाद दौरा
१) आता महाराष्ट्राची सत्ता मिळविण्यासाठी साथ द्या- शरद पवार

**44** नरेंद्र मोदी यांचे अवसान उसने की आत्मघाती?- व्यंकटेश केसरी

**48** राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) रौप्यमहोत्सवी समारंभ,अहमदनगर
१) आता एकच लक्ष्य विधानसभा- सुप्रिया सुळे : ४८
२) भल्याभल्यांना सुजल्यावर कळंतय साहेबांनी मारलंय कुठं?- अमोल कोल्हे : ५२
३) पवार साहेबांचा नाद नाही करायचा- नीलेश लंके : ५६
४) जनतेनं ज्याची त्याची लायकी दाखवून दिली- बजरंग सोनवणे : ५८
५) जनतेच्या प्रश्नांना वाचा फोडण्याचं काम करू- अमर काळे : ६०
६) जनतेचे प्रश्न मार्गी लावण्याचा प्रयत्न करू- भास्करराव भगरे : ६३
७) महाराष्ट्रात कदापिही मनुस्मृती येऊ देणार नाही- जितेंद्र आव्हाड : ६४
८) पवार साहेबांच्या विचारांचं सरकार महाराष्ट्रात आणूया- शशिकांत शिंदे : ६६
९) पवार साहेबांच्या वाढदिवसाला ८५ आमदारांची द्यायचीय भेट- रोहित पवार : ६७
१०) विधानसभेला गद्दारांना जमिनीवर आणायचंय- रोहिणी खडसे : ६९

**70** एका नागरिकाच्या नजरेतून लोकसभा निवडणुकीचा अन्वयार्थ- डॉ. किशोर फुले

**80** चीन : युद्धसज्जतेबरोबर संवादही हवा!- प्रभाकर खोले

**86** अजित पवारांची भाजकडून कोंडी- राजवर्धन सरदेशमुख

**90** पश्चिम आशियात शांतता हवी, शस्त्रे नव्हे- जतिन देसाई

**94** कानोकानी- घंटाकर्ण (हलके-फुलके राजकीय किस्से)

**102** शेवटचे पान- हेमन्त टकले- पप्पू पास हो गया

**अध्यक्षीय**



# महायुती सरकारने लोटले महाराष्ट्राला अधोगतीकडे

**विधानसभेत राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेदरम्यान राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी केलेले हे भाषण. आम्ही हे करतोय, आम्ही ते करतोय याशिवाय अभिभाषणात काहीच नाही असे जोरदार प्रहार करत जयंतरावांनी अभिभाषणाला कडाडून विरोध केला. ते भाषण येथे देत आहोत.**

✻ राज्यघटनेबद्दल यांना आदर नाही, सत्ताधाऱ्यांना संविधान बदलण्यासाठीच सत्ता पाहिजे होती. संविधान बदलण्याची भाषा भाजपाची आत्ताची नाही तर ती जुनी आहे. खूप पहिल्यापासून भाजपाची ती भाषा आहे. नुकतेच भाजपाचे एक खासदार म्हणाले की 'आम्हाला संविधानातील अनावश्यक गोष्टी काढून टाकण्यासाठी ४०० पार जायचे आहे' आता ज्या संविधानाच्या जोरावर तुम्ही सत्ता मिळवली. त्या संविधानात नक्की अनावश्यक काय आहे ? हे जरा एकदा भाजपने स्पष्ट करावे.

✻ पंतप्रधानांचे आर्थिक सल्लागार विवेक देबरॉय यांनीही भारताला नव्या संविधानाची गरज आहे असे नमूद केले होते. म्हणजे काय की एकदा खडा टाकून बघायचा की लोकांच्या प्रतिक्रिया काय येत आहेत. आणि लोकांच्या टोकाच्या प्रतिक्रिया आल्या की माघार घ्यायची.

✻ राज्यपालांनी त्यांच्या भाषणाची सुरुवात नेहमीप्रमाणे छत्रपती शिवाजी महाराज, फुले, शाहू, आंबेडकर यांच्या उच्च आदर्शाचे पालन त्यांचे सरकार करत आहे, असे सांगून केली. यांना छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव घेण्याचा तरी अधिकार आहे का ? २४ डिसेंबर २०१६ रोजी शिवस्मारकाचे पंतप्रधानांच्या हस्ते जलपूजन करून पायाभरणी करण्यात आली. आज या घटनेला डिसेंबरमध्ये ०८ वर्ष पूर्ण होतील, मात्र आजपर्यंत तिथे कोणतीही प्रोग्रेस नाहीये.

✻ राज्यपाल असे म्हणतात कि २०२७-२८ पर्यंत राज्याची एक ट्रिलियन डॉलर्सची अर्थव्यवस्था करण्याचे आपले लक्ष आहे. ०६ वर्षात महाराष्ट्रात १. ५३ ट्रिलियन डॉलर्स ची गुंतवणूक असेल तरच महाराष्ट्र ०१ ट्रिलियन डॉलर्सची इकॉनॉमी होऊ शकते. महाराष्ट्राचा विकासदर १७ टक्क्यांवर गेला तरच ते शक्य आहे.. आत्ता आपला विकासदर ०७ टक्क्यांच्या आत आहे. सत्ताधाऱ्यांचे स्वप्न आहे की महाराष्ट्र एक ट्रिलियन डॉलर्सची इकॉनॉमी व्हावी पण एक ट्रिलियन डॉलर इकॉनॉमीचे लाभार्थी कोण असणार आहेत...? हे एकदा सरकारने स्पष्ट करायला हवे.

✻ सरकार सांगतंय की दावोस येथील परिषदेत त्यांनी २०२४ मध्ये ३ लाख ५३ हजार कोटी रुपयांचे सामंजस्य करार केले आणि त्यातून ०२ लाख नोकऱ्या निर्माण होतील. २०२३ मध्ये दावोस मधून ०१. ३७ लाख कोटी रुपयांची गुंतवणूक आली आणि त्यातून ०१ लाख रोजगार निर्माण होतील असे मुख्यमंत्री त्यावेळी म्हणाले होते. मुख्यमंत्री महोदयांच्या या घोषणेला आता दीड वर्ष होईल त्यामुळे या जुन्या एक लाखांच्या पैकी किती जणांना नोकरी मिळाली त्यांची नावे त्यांनी सभागृहाच्या पटलावर ठेवावी, अशी आमची मागणी आहे.

✻ राज्यपाल महोदयांनी रोजगार मेळाव्याच्या बाबतही भाष्य केले आहे. राज्यभरात मोठा गाजावाजा करून हे रोजगार मेळावे आयोजित करण्यात आले होते. बारामतीच्या रोजगार मेळाव्यात मुख्यमंत्री म्हणाले कि पुढील दोन दिवसांत इथे २५,००० नोकऱ्या दिल्या जातील. वास्तवात तिथे नोकऱ्या मिळाल्या त्या फक्त १२८५... !! म्हणजे दहा टक्के सुद्धा नाही. हे मी म्हणत नाहीये तर इंडियन एक्सप्रेसची बातमी आहे.

✻ शिवडी न्हावा शेव अटल सेतू आपण पूर्ण केला पण या एवढ्या जागतिक दर्जाच्या रस्त्याला आता तडे का गेले आहेत. हे कसं झालं? आता तर राम मंदिरालाही गळती लागली आहे.

✻ नुकतीच लोकसभेची निवडणूक झाली आहे. या लोकसभा निवडणुकीची एका वाक्यात माहिती सांगायची झाली तर २०१९ साली नरेंद्र मोदींचे वाराणसीत लीड ०४ लाख ७९ हजार होते ते घटून दीड लाखांवर आले आहे. संपूर्ण निवडणुकीचा मतितार्थ असा की भाजपचा जनाधर घटला आहे. प्रभू श्रीराम आता भाजप सोबत नाही तर आमच्या सोबत आहे. प्रभू रामाचे तिर्थ स्थान आहे तिथे भाजपचा पराभव झाला आहे. मग ते रामटेक असो व काळा मंदिर जिथे आहे ते नाशिक असो किंवा अयोध्या असो... भाजपचा तिथे पराभव झाला आहे.

✻ काही जण म्हणतात की मुस्लिम आणि (पान १०० वर)

**संपादकीय**



# नव्या लोकसभेची अभद्र सुरुवात

**इन्सान की पहचान उसके धन**
**या पद से नही होती है,**
**उसके मनसे होती है !**
**छोटे मन से कोई बडा नही होता,**
**टूटे मन से कोई खडा नही होता!**
**– अटलबिहारी वाजपेयी**

जित्याची खोड मेल्याखेरीज जात नाही अशी म्हण मराठीत प्रचलित आहे. क्षुद्र आणि कोडग्या मनोवृत्तीच्या माणसांना ती चपखल लागू होते. वर्तमान राज्यकर्ते हे अटलबिहारी वाजपेयींचे वारस असल्याचे दावे करीत असतात. तोही एक दांभिकपणाच आहे. परंतु क्षणभर तो खरा मानला तरी वाजपेयींच्या वरील कवितेतील ओळींना ते पात्र आहेत असे म्हणता येणार नाही. किंबहुना विरोधी पक्षांना शत्रु समजून त्यांचा नायनाट करण्याच्या कमालद्वेषाच्या प्रवृत्तीने पछाडलेले हे राज्यकर्ते आहेत. २०२४च्या निवडणुकीत मतदारांनी अहंकारी भाजपला साधे स्वबळाचे बहुमत देखील नाकारुन त्यांची मस्ती जिरवलेली असूनही या पक्षाचा मस्तवालपणा कमी होताना दिसत नाही. मतदारांनी एकप्रकारे पंख छाटल्यानंतर सत्ता व पदाचा उन्माद या मंडळींना येणार नाही आणि त्यांच्यातील खुनशीपणा सौम्य झाला असेल अशी अपेक्षा केली जात होती. प्रत्यक्षात तसे घडताना आढळत नाही. या पक्षाची, त्यांच्या नेत्यांची देहबोली, अविर्भाव, अभिनिवेश हा ''पडलो तरी नाक वरच'' असाच आढळून येतो. त्यामुळेच मतदारांनी फटकारुनही यांच्यात अजुनही बदल झालेला आढळत नाही आणि उलट उन्मत्तपणात आणखी वाढ झाल्याचे आढळून येते. एकंदरीत नव्या लोकसभेची सुरुवात आणि सरकारस्थापना, मंत्रिमंडळाची रचना या गोष्टी लक्षात घेता मार खाऊनही भाजपचे नेतृत्व सुधारलेले नाही ही बाब स्पष्टपणे दिसून येते. त्यामुळेच एकूण राज्यकारभारात पूर्वीपेक्षा काहीतरी बदल होईल अशी जी अपेक्षा व्यक्त केली जात होती ती फोल ठरणार आहे. याचे कारण स्पष्ट आहे. ज्यांच्यावर केवळ खत्रुडपणाचेच संस्कार झालेले आहे आणि ज्यांच्या रोमारोमात करंटेपणा आणि नसानसात कोती राजकीय संस्कृती भिनलेली ते सुधारु शकत नाहीत. तेच या नव्या लोकसभेच्या सुरुवातीला स्पष्ट झालेले आहे. त्यामुळेच मोदी-शहा जोडगोळीचा उर्मट पिंड बदललेला नाही. गेली दहा वर्षे जी गुर्मी आणि दर्प त्यांनी जोपासला व बाळगला आहे त्यानुसारच त्यांचे यापुढील काळातही आचरण राहणार आहे. त्यामुळेच विरोधी पक्षांना देखील तेवढेच कणखर राहून त्यांच्या या सत्तोन्मादाचा मुकाबला करावा लागणार आहे.

लोकसभेची सुरुवात झाल्यानंतर नियमानुसार सर्वप्रथम हंगामी लोकसभा अध्यक्षांची निवड केली जाते. सर्वसाधारणपणे जास्तीतजास्त वेळा लोकसभेवर निवडून आलेल्या सदस्याची ज्येष्ठता लक्षात घेऊन त्या सदस्याला हंगामी अध्यक्ष म्हणून नेमण्याचा प्रघात आहे. काँग्रेसचे केरळचे खासदार के. सुरेश हे लोकसभेतील सर्वाधिक वेळा निवडून आलेले सदस्य आहेत. ते आतापर्यंत आठवेळा लोकसभेवर निवडून आले आहेत. खरेतर त्यांना हंगामी अध्यक्ष करण्यामध्ये कोणतीच हरकत नव्हती. परंतु सत्तापक्षाचे मन एवढे कोते की त्यांनी सुरेश यांची ज्येष्ठता नाकारली. बिजु जनता दलातून भाजपमध्ये गेलेले भर्तृहरी मेहताब हे सलग सातवेळा निवडून आलेले असल्याने त्यांची ज्येष्ठता अधिक असल्याचा तर्क भाजपकडून देण्यात आला आणि मेहताब यांना हंगामी अध्यक्ष म्हणून नेमण्यात आले. सुरेश यांची ज्येष्ठता मानण्यात काहीच गैर नव्हते. तसेच हंगामी अध्यक्षाला केवळ सदस्यांना शपथ देणे आणि नव्या अध्यक्षांची निवड होईपर्यंत सभागृहाचे काम सांभाळायचे असते. तरीही पदलोलुप भाजपने हंगामी अध्यक्षपद देखील काँग्रेसच्या सुरेश यांना देण्याचे टाळले आणि आपल्या पक्षाच्या व पक्षबदलू मेहताब यांना ही जबाबदारी दिली. यावरुनच भाजपची व त्याहीपेक्षा भाजपचे सूत्रधार असलेल्या जोडगोळीची खत्रुड मनोवृत्ती लक्षात येते.

विरोधी पक्षांनी हा खत्रुडपणाही सहन केला. यानंतर नव्या लोकसभेच्या अध्यक्षांच्या निवडीचा विषय समोर आला. लोकसभेचे अध्यक्षपद हे सत्तापक्षाकडेच राखण्यात येते हे सर्वमान्य आहे. त्याचप्रमाणे त्यासाठी निवडणूक होऊ नये व शक्यतोवर सर्वसंमतीने अध्यक्षांची निवड व्हावी असे प्रयत्न केले जातात. असा प्रघात असला तरी अटलबिहारी वाजपेयींच्या वेळी अध्यक्षपद तेलगु देशमचे जीएमसी बालयोगी यांना देण्यात आले होते. तर नंतरच्या काळात काँग्रेसच्या नेतृत्वाखालील युपीए सरकारच्या पहिल्या कारकिर्दीत मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे ज्येष्ठ नेते सोमनाथ चटर्जी यांना देण्यात आले होते. परंतु हे करण्यासाठी फार मोठे मन, परिपक्वता आणि मुख्य म्हणजे नेतृत्वामध्ये आत्मविश्वास असावा लागतो. या तिन्ही गुणांचा पूर्ण अभाव सध्याच्या नेतृत्वात असल्याने ते नेतृत्व व कोणतेही पद स्वतःच्या हातातून इतरांना देण्याचा मोठेपणा दाखवू शकणार नाही. विरोधी पक्षांनी लोकसभेच्या उपाध्यक्ष पदाच्या बदल्यात अध्यक्षांची निवड बिनविरोध करण्याची तयारी दाखवली होती. परंतु त्यालाही सत्तापक्षाच्या हव्यासी नेतृत्वाने

मान्यता दिली नाही. लोकशाहीत अध्यक्षपद सत्तापक्षाकडे असल्यास उपाध्यक्षपद विरोधी पक्षांना देण्याची प्रथा आहे. नरसिंह राव पंतप्रधान असताना त्यांनी लोकसभेचे उपाध्यक्षपद त्यावेळचा प्रमुख विरोधी पक्ष भाजपला दिले होते. अशी अनेक उदाहरणे आहेत. परंतु अत्यंत क्षुद्र मनाचे राज्यकर्ते या असल्या लोकशाहीतील सभ्य परंपरांना भीक घालत नाहीत. कारण ते एका असभ्य राजकीय संस्कृतीचे प्रतिनिधित्व करीत असतात. तर, लोकसभेच्या अध्यक्षपदासाठी भाजपने गेल्या लोकसभेचे अध्यक्ष ओम बिडला यांनाच पुन्हा संधी देण्याचा निर्णय केला. ओम बिडला हे गेल्या म्हणजे सतराव्या लोकसभेतही अध्यक्षपदी होते आणि त्यांची पाच वर्षांची कारकिर्द ही पक्षपाताने पूर्णपणे ग्रस्त होती. पीठासीन प्रमुख किंवा अध्यक्ष हा निःपक्ष असतो आणि त्याच्या लेखी सत्तापक्ष आणि प्रतिपक्ष किंवा विरोधी पक्ष हे समान असतात. अर्थात हा आदर्शवाद झाला. यापूर्वीही अनेक पीठासीन प्रमुख होऊन गेले परंतु या पदाची एवढी अवनीती अनुभवाला आली नव्हती जेवढी ती २०१४ नंतरच्या काळात आली. सतराव्या लोकसभेच्या अखेरच्या अधिवेशनात याच ओम बिडला यांनी सरकारला हवे असणारे काही कायदे संमत व्हावेत यासाठी विरोधी पक्षांच्या १४५ सदस्यांना सभागृहातून निलंबित करण्याचा विक्रम केला होता. ही त्यांची कृति केवळ अक्षम्यच नव्हे तर अनावश्यक आणि संसदीय प्रथा-परंपरा, प्रतिष्ठा यांना काळिमा फासणारी होती. त्यामुळेच अठराव्या लोकसभेचे अध्यक्ष म्हणून फेरनिवड झाल्यानंतर त्यांच्या गौरवपर जी भाषणे विरोधी पक्षांच्या सदस्यांनी केली त्या बहुतेकांनी ओम बिडला यांच्या १४५ सदस्यांना एका फटक्यात निलंबित करण्याच्या निर्णयाचा उल्लेख केला आणि त्याची पुनरावृत्ती होणार नाही याची अपेक्षा व्यक्त केली. परंतु प्रत्यक्षात ओम बिडला यांनी काय केले हेही पहावे लागेल. त्यांच्या गौरवपर भाषणात विरोधी सदस्यांना फार बोलण्याची संधी मिळू नये आणि त्यांना त्यांच्यावर जास्त टीकाटिप्पणी करण्याची संधी मिळू नये यासाठी अक्षरशः एकेका मिनिटात भाषणे आटोपते घेण्याचा आदेश त्यांनी दिला. परंतु हा आदेश देताना त्यांचा अविर्भाव विलक्षण असभ्य होता. बैठ जाईए असे सांगताना त्यांच्या चेहऱ्यावर जो त्वेष दिसतो तो शोभनीय नाही. एवढेच नाही तर विरोधी सदस्यांना दम देण्याच्या अविर्भावात ते म्हणाले की "जब अध्यक्ष खडे रहते है तब सदस्यों ने नीचे बैठना चाहिए. ये सूचना मुझे फिर से देने की नौबत नही आनी चाहिए !'' पहिल्याच दिवशी लोकसभेचे अध्यक्ष जर दमदाटीची भाषा त्वेषाने करीत असतील तर त्या लोकसभेचे भवितव्य चांगले नाही हेच त्यावरुन स्पष्ट होते. ओम बिडला यांनी गेल्या पाच वर्षात सरकारी पक्षाची तळी अशी काही उचलून धरली की ते पीठासीन प्रमुख आहेत की सरकारमधील एखादे मंत्री आहेत अशी शंका यावी.

यानिमित्ताने गेल्या दहा वर्षातील संसदीय कामकाजाचा आढावा घेणेही संयुक्तिक ठरणार आहे. गेल्या दहा वर्षात म्हणजेच मोदी-शहांच्या काळात संसदेत एकाही स्थगन प्रस्तावावर चर्चा झालेली नाही. स्थगन प्रस्तावासाठीचा विषय अतितातडीचा व लोकमहत्वाचा तसेच तात्कालिक, ताजा किंवा नुकताच घडलेला असणे आवश्यक असते. काही काळ उलटून गेलेला विषय या श्रेणीत समाविष्ट होत नाही. उदाहरणार्थ संसदेचे अधिवेशन चालू असतानाच अशी काही घटना घडल्यास त्यावर स्थगन प्रस्तावाद्वारे चर्चा होऊ शकते. याचे महत्व असे असते की विषयाची तातडी आणि महत्व लक्षात घेऊन संसदेचे कामकाज तत्काळ स्थगित करुन त्या विषयावर चर्चा केली जाते आणि सरकारकडून त्यावर खुलासा मागितला जातो. विरोधी पक्षांच्या हातातील हे एक प्रमुख हत्यार मानले जाते की ज्याद्वारे ते सरकारला जाब विचारु शकतात आणि त्यांच्यावर ठपकाही ठेवू शकतात. जर या प्रस्तावाच्या अखेरीला एखाद्या सदस्याने मतविभाजन मागितल्यास ते देण्याचे बंधन पीठासीन प्रमुखांवर म्हणजेच अध्यक्षांवर असते. मोदींच्या दहा वर्षांच्या काळात असे अनेक प्रसंग घडले आणि विरोधी पक्षांनी त्यावर स्थगन प्रस्तावाद्वारे चर्चा मागूनही पीठासीन प्रमुख या नात्याने ओम बिडला यांनी गेल्या पाच वर्षात आणि सुमित्रा महाजन यांनी २०१४ ते २०१९ या काळात एकदाही आणि एकाही स्थगन प्रस्तावाला मान्यता दिली नाही, ते फेटाळून त्याआधारे चर्चा होऊ दिल्या नाहीत. हे का केले याचे उत्तर अज्ञात आहे. याच बिडलांनी आणि राज्यसभेतील उपसभापति हरिवंश यांनी शेतकऱ्यांच्या दृष्टीने अतिसंवेदनशील असलेली तीन विधेयके चर्चेला फारसा वेळ न देता, अतिघाईत संमत करवली होती. हरिवंश यांनी तर सरकारच्या चाटुकारितेचा कळस केला आणि एका दुरुस्तीवर विरोधी पक्षांनी मतविभाजन मागूनही ते मान्य केले नव्हते. नियमानुसार कुणाही सदस्यांने मतविभाजन मागितल्यावर ते नाकारण्याचा अधिकार पीठासीन अधिकाऱ्याला नसतो. परंतु हा नियमबाह्य प्रकार मोदींच्या काळातील संसदेत घडलेला आहे. विधेयकांच्या तपशीलवार छाननीसाठी ती संबंधित मंत्रालयांच्या संसदीय स्थायी समितीकडे सोपविण्याची पध्दतच पीठासीन प्रमुख या नात्याने ओम बिडला यांनी जवळपास बंदच करुन टाकली आणि या निःपक्ष विचारविनिमय, सल्लामसलत आणि सर्वसंमतीच्या प्रक्रियेचा गळा घोटला. कितीतरी विषय सांगता येतील. याठिकाणी चीनने प्रत्यक्ष नियंत्रण रेषेचे लडाख क्षेत्रात केलेल्या घुसखोरीच्या विषयाची आठवण झाल्याखेरीज राहत नाही. हा अत्यंत ज्वलंत विषय आहे. याचे कारण अद्यापही या विषयाची पुरेशी सोडवणूक झालेली नाही. या विषयावर सभागृहात चर्चा होऊ देण्यात आलेली नाही. संरक्षण, देशाची सुरक्षा आणि संवेदनशीलता अशी कारणे देऊन या विषयावर चर्चा नाकारण्यात आली. शेतीविषयक घाईने संमत करण्यात आलेल्या कायद्यांच्या विरोधात शेतकऱ्यांनी दिल्लीला घेराओ

करीत आंदोलन केले होते. हा तर विषय ताजा असूनही त्यावेळी लोकसभेत या विषयावर स्थगन प्रस्तावाद्वारे चर्चा नाकारण्यात आली. केवळ सरकारला स्थागन प्रस्तावाखाली चर्चा नको आहे यासाठी ओम बिडला यांनी एकही स्थगन प्रस्ताव मंजूर न करता ते सरसकट फेटाळण्याची अत्यंत पक्षपाती आणि अन्यायकारक अशी भूमिका पाच वर्षे घेतली. त्यांच्या आधी सुमित्रा महाजन यांचा काळही फारसा वेगळा नव्हता. ओम बिडला विरोधी पक्षांवर ज्या पध्दतीने डाफरतात ती पध्दतही अत्यंत अयोग्य, अवमानकारक आणि अशोभनीय आहे. अत्यंत तुच्छतेने ते विरोधी सदस्यांना खाली बसण्यास सांगतात. केवळ त्यांच्या त्या खुर्चीचा आणि पदाचा मान व आदर राखण्यासाठी विरोधी पक्षांचे सदस्य त्यांचे हे आचरण व वर्तन सहन करतात असे दिसून येते. कायद्यानुसार लोकसभा अध्यक्ष किंवा राज्यसभेचे सभापति यांना काही विशेषाधिकार प्राप्त झालेले आहेत. परंतु त्याचा अधिक वापर विरोधी पक्षांबाबतच केला जात असल्याची स्थिती आहे. गेल्या म्हणजेच सतराव्या लोकसभेत भाजपच्या अनेक सदस्यांनी मर्यादा ओलांडणारे वर्तन अनेक वेळेस केल्याचे प्रसंग घडले आणि लोकसभा अध्यक्षांनी क्वचितच त्यांच्याविरुध्द कारवाईचा बडगा उगारल्याचे आढळून आले. भाजपचे दिल्लीतून निवडून आलेले रमेश बिधुडी नावाचे सदस्य होते. त्यांनी लोकसभेचेच एक अन्य सदस्य दानिश अलि यांच्याबद्दल अत्यंत खालच्या पातळीवर जाऊन असंसदीय शब्दात टिप्पण्या केल्या होत्या. परंतु लोकसभा अध्यक्षांनी त्यांना कोणतेही शासन केले किंवा सत्तापक्षाच्या अशा असभ्य आणि रानटी सदस्यांना शिस्त लावण्यासाठी आपल्या अधिकाराचा वापर केला असेही कधी दिसून आले नाही. विरोधी पक्षांनी लहानशी चूक जरी केली तरी त्याबाबत गंभीर कारवाईचे पाऊल अनेकवेळेस उचलले गेले परंतु सत्तापक्षाच्या काही अमर्याद सदस्यांना मात्र मोकळे रान देण्यात आल्याचे चित्र सतराव्या लोकसभेत दिसून आले होते. त्यामुळेच ओम बिडला यांची अध्यक्षपदी पुन्हा निवड झाल्यानंतर विरोधी बाकांवरुन जी भाषणे करण्यात आली ती लक्षात घेण्यासारखी आहेत. ओम बिडला यांनी किमान १८व्या लोकसभेत तरी आपल्या निःपक्ष कार्यपध्दतीचा परिचय करुन द्यावा अशी अपेक्षा आहे. परंतु पहिल्याच दिवशीचे त्यांचे आचरण पाहता त्यांच्यात काही सकारात्मक बदल झाला आहे असे खात्रीने म्हटता येणार नाही.

लोकसभा अध्यक्षांची निवड प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर आणि ते पीठासीन म्हणजेच त्यांच्या आसनावर स्थानापन्न झाल्यानंतर सभागृहातर्फे त्यांचा गौरव करण्यात येतो. सर्व पक्षांचे गटनेते प्रामुख्याने भाषणे करतात. राहूल गांधी यांनी त्यांच्या भाषणात सर्वसामान्य जनतेच्या इच्छा-आकांक्षांचे प्रतिनिधित्व करणारे सर्वोच्च सभागृह असल्याचे सांगून विरोधी पक्ष ज्यावेळी या सामान्य जनतेचे प्रश्न सभागृहात उपस्थित करतील तेव्हा त्या सामान्य लोकांचा आवाज येथे ऐकायला यावा अशी अपेक्षा व्यक्त केली. अखिलेश यादव यांनी व इतरांनी देखील १४५ सदस्यांना गेल्या लोकसभेत निलंबित करण्याच्या अत्यंत कडवट घटनेचा उल्लेख आवर्जुन केला. असा प्रकार या नव्या लोकसभेत केला जाऊ नये असे त्यांनी अत्यंत सूचक आणि सभ्य भाषेत मांडले. लोकसभा अध्यक्ष हे सभागृहाचे आणि सर्व पक्षांच्या सदस्यांच्या हक्कांचे संरक्षण असतात. त्या नात्याने जसा विरोधी सदस्यांना शिस्त लावण्याचा अधिकार अध्यक्षांना आहे तो अधिकार त्यांनी सत्तापक्षाच्या सदस्यांबाबतही समानतेने वापरावा असे अखिलेश यांनी स्पष्टपणे ओम बिडला यांना सुचविले. शहाण्याला शब्दाचा मार असतो. परंतु या भाषणांनंतर ओम बिडला यांनी वर उल्लेख केल्याप्रमाणे विरोधी सदस्यांना ज्या पद्धतीने दमदाटीयुक्त पध्दतीने अत्यंत तुच्छतेने सुनावले ते पाहता त्यांच्यात बदल झालेला असावा अशी भावना निर्माण होत नाही.

येथपर्यंत तर ठीक होते. गौरवपर भाषणांनंतर अध्यक्ष हे उत्तरादाखल आभाराचे भाषण करीत असतात. तेही ओम बिडला यांनी केले. सर्वसाधारणपणे यानंतर कामकाज संपणे अपेक्षित असते. परंतु अचानक ओम बिडला यांनी ते सभागृहातर्फे एक ठराव मांडत असल्याचे जाहीर केले. १९७५ मध्ये २५ व २६ जूनच्या मध्यरात्री देशात आणीबाणी लागू करण्यात आली होती. त्याच्या विरुध्द हा ठराव मांडण्यात आला. या ठरावाचे वाचन ओम बिडला यांनी केले. यामध्ये आणीबाणीच्या निर्णयाचा निषेध करण्यात आलेला होता. येथपर्यंत देखील ठीक होते परंतु या लांबलचक ठरावात तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांचे नाव घेऊन त्यांच्यावर टीका करण्यात आली होती. या आणीबाणीला विरोध करताना अनेकजण निधन पावले होते त्यांचे स्मरण करतानाच त्यांना श्रध्दांजलि म्हणून सभागृहात मौन पाळण्याचे आवाहन करण्यात आले होते. यानंतर उभे राहून व मौन पाळून सभागृहाने श्रध्दांजलि वाहिली व कामकाज तत्काळ तहकूब करण्यात आले. खरे तर इतिहासात पन्नास वर्षांपूर्वी घडलेल्या या प्रसंगाचा एवढ्या गाजावाजाने पुनरुच्चार करण्याचे कोणतेच कारण नव्हते किंवा त्याचे औचित्यही नव्हते. परंतु ओम बिडला यांनी औचित्यभंगाचा हा प्रकार केला. हे त्यांनी त्यांच्या बुद्दीने केले काय हा प्रश्न निश्चितपणे निर्माण होतो. कारण यामागे सरकारचा आणि सत्ताधारी नेतृत्वाचा हात असल्याचा वास येतो. आणीबाणीचे समर्थन कुणीच करणार नाही परंतु तो अध्याय संपलेला असल्याने पुनःपुन्हा त्याची आठवण करुन देण्यात काहीच हशील नाही. परंतु इतिहासात रमणारे नेतृत्व असले की अशा गोष्टी घडतात. त्याचबरोबर आणीबाणीच्या विरोधात ठराव आणून काँग्रेस आणि त्यांच्या नेतृत्वाखालील इंडिया आघाडीत फूट पाडण्याचा फुटकळ प्रयत्न मोदी-शहांनी केलेला आढळतो. यामागे त्यांचेच डोके असणार हे स्पष्टपणे दिसते. म्हणजेच या जोडगोळीला अशा गोष्टी व प्रसंग उकरुन

विरोधी पक्षांना सतत उचकविण्याचा प्रकार करायचा आहे हे यावरुन स्पष्ट होते. म्हणजेच त्यांना संसदेचे कामकाज सुरळीतपणे होऊ देण्याची इच्छा नाही हे त्यांनी पहिल्याच दिवशी ही चाल खेळून स्पष्ट केले आहे. त्यामुळेच मतदारांनी एवढी मोठी चपराक मारुनही हे कोडगे सुधारलेले नाहीत किंवा बदललेले नाहीत. विरोधी पक्षांना मुद्दाम होऊन खिजविण्याचे प्रकार हे यापुढे करीतच राहणार हे जसे स्पष्ट होते त्याचप्रमाणे ओम बिडला यांनीही या प्रकारात सामील होऊन ते कोणत्या बाजुला अधिक झुकलेले आहेत हे जसे दाखवून दिले तसेच त्यांच्या निःपक्षतेवरही त्यांनी पहिल्याच दिवशी प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. त्यामुळेच विरोधी पक्षांनी त्यांच्याकडून कितीही निःपक्ष आचरणाची अपेक्षा केलेली असली तरी त्यांच्यावर त्या आवाहनाचा यत्किंचितही परिणाम झालेला नाही याची चुणुक हा आणीबाणीविरोधी ठराव अचानकपणे मांडून दाखविलेली आहे. सर्वसामान्यपणे सभागृहातर्फे आणि खुद्द अध्यक्षांतर्फे जेव्हा असे काही ठराव मांडले जातात त्यासंदर्भात सभागृहातील सर्व पक्षांना विश्वासात घेण्याची प्रथा आहे. कारण सर्व पक्षांना अशा ठरावाची पूर्वकल्पना देणे, त्यांची काही मते किंवा सूचना असतील तर त्या विचारात घेणे आणि त्यानंतर सर्वसंमतीने तो सभागृहात मांडण्याची प्रथा आहे. परंतु कसल्याही सभ्य परंपरा, प्रथा किंवा संसदीय संकेत न पाळता ते उधळून लावण्यात धन्यता मानणारी ही मंडळी आहेत. त्यामुळेच अशा एका चांगल्या प्रसंगाची विधळवाट लावण्याचे हे डोके कदाचित ओम बिडला यांचे नसून जोडगोळीचेच असणार असा कयास कुणी लावल्यास ते फारसे वावगे ठरणार नाही. चांगल्या चाललेल्या गोष्टींमध्ये मिठाचा खडा टाकण्याचा विघ्नसंतोषीपणा असले सुमारबुध्दीच करु शकतात कारण त्यांची बुध्दी (?) किंवा डोके याच गोष्टींमध्ये अधिक गतीने चालत असते. नव्या अध्यक्षांच्या निवडीच्या एका चांगल्या प्रसंगाचे या ठरावाने वाटोळे केलेच परंतु ओम बिडला यांना पुन्हा या एका पहिल्याच दिवशीच्या घटनेने पक्षपाताच्या पिंजऱ्यात कायमस्वरुपी उभे करण्यात आले आहे. स्वतः ओम बिडला यांना याची जाणीव आहे की नाही हे कळायला मार्ग नाही परंतु जोडगोळीच्या नादी लागून ते त्यांच्या वैयक्तिक प्रतिष्ठेचे हनन करीत आहेत.

आता आणीबाणीबद्दल देखील काही खुलासे करणे अत्यावश्यक आहे. आणीबाणी ही अयोग्य, अनुचित, घटनाबाह्य आणि भारतीय लोकशाहीला कलंकित करणारी घटना होती. याबद्दल कुणाचेच दुमत असण्याचे कारण नाही. परंतु एकतर ती घोषित आणीबाणी होती. अघोषित नव्हती. दुसरी बाब म्हणजे १९ महिन्यांनंतर ही आणीबाणी उठवून निवडणुका घेण्यात आल्या. त्या निवडणुकीत जनतेने आणीबाणी लादणाऱ्या इंदिरा गांधी यांना व त्यांच्या चिरंजीवांना पराभूत करुन लोकशक्ती दाखवून दिली होती. विशेष म्हणजे इंदिरा गांधी यांनी हा जनमताचा कौल शिरोधार्य मानला. त्याचप्रमाणे त्यांनी आणीबाणीमध्ये ज्या अनुचित गोष्टी घडल्या आणि जनतेला जो त्रास झाला त्याबद्दल किमान दोनवेळेस जाहीर माफी मागितल्याचे पुरावे उपलब्ध आहेत. १९७७ मध्ये लोकसभेच्या निवडणुका जाहीर केल्यानंतर जुन्या दिल्लीतील एका प्रचारसभेत त्यांनी (६ फेब्रुवारी १९७७) आणीबाणीबद्दल लोकांकडे दिलगिरी व्यक्त केली होती. या सर्व त्रासाला आपण स्वतः कारणीभूत ठरलो आणि त्याची जबाबदारी आपण घेतो असे त्यांनी जाहीरपणे मान्य केले होते. यानंतर २४ जानेवारी १९७८ रोजी महाराष्ट्रातच यवतमाळ येथे झालेल्या जाहीर सभेत त्यांनी तपशीलाने आणीबाणीबद्दल निवेदन केलेले आढळते. कोणत्या परिस्थितीत आणीबाणी लागू करावी लागली हे त्यांनी सांगितले. तसेच आणीबाणीत जे अत्याचार झाले ते इतरांनी केलेले असले तरी त्याची जबाबदारी आपण स्वतःवर घेतो आणि त्यात आपण यत्किंचितही बचावाचा पवित्रा घेणार नाही असे सांगून झाल्या प्रकाराबद्दल जनतेची माफी मागत असल्याचे म्हटले होते. आणीबाणी ही चूक होती असेही त्यांनी मान्य केले. हे संदर्भ देणे आवश्यक आहे कारण केवळ इंदिरा गांधी यांची एकच काळी बाजू जनतेसमोर सातत्याने मांडणाऱ्या वर्तमान सत्ताधाऱ्यांची काळी बाजूही मांडणे आवश्यक आहे. आणीबाणी हा जर लोकशाहीवरील एक कलंक म्हणून मानला गेल्यास गुजरातमध्ये तत्कालीन मुख्यमंत्री नरेंद्र मोदी यांच्या कारकिर्दीत झालेले सांप्रदायिक हत्याकांड हा तर मानवतेवरील कलंक होता. त्याबद्दल मोदींनी कधी माफी मागितली आहे? त्यांनी साधा खेद देखील त्याबद्दल व्यक्त केलेला नाही. एका पत्रकाराने धाडसाने त्यांना एवढ्या निरपराधांच्या हत्या त्या दंग्यांमध्ये झाल्या त्याचे वाईट वाटत नाही का, खेद होत नाही का असे विचारले असता मोदींनी मासलेवाईक उत्तर दिले. गाडीखाली एखादे कुत्र्याचे पिल्लू आले किंवा चिरडले तरी दुःख होते असे उत्तर त्यांनी दिले. म्हणजे मूळ प्रश्नाला आणि त्यावरील स्पष्ट उत्तराला बगल देताना त्यांनी कुत्र्याच्या पिल्लाची उपमा देणारे उदाहरण देऊन त्यांच्या मनोवृत्तीचा परिचय दिला होता. या मनोवृत्तीला कोणते विशेषण लावायचे हे ज्याचे त्याने ठरवावे. परंतु ही एक कोडगी मनोवृत्ती आहे असे निश्चितपणे म्हणता येईल. मणिपूरमध्ये गेल्या वर्षीच्या मे महिन्यापासून हिंसाचार, अत्याचार सुरु आहेत तेव्हा या नेत्याला त्याची आठवणही येताना दिसत नाही. बेटी बचाओ बेटी पढाओच्या घोषणा देताना मणिपूरमध्ये एका विशिष्ट समाजातील महिलांना विवस्त्र करुन त्यांची धिंड काढणाऱ्या घटनेचा साधा निषेध देखील या ट्विटरबहाद्दरांनी केलेला आढळत नाही एवढे हे नेतृत्व संवेदनाशून्य व बथ्थड झालेले आहे. त्याबद्दल लोकसभेत ठराव मांडण्याचे किंवा विरोधी पक्षांनी तसा ठराव मांडल्यास तो मान्य करुन घेण्याचे धाडस, सौजन्य महामहिम ओम बिडला दाखवतील काय असा प्रश्न उपस्थित करणे गैरलागू ठरणार नाही.

या घटना केवळ लोकशाहीपुरत्या मर्यादित नाहीत तर मानवतेशी म्हणजेच एका वैश्विक भावनेशी निगडित आहेत. परंतु एवढ्या मोठ्या गोष्टी समजण्याची क्षमता या सुमारबुध्दींमध्ये नाही आणि त्यामुळेच त्यांच्याकडून काही चांगल्या गोष्टींची अपेक्षा करणेही चुकीचे आहे. थोडक्यात सांगायचे झाल्यास या जोडगोळीची मनोवृत्ती बदललेली नाही आणि त्यांची ध्येयधोरणेही बदललेली नाहीत आणि त्यामुळेच यापुढील काळात परिस्थितीत फार काही चांगला गुणात्मक आणि सकारात्मक बदल दिसेल अशी अपेक्षा करणेही धाडसाचे ठरेल.

विरोधी पक्षांच्या सुदैवाने या निवडणुकीत मतदारांनी त्यांना ताकद दिलेली आहे. गेली दहा वर्षे विरोधी पक्ष तुटपुंज्या ताकदीवर लढत होते. आता ते बऱ्याच अंशी सबळ झालेले आहेत. त्यामुळे त्यांना सहजासहजी किंवा यापूर्वीची दहा वर्षे ज्या तुच्छतेना वागविले गेले होते तेवढे आता शक्य होणार नाही. परंतु विरोधी पक्षांना त्यांचा न्याय्य अधिकार न देण्याची हुकुमशाही मनोवृत्ती वर्तमान राज्यकर्त्यांमध्ये असल्याने विरोधी पक्षांचे संख्याबळ वाढूनही ते त्याचा सन्मान करण्याची शक्यता नाही. मतदारांनीच विरोधी पक्षांना ताकद दिलेली आहे आणि ती सरकारवर व सत्तापक्षावर अंकुश ठेवण्यासाठी दिलेली आहे याची जाणीव मोदी-शहांना नाही. किंवा जाणीव असूनही मतदारांचा कौल न मानता त्या जनतेचा अपमान करण्याची त्यांची वृत्ती कायम आहे. ते अद्यापही त्यांच्याच नेहमीच्या आविर्भावात वागत आहेत. त्यामुळे संसदेत किंवा संसदेबाहेरच्या परिस्थितीत फार काही गुणात्मक बदल किंवा सुधारणा होईल अशा भ्रमात विरोधी पक्षांना वावरुन चालणार नाही. त्यांना अतिशय सावध रहावे लागणार आहे. मोदी-शहा हे विरोधी पक्षांना सतत उचकविण्याचा, चिथावण्याचा प्रकार करणार हे स्पष्ट आहे. तो त्यांच्या रणनीतीचा मुख्य भाग आहे. चर्चेला ते घाबरतात कारण चर्चेतूनच त्यांच्या दुष्कृत्यांचा पाढा वाचणे शक्य होते आणि ती जनतेसमोर मांडणे शक्य होते. चर्चा होऊ नये यासाठीच खुसपटे काढून विरोधी पक्षांना चिथावणे आणि प्रक्षुब्ध करुन गोंधळ घालण्यास भाग पाडण्याची त्यांची ही रणनीती आता गेल्या दहा वर्षात स्पष्ट झालेली आहे. अचानकपणे आणीबाणीचा निषेध करणारा ठराव पहिल्याच दिवशी आणण्याचा प्रकार हा याच मालिकेतील आहे. विरोधी पक्षांनी संयम दाखविल्यास आणि मोदी-शहांच्या रणनीतीला शह द्यायचा असेल तर मुद्दाम मणिपूरमधील महिलांवरील अत्याचार, गलवान खोऱ्यात चिनी सैन्याकडून झालेली वीस भारतीय जवानांची हत्या याबाबतचे ठराव मांडण्याची युक्ति करावी आणि जर लोकसभा अध्यक्ष किंवा सरकारने त्यास विरोध केला तर या मानवतेच्या किंवा देशप्रेमाच्या मुद्यांवर त्यांचे खरे स्वरुप उघड करण्यास विरोधी पक्षांना बळ मिळेल. परंतु केवळ आरडाओरडा करणे, सभागृहाचे कामकाज बंद पाडणे हे यापुढील काळात निरर्थक ठरेल याचे कारण मतदारांनी विरोधी पक्षांना आता पुरेशी ताकद दिलेली आहे. त्या ताकदीचा जनतेसाठी वापर करण्याची मोठी संधी विरोधी पक्षांना उपलब्ध आहे. त्याद्वारेच ते मोदी-शहा जोडगोळीचे खरे स्वरुप जनतेसमोर उघडकीस आणू शकतील.

याठिकाणी आणखी एक सावधगिरीचा संदेश देणे आवश्यक आहे. लोकसभेच्या निवडणुकीत विरोधी पक्षांनी मोदी-शहा जोडगोळी राज्यघटना बदलणार असल्याचा मुद्दा प्रभावीपणे लोकांपर्यंत पोहोचविला होता. त्यामुळे भाजपला फटका बसल्याचे मोदी-शहांच्या लक्षात आले आहे. त्यामुळे यापुढील काळात ते विरोधी पक्षांनी व विशेषतः काँग्रेसला एकटे पाडण्यासाठी म्हणजेच इतर मित्रपक्षांपासून वेगळे पाडण्यासाठी काँग्रेसने किती घटनादुरुस्त्या केल्या आणीबाणीतील ४२वी घटनादुरुस्ती असे अनेक मुद्दे हिरीरीने आणि उच्चरवाने मांडण्याची पूर्ण शक्यता आहे. मोदी देखील त्यांच्या लोकसभेतील भाषणात (राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील धन्यवाद प्रस्तावावरील चर्चेच्या उत्तरादाखल त्यांना पहिले भाषण करण्याची संधी मिळणार आहे) या मुद्यावर विशेषत्वाने भर देतील हे स्पष्ट आहे. संसदेत त्यांनी अलीकडेच राज्यघटनेची प्रत डोक्याला लावण्याचे एक मोठे नाटक केलेले सर्वांच्या लक्षात असेलच. त्यामुळे यापुढील काळात मोदी ते किती राज्यघटनेला बांधील आहेत हे दाखविण्यासाठी भलीमोठी नाटके करण्याची शक्यता आहे. ती लक्षात ठेवूनच विरोधी पक्षांनी त्यांची प्रत्युत्तराची तयारी करणे आवश्यक असेल. सर्वात महत्वाचे उदाहरण लोकसभेचे उपाध्यक्षपद या सरकारने गेली पाच वर्षे रिकामेच ठेवले होते आणि राज्यघटनेचा उपमर्द केला होता हे आहे. त्यावर विरोधी पक्षांनी जोर आणि भर दिला पाहिजे. अशी असंख्य उदाहरणे आहेत जेथे या जोडगोळीने राज्यघटनेशी विसंगत आचरण केलेले आहे. ती शोधून उघडकीस आणून त्यांचा पर्दाफाश करण्याची वेळ आहे. त्यासाठी विरोधी पक्षांना विलक्षण तयारी व गृहपाठ करावा लागेल. आक्रस्ताळेपणा सोडून शांत परंतु ठाम युक्तिवाद करण्याची तयारी करावी लागणार आहे. तरच मतदारांनी विरोधी पक्षांना या निवडणुकीत जे तुल्यबळ स्थान दिले आहे ते सार्थक ठरेल. अन्यथा या जोडगोळीच्या फूटपाड्या विघातक कारवायांना बळी पडून विरोधी पक्ष मतदारांना दिलेला कौल व ताकदीशी प्रतारणा करणारे ठरतील. त्यासाठी या जोडगोळीच्या कारवायांबाबत विरोधी पक्षांना विलक्षण सावध रहावे लागणार आहे. केवळ संख्याबळ वाढले म्हणून गाफील राहून चालणार नाही. जोडगोळी बदललेली नाही, बदलणार नाही याची खूणगाठ मनाशी बांधूनच विरोधकांना पावलोपावली सावध राहून यापुढील मार्ग चालावा लागणार आहे.

डॉ. सुधीर भोंगळे



# आलेख भारतीय बचतीच्या वाटचालीचा

अभय टिळक



**कुटुंबसंस्थांच्या वित्तीय बचतीचे देशी ठोकळ उत्पादनाशी असणारे सरासरी प्रमाण सतत घसरत राहणे, हे व्यापक अर्थकारणाच्या दृष्टीनेही अहितकारक शाबीत होईल, असाही इशारा ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ देत आहेत. कोणत्याही अर्थव्यवस्थेतील कुटुंबसंस्थांचा घटक हा वित्तीय बचतीचा मुख्य स्रोत गणला जातो. उद्योगव्यवसाय आणि शासनसंस्था हे अर्थकारणातील अन्य दोन मुख्य घटक हे कुटुंबसंस्थांनी बचतरूपाने संचयित केलेल्या निधीचे लाभार्थी ठरतात. कारण, कुटुंबसंस्थांची बचत हीच या दोन घटकांना गुंतवणूकयोग्य भांडवलाच्या रूपाने उपलब्ध होत असते. कुटुंबसंस्थांच्या वित्तीय बचतीलाच कसर लागली तर अर्थव्यवस्थेतील बचतीचा प्रवाह आटून एकीकडे व्याजांचे सरासरी दर चढण्यास प्रारंभ होईल आणि दुसरीकडे देशी अर्थव्यवस्थेचे परकीय भांडवलावरील अवलंबन सघन बनेल. या दोन्ही बाबी अर्थकारणाच्या प्रकृतीला मानणाया नसतात व नाहीत.**








आर्थिक विकासाच्या गतीचा आणि गुंतवणुकीचा सहसंबंध सर्वज्ञात आहे. अर्थव्यवस्थेत नव्याने केल्या जाणाया गुंतवणुकीद्वारे उत्पादनक्षमतेमध्ये वाढ घडून येते. वाढत्या उत्पादनक्षमतेद्वारे वाढीव उत्पादन साध्य होते. उत्पादनवाढ सुरू झाली की रोजगारनिर्मितीला चालना मिळते. रोजगारवाढीमधून क्रयशक्तीतील वाढ वेग पकडते. वाढलेली क्रयशक्ती उपभोगाकडे वापरली गेली की बाजारपेठेतील मागणी वाढते. वाढलेली मागणी, यथावकाश, उत्पादनक्षमतेमध्ये वाढ घडवून आणण्याचे नवीन चक्र गतिमान बनवण्याचा इषारा देते. वाढीव उत्पादनक्षमता, तिच्याद्वारे वाढीव उत्पादन, त्यांद्वारे नव्याने रोजगारनिर्मिती, तिच्याद्वारे क्रयशक्तीची निर्मिती होऊ न मागणीतील वाढ, वाढलेल्या मागणीद्वारे अधिक उत्पादनक्षमतेची निकड...हे चक्र मग स्वयंगतीने असेच फिरत राहते. गुंतवणूक हा या सगळ्या चक्राचा पाया

ठरतो तो असा.

गुंतवणुकीचे प्रवाह दोन. एका प्रवाहाचा उगम असतो देशांतर्गत असतो तर दुसरा असतो देशाबाहेरू न येणारा. त्या प्रवाहालाच म्हणतात 'परकीय गुंतवणूक'. ही परकीय गुंतवणुकदेखील पुन्हा दोन प्रकारची. 'प्रत्यक्ष' आणि 'अप्रत्यक्ष' अशी ही तिची दोन रू पे. बचत, गुंतवणूक आणि आर्थिक वाढविकासाचा सरासरी वार्षिक वेग यांचा आतडएाचा संबंध असतो. अर्थव्यवस्था दरसाल सरासरी किती वेगाने आगेकूच करू शकेल, हे दोन बाबींवर निर्भर राहते. देशांतर्गत भांडवली गुंतवणुकीचे प्रमाण आणि उपलब्ध भांडवलाची उत्पादकता हे होय ते दोन घटक. कोणत्याही जिनसेचे एक एकक उत्पादन करण्यासाठी किती एकक भांडवल गरजेचे ठरते, यावर उपलब्ध भांडवलाची उत्पादकता ठरते. तांत्रिक परिभाषेत यालाच 'कॅपिटल-आउटपुट रेशो', असे म्हणतात. भांडवलाची उत्पादकता ठरत असते अर्थव्यवस्थेत उपलब्ध असणाया तंत्रशास्त्राच्या दर्जावर. त्यांमुळे, तंत्रशास्त्राचा दर्जा आणि भांडवलाची मात्रा या दोहोंचा प्रभाव पडत राहतो अर्थविकासाच्या सरासरी गतीवर.

परकीय गुंतवणुकीच्या दोन प्रकारांपैकी परकीय थेट गुंतवणुकीलाच तुलनेने अधिक झुकते माप दिले जाण्यामागील मुख्य कारण आपल्याला सापडते ते इथेच. परकीय थेट गुंतवणूक म्हणजे केवळ रु पये अथवा डॉलरच्या स्वरू पातील नगद रक्कम नव्हे. परकीय थेट गुंतवणूक नगद स्वरू पातील भांडवलासोबतच बरोबर परकीय तंत्रज्ञानदेखील घेऊ न येत असते. अधिक प्रगत तंत्रशास्त्राद्वारे उपलब्ध भांडवलाचा अधिक उत्पादक वापर शक्य बनतो. परंतु, मुळात परकीय भांडवलाची एखाद्या अर्थव्यवस्थेला निकड का भासावी, हा प्रश्न कळीचा ठरतो. अर्थव्यवस्थेची दरसाल आगेकूच ज्या सरासरी गतीने घडवून आणण्याचे मनसुबे त्या त्या देशाचे धुरीण व धोरणकर्ते रचत असतात तो प्रगतीचा ईप्सित वेग व्यवहारात उतरविण्याइतपत भांडवली गुंतवणूक त्या त्या देशापाशी नसेल तर परकीय देशांमधील भांडवलाला लाल पायघडएा अंथरण्यावाचून पर्याय राहत नाही.



हे एवढएावरच संपत नाही. देशी अर्थव्यवस्थेमध्ये प्रवेशणारी परकीय भांडवली गुंतवणूक ही थेट अथवा प्रत्यक्ष स्वरू पाची आहे की अप्रत्यक्ष त्यांवरही बरेच काही अवलंबून राहते. समजा, एखाद्या देशाच्या अर्थव्यवस्थेमध्ये चढएा व्याजदरांचा माहौल नांदत असेल, त्या अर्थव्यवस्थेच्या आगेकूचीचा वार्षिक सरासरी दर एकंदरीने दमदार असेल, देशाच्या वित्तीय तुटीचे प्रमाण नेमस्त असेल, शेअर बाजाराची कमान चढती दिशा टिकवून असेल तर परकीय वित्तसंस्था त्यांच्यापाशी असणारे गुंतवणूकयोग्य भांडवल त्या अर्थव्यवस्थेकडे वळवतात. असे परकीय भांडवल, बहुश:, संबंधित अर्थव्यवस्थेतील शेअर बाजारांत समभागांच्या खरेदीद्वारे गुंतवले जाते. शास्त्रीय परिभाषेत अशा गुंतवणुकीला 'परकीय (वित्त)संस्थात्मक गुंतवणूक' (फॉरिन इन्स्टिटएूशनल इन्व्हेस्टमेन्ट – एफआयआय) असे संबोधले जाते. अशी गुंतवणूक स्वरू पत:च अल्पकालीक असते. संबंधित अर्थव्यवस्थेच्या प्रकृतीमध्ये अंमळ हेलकावे निर्माण होऊ लागले की परकीय वित्तसंस्था तिथे गुंतवलेला आपला पैसा लगोलग काढून घेत बाहेरचा रस्ता धरतात. संबंधित अर्थव्यवस्थेमध्ये जोवर चलती आहे तोवर आपल्या गुंतवणुकीवर भरघोस परतावा पदरात पाडून घेणे, हा अशा गुंतवणुकीचा तात्कालीक हेतू असतो. घराबाहेर पडल्यानंतर आपण आपले वाहन वाहनतळावर 'पार्क' करू न ठेवतो, तशातलाच हा प्रकार.

## देशी बचत आणि परकीय गुंतवणूक

संबंधित अर्थव्यवस्थेच्या शेअर बाजारांत त्यांपायी अस्थिरता निर्माण होऊ न सर्वसामान्य गुंतवणुकदारांना झळ पोहोचते. त्या देशाच्या चलनाचा विनिमय दरही त्यांमुळे बाधित होतो, हे तर निराळेच. परकीय वित्तसंस्था ज्या वेळी देशी शेअर बाजारातील गुंतवणूक तिथून काढून घ्यावयास सुरु वात करतात तेव्हा साहजिकच त्यांनी त्या अर्थव्यवस्थेच्या चलनामध्ये गुंतवलेली त्यांची पुंजी पुन्हा डॉलरसारख्या आंतरराष्ट्रीय चलनात रूपांतरित करून घेतात. परिणामी, संबंधित अर्थव्यवस्थेतील विदेशी चलनाच्या बाजारपेठेत देशी चलनाच्या तुलनेत डॉलरसारख्या परकीय चलनाला असणारी मागणी वधारते. साहजिकच, डॉलरसारख्या परकीय चलनाच्या तुलनेत देशी चलनाचा मूल्यहास घडून येतो. त्याचा फटका बसतो त्या देशाच्या विदेशी व्यापाराला. देशी चलनाचा मूल्यहास घडून आल्याने संबंधित अर्थव्यवस्थेमध्ये केली जाणारी आयात देशी चलनाच्या रू पात महाग ठरू लागते. देशी चलनाचा मूल्यहास घडून येण्याने स्वस्त

शाबीत होणाया त्या देशाच्या निर्यातीने त्या काळात उचल घेतली नाही तर, देशी चलनाचा घडून आलेला मूल्यहास त्या देशाच्या विदेशी व्यापाराच्या चालू खात्यावरील तुटीस कारणभूत ठरतो.

जी परकीय गुंतवणूक एखाद्या अर्थव्यवस्थेमध्ये दीर्घकाळ नांदण्याच्या उद्देशाने प्रवृत्त असते तिची गणना परकीय थेट गुंतवणूक म्हणून केली जाते. एखाद्या अमेरिकी उद्योगाने दुसया देशातील एखादी कंपनी अगर उद्योग संपूर्णतया खरेदी करणे, दुसया देशात आपण नवीन कंपनी स्थापन करणे, अन्य एखाद्या देशात आपल्या उद्योगाचा पूरक उद्योग स्थापन करणे, दुसया देशातील एखाद्या कंपनीच्या भागभांडवलाचा मोठा हिस्सा खरेदी करू न तिच्या निर्णयप्रक्रियेमध्ये निर्णायक हिस्सा मिळवणे...ही सारे परकीय थेट गुंतवणुकीची रू पे होत. अशी गुंतवणूक निव्वळ तात्कालीक लाभांवर दृष्टी ठेवून केलेली नसते. त्यांमुळे, परकीय वित्तसंस्थात्मक गुंतवणुकीपेक्षा अशी परकीय थेट गुंतवणूक संबंधित अर्थव्यवस्थेच्या लेखी दीर्घकालीक हिताची व लाभाची ठरते. परंतु, परकीय थेट गुंतवणूक अथवा परकीय संस्थात्मक गुंतवणूक ही कोणत्याही देशाच्या अंतर्गत (देशी) गुंतवणुकीला संपूर्णपणे पर्याय मात्र ठरू शकत नाही, ही बाब कोणालाच कधीही विसरता येत नाही.

एखाद्या देशाची गुंतवणुकीची एकंदर गरज आणि संबंधित देशामध्ये निर्माण होणारी देशी बचत या दोहोंमधील तफावत परकीय गुंतवणूक भरू न काढत असते, एवढेच. देशी अर्थव्यवस्थेच्या वार्षिक सरासरी वाढीचा वेग किती असावा या संदर्भातील उद्दिष्ट एकदा का निश्चित केल्यानंतर देशी ठोकळ उत्पादनवाढीचा तो वेग प्रत्यक्षात साध्य करण्यासाठी गुंतवणुकीची मात्रा काय व किती असावयास हवी, ते त्या त्या देशाच्या भांडवल-उत्पादन प्रमाणावर (कॅपिटल-आउटपुट रेशो) निर्भर राहते. देशी भांडवलाची जी काही सरासरी उत्पादकता असेल ती ध्यानात घेता, देशी ठोकळ उत्पादनातील सरासरी वार्षिक वाढीचे जे काही उद्दिष्ट नजरेसमोर ठेवलेले असेल ते गाठण्यासाठी आवश्यक असणारी गुंतवणुकीची मात्रा देशी बचतीच्या बळावर उभी राहू शकत नाही, असे एकदा का नजरेस आले की मग परकीय भांडवलाच्या टेकूवर अवलंबून राहण्याखेरीज गत्यंतर उरत नसते.

देशांतर्गत गुंतवणुकयोग्य भांडवलाची मात्रा, यांमुळे, मुख्यत: अवलंबून राहते ती देशांतर्गत बचतीच्या प्रमाणावर अथवा सरासरी बचतप्रवृत्तीवर. म्हणजेच, अंतिमत:, देशी अर्थव्यवस्थेच्या वार्षिक सरासरी वाढीचा वेग, मुख्यत:, निर्भर राहतो तो देशी बचतीच्या सरासरी प्रमाणावर. त्यांमुळे, देशी बचतीचे प्रमाण आणि देशी बचतीची सरासरी मात्रा निर्धारित करणारी देशांतर्गत सरासरी बचतप्रवणता हा अर्थविकासाच्या वाढविस्तारासंदर्भात अखेर कळीचा मुद्दा शाबीत होतो. कुटुंबसंस्थांची बचत, कॉर्पोरेट विङाची बचत आणि शासनसंस्थांची बचत अशा तीन स्त्रोतांच्या एकत्रित बचतीचे देशाच्या ठोकळ देशी उत्पादनाशी असलेले प्रमाण म्हणजे त्या त्या देशाची बचतीची सरासरी पातळी, असे सोप्या शब्दांत सांगता येईल. देशी बचतीचे आणि देशी






गुंतवणुकीचे देशी ठोकळ उत्पादनाशी असलेले सरासरी प्रमाण आपल्या देशात आजवर कशा प्रकारे गतिमान राहिलेले आहे, हे बघणे या टप्प्यावर आता उपकारक ठरावे.

दरवर्षी देशाचे अंदाजपत्रक संसदेच्या पटलावर सादर केले जाण्यापूर्वी 'आर्थिक सर्वेक्षण अहवाल' नावाचा एक दस्तऐवज सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येतो. येऊ घातलेल्या नवीन वित्तीय वर्षासाठी



सरकार सादर करत असलेल्या अंदाजपत्रकाचा अवघा आर्थिक पार्श्वपट त्यात मांडलेला असतो. सन २०२२-२३ या वित्तीय वर्षासाठीचा जो आर्थिक पाहणी अहवाल तयार करण्यात आलेला आहे त्यांत देशी बचत व गुंतवणुकीच्या देशी ठोकळ उत्पादनाशी असलेल्या प्रमाणाची दीर्घकालीक सांख्यिकी सादर केलेली सापडते. ही आकडेवारी मोठी रोचक व तितकीच अभ्यसनीय होय. देश स्वतंत्र झाला त्या वेळी, म्हणजे, १९५०-५१ या वित्तीय वर्षात बचतीचे देशी ठोकळ उत्पादनाशी असणारे प्रमाण होते ९.४ टक्के इतके. हे प्रमाण दुपटीवर जाण्यास पुढील तब्बल पाव शतक सरावे लागले. १९७७-७८ या वित्तीय वर्षात देशी बचतीचे देशी ठोकळ उत्पादनाशी असणारे प्रमाण होते १८.६ टक्के असे. लक्षणीय बाब म्हणजे, १९७७-७८ या वर्षात बचतीचे देशी ठोकळ उत्पादनाशी असणारे प्रमाण त्या पातळीवरून दुप्पट होण्यास पुढील तीन दशके उजाडली. २००७-०८ या वित्तीय वर्षात बचतीचे देशी ठोकळ उत्पादनाशी असणारे प्रमाण जाऊन पोहोचले होते ३७.८ टक्क्यांवर. योगायोगाची बाब म्हणजे, देशाच्या स्वातंत्र्योत्तर वाटचालीतील आजवरची ती सर्वाधिक पातळी ठरते. कारण, २००७-०८ या वित्तीय वर्षानंतर बचतीच्या देशी ठोकळ उत्पादनाशी असणाया सरासरी प्रमाणाल सतत घसरणच लागलेली दिसते. सन २०२०-२१ या वित्तीय वर्षामध्ये बचतीचे हे प्रमाण घसरले २८.२ टक्क्यांपर्यंत. साधारणपणे १९९९-२००० सालापासून देशी ठोकळ उत्पादन पुढील किमान आठ ते नऊ वर्षे सलग सणसणीत दराने दरवर्षी आगेकूच करत होते, हे वास्तव या संदर्भात अधोरेखित करावयास हवे. १९५०-५१, १९७७-७८ आणि २००७-०८ या तीन कालबिंदूंवर देशी गुंतवणुकीचे देशी ठोकळ उत्पादनाशी असणारे प्रमाण अनुक्रमे १०.१ टक्के, १९.३ टक्के आणि ३९.१ टक्के असे राहिल्याचे संबंधित आकडेवारी सांगते.

## देशांतर्गत बचतीची जडणघडण

देशांतर्गत बचतीची जडणघडण या संपूर्ण कालखंडात कशा प्रकारे बदलत गेली याचा आढावादेखील जितका रोचक तितकाच उद्बोधक ठरावा. आर्थिक सर्वेक्षण अहवालातील तक्त्यात सादर केलेली आकडेवारी पाहिली तर, १९५०-५१ ते २००४-०५ या साडेतीन दशकांच्या प्रदीर्घ कालावधीदरम्यान कुटुंबसंस्थांच्या माध्यमातून केल्या जाणाया बचतीचे एकंदर देशी बचतीशी असणारे प्रमाण सरासरी ६८ टक्के ते ७१ टक्के यांदरम्यान फिरताना दिसते. या संपूर्ण कालखंडादरम्यान खासगी कॉर्पोरेट विङााच्या बचतीचे एकंदर देशी बचतीशी असलेले सरासरी प्रमाण दुहेरी आकडएांपर्यंत कधीच पोहोचले नाही. हे प्रमाण १९५०-५१ ते २००३-०४ या काळात जेमतेम एक टक्का ते चार टक्के याचदरम्यान फिरत होते.

२००४-०५ या वर्षात ते २००३-०४ या वित्तीय वर्षातील ४.३ टक्के या प्रमाणावरून न वाढून थेट दुप्पट म्हणजे ८.७ टक्के असे झाले. २००५-०६ सालापासून ते पुढे दशकभर, म्हणजे, २०२०-२१ या वित्तीय वर्षापर्यंत खासगी कॉर्पोरेट विङााच्या बचतीचे देशी बचतीशी असणारे सरासरी प्रमाण सातत्याने १० टक्क्यांच्या परिसरात राहिलेले दिसते.

डोळ्यांत भरणारी बाब म्हणजे, १९५०-५१ ते २०२०-२१ या ५० वर्षांच्या वाटचालीदरम्यान शासनसंस्थेच्या बचतीचे देशी एकंदर बचतीशी असणारे सरासरी प्रमाण बहुतेक काळ एक ते तीन टक्क्यांदरम्यानच घोटाळत राहिल्याचे आकडेवारी दर्शविते. या पाच दशकी प्रवासादरम्यान केवळ सातच वर्षे अशी दिसतात जिथे शासनसंस्थेच्या बचतीचे देशी बचतीशी असणारे प्रमाण चार टक्क्यांपर्यंत उंचावलेले सापडते. या सात वर्षांमध्येदेखील पुन्हा, पाच सलग वर्षे व एका वर्षाच्या 'गॅप'नंतर दोन सलग वर्षे, असे दोन टप्पे दिसतात.

१९७५-७६ ते १९७९-८० ही सलग पाच वर्षे आणि १९८१-८२ व १९८२-८३ ही त्या नंतरची दोन वर्षे, अशी ती सात वर्षे भरतात. १९५०-५१ ते २०२०-२१ या कालखंडात केवळ एकाच वित्तीय वर्षात, म्हणजे, २००७-०८ या वित्तीय वर्षात शासनसंस्थेच्या बचतीचे देशी बचतीशी असणारे प्रमाण पाच टक्के इतके दिसते. शासनसंस्थेच्या बचतीचे देशी ठोकळ उत्पादनाशी असणाया बचतीशी भरलेले ते प्रमाण अगदी आजवरच्या वाटचालीदरम्यानचे सर्वोच्च ठरते. नेमक्या त्याच वित्तीय वर्षात खासगी कॉर्पोरेट विङााच्या बचतीचे देशी बचतीशी असणारे प्रमाणदेखील १२ टक्के या आजवरच्या सर्वोच्च पातळीवर होते, हा योगायोगच म्हणावा लागेल.

कुटुंबसंस्थांची बचत हाच आजवर देशी बचतीचा सातत्याने कणा ठरलेली आहे, ही बाब या आकडेवारीवरून सिद्ध होते. वस्तुरूप मालमत्ता, बँकांमधील ठेवी, विमा, भविष्यनिर्वाह निधी तसेच निवृत्तिवेतनादी फंड, म्युच्युअल फंड, रोख रक्कम, अल्पबचतीच्या योजना अशा स्वरूपांत कुटुंबसंस्था त्यांची बचत संचयित करून ठेवतात, असा दाखला आहे.

# जडणघडण कुटुंबसंस्थांच्या बचतीची

बचत आणि उत्पन्न यांचा सहसंबंध थेट व प्रत्यक्ष असतो. दुसया भाषेत सांगावयाचे तर, तुमच्या-माझ्यासारख्या सामान्य नागरिकाच्या सरासरी उत्पन्नामध्ये वाढ घडून आली की बचत करण्याकडे असलेली आपली सरासरी प्रवृत्तीदेखील वाढू लागते. म्हणजेच, दरडोई उत्पन्नातील सरासरी वाढीला समांतर अशा पद्धतीने दरडोई बचतीमध्येही वाढ घडून येण्यास सुरु वात होते. अर्थात, दरडोई उत्पन्नाच्या वेगवेगळ्या स्तरांवर बचतीची सरासरी प्रवृत्तीदेखील निरनिराळी असते, हे वेगळे सांगायची गरज नाही. त्यांमुळे, दरडोई उत्पन्नाच्या सरासरी पातळीतील वाढ हा कुटुंबसंस्थांच्या बचतीमध्ये वाढ घडून येण्याचा स्रोत शाबीत होतो. आपल्याला मिळणाया उत्पन्नातून बचतीच्या रू पाने बाजूला काढून ठेवलेला पैसा कोणत्या स्वरू पात गुंतवायचा हा अर्थातच ज्याच्या त्याच्या पसंतीचा प्रश्न ठरतो. बचतीच्या रू पाने साठविलेले पैसे काही लोक बँकांमध्ये ठेवतात. काहींना आपली बचत शेअर बाजारात गुंतवणे पसंत असते. ज्यांना शेअर बाजारातील चढउतारांचा अभ्यास करत आपल्या बचतीचे मूल्यरक्षण व मूल्यसंवर्धन करणे अवघड वाटते असे लोक म्युच्युअल फंडांचा पर्याय स्वीकारतात. काहींना आपली बचत घरखरेदी अथवा जमीनखरेदीमध्ये गुंतवावीशी वाटते. तर, भारतासारख्या प्राचीन परंपरांचा प्रभाव असणाया देशात अनेक कुटुंबे सोन्याच्या खरेदीला पसंती देतात. जमीनजुमला, घरे, सोने-चांदी यांसारख्या पर्यायांकडे वळवलेली बचत उद्योगधंद्यांना गुंतवणूकयोग्य भांडवलाच्या स्वरू पात उपलब्ध होत नाही. त्यांमुळे, देशांतर्गत कुटुंबांची एकंदर बचत सगळीच्या सगळी गुंतवणूक म्हणून अर्थकारणाला उत्पादक पद्धतीने उपलब्ध होते असे घडत नाही. कुटुंबसंस्थांनी वित्तीय स्वरू पात संचयित केलेली पुंजी गुंतवणुकीसाठी हाताशी येते, हे या ठिकाणी अधोरेखित करावयास हवे.

वित्तीय स्वरूपातील बचतीचे आपल्या देशातील कुटुंबसंस्थांच्या एकंदर बचतीमध्ये असणारे प्रमाण अलीकडील काळात साधारणपणे किती राहिलेले आहे, यांवर दृष्टिक्षेप टाकणे या संदर्भात इथे उद्बोधक ठरावे.



कुटुंबसंस्थांच्या वित्तीय स्वरू पातील बचतीचे त्यांनी केलेल्या निव्वळ बचतीशी असणारे प्रमाण २०१७-१८ या आर्थिक वर्षात होते ३९.६ टक्के इतके.

तर, २०२१-२२ या वित्तीय वर्षात तेच प्रमाण अंमळ घसरू न आलेले दिसते ३८.७७ टक्क्यांवर. म्हणजे, देशातील कुटुंबसंस्थांच्या वित्तीय बचतीचे त्यांच्या निव्वळ बचतीमधील प्रमाण एक तृतीयांशापेक्षाही अधिक असल्याचे अलीकडील काळातील आकडेवारी दर्शविते. भारतातील कुटुंबसंस्थांच्या माध्यमातून वित्तीय स्वरू पात केल्या जाणाया निव्वळ बचतीचे सरासरी प्रमाण देशी ठोकळ उत्पादनाच्या केवळ पाच टक्के इतक्या नीचांकी पातळीपर्यंत घसरण्याबाबतची जी वृत्ते २०२३ सालाच्या उत्तरार्धात प्रकाशित झाली त्यांपायी जो हलकल्लोळ माजला त्याचे कारण आता या सगळ्या चर्चेवरू न स्पष्ट व्हावे.

या संदर्भातील उपलब्ध आकडेवारी बघणे इथे उद्बोधक ठरेल. सन २०११-१२ या वर्षापासूनचा आढावा घेतला तर असे लक्षात येते की, कुटुंबसंस्थांच्या वित्तीय स्वरू पातील ठोकळ बचतीचे देशी ठोकळ उत्पादनाशी असणारे प्रमाण साधारणपणे १० टक्क्यांच्या परिघात राहिलेले आहे. सन २०२०-२१ या वित्तीय वर्षात कुटुंबसंस्थांच्या वित्तीय ठोकळ बचतीचे देशी ठोकळ उत्पादनाशी असणारे प्रमाण १५.४ टक्क्यांपर्यंत एकदम उंचावलेले दिसते. परंतु, २०२०-२१ हे वर्ष अ-साधारण होते, ही बाब विसरता येत नाही. २०२० सालातील मार्च महिन्यापासून सर्वत्र 'कोविड-१९'च्या संसर्गापायी कडेकोट टाळेबंदी जारी झाली. मुदलात बाजारपेठाच बंद असल्यामुळे खरेदी-विक्रीवर पाबंदी आली. त्यांमुळे, देशातील कुटुंबसंस्थांच्या वित्तीय स्वरू पातील ठोकळ बचतीचे देशी ठोकळ उत्पादनाशी असणारे प्रमाण एकदम उंचावलेले दिसण्यामागे सक्तीच्या बचतीचा हिस्सा मोठा असावा, हे तर्कनिष्ठ अनुमान सिद्ध होते. त्याचप्रमाणे, अर्थचक्रच एकदम ठप्प झाल्याने नागरिकांनी जी काही पुंजी जवळ होती ती काटकसरीने वापरावी, हेदेखील स्वाभाविक होते. या दोन्ही घटकांपायी, देशी कुटुंबसंस्थांच्या वित्तीय ठोकळ बचतीचे देशी ठोकळ उत्पादनाशी असणारे प्रमाण २०२०-२१ या वित्तीय वर्षात एकदम १५.४ टक्क्यांपर्यंत उंचावण्यामागील कार्यकारणभाव या पद्धतीने आपल्याला समजावून घेता येतो. त्या नंतरच्या दोन वित्तीय वर्षांत, म्हणजे, २०२१-२२ व २०२२-२३ मध्ये कुटुंबसंस्थांच्या ठोकळ वित्तीय बचतीचे देशी ठोकळ उत्पादनाशी असणारे प्रमाण अनुक्रमे ११.१ टक्के व १०.९ टक्के असे राहिल्याचे संबंधित आकडेवारी आपल्याला सांगते.

या ठिकाणी आपल्याला कुटुंबसंस्थांची वित्तीय 'ठोकळ' बचत व कुटुंबसंस्थांची वित्तीय 'निव्वळ' बचत या दोन संकल्पनांमधील फरक पुढील चर्चेचे सम्यक् आकलन करू न घेण्याच्या दृष्टीने अतिशय अगत्याचे ठरते. कुटुंबसंस्थांनी वित्तीय

साधनांच्या स्वरूपात संचयित केलेल्या एकंदर बचतीला आपण म्हणतो 'ठोकळ' बचत. तर, कुटुंबसंस्थांनी बँका, बँकेतर वित्तीय कंपन्या तसेच गृहकर्ज देणाया कंपन्या आदींकडून घेतलेल्या कर्जांची वजावट त्यांच्या ठोकळ बचतीमधून घडवून आणली की खाली उरते ती होय वित्तीय 'निव्वळ' बचत. २०२०-२१ या वित्तीय वर्षात देशी कुटुंबसंस्थांच्या वित्तीय स्वरूपातील ठोकळ बचतीचे देशी ठोकळ उत्पादनाशी असणारे प्रमाण १५.४ टक्के इतके असताना, देशी कुटुंबसंस्थांच्या वित्तीय स्वरूपातील निव्वळ बचतीचे देशी ठोकळ उत्पादनाशी असणारे प्रमाण होते ११.५ टक्के इतके. त्या आधीच्या दोन वर्षांत, म्हणजे, २०१८-१९ व २०१९-२० या दोन वित्तीय वर्षांत हे प्रमाण होते अनुक्रमे ७.२ टक्के व ७.७ टक्के असे. तर, २०२०-२१ या वित्तीय वर्षानंतरच्या पुढील दोन वित्तीय वर्षांत, म्हणजेच, २०२१-२२ व २०२२-२३ सालांत अनुक्रमे ७.२ टक्के व ५.१ टक्के असे राहिलेले दिसते. कुटुंबसंस्थांच्या वित्तीय निव्वळ बचतीचे देशी ठोकळ उत्पादनाशी असणारे प्रमाण या पातळीपर्यंत घसरल्यामुळे चर्चेने एकदम जोर पकडला कारण, दीर्घकालीक आकडेवारी बघितली तर कुटुंबसंस्थांच्या वित्तीय निव्वळ बचतीचे देशी ठोकळ उत्पादनाशी असणारे प्रमाण आजवर सतत सरासरी सात ते साडेसात टक्क्यांच्या घरात राहिलेले आहे. या दीर्घकालीक सरासरीच्याही खाली २०२२-२३ या वित्तीय वर्षातील प्रमाण (५.१ टक्के) घसरल्याने या पैलूबाबत गंभीर चिंतनमंथन होणे स्वाभाविक ठरते.

कुटुंबसंस्थांच्या वित्तीय स्वरूपातील निव्वळ बचतीचे देशी ठोकळ उत्पादनाशी असणारे प्रमाण २०२२-२३ या वित्तीय वर्षात ५.१ टक्के इतक्या नीचतम पातळीपर्यंत घसरण्यामागील कार्यकारणभाव जाणून घेण्याकडे आपण आता वळू. या संदर्भातील शासकीय टीकाटिप्पणी प्रथम नोंदवावयास हवी. कुटुंबसंस्थांच्या वित्तीय स्वरूपातील निव्वळ ठेवींचे देशी ठोकळ उत्पादनाशी असणारे प्रमाण ५.१ टक्के इतक्या नीचांकी पातळीपर्यंत घसरण्याने फारसे हडबडून जाण्याचे कारण नाही, अशी या संदर्भातील शासकीय भूमिका आहे. आपली बचत रोख अथवा बँकांमधील ठेवी वा कर्जरोख्यांच्या स्वरूपात धारण करण्यापेक्षा त्यांचा विनियोग घरे, वाहने यांसारख्या मालमत्ता धारण करण्याकडे तसेच शिक्षणात गुंतवणूक करण्याकडे कुटुंबसंस्थांचा कल वाढत आहे, असे शासनसंस्थेचे या संदर्भातील विश्लेषण आहे. घरांच्या बाजारपेठेत अलीकडील काळात दिसून येत असलेली चलती, गृहकर्जांची सुलभ असणारी उपलब्धता, माहिती तंत्रज्ञान तसेच माहिती-तंत्रज्ञानाधारित सेवाउद्योगासारख्या व्यवसायक्षेत्रांमध्ये लठ्ठ पगाराच्या नोकयांची संधी, अशा क्षेत्रांमध्ये तरूण उच्चशिक्षितांचा असणारा भरणा आणि आपली बचत वस्तुरूप माध्यमांच्या स्वरूपात संचयित करण्याची या वर्गाची मानसिकता असे घटक या स्थित्यंतराच्या मुळाशी असल्याचे शासनसंस्थेचे या संदर्भातील प्रतिपादनवजा स्पष्टीकरण आहे. 'कोविड'च्या अरिष्टादरम्यान अर्थव्यवस्थेची वाटचाल अबाधित राखण्यासाठी अंगीकारण्यात आलेल्या उदार पैसाधोरणाद्वारे नरम झालेल्या व्याजदरांच्या सरासरी पातळीचा लाभ उठवत, वित्तसंस्थांकडून उचललेल्या कर्जांचा टेकू आपल्या बचतीला पुरवत कुटुंबसंस्थांनी वस्तुरूप मालमत्ता संचयनाचा पंथ पकडल्यामुळे अर्थव्यवस्थेतील भांडवलनिर्मितीला हातभार लागावा ही अंतिमत: हितावह बाबच ठरते, असा शासनसंस्थेचा या संदर्भातील दृष्टिकोन दिसतो.




## निव्वळ वित्तीय बचतीवर प्रभाव दोन घटकांचा

अर्थात, शासनसंस्थेचे हे स्पष्टीकरण संपूर्णतया अ-वास्तव नसले तरी, याच वास्तवाचा अन्य एक पैलूदेखील तितकीच चिंतनीय आहे. मुदलात, बँकांमधील ठेवींवर अदा केला जात असणारा व्याजांचा सरासरी दर उतरती भाजणी दाखवत असेल तर बँकेतील बचत खात्यांमध्ये पैसे ठेवण्यापेक्षा ते कोणत्या ना कोणत्या स्वरूपातील मालमत्तेमध्ये गुंतवण्याचा पर्याय सर्वसामान्य बचतदारांना तुलनेने अधिक आकर्षक वाटावा, हे तर्कशुद्धच शाबीत होते. परंतु, काही विश्लेषकांच्या निरीक्षणानुसार शासनसंस्था या संदर्भात सादर करत असलेले प्रतिपादनदेखील तसेच्या तसे स्वीकारणे अवघड ठरते. कारण, शिक्षण, वाहनखरेदी अथवा घरखरेदी यांसाठी कुटुंबसंस्था उचलत असलेल्या कर्जांच्या वार्षिक वाढीचा जो सरासरी दर आताशा दिसतो आहे त्यापेक्षा क्रेडिट कार्डांद्वारे केलेल्या कर्जाऊ खरेदीच्या वाढीतील वार्षिक सरासरी वेग, सोने गहाण ठेवून घेतलेल्या कर्जांमधील वाढीचा दर, तसेच 'अन्य ग्राहकोपयोगी बाबींकरता' या वर्गवारीत जमा केली

जाणारी कर्जे यांच्यातील वाढीचा वेग हा अधिक आहे. ही सारी कर्जे मालमत्तानिर्मितीसाठीच कुटुंबसंस्था वापरत असतील असे समजणे अ-यथार्थ ठरेल, असे या विश्लेषकांचे प्रतिपादन दिसते. कर्जाऊ घेतलेल्या रकमांद्वारे उपभोग टिकवणे अथवा वाढवणे हे अंतिमत: जोखमीचे ठरते, असा या अभ्यासकांचा सावधगिरीचा सांगावा आहे. आज ना उद्या देशी-विदेशी मध्यवर्ती बँकांनी उदार पैसाधोरणाचा रोख फिरवला की व्याजदरांची आज नरम राखली गेलेली सरासरी पातळी उंचावण्यास उशीर लागणार नाही, असा इषारादेखील हे अभ्यासक देत आहेत. अशा परिस्थितीमध्ये उपभोगाकडे वळवण्यासाठी कर्जे घेतलेले ऋणको वित्तीय अडचणीत येण्याची शक्यता वास्तव ठरते. तसे झाले तर



कुटुंबसंस्थांनी उचललेल्या कर्जांची परतफेड थकित बनून संबंधित वित्तसंस्थादेखील अडचणीत येण्याची शक्यता वाढते. त्यांमुळे, कुटुंबसंस्थांच्या वित्तीय बचतीमध्ये घडून आलेल्या घसरणीकडे अधिक चिकित्सेने बघण्याची निकड व्यक्त होते आहे.

कुटुंबसंस्थांच्या वित्तीय बचतीचे प्रमाण लक्षणीयरीत्या घसरण्यास 'कोविड'चा फेरादेखील कारणभूत ठरतो, हा मुद्दाही नजरेआड करता येत नाही. २०२०-२१ हे वित्तीय वर्ष 'कोविड'पायी लादल्या गेलेल्या टाळेबंदीने ग्रासलेले होते. सगळेच अर्थकारण ठप्प होऊ न पडलेल्या त्या काळात पूर्वकालीन बचतीच्या आधारेच नागरिकांनी आपापले जीवनव्यवहार काटकसरीने चालू राखले. केवळ इतकेच नाही तर, प्रसंगी उधारउसनवार करण्याखेरीज असंख्यांना त्या काळात अन्य पर्यायच नव्हता. कुटुंबसंस्थांच्या वित्तीय स्वरू पातील निव्वळ बचतींचे देशी ठोकळ उत्पादनाशी असणारे प्रमाण २०२१-२२ या वित्तीय वर्षात घटलेले दिसते ते यांमुळेच. दुसरे म्हणजे, सगळे अर्थचक्रच ठप्प होऊ न पडलेले असण्याच्या त्या काळात जी खरेदी नाईलाजाने लांबणीवर टाकावी लागली होती तिच्याकडे 'कोविड'पश्चात कुटुंबसंस्था हिरिरीने वळल्यामुळेदेखील वित्तीय स्वरू पातील त्यांच्या बचतीचे देशी ठोकळ उत्पादनाशी असणारे सरासरी प्रमाण घसरले असण्याची शक्यताही व्यक्त होते आहे. ही शक्यता गृहीत धरली तरी, 'कोविड'पश्चात कुटुंबसंस्थांच्या कर्जांचे देशी ठोकळ उत्पादनाशी वाढलेले प्रमाण आणखी एका संभाव्यतेकडे निर्देश करते,

उभ्या जगाला कवटाळणाया त्या महामारीदरम्यान ज्या सगळ्या घटकांच्या रोजगाराची हानी झाली त्यांची आर्थिक स्थिती त्या काळात कमालीची नाजूक बनलेली होती. अनेकांच्या रोजगारक्षमतेचाही त्याच पर्वादरम्यान हास घडून आला. विशेषत:, शहरी अ-संघटित क्षेत्रात रोजगार मिळवलेल्यांना, 'कोविड'च्या लाटा ओसरल्यानंतर पुन्हा शहरांकडे परतून पूर्ववत व्यवसायचक्र गतिमान करण्यात अनंत अडचणी उभ्या ठाकल्या. परिणामी, शहरोशहरींचे असंघटित कामगार व उद्योगव्यावसायिक, शेतकयांसह ग्रामीण अर्थकारणातील विविध घटक, स्त्रिया अशा विविध समाजघटकांच्या क्रयशक्तीची हानी झाली. दुसरीकडे, महागाई या ना त्या कारणाने सतत डोके वर काढतच राहिलेली आहे. क्षतिग्रस्त रोजगार आणि क्रयशक्ती एकीकडे आणि महागाईचे सातत्य दुसरीकडे या कात्रीत सापडलेल्या सगळ्या समाजघटकांना उधारीखेरीज पर्याय नसणे, हे ओघानेच येते. देशातील कुटुंबसंस्थांच्या वित्तीय स्वरू पातील बचतीचे देशी ठोकळ उत्पादनाशी असणारे सरासरी प्रमाण लक्षणीयरीत्या घसरणे आणि त्याच वेळी कुटुंबसंस्थांच्या कर्जांचे देशी ठोकळ उत्पादनाशी असणारे सरासरी प्रमाण उंचावणे या दोन्ही गोष्टी समांतरपणे घडण्यामागील हा कार्यकारणभाव अभ्यासकांच्या लेखी अधिक गंभीर व म्हणूनच चिंताजनक ठरतो आहे.

कुटुंबसंस्थांच्या वित्तीय बचतीचे देशी ठोकळ उत्पादनाशी असणारे सरासरी प्रमाण सतत घसरत राहणे, हे व्यापक अर्थकारणाच्या दृष्टीनेही अहितकारक शाबीत होईल, असाही इषारा ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ देत आहेत. कोणत्याही अर्थव्यवस्थेतील कुटुंबसंस्थांचा घटक हा वित्तीय बचतीचा मुख्य स्रोत गणला जातो. उद्योगव्यवसाय आणि शासनसंस्था हे अर्थकारणातील अन्य दोन मुख्य घटक हे कुटुंबसंस्थांनी बचतरू पाने संचयित केलेल्या निधीचे लाभार्थी ठरतात. कारण, कुटुंबसंस्थांची बचत हीच या दोन घटकांना गुंतवणूकयोग्य भांडवलाच्या रू पाने उपलब्ध होत असते. कुटुंबसंस्थांच्या वित्तीय बचतीलाच कसर लागली तर अर्थव्यवस्थेतील बचतीचा प्रवाह आटून एकीकडे व्याजांचे सरासरी दर चढण्यास प्रारंभ होईल आणि दुसरीकडे देशी अर्थव्यवस्थेचे परकीय भांडवलावरील अवलंबन सघन बनेल. या दोन्ही बाबी अर्थकारणाच्या प्रकृतीला मानणाया नसतात व नाहीत.

■■■



# लोकसभा निवडणुकीतील घवघवीत

**लोकसभा निवडणुकीत शानदार यश मिळाल्यानंतर महाविकास आघाडीच्या नेत्यांनी १५ जून रोजी मुंबई येथील यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानमध्ये संयुक्त पत्रकार परिषद आयोजित करून माध्यमांशी संवाद साधला आणि जनतेचे आभार मानले. या पत्रकार परिषदेचा वृत्तांत...**

आपल्यासमोर पहिल्यांदाच लोकसभा निवडणुकीनंतर महाविकास आघाडी एकत्रितपणानं येतेय. लोकसभा निवडणुकीतील घवघवीत यशामध्ये शिवसेना, काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष, भारतीय कम्युनिस्ट पक्ष, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष, समाजवादी पक्ष, शेतकरी कामगार पक्ष, आम आदमी पार्टी, अपक्ष, त्याचबरोबर महाराष्ट्रातल्या विविध संघटना, ज्यांनी प्रचारामध्ये प्रचंड मोठी कामगिरी बजावली. जनजागरण केलं. खासकरून निर्भय बनो ही जी संघटना आहे डॉ. विश्वंभर चौधरींची, निखिल वागळे असतील, ॲड. असीम सरोदे असतील, किंवा महाराष्ट्रातल्या वेगवेगळ्या संघटना, सामाजिक संघटना, ज्यांच्या नावांची यादी प्रचंड मोठी आहे, त्या सर्वांनी मिळून महाराष्ट्रात जनजागरण करून आज महाराष्ट्रातला हा विजय प्राप्त झालेला आहे.

देशातल्या राजकारणामध्ये महाराष्ट्राने बजावलेली भूमिका ही अतिशय महत्त्वाची ठरलेली आहे आणि देशाच्या राजकारणामध्ये इंडिया आघाडीला जे बळ भारतातल्या जनतेनं दिलंय, त्यातलं सगळ्यात मोठं आणि लक्षणीय बळ महाराष्ट्रातल्या जनतेनं या महाविकास आघाडीला दिलेलं आहे. त्यानंतर पहिल्यांदाच आपण याठिकाणी भेटलेलो आहोत. मी आमचे सहकारी पक्ष आणि ज्यांचा मी उल्लेख केला त्या सर्वच संघटना, त्या सगळ्यांचे आभार मानेनच, पण माननीय उद्धव ठाकरे साहेब, पवार साहेब आणि काँग्रेसने दोन्ही नेते पृथ्वीराज बाबा आणि बाळासाहेब थोरात यांच्यावतीनं आज आपणाला याठिकाणी महाराष्ट्राच्या जनतेपर्यंत पोहोचण्यासाठी बोलवलेलं आहे. आपणही सगळ्यांनी आम्हाला या निवडणुकीत सहकार्य




# यशाबद्दल जनतेचे आभार

**जयंत पाटील**

केलं. सर्व चॅनेल, सर्व वर्तमानपत्र, आमच्याकडं साधनं कमी होती, यंत्रणा कमी होती, जाहिरात देण्याची क्षमता दोन टक्के पण नव्हती समोरच्या बाजूच्या तुलनेनं आणि महाराष्ट्रामध्ये निवडणुका कशा झाल्या याचा आपल्या सर्वांना अंदाज आलेला आहे आणि किती खर्च एखादा पक्ष करू शकतो याचे आकडे जर बघितले, तर त्या पार्श्वभूमीवर मिळालेलं हे यश हे फार मोठं आहे आणि त्यामुळं एवढं घवघवीत यश महाराष्ट्रातल्या जनतेनं दिलेलं आहे. त्यामुळं महाराष्ट्रातल्या जनतेचं देखील आभार माननं आवश्यक आहे. यासाठी ही पत्रकार परिषद सुरू करावी एवढीच विनंती मी याठिकाणी करतो.

## विधानसभेला महाराष्ट्रात सत्तापरिवर्तन होणारच : पृथ्वीराज चव्हाण



ही पत्रकार परिषद महाराष्ट्रातल्या जनतेचं आभार मानण्याकरिता आयोजित केलेली आहे. महाराष्ट्राच्या जनतेचा ही लोकशाही वाचवण्यासाठी देशातील जनतेनं जे मतदान केलंय, त्यापैकी महाराष्ट्राच्या जनतेचा फार मोठा आणि सिंहाचा वाटा आहे. महाविकास आघाडीला अगदी निर्णायक बहुमत दिलेलं आहे. त्याबद्दल महाराष्ट्रातल्या तमाम जनतेचे, सर्व घटकातून महाविकास आघाडीच्या उमेदवारांना घवघवीत असा पाठिंबा दिला गेलेला आहे, त्याची परिणीती आपण निकालात पाहिलेली आहे. या निवडणुकीमध्ये आमचे जरी तीन प्रमुख पक्ष असले, तरी जवळपास तीस-चाळीसच्या वर जनसंघटना, काही छोटे पक्ष, कम्युनिस्ट पक्ष असेल, मार्क्सवादी, शेतकरी कामगार पक्ष, आम आदमी पार्टी, अनेक जनसंघटना अशी खूप मोठी यादी आहे. त्यामध्ये काही सामाजिक कार्यकर्ते, जे कुठल्याही पक्षामध्ये नव्हते, या सर्वांनी महाराष्ट्रामध्ये एक वातावरण निर्माण करण्यामध्ये खूप मोठा वाटा उचलला, त्यांचं सर्वांचं धन्यवाद माननं याठिकाणी गरजेचं आहे.

महाराष्ट्राच्या जनतेनं आज या देशातली लोकशाही वाचवण्यामध्ये फार मोठी भूमिका निभावलेली आहे. सिंहाचा वाटा उचललेला आहे. त्या जनतेचं आभार मानण्यासाठी प्रामुख्यानं आम्ही इथे आलो आहोत. त्याचबरोबर आपल्या सर्वांनाही धन्यवाद. आपण जवळपास दोन महिन्यांपर्यंत खूप लांबलेली निवडणूक

आपण सर्वांनी कव्हर केली. आमचा विचार जनतेपर्यंत पोहोचवायचा प्रयत्न केला. प्रचंड मोठ्या धनशक्तीच्या विरोधात आम्हाला लढावं लागलं. त्याचबरोबर प्रसारमाध्यमांवरही कशा प्रकारचं दडपण होतं हेही आपल्या चांगल्यापद्धतीनं जाणता. चौकशी करणाऱ्या ज्या संस्था आहेत, त्या संस्थांचा ज्या पद्धतीनं दुरूपयोग झाला या सर्व गोष्टींना आम्हाला तोंड द्यावं लागलं. पण हे यश महाराष्ट्रातल्या जनतेच्या आशीर्वादाशिवाय शक्य झालं नसतं.



आदिती नलावडे या पुष्पगुच्छ देऊन आदित्य ठाकरे यांचे स्वागत करताना.

आज राज्यातील शेतकरी बांधवांनीदेखील सरकारला एक संदेश पाठवलेला आहे. कुठल्याही समाजाला गृहित धरता कामा नये. आज दुर्दैवानं पूर्वी कधी झालं नव्हतं इतक्या मोठ्या प्रमाणात धार्मिक ध्रुवीकरण करण्याचा प्रयत्न केला गेला आणि त्याला काय यश मिळालेलं नाही हे या निवडणुकीच्या निकालावरून स्पष्ट झालेलं आहे. या महाराष्ट्राच्या भूमीमध्ये छत्रपती शिवरायांच्या आचरणावरून आदर्श घेऊन आम्ही सर्वजण सर्वधर्मसमभावाची भूमिका याठिकाणी राबवतो. त्यामुळं धार्मिक ध्रुवीकरण कुठं चाललं नाही. जनतेच्या प्रश्नांना महाविकास आघाडीच्या नेत्यांनी प्राधान्य दिलं. खरं म्हणजे पवार साहेब आणि उद्धवजींना पण धन्यवाद दिलं पाहिजे, की त्यांनी जवळजवळ प्रत्येक मतदारसंघात जाऊन प्रचार केला. नेत्यांच्यामध्येही चांगला समन्वय होता. बूथ लेवलच्या कार्यकर्त्यांमध्येही खूप चांगला समन्वय होता. त्यामुळं इथं हा परिणाम आपल्याला दिसत आहे.

आत्ताच तिन्ही पक्षांच्या नेत्यांची एक प्राथमिक बैठक विधानसभेच्या पार्श्वभूमीवर झालेली आहे. लवकरात लवकर आम्ही विधानसभेच्यादृष्टिनं जे काय निर्णय घ्यायचे असतील ते घेणार आहे. पण एक गोष्ट निश्चित आहे, की ही विधानसभेची निवडणूक अशाच प्रकारची आघाडी, जनसंघटना, ज्या पद्धतीनं लोकसभेची निवडणूक लढली, त्याच ताकदीनं, किंबहुना त्याच्यापेक्षा अधिक ताकदीनं आम्ही विधानसभेची निवडणूक लढणार आहे. जनतेचे प्रश्न घेऊन पुन्हा लोकांसमोर येणार आहे. मला खात्री आहे, की ज्या पद्धतीनं लोकसभेच्या निवडणुकीला आपण, महाराष्ट्रातल्या जनतेनं आम्हाला आशीर्वाद दिला, त्याचप्रमाणे विधानसभेच्या निवडणुकीमध्ये आशीर्वाद मिळेल



आणि महाराष्ट्रामध्ये सत्ता परिवर्तन निश्चितपणे होईल असा विश्वास आमच्या सगळ्यांच्यावतीनं याठिकाणी बाळगतो. धन्यवाद!

## प्रधानमंत्र्यांनाही धन्यवाद! : शरद पवार

एकच गोष्ट याठिकाणी सांगायची राहून गेली, ती म्हणजे ज्या काही अन्य पक्षाच्या नेत्यांच्या सभा झाल्या, त्याच्यामध्ये देशाचे प्रधानमंत्री यांच्या १८ सभा झाल्या आणि एक रोड शो झाला. त्यांच्या या १८ सभा ज्याठिकाणी झाल्या आणि रोड शो ज्याठिकाणी झाला, त्याठिकाणी आम्हा लोकांच्या उमेदवारांना तेथील जनतेनं फार मोठ्या प्रमाणावर पाठिंबा दिला. आणि म्हणून विधानसभा निवडणुकीच्या काळामध्ये प्रधानमंत्र्यांच्या जेवढ्या जास्त भेटी होतील, तेवढी आमची स्पष्ट बहुमताच्या



दिशेनं वाटचाल होईल. त्यामुळं त्यांनाही धन्यवाद देणं हे माझं कर्तव्य समजतो.

## एनडीए सरकार नैसर्गिक की अनैसर्गिक : उद्धव ठाकरे

महाराष्ट्राच्या जनतेनं जो कौल दिला आणि संपूर्ण देशामध्ये असं एक वातावरण होतं, की भाजपाविरूद्ध कोणी लढू शकत नाही, हे अजिंक्य आहेत. तर अजिंक्यपणा त्यांचा किती फोल आहे, तो फोलपणा महाराष्ट्राच्या जनतेनं ताकदीनं दाखवून दिलेला आहे. म्हणून महाराष्ट्राच्या जनतेचं आम्ही आभार तर मानतोच आहोत, त्यांचे आशीर्वाद तर आम्हाला पाहिजेतच आहेत, इतर सर्वांनी, ज्यांचा ज्यांचा उल्लेख जयंतरावांनी केला, मग ते निर्भय बनो ही एक सामाजिक संघटना आहे, त्याच्यानंतर यू ट्यूबच्या माध्यमातून निखिल वागळे आहेत, हेमंत देसाई आहेत, प्रशांत कदम आहेत, अशोकराव वानखेडे आहेत, रविश कुमार, विश्वंभर चौधरी, असीम सरोदे हे सगळेच एका धाडसाने जनतेचे प्रश्न हिंमतीने ते मांडत आले आणि या त्यांच्या मांडण्यामुळेच, एका नि:पक्षपातीपणानं त्यांनी ती बाजू मांडली, त्याच्यामुळं जनतेला सुद्धा सत्य काय आहे हे कळत गेलं आणि मी तर असं म्हणेन, की ही लढाई फार विचित्र होती. आर्थिकदृष्ट्या असेल, यंत्रणेच्यादृष्टिनं म्हणा, ही विषम लढाई तर होतीच, पण संविधान आणि लोकशाही वाचवण्यासाठी ही लढाई होती आणि मला अभिमान आहे, की मी माझ्या भाषणाची सुरूवात देशभक्त बांधवांनो, मातांनो आणि भगिनींनो अशी करायचो, त्या सर्व देशभक्त आणि देशप्रेमी नागरिकांनी महाविकास आघाडी आणि देशात इंडिया आघाडीला जो कौल दिला आहे, ही जागा आता आपल्या देशाला आलेली आहे आणि साहजिकच आहे, हा विजय हा अंतिम नाहीये, ही लढाई सुरू झालेली आहे.

येत्या दोन-तीन महिन्यांमध्ये महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुका येतील, त्याच्यानंतर इतर राज्यांच्यासुद्धा निवडणुका येतील, मुळामध्ये हे जे काय आता मोदी सरकार होतं, ते आता एनडीए सरकार झालंय. हे सरकार किती दिवस चालेल हा एक मोठा प्रश्न आहे. कारण आमच्याबद्दल नेहमी म्हटलं जात होतं, की नैसर्गिक युती आणि अनैसर्गिक युती, तर आत्ता जे काय तिकडं कडबोळं झालेलं आहे दिल्लीमध्ये, हे नैसर्गिक आहे की अनैसर्गिक आहे हा सुद्धा एक मोठा प्रश्न आहे. एकूणच देशातली जनता या निवडणुकीच्या निमित्तानं जागी झाली हे फार मोठं यश या निवडणुकीच्या वेळेला आपल्याला मिळालं असं मी मानतो.

**प्रश्नोत्तरे...**

## देशाची जनता जागी झालीय : उद्धव ठाकरे

**प्रश्न : काँग्रेस प्रदेशाध्यांनी आपला पक्ष महाराष्ट्रातल्या २८८ जागा लढेल अशी वेगळी भूमिका मांडत आहेत.**

**उद्धव ठाकरे :** जेव्हा तीन पक्ष एकत्रित पत्रकार परिषद घेतात, याचा अर्थ असा, पृथ्वीराजजींनी सांगितलेलं आहे, की आमची एक प्राथमिक बैठक आपल्यासमोर येण्याआधी



झालेली आहे आणि येणारी विधानसभा सुद्धा जे जे लोकं आमच्यासोबत आहेत, महाविकास आघाडी म्हणून आम्ही तीन पक्ष तर आहोतच, पण इतर घटक पक्षसुद्धा आणि सामाजिक संघटनासुद्धा यांना सोबतच घेऊनच आम्ही लढणार आहोत.

**प्रश्न : निवडणूक आयोगानं पदाधिकाऱ्यांची संख्या लक्षात घेऊन पक्ष आणि चिन्हाचा निर्णय दिलेला आहे. आता यामध्ये काही बदल होईल का.**

**उद्धव ठाकरे :** त्या निर्णयाला आम्ही सुप्रिम कोर्टात आव्हान दिलेलं आहे आणि त्या निकालाची अपेक्षा आम्हाला महिनाभरात आहे. आता सर्वाधिक खासदार तर आमचे झालेलेच आहेत. पण मुळामध्ये तो निर्णय कसा अयोग्य होता, त्याच्याबद्दल सुप्रिम कोर्टानंदेखील नाराजी व्यक्त केलेली आहे. म्हणून मला असं वाटतं, की येत्या काही दिवसांत त्याच्या निकालाची आम्ही अपेक्षा धरतो. पण जनतेच्या न्यायालयामध्ये काय झालेलं आहे हे जगानं बघितलेलं आहे.

**प्रश्न : भाजपने निगेटिव्ह नॅरेटिव्ह किंवा वोट जिहादमुळे अपयश आल्याचं म्हटलं आहे आणि ते दूर करण्यासाठी जनतेमध्ये जाणार असल्याचं म्हटलंय.**

**उद्धव ठाकरे :** वोट जिहाद म्हणजे काय? कारण, स्वत: नरेंद्र मोदीजींनी सांगितलं होतं, की त्यांनी त्यांचं बालपण मुस्लिम कुटुंबीयांच्या सान्निध्यात गेलेलं आहे. ईदच्या मिरवणुकीत ते ताजियाखालनं जायचे. त्यांच्या घरचं जेवण ते जेवायचे. मग आत्ता खाल्ल्या मिठाला ते जागले की नाही जागलेत? त्याच्यामुळं वोट जिहाद हा शब्द मला कळलेला नाही. मोदींनी पहिलं सांगावं, की जर ते लहानपणी त्यांच्या शेजारच्या मुस्लिम कुटुंबातलं जेवण जेवत असतील तर त्या मिठाला ते जागलेत, जागणार की नाही जागणार आहेत.

**प्रश्न : महाविकास आघाडीच्या नेत्यांकडून निगेटिव्ह नॅरेटिव्ह करण्यात आलं आणि त्याचा फटका आम्हाला बसला असं भाजपकडून सांगण्यात येतंय.**

**उद्धव ठाकरे :** बरं ठीक आहे. यांना मतं दिली तर तुमची संपत्ती हे जास्त मुलं होणाऱ्यांना वाटून टाकतील हे काय खरं नॅरेटिव्ह होतं? मंगळसूत्र उचलून नेतील, तुमच्या घरातले नळ कापून नेतील, तुमची वीज कापून नेतील हे काय खरं नॅरेटिव्ह होतं? तुमची म्हैस चोरुन नेतील हा काय खरेपणा होता? नकली संतान, नकली सेना हे काय खरं नॅरेटिव्ह होतं? आणि मी प्रत्येकाला नोकरी देईन, प्रत्येकाला घर देईन हे काय खरं नॅरेटिव्ह होतं? उद्योगधंदे वाढवीन हे काय खरं नॅरेटिव्ह होतं?

**प्रश्न : मतांच्या टक्केवारीत फक्त दोन ते तीन लाखांचा फरक आहे असं त्यांचं म्हणणं आहे.**

**उद्धव ठाकरे :** एकूण जर का देशाची लोकसंख्या लक्षात घेतली, तर १४० कोटीपैकी मतदानाचा अधिकार वयाप्रमाणे किती लोकांना आहे याचा आकडा मिळेल आणि त्यापैकी भारतीय जनता पक्षाला किती मतं मिळाली आणि उरलेल्या कित्येक लोकांनी भारतीय जनता पक्षाच्या म्हणजे मोदींच्या विरोधात मतदान केलेलं आहे हीसुद्धा टक्केवारी सगळ्यांच्यासमोर आली पाहिजे.


**प्रश्न : भाजप पराभवाचे मंथन करत आहे. संविधान बदलाच्या खोट्या नॅरेटिव्हमुळं अपयश आलं.**

**उद्धव ठाकरे :** त्यांच्याच नेत्यांनी चारशे पारचा नारा देत


रविश कुमार


अशोक वानखेडे


प्रशांत कदम


विश्वंभर चौधरी


असीम सरोदे


हेमंत देसाई

संविधान बदलण्याची वक्तव्ये केली होती. त्यांनी जे नॅरेटिव्ह सेट करण्याचा प्रयत्न केला होता, तो त्यांच्याच अंगलट आला. अच्छे दिन आयेंगे हे तर आपण विसरलोच. त्या नॅरेटिव्हचं काय झालं? ते पंधरा लाख आणणार असं म्हटलं होतं, ते २०१४पासून धरलं तर त्यांनी जे काही नॅरेटिव्ह केलं होतं ते सर्व खोटी होती. मोदी गॅरंटीचं काय झालं?

**प्रश्न : महाविकास आघाडीला मराठी मतं कमी मिळाली असं सांगितलं जातंय.**

**उद्धव ठाकरे :** मराठी मतं का कमी मिळतील? असं काय कारण आहे. एम फॅक्टरमध्ये मराठी येत नाही? आणि मी तुम्हाला सांगतो, यावेळेला आम्हाला मी अभिमानानं सांगेन, की लोकशाही वाचवण्यासाठी सर्वधर्मियांनी मतदान केलं. त्याच्यात माझे मराठी तर आहेतच, हिंदूसुद्धा आहेतच, मुस्लिम, ख्रिश्चन आहेतच, शीख आहेत. इतर सर्वही आहेत. आणि तुम्हाला काय वाटतं, की रक्त सांडून मिळवलेली मुंबई, मराठी माणसांनी त्यांच्या डोळ्यादेखत जर लुटली जात असेल तर अशावेळेला मराठी माणूस लुटणाऱ्याला मत देईल? महाराष्ट्र आणि मुंबईतला मराठी माणूस मुंबई आणि महाराष्ट्र लुटणाऱ्याला कदापि, झोपेतसुद्धा मत नाही देणार. त्याच्यामुळं अजूनही भारतीय जनता पक्षाला वास्तवाची जाणीव आली नसेल, तर त्याला निवडणुकीच्या निकालाच्या विस्तवाला सामोरं जावं लागेल.



**प्रश्न : लोकसभा निवडणुकीत इंडिया आघाडीकडे पंतप्रधानपदाचा चेहरा नसल्याची टीका होत होती, त्याच पद्धतीनं आता मुख्यमंत्रिपदाचा चेहरा कोण आहे अशी टीका केली जात आहे.**

**उद्धव ठाकरे :** त्यांच्याकडे कोण आहे हे आधी ठरवा ना. त्यांच्याकडे कोण आहे? आता प्रश्न त्यांच्याकडे पण आहे. मला आठवतंय, की मी मुख्यमंत्री असताना देवेंद्र फडणवीसांनी काय म्हटलं होतं, की वसली तीन गावं, एक वसेचिना. आता हालत त्यांची तशीच आहे. तिन्हीच्या तिन्ही ओसाड आहेत. एकसुद्धा वसत नाहीये.

**प्रश्न : महाराष्ट्रातील उद्योग गुजरातमध्ये गेल्याचा आरोप तुम्ही नेहमी करत असता.**

**उद्धव ठाकरे :** आरोप नाही, वस्तुस्थिती आहे. मी माझ्या प्रचाराच्या भाषणांतसुद्धा सांगत होतो, की गुजरातबद्दल आम्हाला काही राग नाही. इंडिया आघाडीचं सरकार आल्यानंतर आणि उद्यासुद्धा आल्यानंतर आम्ही गुजरातच्या हक्काचं काय असेल ते देऊ. पण, याकरता मोदी आणि अमित शहा हे गुजरात आणि संपूर्ण देश यांच्यामध्ये जी एक भिंत उभी करतायंत ती अत्यंत घातक आहे, तशी भिंत त्यांनी उभी करता कामा नये. महाराष्ट्राच्या हिताचं जे असेल ते महाराष्ट्राला मिळालंच पाहिजे. गुजरातचे जे असेल ते जरूर गुजरातला द्या. अन्य राज्यांना जे आवश्यक आहे आणि त्यांच्या हक्काचं आहे ते त्यांना दिलंच पाहिजे, त्यालाच आपण केंद्र सरकार म्हणतो. खरं तर केंद्र सरकार हा शब्द चुकीचा आहे, आपली संघराज्य पद्धत आहे. दहा वर्षात त्यांना समजायला पाहिजे होतं, की संपूर्ण देशानं त्यांना पंतप्रधानपद दिलं होतं. आता कसं तरी त्यांचं पंतप्रधानपद वाचलंय. हे सरकार किती दिवस राहील हे काय सांगता येत नाही. आणि गुजरातमध्ये जर का ही सगळी चालूगिरी करायला लागले तर त्यांचं जे मूळ राज्य आहे, तिथंच त्यांच्या आसनाला सुरूंग लागेल. हे जे काही नरेटिव्ह वगैरे म्हणतायंत, हे काय खरं नाही, मुळातच त्यांच्यात खरेपणा नाहीये. हा सगळा फोलपणा देशाच्या जनतेच्या लक्षात आलेला आहे. मी परत सांगेन, की मला अभिमान आहे, की देशातली जनता जागी झाली. येत्या काळात हे चित्र आणखी बदललेलं आणि देशाच्यादृष्टिनं सुधारलेलं दिसेल.

**प्रश्न : उद्धव ठाकरे कधी ना कधी एनडीएमध्ये येतील अशी अपेक्षा भाजप नेत्यांना वाटत आहे.**

**उद्धव ठाकरे :** बरं ठीक आहे. मला समजा जायचंय, तर यांच्यामध्ये बसून आत्ता मी हो सांगू?

## सरकारच्या धोरणांविरोधात नाराजी : शरद पवार

**प्रश्न : संविधान बदलाच्या खोट्या नॅरेटिव्हमुळं अपयश आल्याचं भाजपचं म्हणणं आहे. त्याचप्रमाणं अजित पवारांमुळेही फार मोठा फटका बसला आहे असं म्हटलं जात आहे. नेमका कशामुळं फटका बसला.**

**शरद पवार :** त्यांना एवढंच सांगायचंय, की महाराष्ट्राच्या जनतेनं त्यांचा पराभव केला, त्यासंबंधीची कारणं अनेक आहेत. पण, ते आम्ही आत्ता बोलू इच्छित नाही. सत्तेचा गैरवापर करून कारवाया केल्या जात आहेत. आणखी एक गोष्ट याठिकाणी झाली, की काही लोकांच्या बाबतीत तुम्ही काही लोकांच्यावरती केसेस केल्या, त्यातल्या काही लोकांना कोर्टानं जामीन दिला. पण त्याच्यामध्ये अनेक लोक कारण नसताना आरोपांशिवाय आजही तुरूंगामध्ये आहेत. याचा अर्थ हा सरळ सरळ सत्तेचा गैरवापर आहे आणि त्यासंबंधी या निवडणुकीमध्ये लोकांनी जी काय भूमिका घेतली, त्याच्यातून शहाणपणा शिकतील अशी अपेक्षा होती. पण तो काय शहाणपणा शिकलेला दिसत नाही आणि त्यामुळं आणखी तीन-चार महिन्यांनी लोकांच्यासमोर जायची संधी ज्यावेळी मिळेल, त्यावेळी लोक त्याचा पूर्णपणानं विचार करून ठोस निर्णय घेतील.

**प्रश्न : अजित पवारांना सरकारमध्ये घेतल्यामुळे भाजपची ब्रॅण्ड व्हॅल्यू कमी झाली असं म्हटलं जातंय.**

**शरद पवार :** त्यांचा अनुभव काय आहे, तो त्यांनी सांगितला. आम्ही त्याच्यावर काय बोलणार.

**प्रश्न : महायुती सरकारमध्ये परस्पर अविश्वास असल्याचं वातावरण आहे. ऑर्गनायझरमधूनही अजितदादांच्या विरोधात जाहीर मत मांडलं गेलं. घटक पक्षांनी हे जर सरकार पाडलं तर शेतकऱ्यांच्यादृष्टिनं महाविकास आघाडीची भूमिका काय असेल.**

**शरद पवार :** साधी ही गोष्ट आहे, की आम्हा लोकांच्या हातामध्ये आज तर काय महाराष्ट्राची सत्ता नाहीये. आज सत्ता कुणाच्या हातामध्ये आहे हे काय मी सांगायची गरज नाहीये. आणि तुम्ही म्हणता तशी परिस्थिती तातडीनं येईल असं दिसत नाही आणि आली तर आम्हाला आनंद आहे.

**प्रश्न : कांद्याच्या निर्यातबंदीचा किती परिणाम झाला.**

**शरद पवार :** सरळ गोष्ट आहे, कांदा उत्पादन घेणारा शेतकरी नाराज होता यामध्ये दुमत नाही. पण हे तेवढ्यापुरेतच मर्यादित नाही. या महाराष्ट्राचा, देशाचा शेतकरी या सरकारच्या धोरणांच्या विरोधात होता आणि आजही यामध्ये बदल झालाय




असं मला दिसत नाही.

**प्रश्न : मराठा आरक्षणाच्या मुद्यावर काय भूमिका आहे.**

**शरद पवार :** यापूर्वीही या मुद्यावर जे कोणी महाराष्ट्रात सत्तेवर आहेत, त्या लोकांनी चर्चा केली होती. त्यांनी काही आश्वासने दिली होती. पण त्याची अंमलबजावणी झाली नाही आणि त्यामुळं राज्यात उपोषणाचे प्रकरण सुरू झाले आहे. आपण जी काही आश्वासने दिली होती, त्यावर तातडीने अंमलबजावणी करण्याची जबाबदारी या सरकारवर आहे. ही स्थिती हाताबाहेर जाण्याची वेळ येऊ न देणं ही सामाजिकदृष्ट्या आज आवश्यकता आहे.

## मोठा-छोटा भाऊ कुणी नाही : पृथ्वीराज चव्हाण

**प्रश्न : लोकसभा निवडणुकीत सर्वाधिक जागा जिंकल्यानंतर काँग्रेसचे नेते महाविकास आघाडीत आम्ही मोठा भाऊ असल्याचे म्हणत आहेत.**

**पृथ्वीराज चव्हाण :** हे बघा, आगामी निवडणुकीमध्ये मोठा भाऊ, छोटा भाऊ असं काही चालणार नाही. प्रत्येक मतदारसंघामध्ये आम्ही बसून सर्वात चांगला उमेदवार कुठल्या पक्षाकडे आहे आणि मागच्या निवडणुकीचे संदर्भ घेऊन जागा वाटपाचा निर्णय घेऊ. आमचा प्रयत्न आहे, की लवकरात लवकर तो निर्णय होईल. आज प्राथमिक बैठक आमची झालेली आहे.

■■■

# जैन टिश्यूकल्चर तंत्रज्ञानाने निर्मित भारतीय केळीच्या लोकप्रिय जाती आता आपल्या करीता उपलब्ध



- वेगवेगळ्या टप्प्यावर व्हायरस इंडेक्सींग करून अस्सल, रोगमुक्त व दर्जेदार रोपे निर्मित करणारी जैन टिश्यूकल्चर ही एकमेव कंपनी आहे.
- जैन टिश्यूकल्चर केळींच्या रोपांची निर्मिती रोगमुक्त, उत्कृष्ट, उच्चतम गुणवत्ता व निवडक मातृवृक्षापासून केली जाते.
- वातावरण नियंत्रित ग्रीनहाऊस व पॉलीहाऊस मध्ये शास्त्रोक्त पद्धतीने हार्डनिंग करणारी एकमेव कंपनी.
- जैन टिश्यूकल्चरच्या रोपांची वाढ पोषक तत्वांनीयुक्त असणाऱ्या, निर्जंतुक व विशेषरित्या आयात केलेल्या मातीविरहीत मिडीयामध्ये होते. अशा रितीने वाढ झालेल्या रोपांमध्ये मातीतून पसरणाऱ्या रोगांचा प्रादुर्भाव होत नाही व रोपे रोगमुक्त असण्याची खात्री असते.
- जैन टिश्यूकल्चर रोपांचा पुरवठा रूट ट्रेनर ट्रे मधून केला जातो, त्यामुळे मुळांचा विकास व वाढ योग्यरित्या होते व हाताळणी करतांना मुळांना नुकसान होत नाही.
- जैन टिश्यूकल्चर तंत्रज्ञानानेच शेतामध्ये रोपांची झिरो-डे सेटींगची खात्री.
- जैन टिश्यूकल्चर केळीची रोपे म्हणजे विक्रमी उत्पादनाची हमी.
- जैन टिश्यूकल्चर शेतकऱ्यांच्या मागणीनुसार एकात्मिक पॅकेज प्रदान करून त्यांना हायटेक लागवड पद्धती, अत्याधुनिक सुक्ष्म सिंचन, त्यातून खते देण्याच्या तंत्रज्ञानाचे वैज्ञानिकदृष्ट्या मार्गदर्शन करते.

- जैन टिश्यूकल्चर ग्रँडनैन जातीच्या केळीची रोपे निर्मित करणारी जगातील नंबर १ ची कंपनी आहे.
- जैन टिश्यूकल्चरच्या केळी रोपांना १९९४ पासून शेतकऱ्यांची पहिली पसंती.
- या वर्षी जैन टिश्यूकल्चर ग्रँडनैन जातीच्या ९.५ कोटी केळी रोपांची लागवड करून शेतकऱ्यांनी उच्चांकी उत्पादन घेतले आहे.
- शेतकऱ्यांच्या वाढत्या मागणीनुसार आता पूवन, इलाकी, रेड बनाना, नेन्द्रन, सुपर नेन्द्रन व बन्थल या लोकप्रिय भारतीय जातींचे जैन टिश्यूकल्चर केळी रोपे उपलब्ध.
- सदैव वाढणाऱ्या जैन टिश्यूकल्चर कुटुंबात त्वरित सामील होऊन फायदा घ्या.



जैन टिश्यूकल्चर -
इलाकी
रूपये २०/रोप



जैन टिश्यूकल्चर -
पूवन
रूपये १६/रोप



जैन टिश्यूकल्चर -
बन्थल/ मोन्थन
रूपये २०/रोप



जैन टिश्यूकल्चर -
नेन्द्रन
रूपये १८/रोप



जैन टिश्यूकल्चर -
रेड बनाना
रूपये २०/रोप

**त्वरित बुकिंग करा व निराशा टाळा**

जैन टिश्यूकल्चर
अधिक उत्पादन – अधिकाधिक नफा.

जैन इरिगेशन सिस्टीम्स् लि.
*कल्पना कणापरी. ब्रह्मांडाचा भेद करी.®*

जैन हाईटेक प्लॅन्ट फॅक्टरी
अधिक उत्पादन – अधिक नफा.

**वाहतूक खर्च वेगळा लागेल.**

**# बुकिंगसाठी संपर्क: (महाराष्ट्र) अकलूज:** ९४२२७७४९३७; **चोपडा:** ९४२२७७3394, **जळगाव:** ९४२२७७६७१८, ९४२२७७६७४८, ९४०४९५५३१७,९४२२७७३७६८ **अंजनगाव सुर्जी:** ९४२२७७५९२८; **मालेगाव:** ९४०३०८०१३८; **नांदेड:** ९४०३६९५८९३, ९४०३६९५८४६; **नंदुरबार:** ९४२२७७४३७५; **मुक्ताईनगर:** ९४०३६९५९०८; **पुणे:** ९४२२७७४९३३; **रावेर:** ९४२२७७४९३१; **टेंभूर्णी:** ९४२२७७४९३२; **सांगली:** ९४०३०८०१७२, **कोकण व गोवा:** ९४२२७७४९३१, ९८७०९९०७५४, ९४२२७७४९३३; ९४२२७७३७६८,

टिप - जैन टिश्यूकल्चर केळी रोप रोगमुक्त असली तरी शेतात लागवड केल्यानंतर त्यावर रोगांचा प्रादुर्भाव होऊ शकतो. त्यामुळे रोगांच्या प्रादुर्भावाची व त्यानंतर येणाऱ्या उत्पादनाची हमी कंपनी घेऊ शकत नाही.

# गाफिलपणाला थारा नको!

**अनंत बागाईतकर**

केंद्रात भाजपच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडी उर्फ एनडीए (नॅशनल डेमोक्रॅटिक अलायन्स)चे सरकार स्थापन झाले. नव्या म्हणजेच १८व्या लोकसभेची देखील प्रतिष्ठापना झाली. या लोकसभेच्या अध्यक्षपदी म्हणजेच पीठासीन प्रमुख म्हणून गेल्या वेळचेच अध्यक्ष ओम बिडला यांना फेरसंधी देण्यात आली आहे. ज्याप्रमाणे केंद्रीय मंत्रिमंडळात आघाडीतील घटक पक्षांचे काही मोजके चेहरे वगळता बाकी सर्व प्रमुख मंत्रालयांमध्ये किंवा खात्यांमध्ये जैसे थे स्थिती राखण्यात आली त्याप्रमाणेच लोकसभेच्या सूत्रसंचालनाची जबाबदारीही ओम बिडला यांच्याकडे कायम राखण्यात आली आहे. यावरुनच या सरकारने यथास्थितीवादाची (स्टेटस को) कास धरली असावी असा निष्कर्ष काढावा लागेल. त्याचप्रमाणे नव्या लोकसभेच्या प्रारंभीच मोदी-शहा सरकार आणि लोकसभा अध्यक्ष ओम बिडला यांनी आणीबाणीच्या निषेधाचा ठराव कोणत्याही पूर्वसूचनेशिवाय मांडून ज्या प्रकारे विरोधी पक्षांना डिवचण्याची कृति केली ती देखील त्यांच्या यापूर्वीच्याच असंस्कृत, असभ्य, अभद्र आणि अनुचित कार्यशैलीचाच भाग होता आणि म्हणूनच त्यांच्या आचरणात कोणताही बदल झालेला नाही असेच ठामपणे म्हणावे लागते. अर्थातच ज्यांच्यावर अभद्र राजकीय संस्कार झालेले असतील त्यानुसारच त्यांचे आचरण राहणार आहे. मोदी-शहा हे रा.स्व.संघाच्या मुशीत तयार झालेले आहेत. त्यामुळे त्यांचे हे आचरण संघाच्या शिकवणुकीचाच भाग आहे काय अशीही विचारणा आता करावी लागणार आहे. सारांशाने एवढेच म्हणावे लागेल की मोदी-शहा जोडगोळी बदललेली नाही. त्यांच्या कार्यशैलीत त्यांनी सुधारणा केलेली नाही. त्यांच्या स्वभावातही नम्रपणा आलेला नाही. उलट मतदारांनी नाकारल्याने ते मनातल्यामनात दातओठ खात आहेत आणि कधी या मतदारांना धडा शिकवतो असे त्यांना झाले असावे. कारण लांड्यालबाड्या, चलाख्या, खोटानाटा प्रचार करुन प्रतिस्पर्ध्यांवर मात करुन विजय मिळविण्याची सवय झालेल्या या दुक्कलीला भाजपला स्वबळाचे बहुमतही मिळाले नसल्याची बाब निश्चितपणे जिव्हारी लागलेली आहे. त्यापासून धडा घेणे दूरच पण त्याऐवजी ते ज्यांनी त्यांना मतदान केले नाही त्यांना धडा शिकविण्याच्या तयारीत दिसतात. त्यामुळे न सुधारलेले, न बदललेले मोदी-शहा यांना झेलण्याची तयारी विरोधी पक्षांना करावी लागणार आहे. मोदी-शहांची अवस्था ही दुखावलेल्या श्वापदासारखी झाली आहे आणि त्यामुळेच आगामी काळात दुखावलेले श्वापद जसे उलटते तसेच त्यांचे आचरण व वर्तन राहील आणि म्हणूनच विरोधी पक्षांना अत्यंत सावधगिरी बाळगावी लागणार आहे. मतदारांनी मोदी-शहा यांचे पंख कातरतानाच विरोधी पक्षांना मात्र तुल्यबळ केले आहे. त्याचाच फायदा विरोधी पक्षांना म्हणजेच काँग्रेसच्या नेतृत्वाखालील इंडिया आघाडीला घ्यावा लागेल आणि भाजपला चोख उत्तर देण्याची तयारी करावी लागणार आहे.







यासाठी इंडिया आघाडीला गाफील राहता येणार नाही. त्यांना दिवसाचे चोवीस तास, आठवड्याचे सातही दिवस सतर्क रहावे लागणार तरच ते मोदी-शहा या जोडगोळीचा यशस्वी मुकाबला करु शकतील.

मोदी-शहा आणि संघ परिवाराने त्यांच्या झालेले नुकसान भरुन काढण्याची सुरुवात केली आहे. मोदी-शहा दुक्कलीस मतदारांनी या निवडणुकीत घायाळ केले. बेकारी, महागाई यासारख्या त्रस्त जनतेने या जोडगोळीचा जटायु केला. परंतु ही कामगिरी मतदारांनी आणि जनतेने केलेली असतानाही त्याचे श्रेय घेण्यासाठी संघ परिवार पुढे सरसावला आहे. अचानक ब्रह्मज्ञान झाल्याप्रमाणे किंवा साक्षात्कार झाल्याप्रमाणे सरसंघचालकांना सत्ता व अधिकारपदाची मस्ती व गुर्मी चढलेल्या राज्यकर्त्यांच्या दुर्गुणांबाबत बोलण्याची हुक्की आली. सरसंघचालक असे म्हणाले की स्वतःला सेवक म्हणणाऱ्यांमध्ये विनम्र भाव असणे आवश्यक आहे. अहंकार हा घातक असतो अशी उदात्त वचने त्यांच्या श्रीमुखातून बाहेर पडली. सरसंघचालकांना दहा वर्षानंतर अचानक हा साक्षात्कार का झाला ही एक मूलभूत शंका आहे. गेली दहा वर्षे सरसंघचालक आणि त्यांचे सेवाभावी स्वयंसेवक सत्तेचा मेवा मनसोक्तपणे ओरपत आहेत. त्यांच्यात सुखोपभोग आणि चंगळवाद पूर्णत्वाने भिनलेला आहे. जोडगोळीने या स्वयंसेवकांना पदे, मानमरातब, गाडीघोडे, आलिशान घरांची आणि इतरही अनेक प्रलोभनांची खिरापत वाटून पुरते सत्तेच्या आधीन करुन टाकले आहे. एकेकाळी व्यक्तीपेक्षा संघटनेला सर्वोच्चता प्रदान करणाऱ्या संघाच्या विचारसरणीमध्ये एवढे खालावलेपण आलेले आहे की गेल्या दहा वर्षातील एकव्यक्तिकेंद्रित राजवटीच्या विरोधात ब्र उच्चारण्याचीही हिंमत नव्हती. आता जनतेने आणि मतदारांनी या जोडगोळीला त्यांची जागा दाखविल्यावर संघाला कंठ फुटताना दिसत आहे आणि फार मोठा आव आणून आता ते प्रवचने देऊ पहात आहेत. असे करुन ते स्वतःवरील जबाबदारी झटकू पहात आहेत. मोदी-शहा हे संघ परिवाराचे सदस्य आहेत. त्यांची दुष्कृत्ये आणि दुष्कर्मांची दुष्ट छाया आपल्या त्यागाचा दावा करणाऱ्या संघटनेवर पडू नये म्हणून आता ससरसंघचालकांना हा अचानक साक्षात्कार झाला आहे. हा आणलेला आव आहे आणि हा केवळ एक लुटुपुटीचा प्रकार आहे. मी मारतो तू रड असा हा खेळ आता रा.स्व.संघ आणि मोदी-शहा खेळू पहात आहेत. मतदारांनी व सामान्य जनतेने या डावाला बळी पडून चालणार नाही. ना संघ बदललेला आहे ना मोदी-शहा ! याची जाणीव मतदारांनी पक्केपणाने मनाशी ठेवली पाहिजे.

मोदी-शहा बदललेले नाहीत हे एकदा स्पष्टपणे लक्षात ठेवल्यानंतर आगामी काळातील त्यांच्या खेळ्या किंवा चाली काय असतील याचा अंदाज लावणे शक्य होईल. त्यातील एक चाल त्यांनी खेळून दाखविलेली आहे. लोकसभेच्या

अध्यक्षपदी ओम बिडला यांची फेरनिवड झाल्यानंतर त्यांच्याकरवी आणीबाणीच्या निषेधाचा ठराव मांडण्याचा प्रकार त्यांनी केला. याद्वारे त्यांनी काँग्रेस आणि त्यांच्या आघाडीतील घटक पक्षांमध्ये दरी निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे. इंदिरा गांधी यांच्या आणीबाणीच्या विरोधात त्यावेळी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष, समाजवाद्यांचे विविध गट तसेच चरणसिंग यांच्या भारतीय क्रांति दल (पुढे हा भारतीय लोकदल झाला) या पक्षांनी जयप्रकाश नारायण यांच्या नेतृत्वाखाली विरोध केला होता. या सर्वांना त्यामुळे तुरुंगात जावे लागले होते. आता राजकारणाचे संदर्भ बदललेले असले तरी मोदी-शहांना अजुनही आशा वाटत आहे की असे आणीबाणीच्या निषेधाचे ठराव करुन काँग्रेस आणि त्यांच्या मित्रपक्षांमध्ये फाटाफूट करणे शक्य होईल. परंतु हा त्यांचा भ्रम आहे किंवा केविलवाणी धडपड आहे. याचे कारण राजकारणाचे बदललेले संदर्भ ते लक्षात घेऊ इच्छित नाहीत. जयप्रकाश आंदोलनातूनच निर्माण झालेले नीतीशकुमार व रामविलास पास्वान हे भाजपचे साथीदार राहिले आहेत. परंतु लालूप्रसाद किंवा मुलायमसिंग यांनी भाजपशी हातमिळवणी केलेली नाही. त्यांनी काँग्रेसबरोबर हातमिळवणी केली कारण भाजपकडून केले जाणारे राजकारण हे आणीबाणीपेक्षा भयंकर, लोकशाहीविरोधी आणि समाजविरोधी असल्याने या पक्षांनी काँग्रेससारख्या मध्यममार्गी व धर्मनिरपेक्ष राजकीय पक्षाबरोबर हातमिळवणी केलेली आहे. भाजपच्या मुस्लिमविद्वेषी भूमिका व धोरणाला या पक्षांचा सक्त विरोध आहे आणि म्हणूनच त्यांनी वेगळी वाट निवडलेली आहे. त्याचबरोबर एखाद्या पक्षाने इतिहासात केलेल्या चुकांमध्ये दुरुस्ती केली असेल तर त्यांची सुधारित भूमिकाही मान्य करावी लागेल हेही येथे लक्षात ठेवावे लागेल. आणीबाणी लादणे ही चूक होती आणि तिचे दुष्परिणाम जनतेला भोगावे लागले त्याबद्दल इंदिरा गांधी किमान दोनवेळेस जाहीर माफी मागितलेली होती हेही येथे ध्यानात ठेवावे लागेल. गुजरातच्या दंगली आणि त्यात निरपराध मुस्लिमांचे झालेले निर्घृण हत्याकांड याबद्दल त्यावेळी मुख्यमंत्री असलेल्या नरेंद्र मोदी यांना अजुनही माफी मागण्याची इच्छा होत नाही आणि अत्यंत अहंमन्य प्रकारे ते माफी न मागता कोडगेपणाने आपले राजकारण चालू ठेवत आहेत ही बाब लक्षात ठेवणेही आवश्यक आहे.




मोदी-शहा हे सुधारु शकत नाहीत. त्यांना एक गोष्ट चांगली समजलेली आहे की राज्यघटना बदलण्याच्या त्यांच्या मनसुब्यांना मतदारांनी चांगलाच शह दिला आहे. त्यांना बहुमतापासून दूर ठेवून आणि मोदी-शहांना आघाडीचे परावलंबी राजकारण करण्यास त्यांनी भाग पाडले आहे. कोणत्याही निर्णयासाठी किंवा संसदेत देखील कोणतेही विधेयक संमत करण्यासाठी मोदींना आता एकतर्फीपणे कामकाज करणे शक्य होणार नाही. त्याचप्रमाणे ते ज्या कळसूत्री बाहुल्यांच्या माध्यमातून सूत्रे हलवीत असतात त्या बाहुल्यांना देखील लगाम बसणार आहे. त्याचे उदाहरण लोकसभेत पाहण्यास मिळाले. राहूल गांधी यांनी लोकसभेत नीट परीक्षेमधील पेपरफुटीचा विषय उपस्थित केला आणि त्यावर त्वरित चर्चा व्हावी अशी मागणी केली. राहूल गांधी बोलत असतानाच त्यांचा माईक (ध्वनिक्षेपक) बंद करण्यात आला. त्यावरुन विरोधी पक्षांनी आरडाओरडा केला आणि सदस्य बोलत असताना त्याच्यासमोरील माईक परस्पर बंद करण्याची ही पध्दत अत्यंत अनुचित असल्याचे म्हटल्यावर लोकसभा अध्यक्ष ओम बिडला यांना खुलासा करताना चांगलेच अवघड गेले. आपण माईक बंद केलेला नाही असे ते म्हणून लागले. परंतु हा असभ्य प्रकार लोकसभेत आणि राज्यसभेत मोदी राजवटीतच चालू करण्यात आला आहे. लोकसभा असो किंवा राज्यसभा असो, या दोन्ही सभागृहात पीठासीन प्रमुखांच्या

परवानगीखेरीज कोणतीच गोष्ट होत नसते. त्यामुळे ओम बिडला यांच्या मंजुरीखेरीज माईक बंद कसा होऊ शकतो हे आता स्पष्ट करावे लागेल. नीट परीक्षा पेपरफुटीबाबत सरकारने अद्याप सभागृहात निवेदन केलेले नाही. उलट शिक्षणमंत्र्यांनी संसदेबाहेर पत्रकार परिषद घेऊन हे प्रकरण सीबीआयकडे तपासाला दिल्याचे म्हटले आहे. संसदेचे अधिवेशन चालू असताना ही माहिती संसदेला सर्वप्रथम देण्याचे बंधन असताना त्याबाबत बाहेर घोषणा करुन संसदेला दुय्यम स्थान देण्याचा किंवा संसदेचे महत्व हिणकस ठरविण्याचा प्रकार जोडगोळीने केला आहे. अर्थात तो त्यांच्या कार्यशैलीचाच एक भाग असल्याने त्याबद्दल नवल वाटण्याचे कारण नाही. या जोडगोळीने संसदेत तर दादागिरी सुरु केलेलीच आहे. राज्यकारभारातही त्यांची दादागिरी आणि गुंडगिरी कशी चालू होईल याचेही आकलन विरोधी पक्षांना करावे लागणार आहे. कारण ही जोडगोळी कोणती जुनीपानी प्रकरणे उकरुन काढून




विरोधी पक्षांच्या नेत्यांना विविध प्रकरणात अडकविण्याचा प्रयत्न करणार आहे हे स्पष्ट आहे. त्यामुळे विरोधी पक्षांना त्याबाबतही जागरूक रहावे लागेल.


विरोधी पक्षांच्या नेत्यांना विविध प्रकरणांमध्ये अडकविण्याचाच एक भाग म्हणजे त्यांच्याविरुध्द विविध राज्यांमध्ये केसेस दाखल करण्याचा राहील. यामुळे संबंधित राजकीय नेता हा केवळ तारखांवर तारखांमध्येच कसा गुंतलेला राहील हे पाहिले जाईल आणि तशा प्रकरणांमध्ये त्यांना गोवण्याचे अनेक प्रकार केले जातील. अगदी ताजे उदाहरण राहूल गांधी यांचेच घ्यावे लागेल. २०१८मध्ये एका भाषणात राहूल गांधी यांनी अमित शहांवर टिप्पणी करताना एका खुनी व्यक्तीला पक्षाध्यक्ष करणारा भाजप हा जगातला एकमेव पक्ष असावा असे म्हटले होते. त्याबरोबर भाजपभक्तांनी राहूल गांधी यांच्याविरुध्द झारखंडमध्ये तक्रारी केल्या व ती प्रकरणे न्यायप्रविष्टही झाली आहेत. रांची व चाइबासा न्यायालयांमध्ये ही प्रकरणे प्रलंबित होती. परंतु आता राहूल गांधी अधिकृत विरोधी पक्षनेते झाल्याबरोबर या प्रकरणात त्यांना रांची विशेष आमदार-खासदार न्यायालयाने समन्स जारी केले आहे. प्रकरण २०१८ मधील आहे हे याठिकाणी लक्षात घ्यावे लागेल. हे उदाहरण देण्याचे कारण असे की आता आगामी काळात दुखावलेले मोदी-शहा विरोधी पक्षांच्या प्रमुख नेत्यांविरुध्द अशी प्रकरणे उकरुन काढणार आहेत हे लक्षात ठेवावे लागेल.

मोदी-शहा यांच्या कार्यशैलीचा आणखी एक महत्वाचा भाग आहे. त्यांना संसदेचे कामकाज सुरळीत चालावे अशी अजिबात इच्छा नसल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे त्यांनी त्यांच्या नेहमीच्या युक्त्या व चलाख्या सुरु केल्या आहेत. संसद अधिवेशनाच्या प्रारंभालाच एखादी वादग्रस्त टिप्पणी करायची आणि त्यावरुनच संसदेत गोंधळ होऊ द्यायचा ही त्यांची रणनीती आता सर्वांना माहिती झाली आहे आणि त्यामुळेच त्यांचा हा डाव यशस्वी होऊ न देण्याची जबाबदारी आता विरोधी पक्षांवर आहे. आणीबाणीबाबत परस्पर आणि एकतर्फी ठराव करणे हा देखील याच रणनीतीचा भाग आहे.

एका बाजुला विरोधी पक्षांच्या नेत्यांना विविध प्रकरणांमध्ये अडकविण्याचे प्रकार करीत असतानाच दुसऱ्या बाजुला आपले सरकार किती राज्यघटनाप्रेमी आहे हे दाखविण्याचे प्रयत्न या जोडगोळीकडून केले जातील. त्याची सुरुवात मोदींनी संसदेतील राज्यघटनेची मूळ प्रत डोक्याला लावून एक मोठे नाटक केल्याचे आख्ख्या भारताने दूरदर्शनवर पाहिलेले आहेच. किंबहुना ओम बिडला यांना आणीबाणी विरोधी ठराव करायला लावताना त्यांनी केलेल्या भाषणात इंदिरा गांधी यांनी राज्यघटना बदलली होती या मुद्यावर विशेष भर दिला होता ही ठळकपणे जाणवणारी बाब होती. याखेरीज काँग्रेसच्या दीर्घ राजवटीत कितीवेळा राज्यघटनेत दुरुस्त्या केल्या गेल्या होत्या याची आकडेवारीही भाजपचे प्रचारक प्रसारित करीत आहेत. परंतु एक आणीबाणीचा अपवाद वगळता बाकीच्या दुरुस्त्या या राज्यकारभार आणि कल्याणकारी हेतुनेच केलेल्या होत्या. त्यामुळे प्रचारकांचा खोटी माहिती प्रसारित करण्याचा डावही फसला. त्यामुळेच आगामी काळात या जोडगोळीचे राज्यघटनाप्रेम उफाळून येणार आहे हे पाहण्यास मिळेल. अर्थात त्यात नाटकाचा भाग अधिक असेल. परंतु खरोखर मोदी-शहा ही जोडगोळी बदलली असेल तर त्यांनी सर्वप्रथम संसदेतील पत्रकारांच्या प्रवेशावर लावलेले निर्बंध उठविणे अपेक्षित आहे. किमान

तेवढे पाऊल जरी त्यांनी उचलले तर त्यांच्यात बदल झाला आहे असे मानण्यासाठी थोडीफार तरी जागा निर्माण होईल. विशेष म्हणजे भाजपला अनुकूल असलेल्या काही वरिष्ठ पत्रकारांनी देखील यासंदर्भात मोदी सरकारला सूचना केलेली आढळते. काँग्रेसचे खासदार माणिक टागोर यांनीही लोकसभा अध्यक्षांना पत्र लिहून मागणी केलेली आहे. पत्रकारांच्या विविध संघटनांनी देखील यासंदर्भात सामूहिक मागणी केलेली आहे. अर्थात अद्याप सरकारने याबाबत कोणतेही सकारात्मक पाऊल उचललेले नाही. नव्या संसदेत विरोधी पक्षांवर टीकेचा हल्ला करण्यासाठी पंतप्रधानांना पहिली संधी लवकरच मिळेल. राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील धन्यवाद प्रस्तावावर आता संसदेच्या पावसाळी अधिवेशनात चर्चा होईल आणि

भूमिका घेतली जात आहे. मात्र काँग्रेस वगळता त्यांच्या नेतृत्वाखालील आघाडीतील इतर घटकपक्षांबाबत मात्र सौम्य धोरण घेतल्याचे दिसून येते. ही तफावत किंवा फरक लक्षात येणारा असल्याने त्याचा येथे उल्लेख अत्यावश्यक आहे. याचा स्पष्ट अर्थ हाच आहे की मोदी-शहा जोडगोळीने इंडिया आघाडीतील घटक पक्षांना काँग्रेसपासून दूर करुन काँग्रेसला एकाकी करण्याचे प्रयत्न सुरु केलेले आहेत. सत्ताधाऱ्यांचा हा डाव ओळखून काँग्रेसला सरकारच्या विरोधात डावपेच किंवा रणनीती आखावी लागणार आहे. यासाठी राजकीय लवचिकता ठेवून इंडिया आघाडीतील घटकपक्षांना आपल्या बरोबर राखण्याची जबाबदारी काँग्रेसला पार पाडावी लागणार आहे. याचे एक साधे उदाहरण सदस्यांच्या शपथविधीच्या




त्या चर्चेला उत्तर पंतप्रधान देतील. दरवर्षी ते विरोधी पक्षांना हिणकस, टाकाऊ ठरवून स्वतःची टिमकी वाजवत असतात. यासाठी ते जुनेजुने संदर्भ देत असतात. पं. नेहरूंवर टीका करण्यासाठी ते त्यांच्या जुन्या भाषणांचे, निर्णयांचे अप्रस्तुत किंवा गैरलागू असे संदर्भ देऊन आपले मुद्दे जनतेवर लादण्याचा प्रयत्न करीत असतात. ही त्यांची वैशिष्ट्यपूर्ण शैली लक्षात घेता यावेळी ते धन्यवाद प्रस्तावावर बोलताना स्वतःचे राज्यघटनाप्रेम सिध्द करण्यासाठी काँग्रेसच्या काळात झालेल्या घटनादुरुस्त्या, आणीबाणी वगैरेंचा उल्लेख करतील अशी अपेक्षा आहे. त्यांना प्रत्युत्तर देण्याची तयारी काँग्रेस पक्षाला करावी लागणार आहे.

वर उल्लेख केल्याप्रमाणे मोदी-शहा या जोडगोळीने इंडिया आघाडीत फूट पाडण्यासाठी प्रयत्न सुरु केले आहेत. पत्रकारकक्षातून लोकसभेच्या वर्तमान कामकाजावर नजर टाकली असता एक बाब ठळकपणे लक्षात येते की लोकसभा अध्यक्षांकडून काँग्रेसच्या सदस्यांबाबत अत्यंत कठोर

वेळी घडले. इंडिया आघाडीच्या अनेक सदस्यांनी शपथ घेतल्यानंतर जय संविधान अशा घोषणा दिल्या. शशि थरुर यांनीही शपथ घेतल्यानंतर जय संविधानची घोषणा देताच त्यांना तेथल्या तेथे असला प्रकार न करण्याबाबत सुनावण्यात आले. मात्र इतर विरोधी पक्षांच्या सदस्यांबाबत एवढे कठोर धोरण पीठासीन अधिकाऱ्यांकडून अवलंबिले गेले नाही ही उल्लेखनीय बाब मानावी लागेल आणि मोदी-शहा यांच्या फूटपाड्या चलाख्या व डावपेचांची जाणीव काँग्रेसला निश्चितच ठेवावी लागेल. याला प्रत्युत्तर म्हणून काँग्रेसने देखील भाजप आघाडीत पाचर ठोकण्याचे डावपेच आखणे उपयोगी पडणार आहे. इंडिया आघाडीतील पक्ष फुटू नयेत यासाठी काँग्रेसला पुढाकार घेण्याची आवश्यकता आहे आणि राहूल गांधी यांना विरोधी पक्षनेते या नात्याने ती जबाबदारी पार पाडावी लागणार आहे. आता मतदार काँग्रेसलाच निवडतील अशा भ्रमात त्यांनी राहू नये. उलट भाजपच्या जोडगोळीतर्फे ज्या संभाव्य

फूटपाड्या कारवाया ते करु पाहतील त्या आधीच ओळखून किंवा त्यांचा आधीच अंदाज घेऊन जोडगोळीच्या चलाख्यांना आधीच प्रत्युत्तर देऊन त्यांचे हेतु हाणून पाडण्यासाठी विशेष जागरुकता इंडिया आघाडीला दाखवावी लागणार आहे. ज्याप्रमाणे ऐन निवडणुकीच्या तोंडावर चौधरी चरणसिंग यांना भारतरत्न देऊन मोदी-शहांनी लोकदलाचे जयंत चौधरी यांना इंडिया आघाडी व समाजवादी पक्षापासून तोडले ते उदाहरण इंडिया आघाडीच्या नेत्यांनी ध्यानात ठेवणे गरजेचे आहे. भारतरत्नचा उपयोग ते राजकीय कारणांसाठी करायला मागेपुढे पहात नाहीत हे येथे लक्षात ठेवण्याची गरज आहे. या मालिकेत तमीळनाडूत शिरकाव करण्यासाठी ही दुक्कल करुणानिधि यांनाही मरणोत्तर भारतरत्न जाहीर करुन द्रमुकला देखील इंडिया आघाडीपासून तोडण्याचा प्रयत्न करु शकतील हेही ध्यानात ठेवावे लागेल. थोडक्यात सत्तेत राहण्यासाठी ही जोडगोळी काहीही करु शकते आणि त्यासाठीच सतर्क राहून आणि त्यांच्या संभाव्य हालचालींचा पूर्व अंदाज व अनुमान बांधूनच इंडिया आघाडीला विलक्षण सावधानतेने पावले टाकावी लागणार आहेत. क्षणाचाही गाफीलपणा त्यांच्या अंगाशी आल्याखेरीज राहणार नाही. त्याचप्रमाणे मतदारांनी नरेंद्र मोदी यांचा ब्रँड आता नाकारलेला आहे. स्वतःला अवतारी पुरुष म्हणण्यापर्यंत त्यांनी मजल मारली होती आणि मतदारांनी त्यांच्या या नाटकांना निर्णायकपणे नाकारलेले आहे. त्यांच्या व्यक्तिमत्वाला वलयांकित करण्याचे सर्व प्रयत्न, त्यांचे महिमामंडन या सर्वच गोष्टी मतदारांनी चक्क उधळून लावलेल्या आहेत. मतदारांनी जी कामगिरी बजावली आहे तीच आता इंडिया आघाडीने पुढे न्यायला हवी. मोदी हे बहुरुपी असले तरी त्यांचे प्रत्येक रूप जनतेसमोर उघडे पाडण्याची संधी इंडिया आघाडीला सोडून चालणार नाही.




मोदींनी त्यांच्या सरकारसाठी पहिल्या शंभर दिवसांचा कार्यक्रम तयार केलेला आहे. विरोधी पक्षांनी देखील त्याला प्रत्युत्तर म्हणून आपला शंभर दिवसांचा कार्यक्रम तयार करण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी संसद हे विरोधी पक्षांसाठी प्रमुख व्यासपीठ राहणार आहे. संसदेतच गेली दहा वर्षे चर्चेऐवजी गोंधळाला अग्रक्रम मिळालेला आहे. आता मतदारांनी विरोधी पक्षांना ताकद दिलेली असताना विरोधी पक्षांनी त्याचा उपयोग करुन गेली दहा वर्षे या राज्यकर्त्यांनी संसदेचा जो दुरुपयोग केला आहे तो आता थांबविण्याचे काम केले पाहिजे. राज्यघटनेचे संरक्षण, संघराज्यवाद म्हणजेच राज्यांच्या स्वायत्ततेचे मुद्दे आणि धर्मनिरपेक्षता यासारख्या मुद्यांवर सरकारला घेरण्याचे काम करावे लागेल. यासाठी इंडिया आघाडीतील विविध घटक पक्षांमध्ये परस्पर समन्वय राखणे अनिवार्य असेल. यासाठी त्यांनी एखाद्या समन्वय यंत्रणेची स्थापना करुन त्या यंत्रणेची सूत्रे एखाद्या अनुभवी नेत्याकडे द्यावीत ज्यामुळे समन्वयात अडचणी येणार नाहीत आणि राज्यकर्त्यांना ठोस, भरीव स्वरुपाचा आणि अर्थपूर्ण विरोध करणे शक्य होणार आहे. सरकारच्या एखाद्या अनुचित निर्णयावर वेगवेगळ्या प्रतिक्रिया देण्याऐवजी इंडिया आघाडी या नात्याने एकत्रित स्वरुपाची प्रतिक्रिया दिल्यास त्या खऱ्या अर्थाने परिणामकारक होतील. त्याचप्रमाणे इंडिया आघाडीने त्यांची एकजूट मतदारांच्या मनावर ठसविण्यासाठी एखादे केंद्रीय कार्यालय दिल्लीत उभारण्याची गरज आहे. त्याचप्रमाणे ज्या राज्यांमधून या आघाडीला ताकद मिळाली तेथील मतदारांचे संयुक्तरीत्या आभारसभा आयोजित करणे अगत्याचे असेल. त्याचप्रमाणे ज्या राज्यात इंडिया आघाडीला फारसे यश मिळू शकले नाही तेथे देखील एक संयुक्त ताकद व आघाडीच्या मजबुतीचे दर्शन मतदारांना घडवून तेथेही शिरकाव करण्याचे काम एकजुटीने करण्याची वेळ आली आहे. या सर्व बाबी लक्षात घेता विरोधी पक्षांनी आगामी काळात आपली संयुक्त ताकद वाढवत नेणे अपेक्षित आहे. तरच पुढे येणाऱ्या निवडणुकीत मतदार इंडिया आघाडीला खरा पर्याय म्हणून स्वीकारतील.

■■■

# आता महाराष्ट्राची सत्ता मिळविण्यासाठी साथ द्या

## शरद पवार यांचे आवाहन



आजचा हा दिवस माझ्या आयुष्यात लक्षात राहणारा दिवस आहे. मला जुने दिवस आठवत आहेत की सुरुवातीच्या काळामध्ये चौथीपर्यंत माझं शिक्षण इथे झालं. तुम्हा सगळ्यांना माहित आहे पवार वस्ती कुठे होती तिथून मी या ठिकाणी शाळेत येत असे. आणखी काही लोक आमच्याबरोबर असायचे आणि इथे शाळा एका वर्गात होती. वाघमोडे नावाचे मास्तर होते. ते आम्हा लोकांना शिकवत असत आणि चौथीपर्यंत या ठिकाणी शिक्षण घेतलं. शनिवार आणि रविवार हा सुट्टीचा दिवस असायचा. कधी कधी आम्हाला गुरं ढोरांची देखभाल करायला पाठवत असत. त्या काळातली काटेची वाडी माझ्या लक्षात आहे. आज बदल झाला तुम्हा सगळ्यांच्या कष्टाने आणि सत्ता हातात आल्यानंतर त्या सत्तेचा उपयोग लोकांच्या आयुष्यात बदल करण्यासाठी करायचा असतो ही शिकवण आम्हा लोकांना यशवंतराव चव्हाण यांनी दिली. त्या रस्त्याने आम्ही आतापर्यंत गेलो.

इथे आणखी एक आठवण मला आहे. महाराष्ट्राच्या



**राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी लोकसभा निवडणुकीच्या निकालानंतर ११ ते २० जून या कालावधीत बारामती तालुक्यातील विविध गावांचा दौरा करून जनतेशी संवाद साधला. या दौऱ्यात त्यांनी केलेल्या भाषणांचा संक्षिप्त सारांश...**

निवडणुकीला मी अनेकदा उभा राहिलो. १९६७ साली पहिल्यांदा उभा राहिलो व त्यानंतरच्या सगळ्या निवडणुकीमध्ये मला यश आलं त्याचं कारण नारळ इथे फोडला होता. प्रत्येक निवडणुकीचा नारळ कन्हेरीत होता. त्यानंतर आपलं यश होतं, हा गेल्या अनेक वर्षांचा अनुभव आहे. हा सगळ्यांचा अनुभव आहे. सुप्रियाने सुद्धा चारदा देशाची लोकसभा जिंकली. त्याचं नारळ इथे फुटलं होतं म्हणून काटेची वाडी, कन्हेरी यांचे जे काही ऋणानुबंध आहेत त्याच्या पाठीमागे इतिहास आहे.

म्हणून इथे यायचं म्हटलं तर आम्हा लोकांना अतिशय आनंद होतो.

यंदाची निवडणूक वेगळी होती पण माझं मन सांगायचं की, बारामतीकर साथ सोडणार नाही. मन जे सांगायचं ते शेवटी खरं झालं. ही निवडणूक संघर्षातून गेली. दोन-चार ठिकाणी दोन चार बुथवर कमी जास्त मत पडली असतील. पण जे लोक सांगत होते काहीच पडणार नाही तिथं पडली, चांगले पडली आणि सबंध मतदार संघामध्ये पडली. या वेळेला एक प्रकारची शक्ती दिल्ली पासून लावली. देशाचे प्रधानमंत्री महाराष्ट्रात आले, माळशिरस तालुक्यामध्ये, कराडला, अहमदनगरला, नाशिकला, नागपूरला, औरंगाबाद. १८ ठिकाणी ते आले त्या १८ पैकी आठ की नऊ ठिकाणी निवडणुकीचा एकच विषय



होता शरद पवार..! भाग्य माझं की देशाचा प्रधानमंत्री आज निम्म्या वेळेला माझं नाव घेतो काय साधीसुधी गोष्ट आहे? काटेच्या वाडीचा चमत्कार त्यांना कळला आणि म्हणून कुठेही गेले तर ते माझ्याबद्दल बोलत होते. मी सांगितलं एका ठिकाणी की इथून पुढच्या निवडणुका असतील तर मोदी साहेब तुम्ही आमच्याकडे जास्त लक्ष ठेवा. कारण त्यांनी लक्षात ठेवलं टीकाटिप्पणी केली तर मतं उलटी होतात, ते आपण याही निवडणुकीत पाहिलं. काही काही लोक अशी असतात की ज्यांचा स्वभाव फक्त टिकाटिप्पणी करायचा असतो, नावं ठेवायची, टीका करायची. यातून जर सुटका करायची असेल तर त्यांच्या हातातून सत्ता काढून घेतली पाहिजे. तुम्ही मला अनेकदा सत्ता दिली. आता मला निवडणुकीला उभे राहून ५६ वर्षे झाली. विधानसभेत गेलो, राज्यसभेत गेलो, लोकसभेत गेलो. केंद्राचा संरक्षण मंत्री झालो, शेती खात्याचा मंत्री झालो. देशपातळीवर व आंतरराष्ट्रीय पातळीवर काम करण्याची जी संधी मिळाली त्यामागे तुमच्यासारख्या लाखो जनतेचे आशीर्वाद व तुमचा पाठिंबा यामुळेच या सर्व गोष्टी घडू शकल्या. माझ्यापरीने जे काही करण्याचा प्रयत्न करता येईल तो मी केला.

निवडणूक झाली आता पाठीमागच्या काही गोष्टी काढायच्या नाहीत, आपण काम करत राहायचं. सुप्रियाला तुम्ही चौथ्यांदा निवडून दिलं. देशाच्या लोकसभेत एक पद्धत आहे की निवडून आलेल्या खासदारांनी लोकांच्या प्रश्नांची किती वेळा मांडणी केली आणि त्यातील काही ठराविक सदस्य असे आहेत की त्यांचं नाव त्या ठिकाणी घेतलं जातं. त्याच्यात सुप्रिया आहे आणि त्याचे कारण त्यांची हजेरी ९८ टक्के पार्लमेंटमध्ये आहे. लोकांचे प्रश्न मांडणारा सभासद म्हणून त्यांचा नावलौकिक आहे. त्याचे श्रेय हे तुम्हा लोकांना आहे. मी नेहमी सांगतो या देशात लोकशाही आहे जगातल्या अनेक देशात हुकुमशाही आहे. इथे हुकूमशाही आणायचा प्रयत्न होता पण या देशातले लोक आमच्यापेक्षा, आम्ही याचा अर्थ आम्ही राजकारणी, आम्ही पदाधिकारी आमच्यापेक्षा तुम्ही सामान्य लोक अधिक शहाणे आहात आणि तुमच्या शहाणपणामुळे या देशाची लोकशाही टिकली. आज जगामध्ये भारताचा नावलौकिक अमेरिके इतकाच महत्वाचा लोकशाही

प्रधान देश म्हणून जो झाला त्याचे श्रेय हे तुम्हा लोकांना आहे. तुम्ही हुकूमशाहीकडे कधी देश जाऊ दिला नाही.

१९७५-७६ ला इंदिरा गांधींनी देशात आणीबाणी केली आणि १९७७ मध्ये निवडणूक झाली. देशातील जनतेने त्यांच्या अधिकावर गदा येते म्हणून इंदिरा गांधींचा पराभव केला. लोकशाहीच्या बाजूला न जाता तुम्ही दुसऱ्या रस्त्याने जाताय ही गोष्ट लोकांना पटली नाही. ती पुन्हा होता कामा नये यासाठी इंदिरा गांधींचा पराभव केला. त्यानंतरच्या काळात पुन्हा निवडणुका आल्यावर ज्यांना संधी दिली ते देश चालवू शकत नाही हे कळल्यावर जनतेने इंदिरा गांधींना पुन्हा सत्तेवर बसवले. याचा अर्थ हा आहे की आम्ही काहीही निकाल घेतले ते लोकं मान्य करत नाहीत.

विशिष्ट राज्य देशामध्ये होते. आजही त्यांच्या हाती सत्ता गेली. पण दहा वर्षांची सत्ता आणि यावेळच्या सत्तेत फरक आहे. दहा वर्षे त्यांच्या हाती स्पष्ट बहुमत होते. आणि अपेक्षा होती की, समाजातील सगळ्या धर्माच्या, जातीच्या, भाषेच्या लोकांना त्यांनी एक प्रकारची धोरणात्मक निर्णय घ्यायची आवश्यकता होती. पण त्यांची निर्णय घ्यायची पद्धत होती की, समाजातील काही घटकांबद्दल मनामध्ये आकस असावा, अशी होती. दुर्दैवाने त्यांची काही भाषणं झाली, ती देशातील एकजुटीला तडा देणारी होती.

देशाचा प्रमुख असतो तो हिंदुस्थानचा प्रमुख असतो. ज्याची जबाबदारी असते सगळ्यांच्या हिताची जपणूक करणे. पण प्रधानमंत्र्यांनी काही ठिकाणच्या भाषणात काही गोष्टी




आमच्याकडून काही चुका झाल्या तर आम्हाला जी शिकवायची ती अक्कल शिकवली जाते. हे या देशाच्या आणि लोकशाहीच्या दृष्टीने भाग्य आहे. या निवडणुकीत मोदी साहेबांनी अशीच भूमिका घेतली. व्यक्तिगत हल्ले करायचे. माझ्याबाबतीतही त्यांनी भटकती आत्मा असे वक्तव्य केले. त्यांनाही मी नंतर सांगितले आता हा आत्मा भटकतोय तो तुम्हाला सोडणार नाही. निवडणुकीत जे काय व्हायच ते झाले. प्रधानमंत्री पद हे देशाचे असते ते कोणा एकट्यादुकट्याचे नसते. त्यापदावर बसलेल्यांनी विचार हा सबंध देशाचा करायला हवा होता. दुर्दैवाने या निवडणुकीत तसे झाले नाही. चुकीच्या गोष्टी मांडल्या गेल्या. देशातील राजकारण बदलतंय. गेले दहा वर्ष

सांगितल्या. त्यांनी धर्माचा उल्लेख केला नाही, पण उल्लेख न करता लोकांना समजेल अशा प्रकारचा उल्लेख त्यांनी केला. त्यांनी भाषणात सांगितले, ज्या समाजात अधिक मुलांना जन्म दिला जातो त्या लोकांच्या हाती सत्ता गेली तर तुमच्या भगिनींच्या गळ्यातील मंगळसूत्र काढून घेतले जाईल. असे म्हणण्याचे काही कारण नाही. पण मातेच्या मंगळसूत्राला हात लावण्याची प्रवृत्ती या देशात लोकांची नाहीये. त्यांनी शेतकऱ्यांच्या मेळाव्याला सांगितले की, जर मताला चुकलात तर तुमच्या घरी दोन म्हशी असतील तर त्यातली एक ते घेऊन जातील. दुर्दैवाने या निवडणुकीमध्ये प्रधानमंत्र्यांकडून एक चुकीची भूमिका मांडली गेली.



दहा वर्षे सत्ता होती पण आज चित्र बदलले. आज लोकांनी सत्ता त्यांच्या हाती दिली, पण त्यांना बहुमत मिळालं नाही. चंद्रबाबू नायडू, नितिश कुमार यांची मदत नसती तर यांचे सरकारच झालं नसते. त्या दोघांच्या मदतीने आज त्याठिकाणी सरकार झालं. याचा अर्थ समजायचा की सत्ता किती महत्वाची असली जबरदस्त असली आणि ती सत्ता जर डोक्यात गेली आणि पाय जमिनीवर राहिले नाहीत, तर या देशाचा सामान्य माणूस योग्य दिवशी योग्य निकाल घेतो. तो निकाल यावेळी लोकांनी घेतला. आमचा प्रयत्न आहे की, देशातील राज्यातील विरोधी पक्षाचे लोक एकत्रित करणे, विरोधासाठी विरोध नाही तर राज्यातील जनतेच्या हिताची जपणूक करणे जर राज्यकर्त्यांकडून होत नसेल तर, गप्प बसायचे नाही. लोकशाहीच्या चौकटीत बसून आपली मत मांडायचे हे करण्यासाठी जबरदस्त विरोधी पक्ष आज हवा आहे. तो उभा करण्याची कामगिरी आम्ही सगळे मिळून करू हा विश्वास तुम्हाला देतो.

गेल्या १०-१५ दिवसात मी, सोनिया गांधी, राहुल गांधी किंवा महाराष्ट्राचे काँग्रेस, उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालची शिवसेना अशा आम्ही सगळ्यांनी एका विचाराने जायची भूमिका घेतली आहे. लोकांच्या सुखदुःखात जागरूक राहायचं. त्यांचे दुःख कमी कसे करता येईल त्यासाठी लोकांनी दिलेल्या संधीचा पुरेपूर उपयोग करायचा. यासाठी तुम्हा सर्वांची साथ नेहमी मिळाली आहे, यापुढेही राहील. तुमच्यासमोर जे प्रश्न आहेत त्याची सोडवणूक करण्यासाठी आपले आमदार आणि बाकी सर्वजणांना बरोबर घेऊन आमच्याकडून पावले टाकली जातील.

या निवडणुकीमध्ये टीकाटिप्पणी फार झाली, वाटप झालं असं म्हणतात. आणखी काही गोष्टी घडल्या. लोकांना चिंता होती जे व्हायचं तेच झालं आणि त्याचे कारण तुम्ही मत द्यायला आत जाता आणि बटन दाबता त्या वेळेला तुमचा जो निर्णय असतो तो कुठेही चुकीच्या माणसाला जात नाही. म्हणून यामध्ये कमी येतील दोन मतं जास्त येतील त्याचा निर्णय तुम्हा सर्वांचा आहे. त्यामुळे सुप्रियाताई मोठ्या मतांनी निवडून आल्या. मला काही लोक म्हणत होते गावात फलक लागलेत. मी म्हटलं, त्यांचे फलक म्हणजे आपले यश. तुम्ही फलक कितीही लावा, शेवटी मत कोणाला दिलं, शेवटी निवडून कोण आलं या गोष्टींचा विचार लोक करत असतात. म्हणून त्याची चिंता करायची नाही.



आता काही गोष्टींकडे मला लक्ष द्यावे लागेल. आपल्याकडे कारखानदारी आहे छत्रपती हा कारखाना सुरू करण्यामध्ये त्या काळात काटेवाडी च्या लोकांनी अनेकांचा हातभार होता. माझे वडील त्याच्यामध्ये होते, आप्पासाहेब पवार यांचं योगदान होतं आणि ही कारखानदारी चांगली चालली. आता काय झालं मला माहिती नाही, आता कोण मार्गदर्शन करतं याच्या खोलात जावं लागेल. इथल्या कारखान्याची निवडणूक किती हे तुमच्या संसाराची निवडणूक आहे. तुमच्या संसाराची निवडणूक असेल त्याच्यामध्ये लक्ष घालावेच लागेल, त्यामध्ये लक्ष घालून स्थिती बदलेल कशी याची काळजी घ्यावीच लागेल. काही नेते मंडळींनी कारखानदारी आपल्या हातात ठेवली, माणसं बसवली. कष्टाने उभा केला त्याच्यावर दुसरा कोणीतरी काय करतो ते तुम्हाला माहित आहे. म्हणून हे दुरुस्त करायचं असेल ते दुरुस्त करण्यासाठी आपण एकत्र राहून हे दुरुस्त करायचंय.

उद्या आणखी निवडणुका येतील लोकसभेची झाली, विधानसभेची येईल, कारखान्याची येईल. प्रत्येक ठिकाणी योग्य निकाल घ्यायचे, मतदान करायचे आणि लोकांच्या हिताचे राजकारण करायचे हे सूत्र घेऊन आपल्याला काम करायचे आहे आणि याच्यासाठी तुम्हा लोकांची एकी हवी आहे. काही लोक दिसत नाहीत. मी गेले दोन दिवस बारामती तालुक्यात हिंडतोय. माझा अनेक वर्षांचा अनुभव आहे मी गेलो तर अनेक लोक त्या ठिकाणी येतात, सगळे नेते असतात. आता या निवडणुकीत मी जातोय सगळीकडे. नव्या पिढीची, गरिबांची, सामान्य लोकांची गर्दी दिसते पण नेते दिसत नाही कुठे. नेते कुठे गेले कळत नाही, मलिदा गँग बाजूला झाली असे हे म्हणतात. आपल्याला दुरुस्ती करायची आहे, लोकांच्या जीवनात फरक करायचा आहे आणि त्यासाठी स्वच्छ व्यवहार याच्याशी तडजोड करायची नाही. जिथे मलीदा गँगचा जे काही उद्योग असेल ते कुणाचाही असो त्यांना त्या ठिकाणी त्यांची जागा दाखवू आणि परिसर हा दुरुस्त करू एवढंच काम करायचंय त्यासाठी तुम्ही जागरूक रहा.

कुठलीही निवडणूक आली त्यासाठी जागरूक रहा. तुमच्या जागरुकीच्या जोरावर आपण चित्र बदलू आणि ते चित्र बदलायचे आहे. माझा प्रयत्न आहे की महाराष्ट्रात बदल करायचा आहे, महाराष्ट्रात राज्य आणायचंय आणि महाराष्ट्रात राज्य आणून जे काही लोकांचे सुख दुःख आहे त्यातून लोकांची सुटका करायची आणि एक स्वच्छ, चारित्र्यसंपन्न राजकारणाची समाजकारणाची सुरुवात करायची आहे. एवढेच मी या ठिकाणी सांगतो. नेते कुठेही गेले तरी सामान्य लोक कुठे गेले नाही हे सुप्रियाच्या निवडणुकीत मी बघितलं. पन्नास टक्के महिलांची जी संख्या आहे त्या महिलांनी सुद्धा आपलं काम चोख केलं. त्यामुळे या ठिकाणी यश आलं त्याच रस्त्याने जाण्याचा निर्धार आपण करूया, पाऊलं टाकूया. मी तुमच्या बरोबर आहे.

१९६७ साली मी पहिल्यांदा महाराष्ट्राच्या विधानसभेला उभा राहिलो. त्या काळामध्ये तुम्ही लोकांनी मोठ्या मतांनी मला विजयी केलं. तशी त्या काळातील निवडणूक सोपी नव्हती. सोमेश्वर कारखान्याचे बाबाराव काकडे यांच्या विरुद्धची ती लढाई होती. मी कॉलेजमधून नुकताच बाहेर आलो होतो आणि मोठ्यांशी संघर्ष होता. त्या काळामध्ये पुलावरून जाणं एवढं सोपं असायचं नाही, अवघड असायचं. एवढा मोठा संघर्ष होता पण त्या संघर्षाच्या काळामध्ये सुद्धा या तालुक्यातल्या जनतेने आणि विशेषतः त्या काळातल्या तरुण पिढीने मला मोठ्या मतांनी विजयी केलं. तेव्हापासून आजपर्यंत





गेले ५० ते ६० वर्ष कधी महाराष्ट्राच्या विधानसभेला, कधी देशाच्या लोकसभेला, कधी राज्यसभेला, ज्या निवडणुकीला मी उभा आहे त्या निवडणुकीला तुम्ही लोकांनी मला विजयी केलं. त्याला अपवाद एकदाच आहे की एकदा आता उत्तमराव बोलले. त्यांच्या भागातून एकदा मी उभा होतो माढ्यामधून. एकदा फक्त अपवाद सोडला तर सगळ्या निवडणुका याच भागातून झाल्या आणि या सगळ्या तुम्ही लोकांनी यशस्वी केल्या.

आजची निवडणूक ही सुप्रिया यांची चौथी निवडणूक आहे. याच्या आधी तीन निवडणुकांमध्ये तुम्ही विजयी केलं आणि परवा झालेली चौथी निवडणूक इथे सुद्धा तुम्ही फार मोठ्या मतांनी सुप्रियाला विजयी केलं. यावेळी या निवडणुकीमध्ये सबंध देशाचे लक्ष होतं. कुठेही गेलं तर चर्चा होती, बारामतीला काय होणार? मला खात्री होती की या भागातील तुम्ही सर्व मतदार बंधू-भगिनी कुणी कितीही विरोध केला तरी मताची वेळ जेव्हा तुमच्यावर येईल, जेव्हा मतदान केंद्रात जाल तेव्हा नेमकं कोणतं बटन दाबायचं हे तुम्हाला सांगावं लागत नाही. हे दाखवून तुम्ही सुप्रियाला मोठ्या मतांनी विजयी केलं.

देशाचे प्रधानमंत्री दीड लाख मतांनी निवडून आले आणि सुप्रिया एक लाख आणि ५४ हजार मतांनी निवडून आली. याचा अर्थ तुम्ही लोकांनी पंतप्रधानांपेक्षा सुद्धा थोडी जास्त मतं आपल्या उमेदवाराला देऊन विजयी केलं. निवडणूक झाली, आता दुसरे प्रश्न आहेत. आत्ताचे जे सरकार आहे ते सरकार शेतकऱ्यांच्या हिताचा विचार न करणारे सरकार आहे. शेतीमालाच्या किमती, उसाची किंमत, सोयाबीनची किंमत व जे काही आपण पिकवतो त्या सर्वांची किंमत ही कशी वाढवून घेता येईल? ही जबाबदारी मोदी साहेब आणि त्यांच्या सहकाऱ्यांची आहे. मोदी साहेब निवडणुकीच्या काळात सांगायचे की माझी गॅरेंटी आहे. मोदींची गॅरेंटी पण ती गॅरेंटी काय आम्हाला बरोबर दिसली नाही. दिवसेंदिवस साखरेची किंमत कमी कशी करता येईल? उसाची किंमत कमी कशी करता येईल? दुधाचे भाव कसे कमी करता येतील? जेणेकरून उत्पादन करणारा, कष्ट करणारा शेतकरी आणि



त्याचे कुटुंब हे अडचण कसे येतील हा विचार करणाऱ्या लोकांच्या हातात आज देशाची सत्ता आहे. मोदी साहेब आणि त्यांचे लोक सांगतात की आम्ही खाणाऱ्यांचा विचार करतो पिकवणाऱ्यांचा नाही. माझं त्यांना म्हणणं एकच आहे, उद्या पिकवणारा घरी बसला तर खाणारा काय खाईल? खाणाऱ्याला खायचं असेल त्यालाही खायची व्यवस्था करूया. पण हे कोण करू शकतो, तर जो काळ्या आईशी इमान राखून शिवारात राबतो, पिक घेतो, देशाचं अन्नधान्यांचं उत्पादन वाढवतो, तोच खाणाऱ्यांच्या हिताची जपणूक करू शकतो.

आपण दुधाचा धंदा वाढवला. तुमच्यापैकी दूध संघात दूध घालणारं कोण आहे का? गाईचा चारा, गाईचे खाद्य या सगळ्या गोष्टी दिवसेंदिवस वाढत चालले आहेत. महागाई वाढते पण दुधाची किंमत वाढत नाही. राज्य सरकारने जाहीर केलं की आम्ही लिटरला पाच रुपये देणार आहोत. अजून ते पाच




रुपये मिळाले नाहीत. जाहिरात केली पण दुधाची किंमत वाढत नाही आणि त्याचा परिणाम आज दुधाचा धंदा हा न परवडणारा झालेला आहे. हे चित्र बदलायचं असेल तर राज्याची सत्ता ही सुद्धा आली पाहिजे. शेवटी राज्य चालवायचा अधिकार हा तुम्ही द्यायला पाहिजे आणि हे काम उद्याच्या निवडणुकीमध्ये आपल्याला करायचं आहे आणि त्यासाठी ही निवडणूक आहे. मी तुम्हाला एका गोष्टीची खात्री देतो, तुम्ही लोकसभेला जसं मतदान केलं तोच विचार तुम्ही विधानसभेला करा. उद्याच्या विधानसभेच्या निकालातून आपण सबंध महाराष्ट्राचे चित्र बदलू, महाराष्ट्राची सत्ता आपण बदलू आणि शेवटच्या माणसाच्या हितासाठी या सत्तेचा वापर कसा करायचा, हा इतिहास आपण तयार करू , एवढंच या ठिकाणी सांगतो. निवडणुकीत तुम्ही चोख काम केलं. तुम्हाला सांगावं लागलं नाही, मला यावं लागलं नाही. याच्या आधीच्या निवडणुकीत सुद्धा मी काही आलो नव्हतो. पण तुम्ही तुमचं काम नेहमीच चांगलं करता हे सगळं तुमचं जे ऋण आहे ते माझ्या कायम लक्षात राहतं. या भागातच नव्हे तर महाराष्ट्राच्या शेतकरी समाजाच्या हिताची जपणूक करण्यासाठी जे जे काही करावे लागेल तेवढा एकच कार्यक्रम माझ्याकडून होईल एवढीच खात्री या ठिकाणी तुम्हा सगळ्यांना देतो.

निवडणुकीमध्ये दहशत कधी असता कामा नये. कारण ही लोकशाहीची लढाई आहे. लोकशाहीमध्ये शेवटच्या माणसाच्या मतदानाचा अधिकार हा निर्णायक आहे. लोकशाहीमध्ये नेता कितीही मोठा असला तरी सर्वसामान्य मतदार हा त्यापेक्षा मोठा असतो. पाण्याचा प्रश्न अद्याप पूर्णपणे सुटलेला नाही. मला एक कलमी कार्यक्रम हातात घ्यायचा आहे. काही मला दुसऱ्या गोष्टी करायच्या नाहीत. एका बाजूने शेती अडचणीत आहे. पण आमची पुढची पिढी शिकली पाहिजे, जगात कुठेही गेली पाहिजे आणि यशस्वी झाली पाहिजे. म्हणून पाणी, शिक्षण, नोकरी या सगळ्या गोष्टींमध्ये लक्ष घालायचं आहे. ते करायचं असेल तर राज्य सरकार आपल्या हातात पाहिजे.

आता मी सांगायला आलोय, की पाणी आणि तरुण मुलांच्या हाताला काम या दोन गोष्टींच्यासाठी लक्ष केंद्रित करणे हा एककलमी कार्यक्रम हा माझ्याकडून होईल आणि त्याला सगळ्यांचे सहाय्य हवे आहे. तुम्ही मला कधी नकार दिला नाही. याही वेळेला देणार नाही, याची मला खात्री आहे आणि तेच काम आपल्याला करायचे आहे.

आम्ही ठरवलंय, काही झालं तरी महाराष्ट्राचं राज्य हातात घ्यायचं. राज्य हातात घेतल्यानंतर मग अनेक गोष्टी करता येतील. पाणी, साखर, त्याची किंमत, इथेनॉल, त्याची किंमत ही शेतकऱ्यांना द्यायची. दुधाचे उत्पन्न वाढेल कसे?

याची काळजी घ्यायची आणि चारा, पशुखाद्य याच्या किमती कशा कमी होतील याच्याकडे लक्ष द्यायचं. तयार झालेल्या दुधापासून जे काही नवीन पदार्थ तयार करतात, त्यामुळे दुधाची किंमत आणखी पाच-सहा रुपयांनी वाढवून ते दूध उत्पादकांच्या घरात जाईल त्याची काळजी घ्यायची आज या सगळ्या गोष्टींची गरज आहे. त्या कामावर आमचं लक्ष आहे.

निवडणुकीत कोणतं बटन दाबायचं हे तुम्हाला सांगावं लागत नाही, हे गेल्या पन्नास वर्षांचा माझा अनुभव आहे. कोणी दमदाटी केली तरी तुम्ही लोक घाबरले नाही. या निवडणुकीत आणखी एक गोष्ट चांगली झाली. येथील आमचे अनेक सहकारी तुमच्याशी संबंध ठेवून गेली अनेक वर्षे काम करतायेत, तुम्ही सुद्धा एकमेकांना साथ देत आलेला आहात. या निवडणुकीमध्ये हे जे पाच-सहा लोक होते यामध्ये एकही

तुम्ही आणि एक चमत्कार मी. या पद्धतीने पाऊलं टाकायची एवढंच या ठिकाणी सांगतो. तुम्ही आतापर्यंत नेहमीच मदत केली, पाठिंबा दिला, सहकार्य केलं. या वेळेला आपल्याला महत्वाचा निर्णय घ्यायचा आहे, त्याला तुम्हा लोकांची साथ मिळेल एवढीच अपेक्षा या ठिकाणी करतो.

अनेक वर्ष ज्यांच्या हातात देशाची सत्ता आहे त्यांची दृष्टी ही खेड्यापाड्यातल्या लोकांच्या बद्दल शेतकऱ्यांच्या संबंधी ही स्वच्छ नाही. मी शेती खात्याचा मंत्री होतो आणि आपल्याकडे तांदळाचे पीक खूप झाले. जगात दोन नंबरचा तांदूळ हिंदुस्थानात झाला. त्याची विक्री कशी व्हायला पाहिजे, हे काम आम्ही करत होतो. आम्ही काय दुकानात विक्री करत नव्हतो. राज्या- राज्यांमध्ये, देशांमध्ये जाऊन तिथले प्रधानमंत्री असतील, राष्ट्रपती असतील त्यांच्याशी मी बोलत



पुढारी नव्हता. कुठे गेले होते कुणास ठाऊक? मी विचारलं, शेवटी हे होते का? ते होते का? पूर्वी आमच्या आसपास जी असायचे त्यातले कोणीच नव्हते. मग होते कोण सगळे नवखे, तरुण मुलं, अल्पसंख्यांक समाज या सगळ्यांनी न बोलता आपले काम चोख केले. कळलच नाही त्यांना हे कसं झालं? मतमोजणी झाली तेव्हा कळलं. अरे हा काय चमत्कार झाला आणि कोणी केला? त्याचे कारण एवढेच आहे की तुमच्याकडे चढउतार करण्याची ताकद आहे. हाच चमत्कार उद्याच्या विधानसभेच्या निवडणुकीला करायचा आणि त्यानंतर इथला पाणी आणि दुधाचा प्रश्न तो कसा सुटत नाही? हे आम्ही बघू, त्यातून कसा मार्ग निघत नाही हे आम्ही बघू. एक चमत्कार

होतो की तुम्ही आमचा माल घ्या. श्रीलंका या देशात मी गेलो आणि तिथले राष्ट्रपती यांना मी भेटलो. त्यांना विनंती केली, की हिंदुस्थानची साखर आणि हिंदुस्थानचा तांदूळ हा तुम्ही घेतला पाहिजे, त्यांना गरज होती. मी त्यांना सांगितलं की हवा तेवढा भाव आम्ही तुम्हाला देतो. त्यांनी मला सांगितलं, की माल द्याल पण आमचा तुमच्यावर विश्वास नाही. मला धक्का बसला, देशावर विश्वास नाही? मी काही व्यक्ती म्हणून गेलो नव्हतो. देशाचा प्रतिनिधी म्हणून गेलो होतो, त्यांनी सांगितलं विश्वास नाही. मी म्हटलं, का? त्यांनी सांगितलं, तुमचं सरकार अनेक धोरणं ठरवतं. पुढे किमती तुमच्या देशात वाढल्या की धोरण बदलतं. आज तुम्ही साखर निर्यात करता म्हणता, उद्या

त्याच्यावर बंदी सुद्धा आणणार.

या केंद्र सरकारचं धोरण सातत्यावर आधारित नव्हतं. कोणी चुकीचा सल्ला त्यांना दिला तर ते त्या मार्गाने जातात. जे सरकार, जे राज्यकर्ते देशाचे ७० टक्के लोक जे शेतीचे धंद्यावर आहे त्या शेतीच्या संबंधित असलेल्या लोकांच्यावर आपली नीती, धोरण याच्यात सातत्य ठेवत नाही त्याची जगात किंमत केली जात नाही. ही अवस्था आपली होती. आम्हा लोकांचे काम काय होते? महाराष्ट्रातील निवडून आलेल्या खासदारांचे काम काय आहे तर पार्लमेंटमध्ये शेतकऱ्यांचं दुखणं काय आहे त्या प्रश्नांची मांडणी करायची, त्यासाठी आग्रह करायचा आणि ते प्रश्न सोडवून घ्यायचे हा निकाल आम्ही लोकांनी घेतलेला आहे.

मी शेती मंत्री असताना ७१ हजार कोटींची कर्जमाफी केली. सत्ता याच्यासाठी वापरायची असते. सत्ता याचा अर्थ नुसता कोणाचा सन्मान करण्यासाठी नाही. माझा सन्मान कितीदा केला? मी देशाच्या लोकसभेमध्ये, देशाच्या राज्यसभेमध्ये, महाराष्ट्राच्या विधानसभेमध्ये, विधान परिषदेमध्ये मी गेले ५६ वर्षे आहे. आपण शिक्षण वाढवलं, शाळा काढल्या, कॉलेजेस काढले. बारामती विद्यापीठाच्या अंतर्गत संस्था काढली. आज त्या ठिकाणी त्यांच्या सगळ्यांसारखेच ३५ हजार मुलं शिकतात. शारदा निकेतन काढलं. कदाचित तुमच्या काही मुली तिकडे शिकत असतील. आज शारदा निकेतनला नऊ हजार मुली आणि मुलं शिकतात. तुम्ही सगळ्यांनी तुमच्या उसाच्या पेमेंटमधून पैसे दिले. मी काही पैसे उभे केले आणि शिवनगर शिक्षण संस्था, माळेगावला इंजीनियरिंग कॉलेज काढला. सोमेश्वर कारखाना, तिथे इंजीनियरिंग कॉलेज काढलं, विद्या प्रतिष्ठानने इंजीनियरिंग कॉलेज काढलं आणि तुम्ही लोकांनी मदत केली. त्यामुळे आज चित्र बदललेलं आहे.

पुणे जिल्हा एकेकाळी शिक्षणाचं माहेरघर होतं. नंतरच्या काळामध्ये यशवंतराव चव्हाण मुख्यमंत्री झाले. त्यांच्या काळामध्ये त्यांनी पुण्याच्या जवळ एमआयडीसी आणली. पिंपरी चिंचवडमध्ये कारखाना त्यांच्या पुढाकाराने आला आणि पुणे ही औद्योगिक नगरी झाली. तुम्हा लोकांच्या आशीर्वादाने माझ्याकडे राज्याचं मुख्यमंत्रिपद आल्यानंतर मी निर्णय घेतला की, पहिल्यांदा कारखाना हा घ्यायचाच नाही आणि कारखाना बाहेर करायचा. पहिली निवड आम्ही भिगवणची केली, त्यानंतर बारामतीची केली, इंदापूरची केली आणि नगर रस्त्यावर रांजणगावची केली आणि नाशिक रस्त्यावर चाकणची केली, या रस्त्यावर भिगवणची केली. या सगळ्यामुळे जवळपास काही लाख लोकांना काम भेटलं. पुण्याच्या जवळ आयटीच्या क्षेत्रामध्ये हिंजवडी इथं आपण आयटीची कारखानदारी आणली. शेती एके शेती करून चालणार नाही. आमच्या घरातला एक तरी मुलगा शेतीच्या बाहेर उद्योगात गेला पाहिजे आणि ते करायचं असेल तर, एमआयडीसीला पर्याय नाही. म्हणून आत्ताच्या आमदारांना सुचवलं. त्यांना बोलावून घेऊन, राज्य सरकारशी आणि उद्योग खात्याशी चर्चा करून आणि लोकांची जिथे संमती आहे, त्या ठिकाणी त्यांच्या संमतीने एमआयडीसीची सुरुवात करू. जिथे लोकांचा विरोध राहील



तिथे उगाचंच आम्ही हट्टीपणा करू देणार नाही. या पद्धतीचे धोरण हे त्या ठिकाणी स्वीकारले जाईल.

मुलं शिक्षित होत आहेत. पण नोकऱ्या कुठे आहेत? त्यासाठी मी लोकांना भेटतो. एका दिवसात मला एक हजार अर्ज येतात आणि संध्याकाळी मी ते अर्ज घेऊन बसतो माझ्या सेक्रेटरीला घेऊन. निम्म्यापेक्षा जास्त अर्ज नोकरीचे असतात. आता या नोकऱ्या आणायच्या कुठून? याचा अर्थ हा आहे, सत्ता मिळवल्यानंतर जशी शेती महत्वाची आहे तसा उद्योग महत्वाचा आहे. त्या उद्योगांमध्ये आधी हाताला काम मिळेल याची काळजी घ्यायची.

अशा अनेक गोष्टींची आज गरज आहे आणि ती करायसाठी देशाचा राजकारण, देशाची सत्ता, देशाचे प्रशासन इथे योग्य निर्णय झाले पाहिजे. दुर्दैवाने मोदी साहेबांच्या राज्यात हा विचार केला जात नाही. शेतकऱ्यांसाठी केला जात नाही, बेकार तरुणांसाठी केला जात नाही म्हणून संघर्ष आहे. आमचं काय भांडण नाही दोघात, मला भांडण करण्याचं काही कारण नाही.

आमचे संबंध तर आहेतच. बारामतीलाही ते आले होते. तुम्हाला कदाचित माहिती असेल आणि भाषण सुद्धा केलं होतं, की शरद पवारांचं बोट धरून मी राजकारणात आलो. तेव्हापासून मला फार भीती वाटते. माझ्यामुळे असेही काही उद्योग होत असेल तर तो भाग सोडून द्या. पण आज या सबंध देशांमध्ये काही बदल केले पाहिजेत, धोरणात बदल केले पाहिजेत, ते शेतकऱ्यांच्या हिताचे असले पाहिजेत, बेरोजगार तरुणांच्या भल्यासाठी असले पाहिजेत, मुलींना सन्मान देण्यासाठी उपयुक्त असे असले पाहिजेत. ते करायचे असेल तर लोकसभा ही अत्यंत महत्वाची आहे. आमच्या हातात सत्ता नाही, बहुमत नाही पण लोकांनी साथ दिली. मी तर दहाच माणसं उभी केली. त्याच्यातील तुम्ही आठ निवडून दिली. एवढा चांगला पाठिंबा लोकांनी दिला.

या देशाची लोकशाही, या देशाचा प्रशासन आणि या देशाचा अर्थकारण हे आम्ही टिकवलेलं नाही. या देशातल्या तुमच्यासारख्या कोट्यावधी लोकांनी टिकवलं. ते शहाणे आहेत, ते चुकीची गोष्ट होऊ देत नाहीत, बोलत नाहीत. मगाशी बोलताना सांगितलं, की आम्ही प्रचाराला जायचो, कोणी बोलायचंच नाही. खरं आहे मलाही लोक सांगायचे, आपल्या खात्रीतलं नाव तिथे कोणी काही भेटत नाही. होतात गैरसमज एक वेळेला ठीक आहे. दबाव येतात. कोणी बोललं नाही पण बटन दाबायला कोणी चुकले का? माणसं साधी नाही, ती कदाचित घोषणा देणार नाहीत. पण आत गेल्यावर ती नेमकं कुठे काय करायचं, हे समजतं हे या देशाचं भाग्य आहे. या देशातला सामान्य माणूस हा देशाचं भाग्य आहे.

आमच्यासारखे राजकीय नेते काही काम करत असतील पण खरं काम तुमच्यासारख्या मतदारांनी केलेलं आणि ते आज चित्र देशामध्ये दिसतंय. त्याची प्रचिती बारामतीच्या लोकसभेच्या निवडणुकीमध्ये तुम्ही दाखवली. शिरूरला दाखवली, नगरला दाखवली, कुठे कुठे नाही. पण ती माणसं साधी आम्ही उभी केली. नगरचा आमचा खासदार माहितीये



तुम्हाला? वाटतो का? खासदार आहे मोठा पुढारी असं वाटतो? असं नाही साधा माणूस आहे, स्वच्छ आहे पण काम केलं. ज्या वेळेला कोणता तो रोग कोरोना, तो आल्यानंतर त्यांनी माझ्या नावाने तिथे एक हॉस्पिटल काढलं, कोविड सेंटर काढलं आणि तिथं १६ हजार लोकांची व्यवस्था त्यांनी तिथे केली. एक वर्ष घरी गेलेले नाही, रात्री तिथं झोपायचं आणि लोकांची मदत तिथे करून लोकांना वाचवलं. साधा माणूस आम्ही उभा केला. त्याच्या विरोधात मोठे होते. साखर कारखान्याचे चेअरमन आणखीन काय काय जाऊ द्या. आता त्या सगळ्या गोष्टींमध्ये त्या साध्या फाटक्या माणसानी सुद्धा त्या ठिकाणी ती निवडणूक जिंकली आणि लोकांनी त्याला शक्ती दिली.

नाशिकला भगरे नावाचा एक शिक्षक, साधा शिक्षक. त्याला आम्ही उभं केलं त्याच्याविरुद्ध केंद्रातल्या एक मंत्री बाई, आमच्या आडनावाच्या आणि त्या ठिकाणी भगरे साधा शिक्षक मोठ्या मतांनी त्या ठिकाणी निवडून आला. सातारला ते झालं होतं पण थोडा घोटाळा झाला. आम्ही घेतली तुतारी आणि तिथं आलं पिपाणी. पिपाणी आणि तुतारीचा फरक कळला नाही म्हणून त्या ठिकाणी तिकडे गडबड झाली, नाही तर ती गडबड झाली नसती. ठीक ठिकाणी हे चित्र दिसतं हा सगळा चमत्कार तुम्ही लोकांनी केला म्हणून बारामतीची चर्चा सगळ्या देशात झाली. देशाच्या बाहेर झाली पण निकाल मात्र तुम्ही नेहमी करता त्यापेक्षा अधिक जोराने केला आणि बटन योग्य दाबलं. आज ही स्थिती तुम्ही केली मी एवढंच सांगतो आपण एकत्र राहू. आपला व्यवसाय, उद्या कारखानदारी असेल, काही असेल त्यात सगळ्यात अधिक लक्ष देऊ आणि लोकांचा संसार सुधारेल कसा, याची काळजी घेऊ.

तुम्ही सर्वांनी साथ दिली त्यामुळेच या भागातली स्थिती बदललेली आहे. त्याच रस्त्याने आपण जात राहुयात. यावेळेस विधानसभेत सुद्धा माझा प्रयत्न हा आहे, आत्ताचं राज्य सरकार राज्यातल्या जनतेकडे नीट बघत नसेल तर ते राज्य हातात घ्यायचं. हे राज्य जिंकायचं. आपण एकजुटीने कष्ट केले. महाराष्ट्रात लोक तुम्हाला पाठिंबा देतील, हा मला विश्वास आहे. ही निवडणूक संपली मी महाराष्ट्रातल्या कानाकोपऱ्यात जाणार आहे, गावोगाव जाणार आहे. तरुण पिढी एकत्र करणार आहे, कष्टकरी वर्ग एकत्र करणार आहे आणि महाराष्ट्रामध्ये लोकांच्या हिताची जपणूक करणारं राज्य ह्या ठिकाणी येईल याची काळजी घेणार आहे. तर त्याला साथ तुम्ही द्याल हा विश्वास आहे.

आता सगळीकडे बदल होत आहे व तो चांगल्यासाठी होत आहे त्या बदलाची भूमिका तुमची जी आहे ती आपण कायम ठेवू आणि मी तुम्हाला खात्री देतो की तुमच्याच नव्हे तर महाराष्ट्रातल्या खेड्यापाड्यातल्या तरुणांच्या, शेतकऱ्यांच्या, दलितांच्या, कष्टकऱ्यांच्या, कामगारांच्या हिताची जपणूक करण्यासाठी प्रयत्नांची पराकष्टा करणे हे काम माझ्याकडून होईल, आपल्या खासदारांकडून होईल, असा विश्वास मी तुम्हाला देतो.

■■■



# नरेंद्र मोदी यांचे अवसान उसने की आत्मघाती?

**व्यंकटेश केसरी**



लोकसभा निवडणुकीत बसलेल्या दणक्याने पंतप्रधान नरेंद्र मोदी हादरले आहेत. उत्तर प्रदेश, महाराष्ट्र, पश्चिम बंगाल, बिहार, तामिळनाडू या प्रमुख राज्यात भाजप पहिल्या क्रमांकाचा पक्ष नाही तसेच केंद्रातील सत्ता टिकवायची असेल तर प्रादेशिक पक्षांशी जुळवून घ्यावे लागेल, देवाण -घेवाण करावी लागेल आणि भाजपला लोकसभेत २७३ हा आकडा गाठायचा असेल राजकीय पक्षांना फोडावे लागेल . आणि एवढे करूनही २०२४च्या लोकसभा निवडणुकीत भाजपला अल्पमत मिळाले हा डाग पुसता येणार नाही हे मोदी जाणून आहेत. कारण तिसऱ्यांदा सत्तेत येऊनही त्यांच्या देहबोलीत चमक नाही, आत्मविश्वास नाही . पराभवाचा फटका सर्वच भाजप नेत्यांच्या देहबोलीतुन दिसत आहे. तर संसदेत विरोधी बाकांवर बसलेले विरोधी पक्ष, त्यांचे नेते हारुनही पराभूत दिसत नाहीत.

विरोधी पक्षात फाटाफूट करून, काँग्रेसला एकाकी पाडून (५० पन्नास वर्षांपूर्वीच्या आणिबाणीबद्दल) नरेंद्र मोदी यांना ते --हर्क्युलस, सर्वशक्तिमान, प्रेषित --असल्याची प्रतिमा पुन्हा मिळणार नाही. लोकसभेच्या अध्यक्षपदी पुन्हा ओम बिर्ला यांची त्यांनी केलेली निवड यात नरेंद्र मोदी यांची हतबलता अधिक दिसते. ओम बिर्ला यांना पुन्हा आणणे याचा अर्थ विरोधी पक्षांचे खासदार फोडून त्यांना कायद्याचे संरक्षण देणे असा असल्याची चर्चा दिल्लीतल्या राजकीय वर्तुळात सुरु झाल्या आहेत.


नेत्याच्या नावावर आपण निवडणूक जिंकू शकत नाही हे कार्यकर्त्याला कळल्यानंतर तो संदेश लोकात जायला फार वेळ लागत नाही. मोदी यांना याचीच भीती वाटत आहे. कारण त्यांचा शिक्का चालत नसेल तर भाजप अंतर्गत पर्याय तयार होतील याची स्पष्ट जाणीव मोदी यांना आहे. पुढच्या काळात त्यांना अनेक आघाड्यांवर लढावे लागणार आहे, मोदी यांची मजबुरी मंत्री मंडळ, खाती वाटपात दिसली.एकीकडे संविधानाबद्दल भक्तिभाव दाखवायचा आणि दुसरीकडे संवैधानिक संस्थावर "होय बा "नेमायचे, मागच्या लोकसभेत

उपाध्यक्षाचे पद पूर्ण पाच वर्षे रिकामे का ठेवले याबद्दल चाकर शब्दही काढायचा नाही, विद्यमान लोकसभेत हे पद संसदीय प्रथेनुसार विरोधी पक्षांना दिले जाईल काय याबद्दल चुप्पी साधायची हे निरोगीपणाचे लक्षण नाही .




आपण भीत नाही, आपण घाबरत नाही, आपली प्रतिमा २०१४ आणि २०१९ च्या लोकसभा निवणुकीत जशी होती तशीच आहे हे दाखविण्याच्या नादात नरेंद्र मोदी, त्यांचा भाजप पुढच्या काळात अधिकाधिक चुका करेल. त्यांच्या हिंदुत्वाला आलेल्या मर्यादा,रामराज्याला पडलेले तडे याचे भान त्यांना नाही .त्यांची राजकीय भाषा, प्रतिमा आणि युक्तिवाद लोकांनी नाकारला आहे.

नरेंद मोदी यांचे तिसरे राज्यारोहण 'नीट' परीक्षेतील पेपरफुटीचा महाघोटाळा, देशातील वाढते रेल्वे अपघात, काश्मीर खोऱ्यातील वाढत्या आतंकवाद्यांच्या हालचाली आणि संसदेत सरकार विरुद्ध विरोधी पक्ष यांच्या सुरु झालेल्या संघर्षाने झाले आहे. भाजप अल्पमतात असला आणि प्रादेशिक पक्षांच्या साह्याने मोदी तिसऱ्यांदा पंतप्रधान झाले तरी त्यांचा तोरा मात्र लोकसभेत " चारसो पार " जागा जिंकल्याचा आहे. लोकसभा निवडणुकीत त्यांच्या नेतृत्वाखाली भाजपला बहुमत भले मिळाले नसले तरी खुमखुमी गेली नाही. प्रबळ विरोधी पक्षांशी संवाद साधण्या ऐवजी त्यांना 'सुनावणे' , त्यांच्याशी खेटण्याची मोदी यांची सवय जात नाही. नवनिर्वाचित खासदारांना शपथ देण्यासाठी "प्रो टेम " अध्यक्षावरून त्यांनी विरोधी पक्षांशी पंगा घेतला. सारे आयुष्य बिजू जनता दलात घालविलेल्या आणि ऐन लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर भाजप मध्ये आलेल्या भर्तृहरी मेहताब यांना मोदी यांनी "प्रो टेम " अध्यक्ष केले आणि त्यांच्या पॅनेलवर न जाण्याचा निर्णय विरोधी पक्षांनी घेऊन आपल्या बहिष्कार जाहीर केला. आणि त्यानंतर मोदी यांनी वादग्रस्त ओम बिर्ला यांनी






दुसऱ्यांदा लोकसभेचे अध्यक्ष केले. याचा अर्थ नरेंद्र मोदी हे सरकार चालविण्यासाठी भविष्यात केवळ तेलगू देसम पार्टी आणि जनता दल (युनाइटेड) यांच्यावरच अवलंबून राहणार नाहीत असा होतो.भाजपला बहुमतासाठी किमान ३३ खासदारांची आवश्यकता आहे. ते खासदार पक्षांतरातून, पक्ष फुटीतून पोटनिवडणुकीतून मिळवता' येतात. अशा ऑपरेशन्स साठी मोदी यांना " होय बा " अध्यक्षाची गरज लागते. आणि ओम बिर्ला यांना आपण तसे आहोत हे गेल्या लोकसभेत दाखवून दिले आहे. त्यामुळे मोदी यांनी राजस्थानच्या ओम बिर्ला यांना पुन्हा बढती दिली. मोदी यांच्या या निर्णयाने त्यांची " सही दिशा, स्पष्ट नीती" देशासमोर आली.

यानंतर त्यांचे दुसरे लक्ष्य भाजप अंतर्गत त्यांच्या विरोधकांना संपविण्याचे आहे. कारण ते संपल्याखेरीज मोदी यांना त्यांचा राजकीय वारस जाहीर करता येत नाही. तो वारस गृहमंत्री अमित शहा आहेत की गुजरात मधील आणखी कोणी ? हे समजण्यासाठी आणखी काही काळ लागेल. म्हणजे त्यांना पुढील काळात दोन पातळीवर संघर्ष करावा लागणार आहे. म्हणजे प्रबळ विरोधी पक्ष आणि पक्षांतर्गत विरोधक यांच्याशी त्यांचा सामना असेल. पण मोदींच्या नावाने निवडणूका जिंकता येत नाहीत हे स्पष्ट झाल्यानंतर भाजप अंतर्गत त्यांचे विरोधक शांत राहणार नाहीत. उत्तर प्रदेश विधानसभेच्या निवडणुका होण्यापूर्वी त्यांना मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांची उचलबांगडी करावी लागणार आहे. राजस्थानात असंतुष्टांना त्यांची जागा दाखववावी लागणार आहे. योगी आदित्यनाथ, शिवराजसिंग चौहान, नितीन गडकरी, वसुंधरा राजे हे परप्रकाशी ' नाहीत भाजप मध्ये आणि भाजप बाहेर त्यांचा चाहता वर्ग आहे.आणि त्यांना राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची साथ मिळाली तर ही अंतर्गत लढाई सोपी जाणार नाही हे नरेंद्र मोदी आणि अमित शहा जाणून आहेत. याशिवाय कर्नाटक म्हणजे गुजरात नाही आणि बिहार मध्ये जनता परिवाराशिवाय निवडणुका जिंकता येत




नाहीत.बंगाली मानसिकता गुजरात विरोधी आहे हे मोदी-शहा यांना कळून चुकले आहे.

महाराष्ट्रात सध्या मित्र पक्षांचे नेते असलेल्या एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्या गटाला वेसण घालावी लागणार आहे. आपल्यामुळे शिंदे गटाचे सात खासदार निवडून आले. त्यांची प्रत्यक्षातली ताकत  दोन खासदार जिंकण्याची नाही . पण हे मित्र उलटले तर भाजपची उलटी गिनती महाराष्ट्रात सुरु होऊ शकते. .

महागाई आणि बेकारी हे प्रश्न सोडविण्याची ताकत मोदी सरकारकडे नसल्याने त्याच फटका भाजपला लोकसभा निवडणुकीत बसला.'नीट' परीक्षेच्या  महा पेपर घोटाळ्याने तरुण उद्या रस्त्यावर आला तर मोदी सरकार काय कारणार ? नुसत्या बहुमताने सरकार चालविता येत नाही याचे दाखले इतिहासात आहेत. मोदी-शहा जुन्या मानसिकतेत वावरत आहेत. गेल्या दहा वर्षात केंद्र आणि राज्यांचे संबंध ताणलेले आहेत. विरोधी पक्षांची सरकारे ही शत्रू समान आहेत अशा पद्धतीने मोदी हे त्यांच्याशी वागले. बिजू जनता दल, वाय,एस. आर . काँग्रेस पार्टी हे केंद्रात मित्र पक्षांसारखे वागले पण त्यांच्याच मुळावर आता भाजप आली. नरेंद मोदी यांचे अवसान हे उसने आहे की आत्मघाती ते आगामी काळात दिसेल पण लोकसभा निवडणुकीच्या निकालाने सारे समीकरण बदलणार हे निश्चित. नरेंद्र मोदी जुन्या प्रतिमेतून (मोदी है तो मुमकिन है ) बाहेर यायला तयार नाहीत तर नवीन प्रश्न, समस्या सोडविण्याची मानसिकता त्यांच्यात नाही. उत्तर प्रदेश, महाराष्ट्र , पश्चिम बंगालमध्ये लोकसभा निवडणुकीत बसलेल्या धक्क्याने ते सावरले नाहीत.




आणि आता महाराष्ट्र, हरियाणा,झारखंडच्या निवडणुका येऊ घातल्या आहेत. मंत्रिमंडळात चमक नाही,खाते वाटपात कल्पकता नाही.यामुळे या सरकारकडे पाच वर्षे चालेल अशी ऊर्जा नसल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरु झाली आहे. एव्हरेस्ट शिखरावर गेलेला माणूस तेथे घर करून राहत नाही , त्याला खाली यावेच लागते असे दिवंगत पंतप्रधान चंद्रशेखर म्हणायचे . २००१ पासून अखंड सत्तेत राहिलेले नरेंद्र मोदी यांचा चढता आलेख आता थांबला आहे.

■■■

# आता एकच लक्ष्य



मी तमाम महाराष्ट्रातल्या मायबाप जनतेच्यासमोर नतमस्तक होते, की ज्या विश्वासाच्या नात्याने आठ खासदार, एक अगदी निसटता विजय, हरियानामधली सीट आणि आपली लक्षद्विपमधली सीट ही अतिशय कमी मतांनी फैजलची ही गेली. पण या संघर्षाच्या काळात जे हिरे पक्षाला सापडले, ते अनमोल हिऱ्यांचा कौतुक करण्यासाठी खरं तर आज आम्ही इथे आलोय आणि हे सगळे हिरे तुम्ही सगळे आहात. ज्यांनी या काळामध्ये अतिशय चांगल्या पद्धतीनी आज इथं केलं, मी तुमच्या सगळ्यांचं मनापासून कौतुक करते. अभिनंदन करते.

२५ वर्षापूर्वी पक्षाची स्थापना झाली आणि २५ वर्षांचा हा प्रवास होत असताना अनेक घटना कभी खूशी कभी गम अशा झालेल्या आहेत. पण अनेक लोकांचं खूप योगदान या पक्षामध्ये आहे. कदाचित काही आज एक वेगळं घर करून

# विधानसभा

**सुप्रिया सुळे**



## रौप्यमहोत्सवी राष्ट्रवादी- अहमदनगर विजयी मेळावा

**राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष– शरदचंद्र पवार' पक्षाच्या रौप्य महोत्सवी वर्धापन दिनानिमित्त १० जून रोजी अहमदनगर येथे आयोजित कार्यक्रमात पक्षाचे नवनिर्वाचित खासदार तसेच मान्यवर नेत्यांनी व्यक्त केलेले विचार**

साजरं करतायंत. त्यांच्यापैकीही अनेक लोकांच्याही कामाची नोंद ही आपण घेतली पाहिजे. कारण का गेल्या अनेक वर्षांमध्ये प्रत्येकात चांगले गुण असतात. त्याच्यामुळं त्या चांगल्या गुणांची नोंद आपण नेहमी ठेवली पाहिजे. त्याच्यामुळं पक्ष वाढीमध्ये त्यांचंही सगळ्यांचं मोठं योगदान होतं. मला असं वाटतं, की आजच्या वर्धापन दिनानिमित्त ते आपण मान्य करून त्यांनाही शुभेच्छा देऊया.

हा एकच पक्ष असा असेल, जो २५ वर्षांचा आहे. पण त्यातली १८ वर्षे सत्तेत राहिलेला आहे आणि स्वत:च्या हिंमतीवर. कॉपी करून पास नाही. स्वत:च्या हिंमतीवर १८ वर्षे आपण आणि काय तोडो, फोडो वगैरे असल्या भानगडी आपण केल्या नाहीत. पण, २५ वर्षातली अठरा वर्षे आपण सत्तेमध्ये राहून या देशाची सेवा करण्याची संधी आपल्याला लोकांनी दिली, याबद्दल मी आपले सगळ्यांचे मन:पूर्वक आभार मानते आणि या २५ वर्षाच्या पूर्ण योगदानामध्ये ज्या पदाधिकारी, नेत्याने राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला जी साथ दिली, त्यांचेही मी या कार्यक्रमाच्या निमित्ताने आभार मानते. या कार्यक्रमात कैलासवासी आर. आर. पाटील, कैलासवासी विमलताई मुंदडा, बाबासाहेब कुपेकर, गुरूनाथ कुलकर्णी,

वसंतराव डावखरे, वसंत चव्हाण, राहता कदम, मनमोहन ओबेरॉय, मोहनसिंग राजपाल, दिग्विजयसिंह खानविलकर, अरूण मेहताजी, गोविंदराव निकम, गोविंदराव आदिक, डी. पी. त्रिपाठी, सुभाषअण्णा कुल, ज्योती वहिनी कलानी, वसंत पवार, विनायक मेटे, माणिकराव जगताप असे असंख्य नेते आहेत, आपण या प्रवासामध्ये गमावले. पण या पक्षामध्ये या सगळ्यांचं खूप मोठं योगदान हे आपल्या संघटना बांधणीमध्ये होतं.



आज अहिल्यानगरमध्ये आपण जमलेलो आहोत. मला आवर्जुन बाळासाहेब थोरातांचा उल्लेख करणं महत्त्वाचं वाटतं. कारण, आज काँग्रेस पक्ष आपल्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या जिथं जिथं सीट होत्या, पूर्ण ताकदीनिशी काँग्रेस पक्ष, उद्धवजींचे मी मन:पूर्वक आभार मानते, सोनियाजी, राहुलजींचे मी मन:पूर्वक आभार मानते. बाळासाहेब थोरातांचं नेहमीच आपल्या सगळ्यांना सहकार्य असतं. त्याबद्दल, अरविंद केजरीवालांचे मी आभार मानते. जेलमधून बाहेर आल्यावर पहिली सभा महाराष्ट्रात अरविंद केजरीवाल यांनी कुठे घेतली तर ती बाळ्यामामांसाठी भिवंडीला घेतली. त्याबद्दल मी तमाम आम आदमी पक्षाचेही मन:पूर्वक आभार मानते. त्यानंतर सगळेच मित्र पक्ष बारामती लोकसभा मतदारसंघात वंचित आघाडीनेही जे काय सहकार्य केलं अशा असंख्य लोकांचे मी या कार्यक्रमाच्या निमित्ताने मन:पूर्वक आभार मानते आणि आज मला असं वाटतं, की पुढचे तीन-साडेतीन महिने एकच लक्ष्य म्हणजे विधानसभा लढणे आणि जिंकणे. हे आपलं सगळ्यांचं लक्ष्य राहणार आहे.

आज आपण ही आठजणं जी दिल्लीमध्ये आपल्या सगळ्यांच्या आशीर्वादाने निवडून गेलेली आहेत. मी आपल्या आठही जणांच्यावतीने आपल्याला शब्द देते, की ज्या पद्धतीनं कष्टांची परिकाष्ठा घेऊन तुम्ही आम्हाला निवडून आणलं. त्याच्यापेक्षा गुंजभर जास्ती आम्ही कष्ट करू आणि तुम्हाला प्रत्येकाला निवडून आणण्यासाठी आम्ही सगळे प्रयत्न करू आणि एक गोष्ट महत्त्वाची, पक्षाच्या वतीने मी आपल्याला सांगू इच्छिते, की अनेकवेळा प्रश्न विचारला जातो, की पुढं काय? आजनंतर राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आदरणीय पवार साहेबांच्या नेतृत्वाखाली सोसायटी, ग्रामपंचायत, बँक, साखर कारखाना आणि काय राहिलं का? जिल्हा परिषद, नगरपालिका, महानगरपालिका, पंचायत समिती, प्रत्येक कार्यकर्त्याला जिथे मान सन्मान मिळेल ही संधी तुमच्या सगळ्यांसाठी आहे. तुम्ही लोकसभा शून्यातून जेव्हा आपल्याकडे होती, तेव्हा लढला. हे बघा, मैदान सब के लिये खुला और खाली है. आपल्याकडे काय प्रॉब्लेम नाहीये. पक्षातल्या सगळ्या पदांचा निर्णय हा होइल. पण आता एकच लक्ष्य विधानसभा.



**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना अहमदनगरच्या सभेत नाशिकच्या ज्या शेतकऱ्याने कांद्याचे काय ते बोला असा प्रश्न विचारला त्याने कांद्याची प्रतिमा शरद पवार यांना भेट म्हणून वर्धापनदिनी दिली.**




धनगरी घोंगडी, काठी आणि पागोटे घालून शरद पवार यांचा धनगर समाजातर्फे सत्कार करण्यात आला.

जेव्हा आपले लोकसभेसाठी सगळे ताकदीने लढले, विधानसभेसाठी जेव्हा युद्ध चाललेलं असतं ना, एकच लक्ष्य मी सात महिने माझ्या आयुष्यातले फक्त माझ्या लोकसभा मतदारसंघासाठी दिले. ना नवऱ्याशी बोलले, ना पोरांशी बोलले. एकच लक्ष्य लोकसभा. तसंच प्रत्येकानी पूर्ण ताकदीनं, संघटनेचं काम आदरणीय पवार साहेब सक्षम आहेत ते निर्णय घ्यायला, ते ते घेतलीच, पण आजपासून फक्त फुलटाईम विधानसभेच्या कामाला आपल्या सगळ्यांना लागायचंय आणि आम्ही आठही जण चोवीस तास तुमच्यासाठी हजर आहोत विधानसभेला मदत करण्यासाठी. त्यामुळे ही आणि दोन-तीन मोठी आंदोलनं आपल्याला करायची आहेत, ज्याचा उल्लेख अमोलदादानी केला.

मला अजून पियुष गोयलांचे शब्द आजही आठवताहेत. मी पार्लमेंटमध्ये त्यांना सांगितलं होतं, की पियुषजी प्याज का आप क्या करेंगे? मला अजूनही त्यांचे शब्द आठवतात, मला म्हणाले होते, की ते तीन जिल्ह्यासाठी मी देशाला वेठीस धरणार नाही. त्या जिल्ह्यांमध्ये काय झालं तुम्ही बघितलं. तुमच्या पक्षाचा मंत्री दिंडोरीमध्ये, कांद्याचं काय केलं तुम्ही बघितलेलं आहे. त्याच्यामुळं तमाम दिंडोरीकरांचे मी मन:पूर्वक आभार मानते, की त्या तीन जिल्ह्यांसाठी आम्ही काय करू, हे झालं आणि तशीच दुधाची परिस्थिती आहे. मी तुम्हाला शब्द देते, ज्याचा उल्लेख नीलेश लंकेंनी केला, आणि अमोल दादानीही केला, की पहिला आवाज जो राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष पार्लमेंटमध्ये पहिला प्रश्न मांडेल तो दुधाच्या भावासाठी मांडेल हा शब्द मी तुम्हाला देते आणि त्याच्यासाठी जी काही, आता मला खूप उत्सुकता वाटते, एवढे नवीन खासदार आलेले आहेत. मी आणि अमोल दादा मगाचपासून विचार करतोय, की आता प्रश्न कुणावर काढायचे? मी आणि अमोल दादा आता मागून सगळं बघणार आहे. कारण का आम्ही आता नवीन खासदारांना संधी द्यायची आहे. तर जयंतरावांनी मला फक्त सांगितलं, त्यांना फक्त सगळे काय नियम, कायदे आधी समजून सांगा. ते नियम, कायदे आम्ही अर्थातच ते सगळं आपण पक्षाच्यावतीनं पूर्ण ताकदीनं करू. पण, सगळ्या सहाही खासदारांकडून मला खूप अपेक्षा आहेत. आता संसदरत्न आम्ही दोघं झालेलो आहोत. मी तुम्हाला शब्द देते, पाच वर्षांनंतर आपले उरलेले सहाच्या सहा खासदार हे महाराष्ट्राचे संसदरत्न पार्लमेंटमध्ये असतील आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा हा परफॉर्मन्स मेरीटवरच असेल. तुम्ही काही सगळ्यांनी काळजी करू नका. आम्ही सगळे तुमच्यासाठी उपलब्ध आहोत. ज्याच्यासाठी पक्षासाठीही आम्ही सगळे वेळ देणार आहोत. कुणाचेही काहीही प्रश्न असतील, इलेक्शन असतील, याच्यासाठी आम्ही सगळे आता ट्वेंटी फोर बाय सेव्हन तुमच्यासाठी उपलब्ध आहोत आणि ती या संघर्षाच्या काळात जी साथ तुम्ही दिली, मी तुम्हाला खरंच प्रांजळपणे कबुल करते, एवढा चांगला रिझल्ट लागेल असं मलाही नाही वाटलं. आपलं लढायचं ठरवलं होतं. आता असंच आम्ही लढलो होतो. काहीच नव्हतं. माझ्या मतदारसंघात तर सगळी गेली होती आणि जी नाही गेली ती नंतर फोन केल्यावर गेली. पण नेते सगळे गेले. मी माझं इलेक्शन फक्त कार्यकर्त्यांच्या जीवावर जिंकून आलेली आहे. त्यामुळे तमाम कार्यकर्त्यांचे मी मन:पूर्वक आभार मानते. आपण सगळ्यांनी जी साथ दिली, त्याबद्दल मी आपल्या सगळ्यांचे मन:पूर्वक आभार मानते. जयहिंद! जय महाराष्ट्र!! जय आघाडी!!!

■■■



आजच्या कार्यक्रमाचं औचित्य साधून महाराष्ट्रातल्या तमाम स्वाभिमानी जनतेचं मनापासून आभार मानेन. अभिनंदन करेन, कारण २०२४च्या लोकसभा निवडणुकीत खरं तर एक प्रश्न महाराष्ट्राच्या जनतेसमोर होता आणि तो म्हणजे या निवडणुकीमध्ये महाराष्ट्राचा स्वाभिमानी माणूस, महाराष्ट्राची जनता ही स्वार्थासाठी सरपटणाऱ्यांच्या गर्दीत उभी राहणार, की महाराष्ट्र धर्म जपण्यासाठी स्वाभिमानानं लढणार. आणि जे महाविकास आघाडीला घवघवीत यश महाराष्ट्रानं दिलंय, त्यासाठी महाराष्ट्राच्या जनतेचं सर्वात आधी मनापासून अभिनंदन करतो, की स्वाभिमानासाठी, महाराष्ट्र धर्मासाठी लढण्याची बाजू ही महाराष्ट्रातल्या स्वाभिमानी जनतेनं निवडली. आणि जसं सगळ्यांनी हा जो राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार पक्षाचा जो स्ट्राईक रेट आहे, भल्याभल्यांना आचंबित करणारा आहे आणि आज महाराष्ट्रातल्या युवकासमोर, महाराष्ट्रातल्या सर्वसामान्य माणसासमोर आदरणीय शरदचंद्रजी पवार साहेबांनी एक मोठं उदाहरण घालून दिलंय, आणि हे उदाहरण म्हणजे, जेव्हा हातातलं सगळं काही संपलंय असं जगाला वाटतं, तेव्हा हिंमतीनं कसं उभं राहायचं असतं आणि कसं लढून जिंकून दाखवायचं असतं ते आदरणीय शरदचंद्रजी पवार साहेबांनी दाखवून दिलंय.

त्याचबरोबरीनं मी प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील साहेबांचं मनापासून आभार मानेन, मनापासून अभिनंदन करेन. कारण, ही सगळी लढाई सुरू असताना पाठीमागे कॅप्टन ऑफ द शीपप्रमाणे अत्यंत जबाबदारीनं या प्रत्येक जागेवरची प्रत्येक बारकावा जर कुणी तपासून पाहिला असेल, वेळोवेळी उत्साह वाढवला असेल तर तो आदरणीय जयंत पाटील साहेबांनी हा वाढवला. त्याबद्दल त्यांचं खरं तर मनापासून कौतुक करणं हे मला वाटतं कर्तव्य आहे आणि त्याचबरोबर संपूर्ण ऑफिस स्टाफ आणि त्या पलिकडे जाऊन तुम्ही सगळे कार्यकर्ते, कारण, महत्त्वाची गोष्ट ही होती, तत्व, निष्ठा, मूल्य या गोष्टी आता राजकारणातून संपल्या का, असं वाटत असताना तुम्ही सगळ्यांनी महाराष्ट्राला दाखवून दिलं की होय तत्व, निष्ठा, मूल्य आणि स्वाभिमान हे आजही महत्त्वाचं आहे. मघाशी बाप्पा बोलताना काही उल्लेख झाले, तेव्हा आम्ही आधी थोडं थांबलो. पण बाप्पा, तुम्ही जे उल्लेख केले ते स्टेजवर आहेत का याची आम्ही चाचपणी केली. पण नंतर कळले की



# भल्याभल्यांना सुजल्यावर कळतंय की पवार साहेबांनी मारलंय कुठं

डॉ.अमोल कोल्हे

बरेच जण नक्कीच टेलिव्हिजनच्या माध्यमातून ही सभा बघत असणार आहेत. कारण, परवा कोल्हापुरात लागलेला बॅनर भल्याभल्यांना समजून चुकलाय, सुजल्यावर कळतंय पवार साहेबांनी मारलंय कुठं.

पण, ४ जूननंतर महाराष्ट्रात जी एक पळापळ सुरू झालेली आहे, या पळापळीचं कारण म्हणजे खासदार लंके साहेबांनी सांगितलं, की विधानसभेचा नारळ फोडणं गरजेचं आहे. आणि ही अभिमानाची गोष्ट आहे. आज महाराष्ट्रातल्या तब्बल १५० ते १५५ विधानसभा मतदारसंघांमध्ये महाविकास आघाडी ही आघाडीवर आहे आणि त्यामुळं महाराष्ट्रात येणारं पुढचं सरकार हे महविकास आघाडीचं असणार ही काळ्या दगडावरची रेघ आहे. आणि त्यासाठी म्हणजे आत्तापासून खरं तर सत्तेत असणाऱ्या लोकांनी काही रडगाणी सुरू केलीत. म्हणजे महाराष्ट्राच्या माननीय उपमुख्यमंत्री महोदयांनी एक विधान करत असताना सांगितलं, की पराभवाचं विश्लेषण करत असताना जे सांगितलं, ते असं होतं, की विशिष्ट नॅरेटिव्ह तयार करण्यात आला. काही समाजांनी आम्हाला मतदान केलं नाही. असा जो नॅरेटिव्ह करण्यात आला, त्या माननीय उपमुख्यमंत्री महोदयांना सांगू इच्छितो, होय काही समाज हे नक्की तुमच्या विरोधात होते. पण, त्या समाजाचे नाव चार अक्षरी आहे, शेतकरी. कारण हा शेतकरी कांद्यासाठी ओरडत होता. सोयाबीनसाठी रडत होता. कापसासाठी रडत होता. दुधाच्या भावासाठीसुद्धा हा आक्रोश करतोय. आणि हाच शेतकरी नावाचा चार अक्षरी समाज तुम्हाला महाराष्ट्र विधानसभेतील सत्तेतून खाली खेचल्याशिवाय राहणार नाही, ही सुद्धा काळ्या दगडावरची रेघ आहे.

म्हणजे एकीकडे शेतमालाला भाव नाही, दुधाला भाव नाही आणि असं असताना साहेब, एक नवीन संघर्ष समोर येऊन उभा राहिलांय. नागपूरपासून गोव्याला जाणारा भक्तीमार्ग असेल, किंवा आता आपल्या पुणे जिल्ह्यात नवीन जी टूम काढलीय, ती औद्योगिक द्रुतगती मार्गाची असेल, जेव्हा एकीकडे आचारसंहिता सुरू आहे, तेव्हा घाईघाईनं नोटिफिकेशन काढण्याची घाई जेव्हा सरकारकडून केली जाते, तेव्हा कुठंतरी दाल मे कुछ काला है की सगळी दालच काळी आहे हा प्रश्न निर्माण होतो आणि सर्वसामान्य शेतकऱ्यांच्या बागायती जमिनींवरून जर असे हायवे जात असतील तर त्याला प्राणपणानं विरोध करणार, हे तुम्हाला आत्ताच निक्षून सांगतो.



कारण, एक फार मोठं उदाहरण या निवडणुकीत अयोध्येच्या निवडणुकीचं हे बघण्यासारखं आहे. कारण, या अयोध्येच्या निवडणुकीमध्ये अयोध्यामध्ये भारतीय जनता पक्षाच्या उमेदवारांचा जेव्हा पराभव झाला, तेव्हा हा पराभव कशामुळं झाला, तर तोडलेल्या बाविसशे दुकानं, जवळपास साडेसातशे घरं जेव्हा तोडली गेली, जेव्हा रोजीरोटीवरती संकट येतं, जेव्हा पोटावरती लाथ मारली जाते आणि घरादारावर नांगर फिरतो, तेव्हा सर्वसामान्य जनता चिडून उठते आणि ही वेळ आता येत्या विधानसभा निवडणुकीमध्ये आपल्याला दाखवून द्यायची आहे.

जेव्हा केंद्रातल्या मंत्रीमंडळाचा शपथविधी होत होता, अनेक बातम्या आपण वाचल्या असतील, या बातम्या वाचत असताना काही बातमी समोर आली, की बिहारमध्ये विशेष दर्जा देण्यासाठी किंवा स्पेशल पॅकेजसाठी मागणी होतेय. आंध्र प्रदेशमध्ये स्पेशल पॅकेजसाठी मागणी होतेय. आणि त्यासाठी त्या बाजूचे घटक पक्ष जे आहेत, ते काही प्रमाणात अडवून धरतायंत. आणि तेव्हा खरोखर मनात आशा निर्माण झाली होती, की एनडीएतले जे घटक पक्ष महाराष्ट्रातले आहेत, हे नक्की महाराष्ट्रातल्या तरूणांसाठी सांगतील, की होय आम्ही पाठिंबा देतो. पण, महाराष्ट्रातून जे उद्योगधंदे पळवून नेलेत महाराष्ट्राच्या तरूणांचा जो पळवून नेलांय, त्याच्याविषयी आधी शाश्वती द्या, पण असं झालं नाही. असं वाटलं होतं, की महायुतीतले घटक पक्ष सांगतील, की होय आम्ही पाठिंबा देतो. पण, तो देत असताना अरबी समुद्रातलं छत्रपती शिवाजी महाराजांचं स्मारक ते आधी होण्याचा आम्हाला शब्द द्या. पण, हे कुठंही झालं नाही भावांनो आणि हे जे घडलं नाही, याचा जाब आता येणाऱ्या निवडणुकीत आपल्याला विचारायचांय.

मघाशी रोहितदादांनी जी विनंती केली, हीच विनंती




लोकसभा निवडणुकीतील विजयाचा आनंदोत्सव साजरा करताना शरद पवार, जयंत पाटील यांच्यासह सर्व निवडून आलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या (शरदचंद्र पवार) सुप्रिया सुळे, अमर काळे, धैर्यशील मोहिते, सुरेश म्हात्रे, अमोल कोल्हे, बजरंग सोनवणे, नीलेश लंके, भास्करराव भगरे या खासदारांचा एकाच हारात गुंफून सत्कार करण्यात आला, त्यावेळी शेजारी शशिकांत शिंदे, राजेंद्र फाळके, संदीप वर्पे

आपल्याला करू इच्छितो. कारण, या संपूर्ण निवडणूक प्रक्रियेमध्ये अनेक ठिकाणी प्रचार करत असतानासुद्धा अनेकजण सांगण्याचा प्रयत्न करत होते, की आम्ही आतून मदत केली. आम्ही शांत राहिलो. आणि त्यानंतर अनेकजण चर्चा करतात. पत्रकार विचारताहेत, घरवापसीची ज्यांची इच्छा आहे, त्यांचं काय? आदरणीय साहेब, या सगळ्या कार्यकर्त्यांच्यावतीनं मी आपल्याला सांगू इच्छितो, दहापैकी आठ हा जो स्ट्राईक रेट आहे, ऐंशी टक्क्याचा स्ट्राईक रेट आपल्या मार्गदर्शनाखाली, जयंत पाटील साहेबांच्या नेतृत्वाखाली हा जो मिळवलांय, हा करत असताना हा सर्वसामान्य कार्यकर्ता लढलांय. आणि याच्या मेहनतीचा, याच्या निष्ठेचा आणि याच्या मनाचा या निर्णयात नक्की विचार व्हावा. जे आहे ते आपल्या हिंमतीवर, आपल्या मार्गदर्शनाच्या बळावर, आपल्या उरातल्या हिंमतीवर आणि आपल्या मनगटाच्या जोरावर आहे. लोकसभा तो सिर्फ झाँकी हैं, विधानसभा अभी बाकी हैं. आणि हेच हा निष्ठावान कार्यकर्ता करून दाखविल, एवढी अपेक्षा व्यक्त करतो. पुन्हा एकदा आपल्या सर्वांचं मनापासून अभिनंदन करतो. आभार मानतो.

आपणा सर्वांना या वर्धापन दिनाच्या शुभेच्छा देत असताना आदरणीय जयंत पाटील साहेबांना ही विनंती करू इच्छितो, की गेल्यावेळी जशा शिवस्वराज्य यात्रेतून संपूर्ण महाराष्ट्र पिंजुन काढला होता, त्याच पद्धतीनं पुन्हा हा महाराष्ट्र पिंजून काढण्यासाठी आपण मार्गदर्शन करावं आणि आदरणीय साहेबांना त्यांच्या वाढदिवसानिमित्त किमान ८५ आमदार देण्याचा जो आपल्या सगळ्यांचा संकल्प आहे, त्यादृष्टिनं पाऊल पुढं टाकावं अशी विनंती करतो आणि थांबतो. धन्यवाद! जय शिवराय!!

■■■

अरे मित्रांनो, ये तो ट्रेलर है, पिक्चर अभी बाकी हैं विधानसभा. अरे, आदरणीय पवार साहेबांनी असा काय चेंडू टाकला, तर पुढल्यांचा डायरेक्ट त्रिफाळा उडाला. अरे, पवार साहेबांचा नाद करता काय. नाद करायचा, पण पवार साहेबांचा नाही बाळांनो, अरे, भले भले थकले. त्यामुळं सगळ्यांना विनंती आहे, की आता मुंबईवर झेंडा अन् डायरेक्ट बहुमतांनीच. असा खटका पडला पाहिजे ना, तर डायरेक्ट पवार शब्द देतो, बाराच्या बारा आणून घालितो साहेब. बाराच्या बारा. नीलेश लंके जे बोलतो ना तेच करतो आणि जे करतो तेच बोलतो. तुम्ही काय काळजी करू नका. मी तर कसा पैलवान आहे, माहित आहे ना. डायरेक्ट असा डाव टाकतो, की पुढला तर आऊटच. त्यामुळं काही काळजी करू नका.

पण खरंच साहेबांमुळं मी खासदार झालो रे. मी खासदार झाल्यावर मी तर बऱ्याच जणांना इचारलं, अरे मी खरंच खासदार



साहेबांचा झेंडा डायरेक्ट मुंबईमध्ये विधानसभेमध्ये फडकला पाहिजेल. निसतं शिट्या मारल्या आणि घोषणा देऊन जुळत नाही. आजच प्रचाराचा नारळ फुटला पाहिजे आपल्या विधानसभेच्या निवडणुकीचा आणि सगळ्यांनी जाताना खूणगाठ बांधायची, मी माझ्या मतदारसंघातला उमेदवार निवडून आणल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही. त्यात मी सुद्धा असणार आहे. मी तर साहेबांना झालो की काय? ते म्हणाले, अरे येड्या झाला ना खासदार तू. मग नंतर तात्यांना विचारलं, म्हणलं माझं सर्टिफिकेट नाही ना बदलायचं. ते म्हणाले, आता नाय सर्टिफिकेट बदलत म्हणले. पण ते कसं आहे, निसता लय दोनशे किलोचा असला, पण असा जरी असला ना तर पक्का खेळाडू हा पवार साहेबांच्या तालमीतला, डायरेक्ट असंच. सगळ्यांना जाता जाता विनंती



# पवार साहेबांचा नाद नाही करायचा

**नीलेश लंके**

करतोय. आता विधानसभेसाठी तयारीला लागायचं. आणि तुम्ही तर असं मला डोक्यावर घेतलं ना त्या पहिल्या दिवसापासून डोक्यावर घेतलं ना, सगळ्यांना असं वाटलं, की कधी याला दिल्लीत नेऊन टाकितो. आता दिल्लीत पाठवलं ना आम्हा आठ जणांना, बघा आम्ही पण कसं काम करून दाखिवतो. संसदेत नाही शेतकऱ्यांना न्याय दिला ना तर बंदच पाडितो संसद आम्ही. आमचं काम हटके आहे. काय फरक पडतोय शेतकऱ्यांसाठी, आमच्या एका कार्यकर्त्यानं कांदा दाखवला. मी कालच साहेबांना इचारलं, हे जरा आचारसंहितेचा नियम मला एवढं कळत नाही म्हणलं, मला आंदोलन करायचंय. आमच्या दूध उत्पादकांसाठी आणि कांद्याच्या निर्यातबंदीसाठी. ते मला म्हणले, जरा कळ काढ, दिल्लीला जा, सर्टिफिकेट घेऊन ये आणि मग लढ म्हणाले. तुला त्याच्याशिवाय तर काय तुला दम निघायचाच नाही. त्यामुळं एकदा दिल्लीहून जाऊन येऊ दे, जरा अंदाज घेतो दिल्लीचा कसं काय आहे, निम्मा अंदाज घेतलांय मी इथूनच. कसं जायचं, कुठल्या मार्गे जायचं, पण बरोबर करीत असतो. काळजी करू नका. आपण काम करणारा माणूस आहे. काम करून दाखवणारा माणूस आहे. ज्यांना ज्यांना शब्द दिला ना, ते शब्द निश्चित पूर्ण करीन पवार साहेबांच्या आशीर्वादासाठी. पण एकच ध्यानात धरायचं सगळ्यांनी, पवार इज द पॉवर. आणि सगळ्यांचा नाद करायचा. पण आदरणीय पवार साहेबांचा नाद केला ना घरी पाठवित असतात भल्याभल्यांना, हे एकमेव उदाहरण. आपल्या सगळ्यांचं दैवत याठिकाणी बसलेलं आहे. त्यामुळं आज जास्त वेळ घेणार नाही. आता लई जणांना बोलायचं आहे. सगळ्यांना पुन्हा एकदा धन्यवाद देतो. थांबतो.

आज पक्षाच्या इतिहासामध्ये खूप मोठा आनंदाचा दिवस म्हणून या वर्धापन दिनादिवशी आमचा सत्कार पक्षानं केला. या रौप्य महोत्सवी वर्षाच्या निमित्तानं मी सर्व नेतृत्व आणि कार्यकर्त्यांना विनंती करणार आहे, की आपली ही लढाई याठिकाणी थांबत नाही, तर आपली लढाई खरी आज सुरू होतीय. आपण राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हा एक देशात एकमेव पक्ष आहे, की ज्याचा रिझल्ट ८० टक्के आहे. दहा जागा लढवल्या आणि निसटता पराजय आमच्या शिंदे साहेबांचा झाला. पण, आठ लोकं निवडून आलो, म्हणजे ८० टक्के रिझल्ट हा आपल्या पक्षाच्या बाजूनं आला. देशात कुठल्याही पक्षाचा नाही. म्हणजे दिलं. त्याबद्दल इथल्या सर्व जनतेच्यासमोर मी नतमस्तक होऊन सांगतो, की एवढ्या मोठ्या लोकांना तुम्ही पराजयाचं पाणी पाजलं. त्याच्यामुळं तुमच्यासमोर नतमस्तक होतो. एवढ्या मोठ्या मोठ्या लढाया जिंकताना आदरणीय साहेबांचा आशीर्वाद आणि तुमची सर्वांची साथ याच्या जीवावर पक्षानं एवढं मोठं यश प्राप्त केलेलं आहे.

येणाऱ्या काळामध्ये आपल्याला विधानसभेची निवडणूक लढायची आहे. आणि आदरणीय साहेब, माझी सर्व नेत्यांना विनंती आहे, की आम्ही निवडून आलेल्या आठच्या आठ खासदारांना जिम्मेदारी द्या आणि जिम्मेदारीचा रिझल्ट



# जनतेनं ज्याची त्याची लायकी दाखवून दिली

**बजरंग सोनवणे**

देशाचा खरा नेता कोण? तर आदरणीय शरदचंद्रजी पवार साहेब हे सिद्ध करून दिलंय या महाराष्ट्राच्या जनतेनं. महाराष्ट्राची जनता कुणासोबत आहे, तर आदरणीय पवार साहेबांसोबत आहे हेही सिद्ध करुन दिलं. त्याच्यामुळं वेगळं काही सिद्ध करायची गरज नाही.

ज्यांनी ज्यांनी या निवडणुकीमध्ये कार्यकर्ता म्हणून, मतदार म्हणून ज्यांनी भूमिका निभावली, त्यांचं मी पहिल्यांदा मन:पूर्वक आभार मानणार आहे. आजच्या या ज्या अहिल्यानगरमध्ये कार्यक्रम होतोय, या कार्यक्रमाच्या ठिकाणचे लोकप्रिय असे खासदारसुद्धा तुम्ही आदरणीय निलेशजी लंके साहेबांना निवडून आमच्याकडून घ्या. आम्हाला तुम्ही एक-दोन दिवसांत जिम्मेदारी द्या, की तुला एवढे विधानसभा मतदारसंघ निवडून आणायचे आहेत आणि मी मात्र छातीठोकपणे, विनम्रपणे विनंती करून तुमच्या सर्वांच्या ताकदीवर सांगणार आहे, की मला जी साहेब आणि आदरणीय प्रांतीय अध्यक्ष साहेब जी काही जिम्मेदारी देतील मराठवाड्याचा एकमेव खासदार म्हणून, ती मी पार पाडण्याचा प्रामाणिक प्रयत्न करेल. मराठवाड्याचे सर्वाधिक आमदार यावेळेस पहिल्यांदा विधानभवनात आपल्या पक्षाचे लावायचं कामसुद्धा तुमच्या सर्वांच्या आशीर्वादानं करण्याची प्रेरणा घेऊन या कार्यक्रमातून जायचंय.

ही लढाई तुमची-आमची सर्वांची अस्मितेची लढाई आहे. त्याच्यामुळं आजच्या या दिनानिमित्त आपल्याला सर्वांना एक निश्चय करून या कार्यक्रमातून जायचंय. येणाऱ्या महाराष्ट्राच्या विधानसभेवर आपल्याला आपला झेंडा फडकवायचा आहे म्हणजे फडकवायचा आहे. याच्यासाठी तुम्ही-आम्ही सर्वांनी एकत्रितरित्या काम करायचंय. कालच देशाच्या पंतप्रधानपदाची शपथ घेतलेल्या मोदी साहेबांनी आज सही करून पदभार घेतला आणि आमच्या मीडियातल्या बांधवांनी बातमी दिली, की पहिली सही मोदी साहेबांनी शेतकऱ्यासाठी केली. मी म्हणलं, बरं झालं. शेतकऱ्यांच्या कामासाठी मोदी साहेबांनी




सही केली. कांद्याची निर्यातबंदी उठवली असेल. आमच्या साखरेची निर्यातबंदी उठवली असंल. कापसाला भाव जाहीर केला असंल, पण, काय सही केली, तर शेतकऱ्यांचा सन्मान योजनेचा जो हप्ता आहे, अरे तो द्यावाच लागला असता. ती योजना आहे. ह्याच्यावर सही केली. म्हणजे गाजर दाखवायचं काम देशाचे पंतप्रधान परत एकदा करतायंत.

तर माझ्या या बीड जिल्ह्यातल्या सर्व तमात जेवढे होते तेवढे, आणि महाराष्ट्रातले जेवढे आहेत तेवढे खासदार महोदय, आम्ही सर्वजण आणि बीड जिल्ह्यातली, महाराष्ट्रातली सबंध जनता यांना सर्वांना विनम्र विनंती करायचीय, माझ्या शेतकरी बांधवांना, तरूणांना मी ज्या बीड जिल्ह्यातून खासदार झालो, ती खासदारकी एवढी सोपी नव्हती. सुरूवातीपासून प्रमाणपत्र हातात घेईपर्यंत लढा द्यावा लागला. पण, आदरणीय साहेब आणि आदरणीय तुम्ही सर्व जनता माझ्यासोबत होतात म्हणून देशात सर्वात उशिरा कुठला निकाला लागला तर तो बीडचा. पण सत्य परेशान होता हैं, लेकीन पराजित नही होता अशा पद्धतीनं सत्याचा विजय म्हणजे हा झालांय. त्याच्यामुळं माझी सर्वांनी विनंती आहे, की या सर्व घटनेतून आपल्याला एकच करायचंय, की या देशाच्या उच्च सभागृहात जाण्यासाठी आदरणीय साहेबांनी मला संधी दिली. मराठवाड्यात एकच जागा लढली. तुमच्या सर्वांच्या आशीर्वादावर ती जागा जिंकण्याचं सौभाग्य माझ्या नशिबी मिळालं. आणि ज्याला हिणवलं जायचं, याची लायकी काय? याची लायकी बीड जिल्ह्यातल्या जनतेनं ज्याची त्याची लायकी दाखवून दिली. आणि यापुढंही महाराष्ट्रातल्या जनतेनं ज्याची त्याची लायकी दाखवून दिली आहे. त्यामुळं आता पुढच्या काळात सुद्धा आपल्याला महाराष्ट्रामध्ये आदरणीय शरदचंद्र पवार साहेबांचं नाव घेऊन देशात नाव उंच करायचंय आदरणीय पवार साहेबांचं, एवढी विनंती करतो आणि थांबतो. जय हिंद! जय राष्ट्रवादी!!

■■■



# जनतेच्या न्याय्य प्रश्नांना वाचा फोडण्याचं काम करू

**अमर काळे**

सर्वप्रथम साहेबांना आणि राष्ट्रवादीच्या प्रत्येक कार्यकर्त्याला या रौप्य महोत्सवी वर्षाच्या मी मनापासून याठिकाणी शुभेच्छा देतो. आज यानंतर माननीय पवार साहेबांना आपल्याला ऐकायचंय. अनेक वक्त्यांना आपल्याला ऐकायचंय. त्यामुळे मी फार जास्त वेळ आपला घेणार नाही. परंतु, सर्वात पहिले माननीय शरदचंद्रजी पवार साहेब यांचं मनापासून मी याठिकाणी आभार मानतो, की त्यांनी विदर्भामध्ये फक्त एक जागा लढवली आणि विदर्भामध्ये एक जागा लढवून फक्त वर्ध्याची जागा त्यांनी मागितली आणि वर्ध्याच्या जागेवर पवार साहेबांनी माझ्यावर विश्वास टाकला. मला त्याठिकाणी उमेदवारी दिली आणि त्याठिकाणी भरघोस मतांनी, त्यांच्या आशीर्वादानं मी याठिकाणी निवडून आलो. त्याबद्दल त्यांचं मी मनापासून याठिकाणी सर्वप्रथम आभार मानतो.

वास्तविक पाहता माझा राष्ट्रवादी पक्षासोबतचा संबंध जर आपण बघितला, तर मी कायम याच्या पहिलं महाराष्ट्राच्या विधानसभेमध्ये तीन टर्म कॉंग्रेस पक्षाचा आमदार म्हणून मी त्याठिकाणी काम केलेलं आहे. परंतु, यावेळेला खासदारकीची संधी मिळाली आणि मी आपल्याला सांगू इच्छितो, की २९ मार्चला माझा राष्ट्रवादी पक्षामध्ये प्रवेश झाला. ३० मार्चला माझी जयंत पाटील साहेबांनी तिकिट घोषीत केली राष्ट्रवादी पक्षाकडनं. २ तारखेला मी नॉमिनेशन भरलं आणि या चार तारखेला आपल्या सर्वांच्या आणि पवार साहेबांच्या आशीर्वादानं मी याठिकाणी खासदार झालो. आणि वास्तविक पाहता ही जी किमया आहे, मला तरी वाटतं ही किमया कोणी पवार साहेबांपेक्षा दुसरं कोणी करू शकत नाही. मला आठवतं, की ज्यावेळेला माझे मामा अनिलजी देशमुख साहेब यांचा मला कॉल आला आणि त्यांनी मला सांगितलं, की तुझं नॉमिनेशन भरण्याकरता स्वत: शरदचंद्र पवार साहेब येणार आहेत. त्यावेळी मला एकदम आश्चर्याचा धक्का बसला. कारण, की विदर्भातलं ऊन इतकं प्रचंड, २ एप्रिलला जवळपास ४६-४७ डिग्रीच्या उन्हामध्ये पवार साहेब माझा नॉमिनेशन फॉर्म भरण्याकरता तीन तास माझ्यासोबत मिरवणुकीनं त्यानिमित्तानं स्वाध्याय मंदिरपासून ते कलेक्टर ऑफिसपर्यंत गेले.

पवार साहेब, मी आपल्याला सांगू इच्छितो, आपली जरब या देशाच्या राजकारणामध्ये इतकी आहे, की आपण माझा नॉमिनेशन फॉर्म भरण्याकरता आले आणि त्याच्यानंतर माझा पराभव करण्याकरता वर्धा लोकसभा मतदारसंघामध्ये देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी साहेबांना यावं लागलं. त्याचबरोबर माझ्या वर्धा लोकसभा मतदारसंघामध्ये उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगीजींना यावं लागलं. माझ्या वर्धा लोकसभा मतदारसंघामध्ये बांधकाम मंत्री नितीन गडकरी साहेबांना यावं लागलं. अजितदादा पवारांना यावं लागलं. देवेंद्र फडणवीसांना यावं

लागलं. सुधीर मुनगंटीवार, चंद्रशेखर बावनकुळे यांना यावं लागलं. त्याचबरोबर हंसराज अहिर, जे माजी केंद्रीय गृहमंत्री होते, त्यांना यावं लागलं. फक्त आपण माझा नॉमिनेशन फॉर्म भरण्याकरता आले आणि देशाच्या पंतप्रधानांपासून उत्तर प्रदेशच्या मुख्यमंत्र्यांपर्यंत प्रत्येकाला माझ्या मतदारसंघामध्ये येऊन त्याठिकाणी प्रचार करावा लागला. ही जी ताकद नावाची जी आहे, ही ताकद खऱ्या अर्थानं पवार साहेबांच्या नावाची आहे, हे त्यानिमित्तानं आपण लक्षात घेतलं पाहिजे. आणि ज्या पद्धतीनं रोहितजींनी याठिकाणी आपल्याला सांगितलं, की साहेब आता काही दिवसांमध्ये ८५ वर्षे पूर्ण करतायंत. वयाच्या ८५व्या वर्षात पदार्पण करतायंत आणि महाराष्ट्राच्या येणाऱ्या विधानसभेच्या निवडणुकीमध्ये ८५ आमदार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे आपण त्यांना भेट म्हणून दिले पाहिजे, अशी अपेक्षा जी याठिकाणी रोहितजींनी व्यक्त केली, त्याच्याकरता जीवाची बाजी लावण्याचा प्रयत्न आम्ही त्यानिमित्तानं करू. रक्ताचं पाणी आम्ही करू, हा शब्द याठिकाणी सर्वच कार्यकर्त्यांच्यावतीनं मी याठिकाणी पवार साहेबांना देतो आणि पवार साहेबांच्या विचाराचं सरकार येणाऱ्या या महाराष्ट्राच्या विधानसभेमध्ये आल्याशिवाय राहणार नाही हा संकल्प आजच्या या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त आपण करूया ही एक अपेक्षा मी आजच्या या कार्यक्रमाच्या निमित्तानं करतो.



याठिकाणी १०पैकी आठ खासदार आपले निवडून आलेले आहेत. मी या देशातल्या सर्व नागरिकांना, महाराष्ट्रातल्या सर्व मतदारांना याठिकाणी आश्वासित करतो, की तुमच्या प्रत्येक न्याय्य प्रश्नाला वाचा फोडण्याचं काम हे आम्ही आठही लोक देशाच्या संसदेमध्ये करू हा विश्वास मी आपल्याला याठिकाणी देतो. याठिकाणी मी आपल्याला सांगू इच्छितो, की आमच्या वर्धा जिल्ह्याचे सन्माननीय खासदार रामदासची तडस हे त्यावेळेला होते. दहा वर्षे त्यांनी खासदार म्हणून त्याठिकाणी काम केलं. आणि मध्यंतरी आमच्या कार्यकर्त्यांनी आमच्या वर्धा जिल्ह्यातल्या एका सरपंचानी तडस साहेबांना फोन केला आणि त्यांना विचारलं, की संसदेमध्ये ज्यावेळेला शेतकऱ्यांच्या संदर्भामध्ये जेव्हा चर्चा चालू होती, त्यावेळेला साहेब तुम्ही बोलले की नाही? तुम्ही आमचे खासदार आहेत. तुम्ही आमच्या प्रश्नावर बोलायला पाहिजे होतं, त्यावेळेला आमच्या जिल्ह्याचे सन्माननीय खासदार रामदासजी तडस साहेब हे त्यावेळी बोलताना बोलले होते, की ज्या मुद्यांमुळं सरकार अडचणीत येईल असे मुद्दे संसदेमध्ये मांडण्याची परवानगी आम्हाला नाही आणि जर देशाचे पंतप्रधान मोदी साहेब असो किंवा माननीय अमित शहाजी असो, यांनी आम्हाला जर नाही म्हटलं तर आम्हाला त्याच्यावरती काही जाता येत नाही. शेतकऱ्यांचे प्रश्न असो

किंवा शेतमजुरांचे प्रश्न असो, ज्या प्रश्नाच्या माध्यमातून सरकार अडचणीत येईल, ते मुद्दे आम्ही संसदेमध्ये मांडू शकत नाही, अशा पद्धतीची एक ऑडिओ क्लिप ही आमच्या खासदारांची त्यावेळेला व्हायरल झाली होती.

मी आपल्याला यानिमित्तानं आश्वस्त करू इच्छितो, की आता हे जे आठ खासदार आपण याठिकाणी निवडून दिलेले आहेत. या आठ खासदारांना खाली बसवण्याचं काम या देशाचे पंतप्रधानही करू शकणार नाहीत, मोदी करू शकणार नाहीत आणि शहाही करू शकणार नाहीत. तुमच्या प्रत्येक प्रश्नाला न्याय देण्याची भूमिका याठिकाणी आमच्या माध्यमातून राहील, ही ग्वाही मी आज या कार्यक्रमाच्या निमित्तानं याठिकाणी देतो आणि फार जास्त न बोलता शेतकऱ्यांचे प्रश्न असतील, प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न असतील, शेतमजुरांचे प्रश्न असेल, युवकांचे प्रश्न असेल, महिलांचे प्रश्न असेल, प्रत्येक प्रश्नाकरता आम्ही आपल्यासोबत आहे हा विश्वास मी याठिकाणी देतो आणि याठिकाणी पवार साहेबांना माझी नम्र विनंती आहे, आपण भाषण करताना सर्वच कार्यकर्त्यांना आपण एक आदेश दिला पाहिजे, की एक घटना जी काही दिवसांपूर्वी, महिन्यांपूर्वी आपल्या महाराष्ट्रामध्ये घडली. परंतु, आता ती घटना लोकं विसरून गेलेले आहेत. त्या लोकांना न्याय देण्याकरता आता आपण राष्ट्रवादी पक्षानं पाऊल उचललं पाहिजे, ही एक अपेक्षा मी याठिकाणी आपल्याला करतो.


सक्षणा सलगर यांनी शाल व पुष्पगुच्छ देवून अमर काळे यांचा सत्कार केला.

मला यानिमित्तानं आपल्याला सांगावसं वाटतं, की मागच्या १ जुलै २०२३ला समृद्धी महामार्गावर एक मोठा अपघात झाला होता. २५ लोक त्या अपघातामध्ये मरण पावले होते. २५पैकी १४ लोक आमच्या वर्धा जिल्ह्यातले होते. अकरा लोक बाहेरच्या ठिकाणचे होते. आणि २५ लोकं त्याठिकाणी मरण पावल्यानंतर त्यावेळेला तत्कालिन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे समृद्धी एक्सप्रेस वेवर गेले होते आणि तिथं जाऊन त्यांनी त्यावेळेला घोषणा केली होती, की जी लोकं या अपघातामध्ये मरण पावली आहेत, त्यांच्या प्रत्येक कुटुंबातल्या व्यक्तीला २५–२५ लाख रूपयांची मदत ही महाराष्ट्र शासनाकडनं दिली जाईल. आजची तारीख आहे १० जून. येणाऱ्या १ जुलैला समृद्धी एक्सप्रेस वेच्या अपघाताला आता एक वर्ष पूर्ण होणार आहे. परंतु, सरकारनी दिलेला शब्द अजूनपर्यंत पूर्ण केलेला नाही. तो अपघात इतका भीषण होता, की त्या अपघातामध्ये २५ लोकांचा अक्षरश: कोळसा होऊन गेला. एक तर अकरा की बारा महिन्याचं बाळ होतं, तेसुद्धा त्याठिकाणी कोळसा होऊन गेलं. त्याठिकाणी आपले उपमुख्यमंत्री जातात आणि २५ लाखांची घोषणा करतात. येणाऱ्या १ जुलैला एक वर्ष पूर्ण होऊन राहिलं. परंतु, एकाही कुटुंबाला त्यांनी आतापर्यंत ती मदत दिलेली नाही.

मध्यंतरीच्या काळामध्ये मी त्या सर्व प्रकल्पात त्या ज्या सर्व अपघातामध्ये मरण पावलेल्या कुटुंबातल्या लोकांची एक बैठक घेतली. त्यावेळेला त्यांनी माझ्याकडं एक माफक अपेक्षा व्यक्त केली, की जरी आम्हाला तुम्ही २५ लाख रूपये देत नसाल, तरी फक्त सरकारनी इतकं करावं, की माझ्या तोंडातून २५ लाख रूपयाची जी काही घोषणा आहे, ती अनावधानानं झाली, एवढं तरी कमीत कमी मुख्यमंत्र्यांनी, उपमुख्यमंत्र्यांनी घोषीत करावं. इतकी माफक अपेक्षा त्या लोकांनी व्यक्त केली. परंतु, २५ लाखही दिले नाहीत आणि अनावधानानं माझ्या तोंडातून २५ लाख रूपये निघालं हेसुद्धा आतापर्यंत ते बोललेले नाहीत. त्यामुळं राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या माध्यमातून संपूर्ण राज्यामध्ये समृद्धी एक्सप्रेस वेवरील अपघातामध्ये मरण पावलेल्या लोकांना न्याय देण्याच्या भूमिकेतून एक आंदोलन त्यानिमित्तानं उभारलं जावं. ही एक अपेक्षा आजच्या या कार्यक्रमाच्या निमित्तानं मी याठिकाणी करतो. आणि निश्चित आपल्या पक्षाच्या माध्यमातून या सर्व २५ लोकांना आपण न्याय मिळवून देऊ हा विश्वास मी याठिकाणी व्यक्त करतो आणि या लढ्याकरता आपणसुद्धा सर्वांनी तयार राहावं. इतकी एक अपेक्षा करून माझ्या शब्दांना याठिकाणी विराम देतो आणि सर्वांचं मनापासून आभार मानतो. धन्यवाद!

# जनतेचे प्रश्न मार्गी लावण्याचा प्रयत्न करू



**भास्करराव भगरे**

आज या रौप्य महोत्सवी वर्षाच्या निमित्तानं थोड्याच दिवसांपूर्वी लोकसभेची निवडणूक संपन्न झाली. या निवडणुकीमध्ये महाराष्ट्रातून आदरणीय पवार साहेबांचे दहा शिलेदार या महाराष्ट्रामध्ये उभे करण्यात आले. यामध्ये दिंडोरी लोकसभा मतदारसंघातून माझ्यासारख्या सर्वसामान्य कार्यकर्त्याला, एका शिक्षकाला ज्याची आर्थिक बाजू सक्षम नसताना उमेदवारी दिली. एवढंच नाही, तर मला निवडून आणलं. यामध्ये जर कोणाचा वाटा असेल तर आदरणीय पवार साहेबांचा आहे आणि आदरणीय पवार साहेब काय करू शकतात, हे संपूर्ण महाराष्ट्राला दाखवण्याचं काम आदरणीय साहेबांनी केलंय.

बोलण्यासारखं खूप आहे. परंतु, एक आदिवासी कुटुंबाला, एक सर्वसामान्य शिक्षकाला खऱ्या अर्थानं उभं करण्याचं काम आदरणीय साहेबांनी या निवडणुकीमध्ये करून एका सर्वसामान्य कार्यकर्त्याला संधी दिली. मी यानिमित्ताने आदरणीय साहेब असतील, आदरणीय जयंत पाटील साहेब असतील, आदरणीय सुप्रियाताई आहेत किंवा सर्वच मान्यवरांचं मनापासून आभार व्यक्त करतो. या देशामध्ये आपण बघतोय, की कशा पद्धतीचा राज्य कारभार चाललांय. परंतु, त्याला छेद देण्याचं काम आदरणीय पवार साहेबांनी त्यांच्या राजकीय कारकिर्दीमध्ये केलं आणि म्हणून खऱ्या अर्थानं त्यांची सेवा करण्याची संधी किंवा आपल्या महाराष्ट्रातील जनतेची सेवा करण्याची संधी या दिंडोरी लोकसभा मतदारसंघातून मला प्रतिनिधीत्व करण्याची संधी मिळाली. त्यातून मी जे जे प्रश्न आहेत, ते प्रश्न नक्कीच चांगल्या पद्धतीने मार्गी लावील आणि आदरणीय साहेबांचा आदेश हा शेवटपर्यंत शिरसावंद्य मानेल, एवढंच यानिमित्तानं सांगतो आणि थांबतो. जयहिंद! जय महाराष्ट्र!! जय राष्ट्रवादी!!!

■■■



२५ वर्षांपूर्वी साहेबांनी पक्ष स्थापन केला. संकटं घाबरट असतात. ती सामुहिकरित्या हल्ला करतात. ती अंगावर घेऊन परतवायची असतात आणि त्याच्यात एकच माणूस माहीर आहे, त्यांचं नाव शरद पवार आहे. या २५ वर्षांत पक्षावर काय कमी संकटं आली. १९९९ साली आव्हान स्वीकारून पक्ष स्थापन केला. साहेबांनी काँग्रेस पक्ष सोडला नव्हता. साहेबांना पक्षातून बाहेर काढण्यात आलं होतं. आणि त्याच्यातनं साहेबांनी पक्ष स्थापन केला. १९९९ साली या पक्षाला सत्तेत आणलं. २००२ साली हा पक्ष फोडण्याचा प्रयत्न केला. मी कुणाचंही नाव घेत नाही. पण, ही बातमी साहेबांना त्यांच्या गुप्तहेरांमार्फत लागली आणि त्या फोडाफोडीच्या राजकारणात माझ्यासारखा एक तरूण साहेबांमुळं आमदार झाला.

दररोज साहेबांकडे जायचे आणि म्हणायचे, की साहेब चला बीजेपीबरोबर जाऊया. साहेब दररोज तुम्हाला म्हणायचे, हां ठीक आहे बघूया. पण, शेवटपर्यंत साहेबांनी बघितलंच नाही. आणि इतकं बघितलं नाही, की साहेबांच्या घराचे दोन तुकडे झाले, तरी साहेब म्हणाले, की पुरोगामी महाराष्ट्रच जीवंत राहिला पाहिजे. फुले-शाहू-आंबेडकरांचेच विचार जीवंत राहिले पाहिजेत. हा माणूस लढला.

घर फुटल्यानंतरचं दुःख काय असतं, हे खरंतर त्यांना एकट्यालाच माहिती आहे. खरं तर या माणसाकडं बघून कधी कधी आपल्याला ऊर्जा मिळते, पण त्या माणसाच्या ह्रदयाला काय पिळवट बसत असेल याचा विचार आपण कधीच करत नाही. आपण त्यांना फक्त वापरतो. नाणं घासतो आपण आपल्या फायद्यासाठी. सोनं उगळतोय आणि लावतोय, फक्त



त्याच्यानंतर सातत्याने साहेब लढा देत राहिले. साहेब, तुम्हाला आठवतही नसेल, तुम्ही बोललेही नसाल, पण आजच्या वर्धापनदिनानिमित्त मुंबईमध्ये झालेल्या कार्यक्रमात ९ महिन्यांचं बाळ बोललं, की साहेबांनी २००९ साली ठरवलेलं, की १६-१६-१६चा फॉर्म्युला करूया. आता ते नेहमी तारखा सांगत असतात साहेब. २००९ साली ठरवलं, २०१४ साली ठरवलं, २०१६ साली ठरवलं, २०१९ साली ठरवलं. अरे, एवढंही तुम्हाला कळत नाहीये का, की साहेब तुम्हाला एक रस्त्यावर घेऊन जातात, पुढंपर्यंत नेतात आणि सोडून देतात आणि साहेब परत येतात. अरे, एवढं तरी कळायला पाहिजे. चारवेळा येडं बनवल्यानंतरसुद्धा तुम्ही साहेबांवर पोच ठेवतांय. साहेब कम्युनल पार्टीबरोबर जातील? जातीयवादी पक्षांबरोबर जातील? अरे, तुम्हाला कळलं कसं नाही, तुम्ही पाच वर्षे

आपल्या फायद्यासाठी. साहेबांना दुःख होत नसेल? साहेबांना ह्रदय नाहीये? साहेबांना भावना नाहीयेत? अरे, ज्यांना २५-२५ वर्षे बाळासारखं सांभाळलं, २५-२५ वर्षे ज्यांना मांडीवर ठेवलं, त्याच लोकांनी मागनं हात घालून गळा पकडायचा प्रयत्न केला असेल तेव्हा साहेबांच्या डोळ्यातून अश्रू वाहिले नसतील? जेव्हा रात्री एकटे झोपत असतील, तेव्हा त्यांना वाईट वाटत नसेल? पण, याचा कसलाच विचार न करता जी माणसं सोडून गेली, ते जर परतीच्या वाटेवर असतील तर साहेब आम्हाला रडू येईल. कारण, ते दुःख आम्ही बघितलंय. पण, अर्थात शेवटी माझं एकच उत्तर असतं, साहेब घेतील तो निर्णय. त्याला नो चॅलेंज. साहेबांनी सांगितलं, उद्या याला बाप मानायचा, तो बाप. तिथे कुठेही प्रश्न उत्तरे होणार नाहीत.

पण, साहेब महाराष्ट्रानं नेहमी गद्दारीला गाडलंय. मग



# महाराष्ट्रात कदापिही मनुस्मृती येऊ देणार नाही

**जितेंद्र आव्हाड**

तो कृष्णाची खोपडे असो, नाहीतर सूर्याजी पिसाळ असो. या अवलादींना महाराष्ट्रानं माफ केलेलं नाही, हे या निवडणुकीत महाराष्ट्राच्या जनतेनी दाखवून दिलंय. म्हणून साहेब, महाराष्ट्राची परिस्थिती आता तरी चांगली आहे. या देशाच्या राजकारणात सर्वात मोठा जो खेळ झाला, तो खेळ संविधानानी केलाय. जेव्हा चारशे पारचा नारा लागला, तेव्हा देशातल्या काहीजणांनी जे सांगितलं होतं, त्यातला मी एक होतो, की ज्यादिवशी चारशे पार होतील, त्यादिवशी संविधान आरपार होईल. आणि आज हे कितीही म्हणत असले, की आम्हाला संविधान बदलायचं नव्हतं तर मी उदाहरणासकट सांगतो, की अमित शहांनी भाषण केलं होतं, की आमचं सरकार जर आलं, तर आम्ही मुस्लिम पर्सनल लॉ बदलून टाकू. मुस्लिम पर्सनल लॉ हा फंडामेंटल राईटमधला हक्क आहे. जो संविधानमध्ये आहे. त्याच्यामध्ये राईट टू रिलिजन आहे. तुम्हाला धर्माचं स्वातंत्र्य आहे. धर्माचं स्वातंत्र्य म्हणजे काय, तर त्या धर्माच्या रूढी, परंपरा, चाली, रिती या सगळ्या तुम्ही अपनावू शकता. तुम्हाला त्याला कुणीही विरोध करणार नाही. ज्या दिवशी अमित शहा हे म्हणतात की मुस्लिम पर्सनल लॉ बदलून टाकू, त्यावेळी त्याचा अर्थ त्यांना संविधान बदलायचे होते असा होतो.

या देशाच्या बहुजन जनतेने त्यांना रोखले. केवळ दलितांनीच नाही, तर याठिकाणी एससी आहे, एसटी आहे, ओबीसी आहेत, त्यांना माहिती आहे, की ज्या दिवशी या देशातनं संविधान गेलं, त्यादिवशी आपण दुहेरी नागरिकत्वावर येऊ आणि आपल्याला खालच्या दर्जाचं नागरिकत्व दिलं जाईल. जे त्यांच्या मनुस्मृतीमध्ये लिहिलंय. १९५० साली जेव्हा हे संविधान स्वीकारलं, तेव्हा आरएसएसच्या ऑर्गनायझर या मुखपत्रामध्ये लिहून आलं, की आम्हाला हे संविधानच मान्य नाही. आमचं संविधान हे मनुस्मृती आहे. परवा परवा दीपक केसरकरांनी जाहीर भाषणात सांगितलं, की मनुस्मृतीमधले चार चांगले श्लोक घेतले तर काय चुकलं. बहुजन समाजाला मान्य आहे का मनुस्मृती पुस्तकात येणं? अरे, आमच्या आईला वासनांध म्हणणं, आमच्या आईला कामांध म्हणणं हे कोण स्वीकारू शकेल. महिलांबद्दल मनुस्मृतीमध्ये काय लिहिलंय हे माहिती आहे का? ती फक्त उपभोगाची वस्तू आहे. एवढंच सांगतो. पुढचं काय सांगत नाही. शाळेला बंदी, शिकण्याला बंदी, विवाहाला बंदी, घराच्या बाहेर पडायचं नाही अशा अनेक घाणेरड्या गोष्टी लिहून ठेवल्या आहेत.

चातुर्वण्य व्यवस्था कुणी आणली? याच मनुस्मृतीनं आणली. आणि म्हणून जसं आपण सर्वजण संविधान बदलाच्या विरोधात उभं राहिलो, तसं दीपक केसरकरांनी आपल्याला हिंट दिलेली आहे, जी अमित शहांनी दिली होती, की आम्ही कायदा बदलू. म्हणजे आम्ही संविधान बदलू. आम्ही चार श्लोक आणतोय, याचा अर्थ मागच्या दाराने आम्ही मनुस्मृती आणतोय. आम्ही मेलो तरी चालेल, पण ज्या बाबासाहेबांनी महाडला ही मनुस्मृती जाळली होती, त्या बाबासाहेबांचं नाव घेत आम्ही तुम्हाला मनुस्मृतीला हातसुद्धा लावू देणार नाही. वाटल्यास हिंसा होईल. पण मनुस्मृती महाराष्ट्रात येणार नाही.

साहेबांचं जे काही योगदान आहे महाराष्ट्राच्या यशामध्ये, याच्याबद्दल जास्त काय मला बोलायचं नाही. सगळ्यांनाच माहिती आहे, की ८४ वर्षाचा हा तरूण ११० सभा घेतल्या. लोकं यांना घराच्या बाहेर काढायला निघाली होती, वय झालं, वय झालं. त्यांना तुमचं वय काय आता विचारावं लागतंय. म्हाताऱ्यासारखे दिसतायंत. या खेळाडूनं अशी गुगली टाकलीय, की त्रिफळा उडाला आणि बॉल, स्टम्प कुठे गेले हे कळालेलं नाही. लोक कहते हैं बदलता है जमाना सबको, मर्द वो है जो जमाने को बदल देता हैं, अशा या शरद पवारांना तसेच जमलेल्या सगळ्यांना पक्षाच्या वर्धापनदिनानिमित्त शुभेच्छा देतो. साहेब, तुम्ही या पक्षाला जन्म दिलात, पण त्याचबरोबर अनेकांचं आयुष्य घडवलं. त्याच्यातला मी एक आहे. नाहीतर मी इथपर्यंत पोहचूच शकलो नसतो. तुमचे लाख लाख आभार मानतो. रजा घेतो. जयहिंद! जय महाराष्ट्र!! जय भीम!!!

■■■



# पवार साहेबांच्या विचारांचं सरकार महाराष्ट्रात आणूया

**शशिकांत शिंदे**

आज पक्षाचा २५वा वर्धापनदिन. १९९९ साली शिवाजी पार्कवरून सुरू झालेला हा प्रवास आज नगरच्या असलेल्या या अहिल्यानगरमध्ये याठिकाणी संपन्न होतोय. २५ वर्षांच्या या प्रवासामध्ये या महाराष्ट्राने आणि या देशाने, या जनतेनं पवार साहेबांवर अतूट प्रेम केलं. अडचणीच्या आणि संकटाच्या काळामध्येसुद्धा माझ्या नेत्याच्या पाठीमागं आपण सर्वजण उभे राहिला, पाठिंबा दिला, त्याबद्दल आभार व्यक्त करतो. लंके साहेबांचं विशेषत: मी मुद्दाम आभार आणि अभिनंदन व्यक्त करतो. मघाशी मी आणि प्रकाशराव होतो. लंके साहेबांना प्रकाशरावांनी सांगितलं, की तुम्ही राजभवनामध्ये गेल्यानंतर तुम्हाला सोडतील का? त्यांना मी सांगितलं, की त्यांची एवढी प्रसिद्धी झालेली आहे, की देशाच्या पंतप्रधानांसुद्धा लंके कोण हे आता ओळखायला लागले आहेत. त्यामुळे सर्वसामान्य कार्यकर्त्याला निवडून देणं हा इतिहास तुम्ही घडवला.

जयंतभाई, सगळे सामान्य असलेले उमेदवार दिले गेले. साहेबांनीसुद्धा मला लढ म्हटलं. चव्हाण साहेबांच्या भूमीचा इतिहास करण्याची मला संधी दिली होती. थोडा कमी पडलो. तरी मला याचा अभिमान आहे. कारण, नेत्यासाठी लढलं पाहिजे. परिणामाचा विचार न करता, माझ्या नेत्यासाठी तो विचार जीवंत ठेवला पाहिजे, त्यासाठी लढणारा कार्यकर्ता शशिकांत शिंदे होता आणि म्हणून एवढंच सांगणार आहे, की मी आणि आमचे सहकारी चव्हाण साहेबांचा हा जिल्हा काही मतांनी पराभूत झालो, तरी तुतारी आणि पिपाणी यामधला फरक होता. मी पराभवाला कधी घाबरत नाही. मी एवढंच आज आलेल्या लोकांना सांगणार आहे, की ते म्हणत होते, पवार साहेब अतृप्त आत्मा आहे. या आत्म्याने बऱ्याच जणांचे आत्मे शांत केले आहेत.

आज लोकसभेच्या निवडणुकीचा निकाल लागल्यानंतर दहा जागांपैकी आठ जागा जिंकणारा एकमेव नेता हा होतो तो शरदचंद्रजी पवार साहेब होते. या नेत्याच्या माध्यमातून आता खरी परीक्षा जी आहे, ती या विधानसभेच्या निवडणुकीची आहे. साहेब, आपण असला, उद्धवजी ठाकरे असतील किंवा काँग्रेस असेल तिसऱ्या आणि चौथ्या फळीतल्या कार्यकर्त्यांनी आणि सर्वसामान्य जनतेनं ही निवडणूक हातामध्ये घेतली होती. निकाल ऐतिहासिक झाला आणि हा इतिहास जीवंत ठेवायचा असेल तर समोरच्या कार्यकर्त्यांना एकच विनंती करेल, की माझा नेता याठिकाणी लढतोय. आता आपली परीक्षा आहे. जसे छत्रपती शिवाजी महाराजांसाठी सात वीर दौडले होते. साहेब, आमच्यासारख्या कार्यकर्त्यांवर पण महाराष्ट्राची जबाबदारी द्या. तुमच्यासाठी आणि पक्षासाठी अहोरात्र झटू आणि हा इतिहास घडवण्याचा निश्चितपणे प्रयत्न करू. ही परीक्षा जेवढी आमची आहे, तेवढीच समोरच्या कार्यकर्त्यांची आणि सर्वसामान्य जनतेची आहे. हा महाराष्ट्र काय आहे, याची गांभीर्यानं दखल आता सर्वच पक्षांनी घेतलेली आहे. आता पक्षाला कळलं मराठा, आता पक्षाला कळलं मुस्लिम, ओबीसी, समाजातल्या जातीय ध्रुवीकरणामध्ये अखंड पुरोगामी महाराष्ट्राला फोडण्याचा प्रयत्न करणाऱ्यांना आता पक्षाची मते पाडण्याची वेळ येते आहे. आता आपण कष्ट करूया आणि या नेत्याला या वर्षामध्ये होणाऱ्या निवडणुकीमध्ये या महाराष्ट्रामध्ये शरदचंद्रजी पवार साहेबांच्या विचारांचं सरकार आणण्याचा इतिहास घडवूया. आम्ही लढायला तयार आहोत. तुम्ही पण तयार आहात हे सिद्ध करूया. जयहिंद! जय महाराष्ट्र!!



# पवार साहेबांच्या वाढदिवसाला ८५ आमदारांची द्यायचीय भेट

**रोहित पवार**

मी विविध क्षेत्रांमध्ये काम करतो. व्यवसाय असेल, समाजकारण असेल, राजकारण असेल. पण, जेव्हा केव्हा मला अडचण येते, जेव्हा सगळीकडे अंधार झाल्यासारखा वाटतो, तेव्हा तिथं पवार साहेबांचा चेहरा समोर येतो आणि त्या चेहऱ्याकडं बघितल्यानंतर, साहेबांचं नाव घेतल्यानंतर, साहेबांबद्दल विचार केल्यानंतर एक वेगळी प्रेरणा आणि ऊर्जा ही माझ्यासारख्या कार्यकर्त्याला मिळते. आणि मग संघर्ष करण्याची एक वेगळी ताकद ही जर कोणामुळं आम्हा सगळ्यांना मिळत असेल, तर फक्त पवार साहेब आहेत.

आज हा जो विजय महाराष्ट्रामध्ये महाविकास आघाडीचा झाला आणि खासकरून राष्ट्रवादीचे जे सर्व खासदार निवडून आले, त्याला फक्त कोण जबाबदार असेल तर आदरणीय पवार साहेब जबाबदार आहेत. सर्व निष्ठावंत पदाधिकारी जबाबदार आहेत. तसंच या महाराष्ट्रातले सर्व स्वाभिमानी नागरिक, खरं तर साहेबांना मला सांगावसं वाटतं, की या महाराष्ट्रामध्ये असणारा शेतकरी, त्याला अनेक अडचणी आहेत आणि प्रत्येक शेतकरी आदरणीय पवार साहेब तुमच्याकडं बघतो. युवांना अडचणी आहेत. युवा सर्व तुमच्याकडं बघतात. विद्यार्थी असतील, महिला असतील, या महाराष्ट्रातल्या सामान्य लोकांना जेव्हा केव्हा अडचण येते, तेव्हा ते तुमच्याकडे बघतात. पवार साहेब हे आपल्यासाठी संघर्ष करतायंत आणि मग पवार साहेबांबरोबर आपण भक्कमपणे राहिलं पाहिजे अशी भूमिका महाराष्ट्रातल्या जनतेनं आज तिथं घेतली, म्हणून हा विजय आपण सर्वजण बघू शकतो.

पवार साहेब एक व्यक्ती नाही. पवार साहेब एक विचार आहे. संघर्षाचा, लढण्याचा, स्वाभिमानाचा विचार आहे. आज आम्हा सर्वांना आनंद वाटतो, की आज अख्खा महाराष्ट्र पवार साहेबांमागे भक्कमपणे उभा राहिला. लोकसभेच्या निवडणुकीमध्ये दहापैकी आठ खासदार आपले निवडून आले. सर्व खासदारांचं मी मनापासून अभिनंदन करतो. तसंच दोन आपले उमेदवार हे मनापासून लढले. पण, दुर्दैवानं त्यांना यश मिळू शकलं नाही. पण, ज्या जिद्दीनं ते लढले, त्याबद्दल त्यांचंही अभिनंदन मी याठिकाणी करतो. आणि सर्व मतदारांनी, ज्यांनी महाविकास आघाडीच्या प्रत्येक उमेदवाराच्या पाठीमागे भक्कमपणे उभे राहिले, त्यांचेसुद्धा मी अभिनंदन करतो. तसंच महाविकास आघाडीचे सर्व घटक पक्ष, त्याचे सर्व नेते यांचंसुद्धा याठिकाणी आभार व्यक्त करतो. संघटनेच्या माध्यमातून जयंत पाटील साहेबांनीसुद्धा खूप मनापासून आणि खूप मोलाची अशी भूमिका त्याठिकाणी बजावली, त्यांचंही आभार याठिकाणी मी व्यक्त करतो.

आपल्या पक्षाचा स्ट्राईक रेट जर बघितला, तर दहापैकी आठ खासदार आपले निवडून आलेले आहेत. पण, जी नकली राष्ट्रवादी आहे, चोरलेली राष्ट्रवादी आहे, त्याचा स्ट्राईक रेट फक्त २५ टक्के आहे. भाजपाचा स्ट्राईक रेट हा ३४ टक्के आहे. त्यामुळे पलिकडे पैसा असला, सत्ता असली, दबावतंत्र असलं, तरीही लोकांनी त्या लोकांना नाकारलेलं आहे. कारण का तर आपण जेव्हा लढत होतो, तेव्हा सामान्य लोकांची भूमिका घेत सामान्य लोकांच्या अडचणींवर आपण बोलत होतो आणि भाजपा आणि त्यांचे मित्र पक्ष कशावर बोलत होते, तर फक्त द्वेषावर बोलत होते. समाजा-समाजामध्ये, जाती-जातीमध्ये वाद निर्माण करण्याचा ते प्रयत्न करत होते. पवार साहेब कांद्यावर बोलत होते, बेरोजगारीवर बोलत होते, महिला सुरक्षितेबद्दल बोलत होते, आणि मोदी साहेब इथं येऊन काय बोलत होते, तर हिंदू-मुस्लिम बोलत

होते, जाती-जातीमध्ये तेढ निर्माण करत होते. आज लोकांना काय पाहिजेल, तर हाताला काम आणि पोटाला अन्न पाहिजे. आणि त्या विषयावर तुम्ही आणि आपण सर्वजण लढलो. म्हणून हे यश आज त्याठिकाणी मिळालं आणि हे लोकसभेचं यश आपल्या मस्तकात गेलं नाही पाहिजेल. कारण का तर विधानसभा पुढे आहे. आपल्याला जमिनीवर राहून लोकांच्या हितासाठी त्याठिकाणी येत्या काळामध्ये लढायचंय हे आपण सर्वांनी समजून घेतलं पाहिजेल. पवार साहेबांवर अनेक मोठे नेते विरोधातले टीका करत होते. आपले नेते जे पलिकडे गेलेले आहेत, ते म्हणायचे, की पवार साहेबांनी विश्रांती घेतली पाहिजेल. पवार साहेबांनी त्यांच्यातल्या काही नेत्यांना या लोकसभेमध्येच विश्रांती दिली. आता येणाऱ्या विधानसभेमध्ये राहिलेले जे कुणी असतील त्यांनासुद्धा विश्रांती देतील अशी परिस्थिती आहे. लोकसभा फक्त ट्रेलर होतं आणि येणारी विधानसभा हे खऱ्या अर्थानं पिक्चर असणार आहे. ज्यामुळं भाजप या महाराष्ट्रातून मित्र पक्षासह हद्दपार झालेले आपल्या सगळ्यांना पाहायला मिळेल.

भाजपाचे एक नेते कुठल्यातरी मुलाखतीमध्ये बोलत होते, की शरद पवारांच्या राजकारणाचे पर्व संपले आहे. काल सेंट्रल हॉलमध्ये बसले होते. त्यांच्या चेहऱ्यावरचे हावभाव बघितल्यानंतर त्यांची आजची काय परिस्थिती आहे हे आज आपल्या सर्वांना तिथं कळतं आणि ती जर कुणी केली असेल, तर या पैलवानानी, वस्तादानी त्याठिकाणी या इलेक्शनमध्ये करून दाखवलेली आहे. मी फक्त एवढंच म्हणेल, येत्या काळामध्ये काही लोकं म्हणतील, नाहीतर मीसुद्धा कदाचित म्हणेल, की मी किंगमेकर आहे, मी सेनापती आहे. अहो, हे एक-दोन सेनापतीचं काम नव्हतं, महाराष्ट्रामध्ये असणाऱ्या तुमच्यासारख्या सामान्य त्याठिकाणी कार्यकर्ते जे आहेत, त्या कार्यकर्त्यांच्यामुळं हे यश मिळालेलं आहे, कुणा एका-दुसऱ्या नेत्यामुळे नाही. आणि पवार साहेबांनी जे कष्ट या वयामध्ये घेतले याच्यामुळे खऱ्या अर्थाने आपल्याला हे यश मिळालेलं आहे. त्याच्याचबरोबर मी आपल्या सर्वांना एवढंच म्हणेल, की येत्या काळामध्ये आपल्या सगळ्यांना एकत्रित राहायचंय आणि एकत्रित लढायचंय. त्याच्यामुळं आपलं जे फोकस आहे, ते बाजूला जाऊन देऊ नका अशी विनंती इथं मी आपल्या सर्वांना करतो. टीका करून फायदा नसतो. खऱ्या अर्थानं लोकांसाठी काम करायचं असतं आणि ते काम आपले सर्व नेते आणि आदरणीय पवार साहेब त्याठिकाणी करताना आपल्याला सगळ्यांना बघायला मिळतंय. मी विनंती करेन, की हे जे सामान्य कार्यकर्ते आहेत, हे निष्ठावंत पदाधिकारी या लोकसभेच्या निवडणुकीमध्ये त्यांनी फार मनापासून कष्ट घेतलेले आहेत. त्यांना धमकी दिली गेली, त्यांना अल्टिमेटम दिलं गेलं, त्यांना अडचणीत आणण्याचा प्रयत्न केला गेला, त्यांचे व्यवसाय अडचणीत आणले, कार्यकर्त्यांना पोलिसांच्या धमक्या दिल्या, तरीसुद्धा हे निष्ठेबरोबर राहिले, महाराष्ट्र धर्माबरोबर राहिले आणि पवार साहेबांबरोबर राहिले. त्यामुळे येत्या काळामध्ये असे अनेक लोकं येतील. म्हणतील मी अंधारात मदत केली. मी तुमचाच प्रचार करत होतो. फक्त पुढे येत नव्हतो. काही नेते आता पलिकडे गेलेले आहेत, त्या नेत्यांना परत इकडे यावे लागेल. फक्त सर्व नेत्यांना, सर्व पक्ष प्रमुखांना मी विनंती करेल, पहिला निष्ठावंतांचा विचार त्याठिकाणी केला गेला पाहिजेल, मग त्या लोकांचा विचार.

येत्या काळामध्ये आपलं जे कॅडर आहे, जे कार्यकर्ते आहेत, ते कसे मजबूत होईल याच्यासाठीसुद्धा विचार केला गेला पाहिजेल. आणि असे काही नेते असतात, ते दोन दगडावर पाय ठेवतात. त्या नेत्यांना म्हणायचं, की तिकडं तरी जावा नाहीतर हिकडं तरी या. पण दोन दगडांवर पाय ठेऊन चालणार नाही. या महाराष्ट्रात लोकांच्या आशीर्वादानं आणि कार्यकर्त्यांच्या कष्टानं ज्यावेळी आपलं सरकार येणार आहे, त्यावेळी जो मॅनिफेस्टो असेल, त्यामध्ये फक्त सर्वसामान्य व्यक्ती केंद्रबिंदू ठेवला पायजेल. सर्वसामान्यांच्या अडचणी त्या मॅनिफेस्टोमध्ये आल्या पाहिजेत आणि त्याला आपण काय करणार हे त्यामध्ये आणलं पाहिजेल. जेव्हा आपली सत्ता या राज्यात ज्यावेळी येणार, त्याचा केंद्रबिंदू फक्त सामान्य व्यक्ती राहिला पाहिजे, जे नेहमी नेहमी पवार साहेबांनी आपल्याला शिकवलेलं आहे. नीट, पेपरफुटी, बेरोजगारी, शेतकऱ्यांना विमा, खतांची, बियाण्यांची ब्लॅकमध्ये विक्री असे विषय आपण या इलेक्शमध्ये घेतले पाहिजेत आणि त्यावर आपल्याला काम करावं लागेल अशी विनंती मी आपल्या सगळ्यांना करतो.

पवार साहेब हे ब्रह्मास्त्र आहे. आपण सर्वजण तलवार, बंदूक घेऊन लढतो. ब्रह्मास्त्र हे मोठे शस्त्र आहे आणि ते सगळ्यात शेवट वापरलं गेलं पाहिजेल. आधी आपण सर्वांनी लढलं पाहिजेल आणि मग शेवट जर बॉम्ब टाकायचा असेल तर पवार साहेबांसारखं मोठं नेतृत्व त्याठिकाणी आपण पुढं केलं पहिजेल. पुढल्या डिसेंबरला पवार साहेबांचं वय ८५ होणार आहे. त्यामुळं इथं असणाऱ्या सर्व कार्यकर्त्यांची जबाबदारी आहे, इथं असणाऱ्या पदाधिकाऱ्यांची जबाबदारी आहे, की महाविकास आघाडीमध्ये लढत असताना ज्या काही सीट आपल्याला मिळतील, फक्त पक्ष म्हणून बोलायचं झालं तर पवार साहेबांच्या येणाऱ्या वाढदिवसाला कमीत कमी ८५ आमदार हे आपल्याला द्यायचेत हा निश्चय आपण सर्वांनी मनामध्ये ठेवावा. एवढंच सांगतो. थांबतो. जयहिंद! जय महाराष्ट्र!!



# विधानसभेला गद्दारांना जमिनीवर आणायचंय


**रोहिणी खडसे**

पक्षाच्या वर्धापनदिनानिमित्त सगळ्यात पहिलं तुम्हा सगळ्यांना मन:पूर्वक शुभेच्छा देते. या २५ वर्षाच्या काळामध्ये खूप चढ- उतार पक्षाचे, आपल्या सगळ्यांचे नेते आदरणीय पवार साहेबांच्या नेतृत्वात या पक्षाने बघितलेत आणि तुम्ही सगळे त्याचे साक्षीदार राहिलात. तुम्हा सगळ्यांना शुभेच्छा देते. त्याचबरोबर या लोकसभा निवडणुकीमध्ये विजय मिळविलेल्या आपल्या सगळ्या नवनिर्वाचित खासदारांचे अभिनंदन करते. कारण, एकेक जागा तुमच्या सगळ्यांच्या मेहनतीने निवडून आल्या. त्यामुळं तुमचंही अभिनंदन करते.

२५ वर्षांचा काळ हा फार मोठा काळ आहे आणि या काळामध्ये प्रत्येक चढ-उतार तुम्ही जवळून अनुभवले आहेत. पण, यावेळेसची निवडणूक काहीतरी वेगळी होती. असं म्हणतात ना, की जिंकण्याची मजाही तेव्हाच येते, जेव्हा प्रत्येकजण आपल्या हरण्याची वाट बघत असतो आणि यावेळेस आपण जी जीत मिळविली आहे ती खरंच खूप महत्त्वाची होती. तुमच्या प्रत्येकाच्या मेहनतीमुळे आपल्या पक्षाचे आठ खासदार निवडून आले आहेत. प्रत्येकाचं लक्ष ज्या मतदारसंघावर होतं, त्या बारामतीमध्येसुद्धा आदरणीय सुप्रियाताई सुळे पण मोठ्या मताधिक्याने निवडून आल्यात. जेव्हा आम्ही महाराष्ट्रात फिरत होतो, तेव्हा प्रत्येक व्यक्तीला ताईंचं काय होतंय असं वाटायचं. प्रत्येकाला चिंता होती ती ताईंची आणि खरंच ताई मोठ्या मताधिक्यानं निवडून आल्यात. कारण, त्यांनी केलेलं काम, त्यांच्या मतदारसंघात त्यांचा असलेला संपर्क यामुळे त्या निवडून आल्या आहेत. प्रत्येकाला आनंद वाटेल अशा म्हणजे एक लाख ५८ हजार मतांनी ताई निवडून आल्यात.

ताईंसाठी मला इथे दोन वाक्यं बोलायची आहेत, की ताईंनी या संघर्षामध्ये किंवा या निवडणुकीच्या काळामध्ये खूप लोकांनी त्यांच्यावरती खालच्या स्तरावर जाऊन टीका केली. पण, ताईंनी संयम बाळगला आणि त्या संयमाला मी खरंच सलाम करेन, त्यांनी कुठेही त्यांचा संयम ढळू दिला नाही. कितीही टीका झाली तरी ताई ठाम राहिल्या आणि त्यांचा निरंतर संपर्क त्यांच्या मतदारसंघातील लोकांपर्यंत राहिला. त्या शांतपणे लोकांमध्ये जात राहिल्या. त्यांच्यासाठी मी दोन शब्द मला बोलायचेत, की **सब सितमवाले बहोत कमजोर समझे थे जिसे, उसने इस गुलशन में हंगामा मचाकर रख दिया, सारे तूफाँ चूप रहें, सारी आंधीयाँ बैठी रही और एक तितली ने दरखतों को हिलाकर रख दिया.** आम्हाला अभिमान आहे, की त्या सुप्रियाताईंच्या नेतृत्वात आम्ही काम करतोय. पवार साहेबांच्या नेतृत्वात आम्ही काम करतोय. या पक्षामध्ये ज्या विचारधारेला घेऊन आम्ही काम करतोय. पक्षाच्या सगळ्या नेते गणांच्या मार्गदर्शनाखाली काम करण्याची संधी आमच्यासारख्या सगळ्या नेत्यांना, कार्यकर्त्यांना मिळतेय. खरंच नशिबवान आहोत. आदरणीय पवार साहेबांना आम्ही या गेल्या प्रचाराच्या काळात फार जवळून बघितलं. जयंत पाटील साहेबांनी जवळ जवळ १०६ सभा संपूर्ण महाराष्ट्रात घेतल्यात. सोपं नव्हतं. आम्ही पवार साहेबांना जेव्हा जवळून बघितलं, तेव्हा साहेबांना एकेका दिवशी पाच पाच सभा घेतल्यात. त्यांच्या तब्येतीवरती जी लोकं टीका करतात ना, मला असं वाटतं, की त्यांच्यापेक्षा जास्त सभा घेऊन साहेबांनी त्यांना हे दाखवून दिलंय, की वय नाही, तर हिंमत लागते आणि हिंमत आणि तुमच्यामध्ये जिद्द लागते. त्या भरोशावरती आज आपण हा विजय मिळवलांय. आजच्या दिवशी मी परत एकदा तुम्हा सगळ्यांना शुभेच्छा देते. सगळ्यांचे मनापासून अभिनंदन करते. हा उत्साह अजून आपल्याला तीन महिने विधानसभेच्या निवडणुकीपर्यंत टिकवून ठेवायचा आहे. हाच उत्साह घेऊन जे गद्दार आपल्याला सोडून गेलेत, त्यांना परत आपल्याला जमिनीवर आणायचंय. आमच्या माता-भगिनींनी तर खूप कष्ट घेतलेत. खरं तर ही निवडणूक बदलण्याचे काम त्यांनी केलंय. त्यामुळं मला त्यांचा अभिमान वाटतो आणि त्यांचे अभिनंदनही करते आणि थांबते. जय हिंद! जय महाराष्ट्र!!

■■■





# एका नागरिकाच्या नजरेतून

**लोकसभेच्या या निवडणुकांनी अतिशय संयत आणि संयमी निकाल दिला आहे. भारतीय मतदार गरीब असेल, कमी शिकलेला असेल पण सामुदायिक शहाणपण आणि शहाणीव त्याच्यात ठासून भरली आहे. हेच या निकालांनी सिद्ध केले. येणाऱ्या सत्ताधाऱ्यांच्या बेलगाम वागण्यावर या निकालाने अंकुश लावला आहे, तर विरोधकांना शांततेचा, संयमाचा, अधिक अभ्यासाचा संदेश दिला आहे. सार्वभौम जनतेचा हा कौल समजून घेऊन दोन्ही बाजूंनी आपले वर्तन ठेवणे अपेक्षित आहे. त्यातच देशाचेही भले आहे.**

# लोकसभा निवडणुकीचा अन्वयार्थ

डॉ.किशोर फुले



आपल्या विशालकाय भारत देशातील निवडणुकीचे पर्व संपले. लोकशाहीचा उत्सव पार पडला. लोकशाहीत जनता सार्वभौम असते. तिच्या मनात आणि बोटात काय दडले आहे हे सांगणे कठीण असते. निवडणुकांचे नुकतेच धक्कादायक निकाल लागले. सामान्य जनतेने सिंहासनाला हादरा दिला. मी कुठल्याही पक्षाचा गंडाधारी नाही. या पार्श्वभूमीवर एक तटस्थ नागरिक म्हणून लोकसभेच्या या निवडणुकीचा आणि सरकारच्या कार्यपद्धतीचा परखडपणे हा अन्वयार्थ मांडला आहे. आपण विचार करावा.

खरे म्हणजे निवडणुकांचे पर्व हे वैचारिक मंथनाचे लोकशाहीत सर्वात मोठे व्यासपीठ असते. या व्यासपीठाचे वैशिष्ट्य म्हणजे समाजातील लहान- थोर, शिक्षित -अशिक्षित, गरीब -श्रीमंत, सर्व जात-पात, धर्म-पंथ यांना सामावून घेणारे, त्यांचे लोकशाहीच्या अंगाने साधक- बाधक उद्बोधन करणारे हे व्यासपीठ असते. आभाळाच्या छताखाली विस्तीर्ण मैदानावर होणाऱ्या राजकीय सभा म्हणजे तर अनौपचारिक शिक्षणाची एक अमर्याद वर्गखोलीच असते. प्रत्येक पक्ष, प्रत्येक नेता लोकशिक्षक होऊन जातो आणि नागरिक बनतात विद्यार्थी. विशेषतः आणीबाणीनंतर ज्या निवडणुका झाल्या त्या निवडणुकीतील जनसभा म्हणजे, तर लोकशाही मूल्यांच्या रक्षणासाठी लढलेल्या लढवय्या लोकशिक्षकांच्या जीत्याजागत्या कहाण्या होत्या. वैचारिक मंथनाने सारा देश ढवळून निघाला होता.

या उद्बोधनातून मतदानाच्या दिवशी मतदारांच्या सारासार विवेकाची परीक्षा होते. मतदारांचा हा विवेक देशाचे भवितव्य घडवतो. मतदारांची पोत जशी तसे सरकार अस्तित्वात येते. त्यामुळेच- People get the government what they deserve. हे अवतरण प्रसिद्ध आहे. लोकांना लोकांच्या लायकीप्रमाणे सरकार मिळते. या पार्श्वभूमीवर विचार करता या निवडणुकीने आणि त्यासाठी झालेल्या प्रचारसभांनी कोणते लोकशिक्षण केले? समाज जागृती म्हणून काय योगदान दिले? याचे उत्तर नकारार्थी स्वरूपाचे मिळते.

या निवडणुकीच्या प्रचार सभांनी कमालीचा राग, द्वेष, मत्सर, टिंगलटवाळी आणि राजकीय शत्रुत्वाचे हीणकस प्रदर्शन केले. आपल्या दुष्कृत्यांचेही किळसवाणे उदारीकरण केले. साधारणतः चित्र असे असते की, विरोधी पक्ष हा अधिक आक्रमक आणि प्रसंगी उथळ प्रचाराचा आधार घेताना दिसतो. सत्ताधारी पक्ष हा बचावात्मक व विकासात्मक मुद्द्यांचा पाठपुरावा करतो. पण या निवडणुकीत विरोधकांचा सूरच सत्ताधारी पक्षाने बेसूर होईपर्यंत लावला. विकासाच्या कामांपेक्षा, दहा वर्षातील उपलब्धी मांडण्यापेक्षा विरोधकांना नामोहरम करायलाच आपला दिग्विजयी रथ कसा निघाला आहे, काँग्रेसमुक्त भारत कसा होईल, राहुल गांधी (शहजादा) संसदेतही कसा दिसणार नाही, असली पक्ष कोणता, नकली पक्ष कोणता या अतिशय उठवळ आणि नकारात्मक मुद्द्यांवर सत्ताधारी पक्षाच्या प्रचाराचे सूत्र होते. सर्वात दुर्दैवाची बाब म्हणजे देशाचे पंतप्रधान या मोहिमेचे नेतृत्व करीत होते. गल्लीबोळातल्या नेत्यांची कहाणी काय सांगावी?

प्रचारातील सर्वात गंभीर बाब म्हणजे देशाच्या पंतप्रधानांनी केलेला द्वेषमूलक प्रचार होय. 'जास्त मुलं असतात त्यांना, जे बाहेरून आले आहेत त्यांना, हिंदू महिलांचे मंगळसूत्र कोण हिसकावून घेणार, कोणाला देणार ,कोण मुजरा करेल, राम मंदिरावर बुलडोझर कसा चालविला जाईल' इत्यादी. पंतप्रधानपद हे संवैधानिक (Statutory )पद आहे. संवैधानिक पदावर निवडून गेलेली आणि संवैधानिक शपथ ग्रहण केलेली व्यक्ती व्यक्तिगत जीवनात कितीही टिळाधारी असली, तरी सार्वजनिक जीवनात पालकत्वाच्या भूमिकेत असली पाहिजे. कोणाविषयी विशेष ममत्व किंवा कोणाविषयी राग, द्वेष ठेवणार नाही अशी सर्वसाक्ष शपथ घेऊन, त्या जाणिवांसह ती आसनावर विराजमान झाली असते, असायला हवी. पण संवैधानिक पदावर बसलेले पंतप्रधान, गृहमंत्री, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री या शपथा गुंडाळून बेलगामपणे निवडणुकीच्या प्रचारात धार्मिक नारे देत होते. विरोधी पक्षांचा वाचाळपणाही याला अपवाद नव्हता.

एकमेकांचे वाभाडे त्यांच्या व्यक्तिगत जीवनासह इतके काढले गेले की लोकांना त्याची लाज वाटायला लागली. दोन्ही बाजूने केलेल्या प्रचाराने पक्षांचे, राजकीय नेत्यांचे इतके अवमूल्यन केले की निवडणुकीनंतर सत्ता पदावर बसलेली कोणतीही व्यक्ती किंवा पक्ष हा भ्रष्ट, बदमाश, खोटारडा, नौटंकी, देशद्रोही, समाजात फूट पाडणारा, कुणाचे लागूंलचालन करणारा तर कुणाचा कमालीचा द्वेष करणारा, बदफैली, नकली याच अवगुणांनी युक्त असेल; तो आदरणीय राज्य प्रमुख किंवा राष्ट्रप्रमुख नसेलच अशी धारणा समाजाची आणि विशेषतः तरुण पिढीची करण्याचे पातक निवडणुकांच्या रणधुमाळीत घडले. लोकशिक्षण तर कोसो दूर लोकांना किळस यावी असे चित्र निर्माण झाले.

लोकशिक्षणाचा,वैचारिक मंथनाचा हा विचार अनेकांना भाबडा आणि अतिआदर्शवादी वाटेलही. पण लोकशाहीत काय अपेक्षित असते? सार्वत्रिक पातळीवर मूल्य स्थापना कशी होईल ?लोकशाही मूल्य कसे वृद्धिंगत होईल ? समाजाच्या धारणा व्यापकस्तरावर कशा निर्माण होतील ? 'हे राजकारण आहे. इथे असेच चालते' ही घाऊक आकाशवाणी राष्ट्रनिर्माणला बाधा पोहोचविते. नागरिकाला केवळ 'मतदार' मानून पाचा वर्षाच्या बोलीनं त्याच्या इच्छा -आकांक्षांचा, नवीन पिढीच्या स्वप्नांचा



आणि लोकशाही मूल्यांचा जाहीर लिलाव करते.

वास्तविक पाहता स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानंतरसुद्धा भारतात 'नागरिकत्व' (Citizenship) रूजविण्यात राजकीय व्यवस्था अपयशी ठरली. आजही निवडणुका मराठा, ब्राह्मण, तेली, माळी, साळी, ओबीसी, एससी, एसटी, हिंदू, मुस्लिम या लेबलांवर लढविल्या जातात. उमेदवाराची गुणवत्ता पाहण्यापेक्षा त्याची जात, धर्म पाहण्यात आपल्याला अधिक स्वारस्य असते; हे दुर्दैव आहे. सर्वच राजकीय पक्ष याला जबाबदार आहेत. प्रसार माध्यमांची विश्लेषणही यावरच आधारित असतात हे आणखी दुर्दैव. समाज रसातळाला एकदम जात नाही. राष्ट्रपुरुषाने, समाजपुरुषाने केलेल्या दूरवर्तनाच्या, भ्रष्ट आचरणाच्या एकेका थेंबाने त्याच्या नाका- तोंडात दूषित पाणी जाऊन तो रसातळाला जातो.

मूल्य आपोआप निर्माण होत नाहीत. ती आकाशातून टपकत नाहीत की बाभळीच्या झाडाला लटपटून येत नाहीत. राष्ट्रपुरुषांच्या, समाज पुरुषांच्या असीम त्यागातून ती प्रतिबिंबित होतात. जुलमी राजेशाहीत जे पोळून निघाले त्यांना लोकशाहीचे मूल्य कळले.

जुलमी राजसत्तेच्या विरुद्ध आवाज उठविणाऱ्या सॉक्रेटीसला तुरुंगात टाकल्या गेले. राज सत्तेच्या विरुद्ध आवाज उठविण्याचा राजद्रोह त्याने केला होता. त्याला मृत्यूदंडाची शिक्षा झाली. मृत्यूदंडाच्या आदल्या रात्री त्याचे सहकारी तुरुंग अधिकाऱ्यांना लाच देऊन त्याला पळवून न्यायला आले. तो गाढ झोपला होता. मृत्यूच्या दारात असलेला सॉक्रेटीस गाढ झोपलेला पाहून त्याच्या मित्रांनाही आश्चर्य वाटले. त्यांनी त्याला उठविले. पळून जाण्याची सर्व व्यवस्था झाली आहे असे सांगितले. सॉक्रेटिसने पळून जायला साफ नकार दिला. तो म्हणाला, मरणाच्या भयाने मी पळून गेलो तर लोक मला पळपुटा सॉक्रेटीस म्हणून हीणवतील. मी लोकशाही मूल्यांसाठी आवाज उठविला, मृत्युदंड स्वीकारला. उद्या विषाचा पेला मी हसत- हसत जवळ करीन. माझा मृत्यू अटळ आहे पण सॉक्रेटीसने लोकशाही मूल्यांसाठी मृत्यू स्वीकारला होता या विचारातून येणाऱ्या पिढ्या प्रेरणा घेतील. लोकशाही मूल्यांसाठी लढतील. सॉक्रेटीस अजरामर झाला.




पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांनी राम मंदिराच्या प्रतिष्ठापणनेपूर्वी दक्षिणेतून शूचिर्भूत होऊन प्रभू श्रीरामचंद्राची, रामललाची प्रतिष्ठापना केली .त्यातला प्रत्येक प्रसंग, प्रत्येक दिवस आपण माध्यमांवर पाहिला, वर्तमानपत्रात वाचला. प्रभू रामचंद्र हे संपूर्ण भारतवर्षाचे श्रद्धास्थान आहेत. ज्यावेळी भारतात कोणतीच हिंदुत्ववादी संघटना नव्हती, रामाचं ब्रँण्डिंग करणारे राजकीय पक्षही नव्हते, त्याच्या पूजेचा, अर्धवट राहिलेल्या मंदिर वास्तूचा इव्हेंट नव्हता, शंकराचार्यांच्या मताचाही दुस्वास करणारे, त्यांना हिणवणारे टिळाधारी उन्मादी कार्यकर्तेही नव्हते; त्यावेळी शेकडो वर्षांपूर्वी गावागावात हनुमंताची, आणि रामरायाची मंदिरं संपूर्ण गावांनी लोकवर्गणी करून बांधली आहेत. अनेक गावातील मंदिरं तर बहुजन समाजातील त्यावेळच्या गर्भश्रीमंत लोकांनी स्वतःच्या पैशाने बांधली. शेकडो वर्षांपासून आपल्या गावात ते रामरायाची, हनुमंताची अखंड उपासना करीत आहेत. रामजन्मोत्सव मोठ्या प्रमाणात साजरा केला जात आहे. अनेक ठिकाणी मुस्लिम समुदायाचे लोकही या उत्सवात सहभागी होताना दिसतात.

या साध्या माणसांच्या हृदयात राम वसला होता, आहे आणि वसलेला राहील. अयोध्येतला राम मुक्त व्हावा त्याचेही मंदिर व्हावे ही धर्मभावना खेड्यापाड्यातील साध्या भोळ्या माणसांची अनेक वर्षापासूनची होती. त्यात काँग्रेसला मानणाऱ्या अनेक पुढाऱ्यांचाही समावेश होता. फरक फक्त एवढाच होता की त्यांनी हृदयातला राम मतपत्रिकेवर आणला नाही.

प्रभू रामचंद्र हे भारताचे श्रद्धास्थान आहे. ते चमत्कारी पुरुष म्हणून नव्हे. मुलाबाळांसाठी काही कोणी त्यांना मरीमायप्रमाणे नवस घालित नाही. हा राजाराम लोकांच्या हृदयसिंहासनावर हजारो वर्षांपासून विराजमान आहे की तो त्याच्या मर्यादा पुरुषोत्तम प्रतिमेमुळे. त्याने आपल्या व्यक्तिगत आणि सार्वजनिक जीवनात निर्माण केलेल्या मूल्य संस्कारामुळे. राजपद स्वीकारण्याची सर्व क्षमता आणि लोकभावना सोबत असतांनासुद्धा केवळ आपल्या वडिलांच्या वचनपूर्तीसाठी वनवास स्वीकारून असीम त्याग करणाऱ्या राजपुत्राचे प्रतीक आहेत श्रीराम आणि त्याची जाज्वल्य कहाणी आहे रामायण.

त्यातून भारतवर्षावर अखंड मूल्य संस्कार झाला. केवळ नरच नव्हे, तर वानरंसुद्धा त्या आदर्श राजाने जवळ केली. त्या रामाचा व्यापक, सर्वसमावेशक, लोककल्याणकारी संस्कार मात्र राज्यकर्ते सोयीस्करपणे विसरले. रयतेचं राज्य निर्माण करणारे छत्रपती शिवाजी महाराज हे आदर्श राजा ठरले ते त्यांच्या मूल्यनिष्ठेमुळे. केवळ राज्याभिषेक झाला, सत्ता प्राप्त केली म्हणून आपण त्यांना महाराज मानून हृदयसिंहासनावर स्थान दिले नाही. रयतेचे सदैव भान ठेवणारा आणि शत्रूचीही कबर बांधणारा व्यापक विचारांचा आदर्श राजा म्हणून ते प्रातःस्मरणीय ठरले.

आकाशाला भिडलेली महागाई,

विक्राळरूप धारण करणारी बेरोजगारी, आत्महत्या करणारे शेतकरी, धनदांडग्या उद्योगपतींनी चालविलेलं पर्यावरणाचं, समाजाचं, सरकारी उद्योगांचं शोषण रयतेच्या या मूलभूत प्रश्नांचा विचार शिवाजी राजाचे नाव घेणाऱ्या या शासन व्यवस्थेने का केला नाही? देशातील व्देषमूलक वातावरण पाहून तर अटलजी पुन्हा गरजले असते ‘ राजधर्मका पालन करो!’ अराजकाची भाषा करणा-या ओवेसींच्या मुस्क्या आवळल्याच पाहिजेत, देशद्रोह करणाऱ्यांना कडक शासन झालेच पाहिजे, निवडणूक मिरवणूकीत बिभत्स चाळे करणाऱ्या समाजकंटकांना फोडूनच काढलेच पाहिजे पण संपूर्ण समुदायाला आरोपिच्या पिंज-यात उभं करणं, बहिष्कृत करणं देशहिताचं नाही.

रामायण, महाभारत, भगवद्गीता हे भारतीय समाजजीवनाचे दिशादर्शक महाग्रंथ आहेत. याचा अर्थ कुराण, बायबल, धम्मपद, गुरुग्रंथ साहिब हेही पूज्य ग्रंथ आहेतच. त्याज्य ग्रंथ नाहीत. त्याकाळात समाज जीवनाला दिशा देण्यासाठी हे महान ग्रंथ म्हणजे एक आचारसंहिताच होती.

स्वातंत्र्य आंदोलनाची पार्श्वभूमी, या देशाची भौगोलिक, ऐतिहासिक, धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक ठेवण विचारात घेऊन घटनाकारांनी ‘भारतीय राज्यघटना’ (Indian Constitution) निर्माण केली .’आम्ही भारताचे नागरिक’ हा ‘आम्ही’ चा आणि नागरिकत्वाचा स्वर प्रबळ केला. ‘मी’ चा नाही. कोट्यावधी भारतीयांच्या आशा- आकांक्षांचे प्रतिध्वनी या भारतीय राज्यघटनेतून प्रतिबिंबित झाले आहेत. भारतीय समाज व्यवस्थेच्या, वर्णवर्चस्वाच्या वणव्यात पोळून निघालेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलित, पीडित, वंचित माणसाला या राज्यघटनेतून आत्मस्वर दिला आणि आत्मबळही दिले. मुख्य म्हणजे लोकशाही मूल्य दिले.

आपल्या व्यक्तिगत जीवनात घराच्या उंबरठ्या आड आपल्या उपासनेचा मार्ग कोणताही असला तरी, कोणत्याही धर्मग्रंथावर आपण फुले अर्पण करीत असलो तरी सार्वजनिक जीवनात, राष्ट्र जीवनात आपला धर्मग्रंथ, आचार ग्रंथ आता भारतीय राज्यघटना हाच झाला आहे. राजपदावर बसलेल्या राष्ट्र प्रमुखाचा, त्या व्यवस्थेत सरकार म्हणून शपथ घेतलेल्या कोणत्याही व्यक्तीचा व्यक्तिगत उपासना ग्रंथ कोणताही असला तरी त्याला सार्वजनिक जीवनात, राष्ट्र जीवनात संविधानालाच आपला उपासना आणि आचार ग्रंथ करणे अपेक्षित आहे. जातीयतेच्या आणि धार्मिकतेच्या आधारे राजकारणाचे प्रदूषण केले जाऊ नये म्हणून संविधानाच्या अनुच्छेद २६ मधे हे स्पष्ट करण्यात आले आहे.

संविधानातील मूलभूत विचाराला, चौकटीला अपेक्षित स्वर होता ‘आम्ही’ चा. सत्तेच्या अहंगंडाने पछाडलेल्या मोदी-शहांनी स्वर उंचावला ‘मी’ चा. संविधानात लोकशाही मूल्यांना अनन्यसाधारण महत्व दिले गेले आहे. लोकभावना आणि लोक मताचा आदर सर्वोच्च मानला आहे. लोकशाहीच्या संतुलनासाठी काही स्वायत्त, घटनादत्त संस्थांचे निर्माण घटनाकारांनी विशद केले आहे. केवळ विचार विशद केले नाही, तर या घटनादत्त स्वायत्त संस्थांचे पावित्र्य आणि स्वायत्तता याचे अनन्य साधारण महत्व अधोरेखित केले आहे. विरोधी लोकनिर्वाचित सरकारलाही कसे




संरक्षित केले पाहिजे याचेही महत्त्व सांगितले आहे. प्रबळ विरोधी पक्ष हा लोकशाहीचा आधार मानला आहे. विरोधक म्हणजे शत्रू नव्हे हा विचारही मांडला गेला आहे. ‘आम्हीचा’ सर्वसमावेशक नागरिकत्वाचा स्वर घटनेचा आत्मा आहे .

संविधानातील वरील अपेक्षांचा विचार करता सर्वोच्च न्यायालय, न्यायप्रणाली, न्यायाधीश निवड पद्धती, निवडणूक आयोग, रिझर्व बँक ऑफ इंडिया, बँकिंग व इन्शुरन्स सेक्टर यासारख्या संस्थांच्या स्वायत्ततेला नख लावण्याचे काम या सरकारने केले. लोकशाही मूल्यांचे अनन्य साधारण महत्व विशद करणारे व्हॉल्टेअर या तत्त्ववेत्याचे एक अवतरण प्रसिद्ध आहे. आपल्या जुन्या संसदेच्या एका प्रवेशद्वारावर ते कोरले आहे. (नवीन संसद भवनाचे माहित नाही) व्हॉल्टेअर म्हणतो-

I may not agree with a word what you say but I will defend until my death your right to say so.

‘मी तुझ्या मताशी एका अक्षरानेही सहमत नाही पण तुला तसे सांगण्याचा अधिकार आहे; हे मी माझ्या कंठात प्राण असेपर्यंत सांगत राहीन.’ हे अवतरण म्हणजे लोकशाहीचा आत्मा आहे.

लोकशाहीत विरोधी पक्ष, विरोधक असणारच. सरकारच्या ध्येय- धोरणावर ते अभिव्यक्त होणारच. प्रसार माध्यमे सरकारच्या चुकांना अधोरेखित करणारच. लोकांचे विश्वस्त(Trustee )म्हणून सरकार कार्य करते .हे विश्वस्त चुकले तर लोकांचे प्रतिनिधी किंवा लोकभावना व्यक्त करणारी प्रसारमाध्यमे सरकारवर टीकेचा आसूड होणारच. त्यांनी सरकारचे भाट होणे अपेक्षित नाही. काँग्रेसच्या काळात भाजपसह सर्वच विरोधी पक्षांनी अत्यंत विखारी टीका सरकारवर आणि सरकारच्या प्रमुखांवर, पंतप्रधानांवर केलेली आहे.

खुल्या आर्थिक धोरणाच्या चर्चेत तत्कालीन अर्थमंत्री मा. डॉ. मनमोहनसिंगजी यांना वर्ल्ड बँकेचा, अमेरिकेचा, सीआयएचा एजंट म्हणून संबोधल्या गेले. ते देशद्रोह करीत आहेत असा सूर आळवला गेला पण प्रगल्भ डॉ. मनमोहनसिंग शांत राहिले. ‘येणारा काळच याचे उत्तर देईन’ असे ते म्हणाले. राजपदावर बसलेल्या




व्यक्तीच्या अंगात ती सहनशीलता व प्रगल्भता लागते. काँग्रेसच्या काळात अनेक जुन्या, जाणत्या संघ, भाजपाच्या लोकांचा आदर करणारे आणि त्यांची प्राधान्याने कामे करणारे काँग्रेसजन मी पाहिले आहेत. एखाद्या पत्रकाराने विरोधी बातमी छापली तरी त्याच्याशी जुळवून घेऊन त्याला आपली बाजू सांगण्याचा उदारपणाही त्यांनी दाखवल्याचे मला ज्ञात आहे. विरोध केला म्हणून कमालीचे शत्रुत्व त्यांनी बाळगले नाही. श्री. नितीन गडकरींच्या कार्यशैलीत ही उदारता दिसून येते.

मोदी- शहांनी तर अफजलखानाप्रमाणे विरोधकांना संपविण्याचा विडाच उचलला होता. आपल्याविरुद्ध सरकार आले की पाडापाडीचे, फोडाफोडीचे षडयंत्र रचण्यात जोडी गुंतून जायची. मग ईडी लाव, सीबीआय लाव, खोके पाठव, ओके कर! हे सूत्र सुरू व्हायचे. मुख्य म्हणजे त्याचे निर्लज्ज समर्थन करायचे. प्रसार माध्यमात थोडाही विरोधी सूर उमटला तर त्या पत्रकाराची, संपादकाची उचलबांगडी तरी व्हायची नाहीतर अदानी- अंबानी या दोस्तांना सांगून चॅनलच विकत घेतले जायचे.मग साऱ्या अँगलने केदारनाथ, कन्याकुमारीच्या ध्यानधारणेची चित्रणं करायला ते सर्व मोकळे.

आकाशाला टेकलेल्या महागाईची जीवघेणी समस्या, बेरोजगारीचा भीषण प्रश्न, शेतकऱ्यांना हमीभाव किंवा न्याय देण्याचा प्रश्न, महिला कुस्तीगिरांच्या शोषणाचा प्रश्न किंवा देशातील जातीय विद्वेषाचा प्रश्न कोणत्या माध्यमाने प्रभावीपणे मांडला, विरोधी पक्षांनी उचलला तर तो देशद्रोही तरी व्हायचा किंवा त्याची फिल्डिंग तरी लावली जायची. कसले अभिव्यक्ती स्वातंत्र्य? कुठला चौथा स्तंभ? सारे कसे सामसूम.

घटनेच्या उद्देशपत्रिकेत 'आम्ही भारताचे नागरिक' हा आम्हीचा स्वर घटनाकारांनी सर्व जाती, धर्म, पंथ मानणाऱ्या भारतीय नागरिकाचा सामूहिक स्वर उजागर केला आहे. लोकनिर्वाचित सरकार हे पालकत्वाच्या भूमिकेत असते. कुटुंब प्रमुख जसा आपल्या मुलाबाळात भेद करीत नाही तसा राष्ट्र प्रमुखांनीही तो करणे अपेक्षित नाही. पण राष्ट्र प्रमुखाची सारी दारोमदार द्वेषमूलक राजकारणावर. हिंदू समूहाचे आपणच कसे तारणार आहोत या विचारावर.


अन्य धर्मीय विशेषतः मुस्लिम व इतर धर्मीय हे भारताचे जणू नागरिकच नाहीत अशी सर्व मोहीम. त्यासाठी नेहरू- गांधींचे प्रचंड प्रतिमाहनन. काँग्रेसला कस्पटासमान समजून खिल्ली उडविण्याचे जणू अभियानच. सावरकरांचे प्रतिमाहनन हे जसे निषेधार्ह तसे नेहरू- गांधींचेही .कारण कोणत्याही महापुरूषाचे प्रतिमाहनन हे व्यक्तिगत नसते; ते देशाचे असते . राम गणेश गडकऱ्यांनी म्हटल्याप्रमाणे 'महापुरुष हे नभांगणातील ताऱ्यांसारखे असतात' प्रत्येकाची चमक वेगळी, प्रत्येकाचे तेज वेगळे.

देशाच्या स्वातंत्र्यसंग्रामात घराघरातून आहुती देणारा काँग्रेस पक्ष आहे. सुभाष- सावरकर- भगतसिंग या क्रांतिकारी नेत्यांसह असीम त्याग काँग्रेसच्या लोकांनी केला. गांधीं- नेहरू- पटेलांच्या नेतृत्वात काँग्रेसजन रक्तबंबाळ झाले, छातीवर गोळ्या झेलल्या. ना पळाले, ना हिंसा केली.नेत्याने सांगितलेल्या सत्य -अहिंसेच्या तत्त्वासाठी प्राण दिले. मुख्य म्हणजे स्वातंत्र्य आंदोलनात सहभागी नसलेल्या, ब्रिटिशांची चाकरी करणाऱ्यांना 'देशद्रोही' म्हणून हीणवलेही नाही.


सोन्याचा चमचा तोंडात घेऊन जन्माला आलेला जवाहरलाल गांधींच्या नेतृत्वात जाडीभरडी खादी घालून तुरुंगात गेला. लाठ्या खाल्ल्या. प्रचंड विद्वत्ता असलेला हा नेता होता. स्वातंत्र्योत्तर काळात त्याच्या नेतृत्वात पारतंत्र्यातून बाहेर आलेला देश उभा राहिला. औद्योगिक क्रांती झाली, हरितक्रांती झाली, श्वेतक्रांती झाली, नीलक्रांती झाली. लाखो लोकांना रोजगार दिला. इंडियन सायन्स काँग्रेसला महत्त्व दिले. इस्त्रोची निर्मिती करून होमी भाभा, विक्रम साराभाई अशा वैज्ञानिकांचा सन्मान केला. देशाला आधुनिक ,वैज्ञानिक दृष्टी दिली . देशात विद्यापीठ अनुदान आयोग, आयआयटी, मेडिकल कौन्सिल, बार कौन्सिल, विविध विद्यापीठे अशा संस्थांच्या स्थापनेत पुढाकार घेतला. देश उभारला.

'देश उभारणीसाठी आळस झटकून सर्वांनी कामाला लागले पाहिजे' या आशयाचे परखडपणे आवाहन देशवासीयांना लाल किल्ल्यावरून केले. लोकांना 'आळसी' नाही म्हटले. त्या नेहरूंची बिभत्स, एडिटेड चित्रे पसरवून भाजपच्या पिलावळीने नेहरूंचा नाही देशाचा अपमान केला. नेहरूंचे काही चुकले नसेल काय? चुकलेही. नेहरूंना प्रत्यक्ष संसदेत धारेवर धरणारे डॉ.राममनोहर लोहिया, बॅरिस्टर नाथ पै व अनेक दिग्गज संसदपटू होते. त्यात तरुण अटलजींचाही समावेश होता. नेहरूंच्या ध्येय -धोरणाविरुद्ध प्रचंड लिखाणही प्रसिद्ध आहे. त्यात आपल्या विदर्भातील नागपूरचे, जून्या पिढीतील विद्वान लेखक डॉ.नि. र. वऱ्हाडपांडे यांच्या पुस्तकांचाही समावेश आहे. पण नेहरूंवर बिभत्स टीका करणारी पिग्मी माणसे मोदी -शहांच्या छत्रछायेत काँग्रेस गवतासारखी नालीच्या काठाने आता उगवली आहेत.

नेहरूंच्या घराणेशाहीवर पंतप्रधान नेहमीच बोलतात. एखाद्या घराण्याने ठरविले तरी लोकांनी स्वीकारले पाहिजे ना! त्याची तशी लायकी असली पाहिजे ना! नेहरूंचा वारसा लालबहादूर शास्त्री, गुलजारीलाल नंदा व नंतर इंदिराजींकडे आला. पाक व्याप्त काश्मीरमध्ये सर्जिकल स्ट्राइकचाही इव्हेंट करणाऱ्यांना इतकेच




पंडित नेहरू



बॅरिस्टर नाथ पै



डॉ. राम मनोहर लोहिया



लाल बहादूर शास्त्री

सांगावेसे वाटते की, पाकिस्तान विरुद्ध स्वतंत्र भारतात सर्वात मोठी कामगिरी जर कोणी केली असेल तर ती श्रीमती इंदिरा गांधींनी . १९७१-७२ च्या युद्धात इंदिराजींच्या नेतृत्वात आणि जनरल माणेकशॉच्या व्यूहरचनेत पाकिस्तानचे दोन तुकडे करण्यात आले. अटलजी म्हणाले, 'हा दुर्गेचा अवतार आहे'.


इंदिरा गांधी दिखाऊ नाही, अंत:करणातून प्रचंड धार्मिक होत्या. गळ्यात रुद्राक्षाची माळ घालत आणि तिचा नित्य जपही करत. इंदिरा गांधींना पंतप्रधान असताना त्या पारसी आहेत म्हणून कर्मकांडी कर्मठांनी मंदिर प्रवेश नाकारला होता. हिंदू धर्माचे खरे दुश्मन भेदाभेदाचे,कर्मकांडाचे व्यापारी आहेत. पंढरपूरचे बडवे आणि वाराणसीचे पंडे त्याचे मूर्तीमंत उदाहरण आहे. इंदिराजींनी देशासाठी बलिदान दिले. आणीबाणी ही त्यांची फार मोठी चूक होती हे मान्य करावेच लागेल. त्याचे परिणामही त्यांना भोगावे लागले.

इंदिराजींचा वारसा आला राजीव गांधींकडे. लोकांनीच तो दिला. त्यांच्या नेतृत्वात काँग्रेसचे ४४४ खासदार निवडून आले. त्याकाळात ते चारसो पार झाले. दंभ आणि अहंगंडाचा लवलेशही त्यांच्या राजीव लोचनावर कधी कोणी पाहिला नाही. राजीव गांधींनी देशाला माहिती तंत्रज्ञानाची, आधुनिक ज्ञान- विज्ञानाची जोड दिली. मनुष्य शक्तीला मानवी संसाधन ( Human Resource) मानले. देशाला नवी दृष्टी दिली. राजीवजींच्या देहाच्या चिंधड्या झालेल्या आपण पहिल्या. आपल्या तरुण पतीच्या देहाचे तुकडे गोळा करणाऱ्या सोनिया गांधी, आपल्या वडिलांच्या उद्ध्वस्त शरीराला सामोरे जाणारे प्रियंका आणि राहुल पाणावलेल्या डोळ्यांनी संपूर्ण देशाने पाहिले.


एखाद्या कुटुंबाचा त्याग म्हणजे यापेक्षा जास्त काय असतो ? ही केवळ सत्तेची नव्हे, त्यागाचीही घराणेशाही आहे. लग्न न करणे आणि सुट्टी न घेणे हा त्याग या त्यागाच्या आसपासही फिरकत नाही. काँग्रेसने ६० वर्षे सत्ता उपभोगली. सत्तेचे दोष कालांतराने त्यांच्यातही निर्माण झाले. खूपदा निर्णयही चुकले पण देश एकसंध ठेवण्यासाठी जाती-धर्मात सलोखा वाढविण्यासाठी, शांततेसाठी प्राणांची आहुती दिली. अशा नेहरू- गांधी घराण्याला पाण्यात पाहणारा, एखादा पक्ष संपविण्याची जाहीर भाषा करणारा पंतप्रधान मात्र आम्ही पहिल्यांदाच पाहिला. हे लोकशाही मूल्यांच्या विरुद्ध आहे.

भाजपा मोठ्या अभिमानाने सांगत होती आम्ही 'पार्टी विथ डिफरन्स' आहोत.वास्तविक पाहता काँग्रेसच्या काळात ज्या ज्या मुद्द्यांसाठी विरोधी पक्षात असलेल्या भाजपाने रान उठविले त्या गोष्टी आम्ही कदापिही करणार नाही याची खूणगाठ सत्ता आल्यावर बांधायला हवी होती. खुद्द मोदीजीही राजकीय दुस्वासाचे बळी ठरले होते. पण काँग्रेसने केलेल्या प्रमादांचा उच्चांक आम्ही मोडूनच काढू असा चंगच जणू मोदी -शहा यांनी बांधल्याचे दिसून आले. काँग्रेस सरकारी यंत्रणांचा किती गैरवापर करते विशेषतः सीबीआयचा यावर पानेच्या पाने त्या काळात लिहिल्या गेली. घसा कोरडा होईस्तोवर ओरडणे झाले. पण सत्तेत आल्यावर भाजपाने काय केले ? निवडून, निवडून विरोधकांची यादी ईडी-सीबीआयला दिली .

काँग्रेस राज्यपाल पदासारख्या, मंत्रीपदा सारख्या महत्त्वाच्या पदांवर नालायकांना, मूर्खांना, स्वतःच्या पक्षातील जी हुजऱ्यांना नेमते हे अनेक वर्षे आम्ही ऐकत आलो. मोदी- शहांनी आपल्या कोशातून असे काही 'कोशारी' बाहेर काढले की कोना प्रभाकरराव परवडले असे वाटायला लागले. शिक्षण खात्यासारखे खाते एका उच्चविद्याविभूषित(???) व्यक्तीकडे सोपविले. काँग्रेसने आणीबाणीत लोकशाही मूल्यांचा गळा घोटला आहे. त्यासाठी दुसरे स्वातंत्र्य युद्ध लढावे लागेल. असे संघ, जनसंघाचे नेते म्हणत.



राजीव गांधी



अटल बिहारी वाजपेयी



इंदिरा गांधी



गुलझारीलाल नंदा

ते खरेही होते. त्यासाठी घरादारावर त्यांनी तुळशीपत्र ठेवले. असीम त्यागही केला. १९ महिने तुरुंगवास पत्करला. त्यांच्या त्यागावर निवडून आलेल्या मोदी सरकारने लोकशाही मूल्यांचे रक्षण केले ? उत्तर नकारार्थी येते.

काँग्रेस फोडाफोडीचं राजकारण करते, विरोधकांचे लोकनिर्वाचित सरकार पाडते; हा जनमताचा अनादर आहे, आयाराम- गयारामांचे राजकारण भ्रष्ट राजकीय व्यवस्थेला जन्म देते हे तत्त्वज्ञान काँग्रेसच्या काळात सांगणाऱ्या भाजपाला सत्ता येताच त्याचा सोयीस्कर विसर पडला. जनता पक्षाच्या काळात हरियाणात भजनलाल यांचे सरकार होते. १९८० ला इंदिरा काँग्रेसची सत्ता आल्यावर भजनलाल यांच्यासह पूर्ण मंत्रिमंडळ व हरियाणातील जनता पक्ष काँग्रेसमय झाला. तेव्हा विरोधकांनी आग ओकली होती. या भ्रष्ट खेळीचा तीव्र निषेध केला होता. 'भजनलाल' ही शिवी झाली होती.

आगामी काळात महाराष्ट्राचा राजकीय इतिहास जेव्हा लिहिला जाईल, तेव्हा ८४ व्या वर्षी शरीराचा तोल जात असला तरी मनाचा तोल ढळू न देणारे धिरोदात्त शरद पवार, जीवघेण्या आजारातून उठलेले गणंगांच्या टोळक्याविरुद्ध एकाकी सामना लढणारे बाळासाहेबपुत्र उद्धव ठाकरे आणि तत्व विचारांची आयुष्यभर पारायणे करूनसुद्धा सत्ता येताच देव्हाऱ्यातील दत्तात्रयाला नख लावणारी भाजपा त्यात अधोरेखित केल्या जाईल; एवढे मात्र खरे. शेतातील उभे पीक टोळभैरवांनी फस्त केल्यानंतरही एखादा भूमिपुत्र ज्या उमेदीने नव्या पेरणीची सुरुवात करतो त्याला तोड नसते. प्रचंड उपहासाला, अपमानाला धिरोदात्तपणे सामोरे गेलेल्या राहुल गांधींची नोंदही भारताला घ्यावीच लागेल.

फोडाफोडी, ईडी -बिडी, सत्तेच्या आकड्यांचे गणित जुळणे इतक्या पुरताच हा खेळ मर्यादित राहत नसतो. समाजावर, तरुण



पिढीवर त्याचे दूरगामी परिणाम होत असतात. राजकीय आणि सामाजिक जीवनाची चौकटच त्यामुळे उद्ध्वस्त होते. शासनातील भ्रष्ट अधिकारी, व्यापारातील धनदांडगे, समाजातील गुंड- पुंड यामुळे अधिक पुष्ट होतात. नवीन पिढीच्या ईच्छा -आकांक्षा करपल्या जातात. आदर्श- आदर्श म्हणून तरी कोणाकडे?, कसे बघावे? यामुळे समाज भ्रमित होतो आणि पुस्तकातून वाचलेली माणसे पुन्हा निर्माणच होणार नाहीत या उद्विग्नतेतून पुस्तकेच फाडून टाकतो.

आता.. आता मूळ पक्ष ज्यांनी स्थापन केला, वाढविला, रक्ताचे पाणी केले, खुद्द मोदींनाही 'उंगली पकडके राजनीति शिकवली' त्या शरद पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस नकली, ते भटकती आत्मा आणि घाऊक पक्षांतर करणाऱ्या सिंचन सम्राट अजित पवारांची असली हे खुद्द पंतप्रधानांनीच सांगितले. याला काय म्हणावे ? तेच उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेबाबत. ज्या मातोश्रीच्या आश्रयाने लोक रिक्षेवाल्याचे मुख्यमंत्री झाले; त्याच मातोश्रीला सुरुंग लावणाऱ्या खोकेबाजांचा पक्ष असली हे सांगण्याचे धाडसही पंतप्रधानांनी केले. हा कोणता न्याय होता?

या पक्षांतराचा सर्वात वाईट पायंडा म्हणजे घरभेद्यांनी मायबापांना रस्त्यावर आणून, त्यांचे सर्वस्व हिसकावून घरावरच आपली मालकी सांगितली. पक्ष, चिन्ह सारेच बळकावले. राजकीय साठमारीचा नवा ट्रेंड निर्माण केला. यापेक्षा निर्लज्जपणे लोकशाही मूल्यांचा खून कोण करू शकतो ? या सर्व घटनाक्रमाच्या मुळाशी भाजप होता हे आम्ही पाहिले. निवडणूक आयोग चाकरी करायला तयारच होता. जनतेच्या न्यायालयाने मात्र या बेमूर्वतखोर घरभेद्यांचा पुरता बंदोबस्त केला.

महाराष्ट्रात तर भाजपने काय मिळविले ते कळलेच नाही. स्वतःचा चेहरा गमावलेला पक्ष अशीच ओळख भाजपची महाराष्ट्रात शिल्लक राहिली. श्री .देवेंद्र फडणवीस यांच्यासारख्या उत्तम नेतृत्व क्षमता असणाऱ्या नेत्याच्या पदरात फोडाफोडीच्या राजकारणाने काय पडले ? पदत्याग करण्याची इच्छा व्हावी इतकी प्रचंड निराशा. जनमानसातील प्रतिमेचे काय ?

एकनाथरावांच्या सुरत- गुवाहाटी- गोवा -मुंबई या सफरीच्या पार्श्वभूमीवर, सिंचनतज्ज्ञ अजित पवारांना पायघड्या घालण्याच्या पार्श्वभूमीवर, राज ठाकरेंकडे दयेची याचना

करण्याच्या पार्श्वभूमीवर, आणि प्रज्वल रेवण्णाला मांडीवर घेतल्याच्या पार्श्वभूमीवर आणीबाणीत १९ महिने तुरुंगवास भोगलेल्या एका ज्येष्ठ संघ स्वयंसेवकाला सहज विचारले, ‘काका, आपला भाजप कुठे आहे ?’ संघ कार्यासाठी आयुष्य वेचलेले ते निष्ठावान वृद्ध स्वयंसेवक ओशाळून इतकच म्हणाले, ‘आता काळ बदलला आहे’. आपल्या निष्ठेला जराही तडा जाऊ न देता, आपल्या संयत प्रतिक्रियेतून त्यांनी सर्व काही सांगून टाकले. वारंवार, वेळी- अवेळी शपथविधीच्या पिपाण्या वाजविणाऱ्या, धमाके फोडणाऱ्या आकड्यांच्या खेळात संघ, भाजपाच्या सच्चा कार्यकर्त्यांचा आतला आवाज क्षीण झाला; ही वस्तुस्थिती नाकारता येत नाही.

१९९६ साली अटलजींचे सरकार एका मताने पडले. अटलजी विरुद्ध सारे विरोधक चंग बांधून एकत्र आले होते. अटलजींनी मनात आणले असते तर घोडेबाजार करून सत्तेचा सारीपाट अटलजींना सहज काबीज करता आला असता. स्व. प्रमोद महाजनांसारखे राजकारण आणि व्यवहार कुशल शिलेदारही सोबत होतेच पण अटलजींनी ते केले नाही. सत्ता सोडली. राजीनामा देण्यापूर्वी विरोधकांचा खरपूस समाचार घेताना ते म्हणाले, ऐसी सत्ताकोतो मैं चिमटीसेभी छूना नहीं चाहता. अटलजी विरोधात बसले. पण विरोधात बसूनही अटलजींची शान कायम राहिली .अगदी बखरकारांच्याच शब्दात सांगायचे तर, अटल कल्पांतिचा आदित्य भासला.

मोदी- शहांची कार्यपद्धती पाहता गेल्या दहा वर्षातील नकारात्मक गोष्टी योगायोगाने घडल्या नाहीत. अडवाणी- जोशींचा अज्ञातवास, स्वायत्त संस्थांमध्ये ढवळाढवळ, विरोधकांना निवडून निवडून तुरुंगवास, स्व. सुषमा स्वराज या प्रज्ञावान परराष्ट्र मंत्र्याचे स्वतःच्या मंत्रालयातील अस्तित्वच संपविणे, महाराष्ट्राच्या राजकीय पटलावरून (आणि फलकावरूनसुद्धा!) श्री. नितीन गडकरी लुप्त होणे, त्यांची खाती काढणे, इतर राज्यात सत्तेच्या साठमारीसाठी तत्परता दाखविणाऱ्या भाजपाच्या शीर्षस्थ नेतृत्वाने २०१९साली उद्धव ठाकरेंच्या वेगळ्या भूमिकेनंतर १९ दिवस मूग गिळून बसणे, देवेंद्र फडणवीस यांना डावलून शिंदेंना मुख्यमंत्रीपदाची माळ घालणे, अजित पवारांना आवतन देणे, महाराष्ट्रातील उद्योग आणि केंद्र सरकारची कार्यालयं गुजरातला जाणे, कोरोना सारख्या संकट काळात महाराष्ट्राचा दुस्वास करणे, उत्तर प्रदेशात योगींचे उमेदवार डावलून स्वतःची माणसं घुसविणे, एक्झिट पोल मनासारखा लावणे आणि कहर म्हणजे ‘संघाची आता आम्हाला गरज उरली नाही’ असे खुद्द राष्ट्रीय भाजप अध्यक्षांनी मुलाखत देऊन सांगणे हे सर्वच योगायोग नाहीत. ते सिद्धयोग आहेत.

२०१४ साली श्री. नरेंद्र मोदी पहिल्यांदा देशाचे पंतप्रधान झाले. एखाद्या सामान्य घरातील व्यक्ती आपल्या अविचलनिष्ठेने आणि प्रचंड परिश्रमाने सर्वोच्च पदावर कशी पोहोचू शकते याची उदाहरणे आम्ही विद्यार्थ्यांना ‘रोल मॉडेल’ म्हणून वर्गात द्यायचो. दहा वर्षे सलग त्यांनी अनिर्बंध सत्ता उपभोगली. सलग दहा वर्षांचा पूर्ण बहुमताचा कालावधी एखाद्या सरकारला आपला विधायक ठसा उमटविण्यासाठी पुरेसा आहे. भाजपा, मोदी सरकारला ती संधी पूर्ण प्राप्त झाली. या दहा वर्षाच्या काळात या सरकारने काहीच चांगले केले नाही काय ? निश्चितच केले. अनेक चांगली कामे केली. काही लँडमार्कही निर्माण केले.

असा एक सूर उमटतो की ‘लोकांना हवे तरी काय असते? विकास हा मुद्दा लोक लक्षात घेत नाहीत का?’ त्याचे उत्तर असे आहे की, एखाद्या वर्गात प्रथम आलेल्या हुशार विद्यार्थ्यांचं लोक कौतुक करतात. पण या हुशार विद्यार्थ्याने अहंकारी होऊन वर्गात कमी गुण प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांना त्यांच्या परिस्थितीवरून, कपड्यांवरून, रंगावरून, कमी गुणांवरून हिणवले,पायात पाय घालून पाडले तर त्या हुशारीला शून्यावर आणतात. हुशार विद्यार्थी उचापतखोर म्हणून स्मरणात ठेवतात.

महाभारताच्या शांतीपर्वात विचलित युधिष्ठिराला राजपदाचा उपदेश करताना भीष्म पितामह म्हणतात-

**कालो वा कारणं राज्ञो राजा वा कालकारणम।**
**इति ते संशयो मा भूद्राजा कालस्य कारणम ॥**

युधिष्ठिरा, राजा हाच काळ घडवत असतो. राजाचे वचन, वर्तन, नीती तशी परिस्थिती निर्माण करते. महाभारताचा अभ्यास असणारे मोदीजी भीष्म पितामहांचा हा उपदेश विसरले.

श्वेतवर्णीयांच्या वर्ण श्रेष्ठत्वाच्या पार्श्वभूमीवर बराक ओबामा अमेरिकेचे पहिले अश्वेतवर्णीय राष्ट्राध्यक्ष झाले. वर्णवर्चस्वाचे चटके त्यांनीही सहन केले होते. अगदी तळागाळातील स्तरावर काम केले. राष्ट्राध्यक्ष झाल्यावर जी विधायक स्वप्ने देश घडविण्यासाठी उराशी बाळगली होती ती कुठलाही विखार मनात न ठेवता त्यांनी पूर्ण केली. श्री. नरेंद्र मोदींनाही तसे करता आले असते. ‘अच्छे दिन’ आणता आले असते. भारत आणि अमेरिकेची तुलना भौतिक पातळीवर होऊ शकत नाही. पण ‘आपली स्वप्ने पूर्ण करणारा हा निर्विवाद नेता आहे’ ही विधायक प्रतिमा मात्र निःसंशय निर्माण करता आली असती. तेवढी नेतृत्व क्षमता आणि दृष्टी त्यांच्याकडे आहे.

कमालीची सत्ताकांक्षा, विरोधकांना नेस्तनाबूत करण्याची ओढ, सरकारी यंत्रणांचा गैरवापर, स्वायत्त संस्थांचे खच्चीकरण, लोकशाही मूल्यांची



उपेक्षा आणि अहंगंडाचे नकारात्मक राजकारण यामुळे या सरकारची सकारात्मक प्रतिमा डागाळल्या गेली. एक विधायक सरकार म्हणून काळावर आपली छाप सोडण्यात ते अपयशी ठरले.

'केवळ साध्य मोठे असून चालत नाही. साधनही तेवढेच शूचिभूर्त असावे लागते' असे महात्मा गांधी म्हणत. मोदींनी साध्य विश्वगुरूचे ठेवले. साधनेमात्र शूचिभूर्त व कालजयी वापरली नाहीत. मुत्सद्दीपणा व षडयंत्र यात फरक केला नाही. प्रतिशोधाच्या, नेतृत्व वर्चस्वाच्या आणि अतिरेकी प्रसिद्धीच्या झोतातून ते बाहेरच आले नाहीत . त्यामुळे वाराणशीत गंगेची आरती करणारे आणि श्रीरामाच्या चरणी सुवर्णकमळं अर्पण करणारे नरेंद्र दामोदरदास मोदी हे सच्चे भक्त वाटण्यापेक्षा राजकीय पुरुष म्हणूनच सामान्य भक्तांच्या नजरेत भरले. त्यामुळे रामरायाने अयोध्येत आशीर्वाद दिला नाही.

आणखी एक गोष्ट. एकीकडे सत्य मांडणाऱ्या प्रसार माध्यमांची गळचेपी तर दुसरीकडे सत्ताधीशांसाठी बेगडी गळा काढण्याची चढाओढ या पर्वात बघायला मिळाली .निवडणूकपूर्व अंदाजांचे एक्झिट पोल तर स्वतःचीच पोलखोल करून बसले. देशाची किती ही दिशाभूल ? प्रसिद्ध गायक रूप कुमार राठोड यांचे एक गीत आहे. ' दुल्हन की डोली कहारोंने लुटी' नववधूचे सर्वस्व मेणा खांद्यावर घेणा-या भोयांनीच लुटावे तसे. वारांगनांचीही काही व्यवसायनिष्ठा असते. पण समाजमाध्यमी पोपटछाप ज्योतिषांनी तर उच्छादच मांडला होता. ज्यांनी मूल्यभान ठेवले, समाजाला सत्य सांगितले त्या प्रसार माध्यमांचा देश अखंड ऋणी राहील.

प्रसार माध्यमात आपण कसे दिसावे ? कसे चालावे? आजूबाजूला मनुष्यविरहित क्षेत्र कसे करावे ? याविषयी कमालीचे जागृत असणारे पंतप्रधान एका बाबतीत मात्र फारच निरीच्छ दिसतात. निवडणूक निकालानंतर विविध राजकीय पक्षप्रमुखांनी




पत्रकार परिषदा घेऊन आपल्या विजयाची अथवा पराजयाची कारणमीमांसा केली. पत्रकारांच्या थेट प्रश्नांना सामोरे जाऊन त्यांनी मनमोकळी उत्तरे दिली. बारामतीत हरणारे आणि एकच खासदार गाठीशी असणारे श्री. अजित पवारांचाही त्यात समावेश होता. पण दहा वर्षे अद्वितीय कार्य करणारे माध्यमप्रेमी पंतप्रधान मात्र पत्रकार परिषदेपासून अलिप्त राहिले. माध्यमांना सामोरे जाण्यास, आपली यशोगाथा सांगण्यास ते का कचरतात? कदाचित नंतर ते लहान मुलांना 'मन की बात' सांगतील.




लोकसभेच्या या निवडणुकांनी अतिशय संयत आणि संयमी निकाल दिला आहे. भारतीय मतदार गरीब असेल, कमी शिकलेला असेल पण सामुदायिक शहाणपण आणि शहाणीव त्याच्यात ठासून भरली आहे. हेच या निकालांनी सिद्ध केले. येणाऱ्या सत्ताधाऱ्यांच्या बेलगाम वागण्यावर या निकालाने अंकुश लावला आहे, तर विरोधकांना शांततेचा, संयमाचा, अधिक अभ्यासाचा संदेश दिला आहे. सार्वभौम जनतेचा हा कौल समजून घेऊन दोन्ही बाजूंनी आपले वर्तन ठेवणे अपेक्षित आहे. त्यातच देशाचेही भले आहे.

श्री. नरेंद्रभाई मोदींनी तिसऱ्यांदा पंतप्रधान पदाची शपथ.. हो, संविधानातील ईश्वरसाक्ष शपथच घेतली आहे. त्यांचे त्रिवार अभिनंदन! जनतेने भारताचे भाग्यविधाते होण्याची संधी त्यांना पुन्हा दिली आहे. त्यांच्या दिग्विजयी रथाला तुरुंगाची हवा खाऊन आलेले सन्माननीय(?) चंद्राबाबू नायडू आणि भूमिका बदलासाठी 'भारतरत्न' कमी पडेल असे आदरणीय(?) नितिशकुमार अशी दोन चाकही नियतीनं लावून दिली आहेत. जनतेच्या ईच्छा-आकांक्षा या दिग्विजयी रथाच्या धर्मध्वजावर प्रतिबिंबित होवो ही शुभकामना व्यक्त करतो. एक प्रचलित संघगीत आहे. संघ प्रचारक राहिलेल्या श्री. मोदीजींना आणि स्वयंसेवक असलेल्या श्री. देवेंद्रजींना कदाचित ते मुखपाठ असेल.

**पथका अंतिम लक्ष्य नही है, सिंहासन चढते जाना।**
**सब समाज को लिये साथ मे, आगे है बढते जाना॥**

**- डॉ. किशोर फुले , (९४२३१२४६०८)**

■■■

# तिएन-आन-मन
## हत्याकांडाची ३५ वर्षे



जगातली दुसऱ्या क्रमांकाची आर्थिक महासत्ता असणारा चीन हजारो वर्षांच्या संबंधांनंतर आजही तेवढाच अनाकलनीय, दुर्बोध वाटतो. भारताचा तो स्पर्धक आहे आणि महत्वाकांक्षी शत्रूही, जो स्वत:चे हीत साधण्यासाठी कोणत्याही थराला जाऊ शकतो. चार दशकांहूनही अधिक काळ परराष्ट्रसेवेत असलेले, चीनचा फार जवळून अभ्यास केलेले आणि चीन, तैवान तसेच हाँगकाँग येथे मोठ्या जबाबदारीवर काम व वाटाघाटी केलेले भारताचे माजी परराष्ट्रसचिव श्री. विजय गोखले यांनी भारत-चीन संबंध व चीनची राजकीय वाटचाल आणि परराष्ट्र निती व राजकारण यांचे फार जवळून अध्ययन व निरीक्षण केले असून त्यावर विपूल लेखन केले आहे, अनेक पुस्तके लिहिली आहेत. चिनी ड्रॅगनशी वेगवेगळ्या स्थरांवर संबंध ठेवताना कशा प्रकारे सावधपणा बाळगला पाहिजे व त्याच वेळी सर्व पद्धतीची तयारीही ठेवायला हवी हे आपले ग्रंथ व अगदी ताजे लेख यांमधून प्रतिपादन करणाऱ्या त्यांच्या विचारांचा मागोवा.



# चीन

## युद्धसज्जतेबरोबर संवादही हवा!

प्रभाकर खोले

चीनची राजधानी बिजिंग येथील इतिहासप्रसिद्ध तिएन-आन-मन चौकामध्ये १९८९ मध्ये झालेल्या तिएन-आन-मन उठाव, किंवा लोकशाही चळवळ किंवा विद्यार्थ्यांची निदर्शने या अनेकविध नावांनी प्रसिद्ध पावलेल्या आणि हजारो निदर्शकांचा अमानुषपणे बळी घेऊन चिनी राज्यकर्त्यांनी निर्घृणपणे अक्षरशः चिरडलेल्या जनतेच्या उत्स्फूर्त उठावाला यंदा ३५ वर्षे झाली.

चीनमधील कम्युनिस्ट सत्तारूढांची दडपशाही दूर करून तेथे लोकशाहीची स्थापना व्हावी, भ्रष्टाचार, एकाधिकारशाही आणि पक्षपात दूर करून कारभारात पारदर्शकता आणावी, विचार स्वातंत्र्य व वृत्तपत्र स्वातंत्र्याची प्रतिष्ठापना व्हावी,

समता व लोकशाही मूल्ये यावीत यांसाठी त्याचबरोबर आर्थिक सुधारणांच्या मागणीसाठी व हू याओ बांग या लोकप्रिय नेत्याच्या निधनाविरुद्ध निषेध म्हणून हजारो विद्यार्थ्यांच्या नेतृत्वाखाली तिएन–आन–मन या विशाल चौकामध्ये निदर्शने चालू होती. त्यामध्ये सामील झालेल्यांनी उपोषण, आंदोलन, असहकार, ठिय्या असे शांतताप्रिय मार्ग अनुसरले होते. क्वचित कुठे चिथावणीखोरांकडून हिंसेचाही अवलंब तुरळकपणे केला जात होता.

१५ एप्रिल १९८९ ते ४ जून १९८९ अशा जवळजवळ पावणेदोन महिन्यांच्या कालावधीत चाललेले हे आंदोलन केवळ बिजिंगपुरतेच मर्यादित न राहता अल्पावधीमध्येच साऱ्या चिनभर ४०० हून अधिक शहरांमध्ये पसरले आणि आंदोलनाच्या परिसिमेच्या काळत तर १० लाखांहून अधिक निदर्शकांनी बिजिंगचा तिएन–आन–मन चौक व जवळपासचा परिसर पूर्णपणे व्यापून टाकला होता.


चीनमधील बीजिंगच्या तिएन–आन–मन चौकात हजारो युवकांना रणगाड्याखाली चिरडून मारण्यात आले.




अध्यक्ष दंग शियाओ पिंग सकट लि पंग व इतर जहाल समजल्या जाणाऱ्या पक्ष नेतृत्वाने कधी वाटाघाटी तर कधी दमदाटी असे दुटप्पी धोरण या आंदोलकांना सामोरे जाण्यासाठी वापरले. पक्षातील झाओ झी यांग किंवा वान ली यांसारख्या समन्वयवादी, मवाळ नेत्यांचा सल्ला सबुरीचा होता, परंतु कम्युनिस्ट पक्ष नेतृत्व व राजवटीपुढे त्यांचे फार चालले नाही. पक्षातही या आंदोलनाचे काय करायचे याबद्दल एकमत नव्हते. अखेर जहाल नेतृत्वाची सरशी झाली आणि २० मे रोजी तिएन–आन–मन भागामध्ये ‘लष्करी कायदा’ पुकारण्यात आला. मध्यवर्ती कम्युनिस्ट पक्षाच्या पोलिट ब्युरोच्या निर्णयाप्रमाणे या परिस्थितीच्या हाताळणीसाठी चिनी लष्कराला (पिपल्स् लिबरेशन आर्मी, PLO) बोलावण्यात आले. २ जून ला निदर्शकांना जबरदस्तीने हलवून चौक रिकामा करण्याचा हुकूम लष्कराला दिला गेला आणि निदर्शक व सैनिकांच्या चकमकी उडाल्या.

३–४ जून १९८९ च्या रात्री चिनी लष्कराने रणगाडे, शस्त्रास्त्रे यांसह केलेल्या कारवाईत हजारो निदर्शक प्राणास मुकले. हजारो आणखी जायबंदी झाले. हे सगळे निशस्त्र नागरिक होते. कित्येक हजारांना अटक करण्यात आली तर काही चिनी सैनिकही ठार झाल्याचा दावा करण्यात आला. इतर शहरांतूनही धरपकड व गोळीबाराचे सत्र असेच चालू राहिले.

या घटनेचे पडसाद इतरत्र व बाहेरच्या जगामध्ये उमटू नयेत म्हणून चिनी सरकारने प्रसारमाध्यमांवर बंदी घातली. परदेशी बातमीदारांना स्थानबद्ध केले, घालवून दिले किंवा तुरूंगात टाकले, आणखी हजारो अधिकारी, कार्यकर्ते, कामगार तसेच नेते व नागरिकांना तुरूंगात टाकले. तरिही या घटनेची हकिकत, छायाचित्रे व इतर कागदपत्रे बाहेर जातच राहिली. जगाला या महाभयानक घटनेची कल्पना येतच राहिली.

६ जून १९८९ रोजी जाहिर केलेला मृतांचा सरकारी आकडा फक्त ३०० इतकाच सांगितला गेला. त्यामध्ये सैनिक, नागरिक व बिजिंगमधील विद्यापीठातील २३ विद्यार्थी होते असा खुलासा दिला गेला, तर सुमारे २००० नागरिक व पोलिस आणि सैनिक मिळून ५००० असे एकूण ७००० जखमी झाल्याची माहिती दिली. नंतरच्या अधिकृत वृत्तांतात (१९ जून) मृतांचा आकडा २४१ इतका खाली आणला गेला. (ज्यामध्ये ३६ विद्यार्थ्यांसह २१८ नागरिक, १० सैनिक आणि १३ पोलिस होते)

मात्र ही घटना प्रत्यक्ष पाहणारे तसेच इतर स्त्रोतातून प्राप्त झालेल्या व इतर राष्ट्रांचे राजदूत व राजनैतिक अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या माहितीनूसार या घटनेतील मारल्या गेलेल्यांची संख्या कित्येक हजार होती, तर जखमींची संख्या त्याहीपेक्षा जास्त. बिजिंगमधील इस्पितळे व दवाखान्यांना दिलेल्या भेटींवरून त्याने हे आकडे मिळविले होते. 'चिनी रेडक्रॉस' नेही आधी मृतांचा आकडा २६०० इतका सांगितला होता पण त्यांनी नंतर याचा इन्कार केला.


## विजय गोखलेंचे लेखन व सल्ला!


चिनी सत्ताधाऱ्यांनी तिएन-आन-मन येथे केलेल्या हत्याकांड हा फक्त चिनलाच नव्हे तर साऱ्या मानवतेला लागलेला काळिमा आहे. मात्र चीनसारख्या देशात आणि विशेषतः सध्याच्या राजवटीत (किंबहुना गेल्या तीन-साडेतीन हजार वर्षांच्या ज्ञात चिनी इतिहासात) असे प्रकार अनेकदा आणि वारंवार घडले आहेत. माओंचा लाँग मार्च ते लिंक्यांगमधील कोट्यावधी बिगुर मुस्लिमांची (तुर्क) छळछावणी व कत्तल, तिबेटी बौद्ध लामा पंथियांवरील अत्याचार व त्यांच्या संस्कृतीचे पुसून टाकणे, हाँगकाँगमधील दडपशाही, तैवानवरील धमकावण्या तसेच भारताशी सिमेवरून कुरबुरी या सध्याच्या चिनी (राज्यकर्त्यांच्या) संस्कृतीच्या व वाटचालीचे एक अविभाज्य अंग आहे आणि चिनचा कित्येक दशकांचा अनुभव व अभ्यास असलेले (निवृत्त) परराष्ट्र सचिव विजय गोखले यांच्या स्फुट व वृत्तपत्रीय लेखनातून हेच स्पष्ट होते की चिनचा हा स्वभाव लक्षात घेऊन प्रसंगी त्यांच्याशी दोन हात (मात) करण्याची लष्करी तयारी ठेवतांनाच त्याच्याशी (प्रदीर्घ) चर्चा करण्याची दारेही भारताचे सदैव उघडी ठेवली पाहिजेत, सजगपणे आणि आपले अंतिम उद्दिष्ट व ध्येय कायम लक्षात ठेवून !

श्री. विजय गोखले आपल्या 'आफ्टर तिएन-आन-मेन, द राईज ऑफ चायना' तसेच 'द लाँग गेम, हाऊ द चायनिज निगोशिएट विथ इंडिया' आदी पुस्तके तसेच 'द रोड फ्रॉम गलवान' किंवा 'किप युवर एनिमी क्लोजर' यांसारख्या शोधनिबंध व लेखांमधून असाच सल्ला देतात.

'द लाँग गेम' (याचे मराठी मध्ये भाषांतर 'भारत-चिन संबंध ची प्रदीर्घ खेळी' या नावाने रोहन प्रकाशनाने प्रसिद्ध केले आहे.) हे पुस्तक म्हणजे भारत-चीन संबंधातील गेल्या पाऊणशे वर्षातील घडामोडी, डावपेच व धोरणांचा आणि हुकलेल्या / गमावलेल्या संधींचा तसेच चिनी राज्यकर्त्यांच्या दीर्घसूत्री राजकारणाचा वस्तुपाठ आहे.

चिनी राज्यकर्त्यांचे अविचल धोरण, दुटप्पी वागणूक, प्रसंगी समोरच्याला झुलवत ठेवणारे, बुचकळ्यात पाडणारे राजकारण व त्याला पुरक कृती आणि सुरुवातीला त्याला भुलत, फसत भारताचे अदूरदर्शीपणाचे, दिशाहीन व क्वचित स्वप्नाळू वाटणारे धोरण आणि हळूहळू अनुभवाने त्यामध्ये आलेले शहाणपण या सर्वांचा अत्यंत स्पष्ट व सुंदर असा लेखाजोखा विविध कालखंड व टप्पे यांचे थांबे घेत गोखले यांनी वाचकासमोर मांडला आहे. तो अगदी सोप्या व सुलभ भाषेमध्ये! आणि हे करताना त्यांनी कुठेही दुढ्ढाचार्याची भूमिका घेतलेली नाही, की भाषेची प्रौढी मिरविली नाही. जे काही






मांडले आहे, ते सरळ भाषेत, परराष्ट्रीय राजनिती व राजकारण यांचे तारतम्य सांभाळत आणि त्यातील त्रुटी किंवा अपुरेपण हळूवारपणे उलगडून सांगत व त्यामधून पुढील प्रवासासाठी योग्य ते दाखले देत; कारण ''तुम्ही तुमचे मित्र देश निवडू शकता, शेजारी नाही'' !

## तिबेटमधील विशेषाधिकारांचा बळी -

''भारत आणि चिन यांचे संबंध खूप प्राचिन व ऐतिहासिक असल्याचे दावे आहेत.'', असे प्रतिपादन करून गोखले या वास्तवाची जाणीव करून देतात की प्रत्यक्षात चीनमधून बारतात आलेले युएन च्वांग सारखे प्रवासी यांची वर्णने आणि भारतीय राजवटींकडून अधुनमधून चीनला पाठविलेली प्रतिनिधी मंडळे याव्यतिरिक्त चीनशी भारताचा फारसा संबंध नव्हता. दोन्ही देशांची सीमा थेट भिडली नव्हती (मधला तिबेट बहुतेक काळ स्वतंत्र किंवा स्वायत्त होता), रेशीम मार्ग पलिकडून जात होता आणि भारत-चीन व्यापार हा बहुशः (जो काही असेल तो) समुद्रमार्गेच होत होता. त्याचबरोबर युरोपीय वसाहतवादी देशांची (भारताप्रमाणे) संपूर्ण चीनवर कधी सत्ताही नव्हती. तेव्हाही इंग्रजांना तिबेट हा चीनसाठी आणि अफगाणिस्तान रशियन साम्राज्यासाठी) 'बफर' म्हणून ठेवण्यातच अधिक रस होता आणि म्हणून तिबेटवर सशस्त्र हल्ला करून इंग्रजांनी विशेषाधिकार मिळवले होते (जे पुढे भारताने चीनला तिबेटवरील स्वामित्वाबरोबरच बहाल करून टाकले).

त्यामुळेच भारत आणि चीन यांचे राजनैतिक संबंध खऱ्या अर्थाने १९४९ नंतर चीनमध्ये चँक कै शेफ राजवट उलथून (व हजारोंचे शिरकाव करून) कम्युनिस्ट सत्तेवर आल्यावर त्यांना भारताने मान्यता दिल्यानंतरच सुरू झाले.

त्यावेळी भारताला राजनैतिक संबंध हाताळण्याचा अनुभव नव्हता म्हणजे राजकीय नेतृत्व या बाबतीत अननुभवी होते तर सनदी सेवेतील अधिकारी ब्रिटिश पद्धतीच्या व प्रवृत्तीच्या मॉडेलवर शिक्षित झालेले होते. याउलट कम्युनिस्टांच्या गाठी वसाहतवादी व इतर परकी व राजनैतिक सत्तांशी संवादाचा दीर्घकालचा अनुभव होता. सहाजिकच दोन्ही देशांच्या एकमेकाबाबतचा दृष्टीकोन व परस्पर मान्यतेची आवश्यकता यांमध्ये फरक होता.

''तिबेट हा चीनचाच भाग आहे'', हा दावा कम्युनिस्टांनी आणि त्याआधीच्या चिनी राज्यकर्त्यांनी कधीच लपवून ठेवला नसला तरी ''सद्भावना कमावण्यासाठी'' भारताने नव्या





चीनने तिबेटवर १९५४ मध्ये आक्रमण केले. तेव्हा तिबेटी लोक मोठ्या संख्येने घोड्यावर भूमी सोडून निघून गेले.

राजवटीला मान्यता दिली आणि सिक्कीम (तेव्हा भारतात नव्हते) व तिबेटमधील भारतीय प्रतिनिधी वारंवार इशारे देत असतानाही तिकडे दुर्लक्ष करून तिबेट हातातून गमावला व अखेर १९५४ मध्ये चीनच्या तिबेटवरील सार्वभौमत्वालाही बिनशर्त मान्यता दिली. शेकडो तिबेटींची कत्तल झाली, हजारो निर्वासित झाले व दलाई लामांसकट असंख्यांना भारतात आश्रयार्थ यावे लागून तिबेटवर चिनी कम्युनिस्टांचा वरवंटा पूर्णपणे फिरला.





१८ मे १९७४ रोजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी पोखरण येथे पहिली अणु चाचणी घेतली. त्यावेळी त्याचे नाव 'बुद्ध हसला' असे ठेवण्यात आले होते.

## अणुचाचणी आणि अणुकरार !

इंदिरा गांधी यांनी १९७४ मध्ये पोखरण येथे भारताची 'शांततेसाठी अणुचाचणी' केली. त्यावेळीही चीनने भारताविरुद्ध प्रचार आघाडी उघडली होती. अमेरिकेने तेव्हा चिनशी सख्य करून राजनैतिक संबंध जोडले होते (निक्सन-किसिंजर कारकिर्द) व त्याला पाकिस्तानची मदत झाली होती. अमेरिकेची मेहेरनजर होती. आणि पाक-चीनही जवळ आले होते. पोखरण अणुस्फोटानंतर अमेरिकेने अण्वस्त्रधारी व पुरवठादार देशांची संघटना उभी केली होती.

नंतर १९९८ मध्ये वाजपेयी पंतप्रधान असताना भारताने पाच अणुचाचण्या केल्या, तेव्हा अमेरिकेने भारतावर निर्बंध घातले तर आता चीनने छुपी तसेच उघडउघड भारतविरोधी भूमिका घेतली होती. 'भारतावर शक्य तेवढे कडक निर्बंध घातले पाहिजेत,' असा चीनचा आग्रह होता, तर अध्यक्ष बिल क्लिंटन यांच्या अध्यक्षतेखाली अमेरिका आतून निर्बंधांसाठी तेवढी उत्सुक नव्हती. किंबहुना स्ट्रोन टॅल्बोट आणि जसवंतसिंग यांच्या किमान डझनभर तरी बैठका झाल्या होत्या. अमेरिकेच्या या बदलत्या दृष्टीकोनाची कदाचित पुरेशी जाणीव चीनला झालेली नसावी.


डेमोक्रॅटिक बिल क्लिंटन जाऊन अमेरिकेच्या अध्यक्षपदी रिपब्लिकन पक्षाचे जॉर्ज बुश (ज्युनिअर) आल्यानंतरही या प्रयत्नांत खंड पडले नाहीत. दरम्यान २००४ मध्ये भारतातले वाजपेयी सरकार जाऊन काँग्रेस आघाडी प्रणित डॉ. मनमोहनसिंग यांचे सरकार आले होते. त्यानेही आण्विक मगरमिठीतून भारताला सोडवण्याचे प्रयत्न चालू ठेवले. जॉर्ज बुश यांच्या सरकारने त्याला साथ दिली.

दरम्यान जगभरात बरेच बदल झाले होते. सोव्हिएट युनियनचे विघटन, दोन्ही जर्मनींचे एकत्रीकरण, इराणमध्ये कट्टर इस्लामी राजवट अशा राजकीय पटावरील सोंगट्या बदलत होत्या. भारतावरील आण्विक बंधनांपासून मुक्त होण्यासाठी अमेरिकेबरोबर ऐतिहासिक अणुऊर्जा करार करण्यात आला आणि २००८ साली आपल्या अक्षरशः शेवटच्या काही महिन्यांमध्ये जॉर्ज बुश यांनी अमेरिकेचे वजन, ताकद व राजकीय बळ वापरून अणु पुरवठा गट व इतरांकडून आणि मुख्यतः अमेरिकन संसदेकडून (काँग्रेस) त्याला मान्यता मिळवून दिली. (१:२:३ करार-'एकवार अपवाद'). चीनने या प्रत्येक पायरीवर तसेच प्रत्येक गटामध्ये या प्रयत्नांवर पाणी फिरविण्याची पराकाष्ठा केली परंतु अखेर त्यालाही हे मान्य करावे लागले.

आज अमेरिका भारताच्या बाजूने तर चीन उघड उघड विरुद्ध असला तरी भारताच्या लोकसंख्येपेक्षा (आता) किंचित कमी पण राष्ट्रीय उत्पन्न व अमलाखालील प्रदेश याबाबतीत भारतापेक्षा चौपटीहून अधिक आहे. त्यामुळेच आपण सदैव सज्ज व सतर्क राहिलो तरी चर्चेलाही तयार राहावे, (तसेच विलंबी दुटप्पीपणाच्या राजकारणातही, असा गोखले यांचा सल्ला आहे. त्यासाठी त्यांचे लेखन मुळातूनच वाचायला हवे!

■■■

# अजित पवारांची भाजपकडून कोंडी




**राजवर्धन सरदेशमुख**

'गरज सरो अन् वैद्य मनो' अशी भारतीय जनता पक्षाची सुरूवातीपासूनची भूमिका आहे. कोरेगाव पार्क येथील श्री. अतुल चोरडीया या उद्योगपतीच्या घरी झालेल्या बैठकीत श्री. शरद पवार यांनी या भाजपच्या वर्तणुक पद्धतीची आणि भूमिकेची श्री. अजित पवार यांना आठवण करून दिली होती. इतकेच नव्हे तर याचा तुम्हांला लवकरच अनुभवही येईल असे स्पष्टपणे सांगितलेही होते. पण अजित पवार भाजपच्या म्हणण्यापेक्षा देवेंद्र फडणवीसांच्या इतके प्रेमात पडून अंध झाले होते की त्यांना फडणवीसी कावा कळलाच नाही. आता हा कावा उघड होऊ लागला आहे आणि भाजप अजित पवारांची कोंडी करून त्यांना महायुतीच्या बाहेर कसे हाकालता येईल या दृष्टीने व या दिशेने पाऊले टाकताना दिसतो आहे.

याबाबतची अगदी ठळक उदाहरणे म्हणून पुढील गोष्टींचा आवर्जून उल्लेख करावा लागेल.

१) अजित पवार हे प्रचंड भ्रष्टाचारी असल्यामुळे व जलसंपदा खात्यात ७० हजार कोटी रूपयांचा घोटाळा (पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भोपाळच्या सभेत म्हटल्याप्रमाणे) त्यांनी केलेला असून राज्य सहकारी बँकेतही मोठा घोटाळा करून बँकेचे फार आर्थिक नुकसान स्वस्तात साखर कारखाने विकत घेऊन केले आहे असा आरोप अनेक वर्षांपासून त्यांच्यावर होत होता. अशा भ्रष्ट व्यक्तीला मंत्रीमंडळात घेऊन व उपमुख्यमंत्रीपद देऊन भाजपने मोठी चूक केली आहे अशी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची सुरूवातीपासूनची भूमिका होती. अजित पवारांना महायुतीत घेणे संघाला अजिबात आवडले नाही. संघाचे सर्व प्रमुख नेते व स्वयंसेवकही या निर्णयामुळे



भाजपवर नाराज होते. ती नाराजी संघाच्या लोकांनी कधीही लपवून ठेवली नाही. सुरूवातीला ते उघडपणे बोलत नव्हते. नंतर मात्र त्यांनी जाहीरपणे व खासगी बैठकीत उच्चरवाने नाराजी व्यक्त करण्यास सुरुवाती केली आणि आता लोकसभा निवडणुकीचे निकाल जाहीर झाल्यानंतर संघाने उघडपणे व अजित पवार यांचे स्पष्ट नाव घेऊनच संघाचे मुखपत्र असलेल्या 'ऑर्गनायझर' या मासिकात अजित पवार यांच्यासारख्या भ्रष्ट व लुटारू नेत्याशी युती केल्याबद्दल भाजपवर खुलेआम जाहीरपणे टीका केली. भारतीय जनता पत्राचे जे कार्यकर्ते अजित पवार यांच्या प्रवेशाबद्दल नाराज होते व दबक्या आवाजात ते नापसंती व्यक्त करून देवेंद्र फडणवीस यांना खासगीत शिव्यांची लाखोली वाहात होते त्यांनीही जाहीरपणे आपली मते मांडण्यास सुरुवाती केली. संघाच्या 'ऑर्गनायझर' या मुखपत्राचे पाठबळही त्यांना या कामी आले. त्यामुळे खुद्द फडणवीस यांचीच पक्षात बेइज्जत झाली.

२) अजित पवार यांच्या गटाची (मी मुद्दाम पक्षाची म्हणत नाही कारण मूळ पक्ष शरद पवार यांनी स्थापन केलेला आहे आणि त्याबाबतचा खटला सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असून अजित पवार यांनी पक्ष व चिन्ह चोरलेले आहे हे जनतेला पूर्णपणे ठाऊक आहे.) लोकसभा निवडणुकीत पुरती नाचक्की झाली. एक जागा जी निवडून आली ती किती भानगड्या करून व पैसे वाटून आली याची जाहीरपणे आता लोकात चर्चा चालू आहे. अजित पवार गटाचा स्ट्राईक रेट फक्त २५ टक्के राहिला. त्या तुलनेत शरद पवार यांच्या राष्ट्रवादी पक्षाचा स्ट्राईक रेट सर्वाधिक म्हणजे ८० टक्के राहिला. यावरून महाराष्ट्रातली जनता शरद पवार यांच्याच पाठीशी आहे आणि त्यांनाच ती नेता मानते हे ठळकपणे अधोरेखीत झाले आहे. अजित पवार यांना भाजपने जरी उपमुख्यमंत्रीपद दिलेले असले तरी जनता त्यांना मनापासून नेता मानण्यास तयार नाही हे सिद्ध झाल्यामुळे पंतप्रधान मोदी यांनी आपल्या मंत्रीमंडळात अजित पवार गटाला आणि त्यातही प्रफुल पटेल यांच्यासारख्या भ्रष्टाचार व गैरव्यवहाराचे आरोप असलेल्या आणि त्यामुळेच 'ईडी' ने 'सीजे' हाऊसचे काही मजले ताब्यात घेतलेल्या व्यक्तीला कॅबिनेट मंत्रीपद देण्यास नकार दिला. तोंडाला पाने पुसायची म्हणून राज्यमंत्रीपद देऊन अजित पवार गटाचा जाहीरपणे अपमान केला. हे राज्यमंत्रीपद स्वीकारण्यासाठी सुनील तटकरे खूप आसुसलेले होते पण प्रफुल पटेल यांनी प्रश्न प्रतिष्ठेचा करून कॅबिनेटमंत्रीपद आणि तेही मलाच मिळाले पाहिजे असा आग्रह धरून राज्यमंत्री पदावर बोळा फिरविला असे सांगितले जाते. खरं खोटं त्यांनाच माहिती. पण मंत्रीपद न मिळाल्यामुळे अजित पवार गटाची पुरती नाचक्की झाली. उरलीसुरली जी काही असेल ती ही गेली.

३) शिरूर आणि इंदापूर या दोन तालुक्यात भाजप



# महायुतीतून अजित पवारांना आधी बाहेर काढा

## सुदर्शन चौधरी यांची मागणी

**एकवेळ सत्ता नसली तरी चालेल पण अजित पवार यांना सत्तेतून व महायुतीतून बाहेर काढा. आमचे लोक निधी मागायला गेले तर अजितदादा म्हणाले तुमचा काय संबंध. फक्त १० टक्के निधी देणार आहे. राष्ट्रवादीच्या विरोधात आम्ही दहा वर्षे जीवानिशी लढतोय आणि त्यात अजित पवार यांना आमच्या बोकांडी बसविले आहे. त्यामुळे भाजपची प्रचंड बदनामी होऊन फार मोठे नुकसान झाले आहे. आम्हांला त्यांच्यासोबत नको आहे. राष्ट्रवादीच्या गुंडांनी येथे येऊन म्हणजे कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये बराच धिंगाणा घातला. माझ्या विरुद्ध घोषणाबाजी केली. राष्ट्रवादी हा गुंडांचा पक्ष आहे. ते त्यांच्या पद्धतीने वागले. माझी दादांशी ओळख देखील नाही आणि व्यक्तीगत काही वादही नाही. पण पक्ष श्रेष्ठींनी आता मला शांत राहण्यास सांगितले आहे. त्यामुळे या विषयावर मी कोणतीही प्रतिक्रिया प्रसार माध्यमांना देणार नाही. देवेंद्र फडणवीस हेच आमचे पुढचे मुख्यमंत्री असावेत अशी आम्हा कार्यकर्त्यांची इच्छा आहे. अजितदादांना मुख्यमंत्री व्हायचे असेल तर त्यांनी दुसऱ्या पक्षात जाऊन व्हावे. भाजपने त्यांना बाहेरचा रस्ता दाखवावा अशी आमची कार्यकर्त्यांची इच्छा आहे, असे सुदर्शन चौधरी यांनी निरनिराळ्या प्रसारमाध्यमांना मुलाखती देतानाही सांगितले.**



कार्यकर्त्यांच्या बैठकी झाल्या. या बैठकांमधून भाजपचे स्थानिक नेते काय बोलले यासंबंधीच्या बातम्या सर्व वृत्तपत्रातून प्रसिद्ध झाल्या आहेत. लोकांनी त्या वाचल्या आहेत. एकेकाळी भाजपच्या पुणे जिल्हा युवा मोर्चाचे अध्यक्ष राहिलेले आणि सध्या भाजपचे पुणे जिल्हा उपाध्यक्ष व हवेली कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक असलेले श्री. सुदर्शन चौधरी यांनी अजित पवार यांना महायुतीत घेतल्यामुळे भाजपची खूप बदनामी व नाचक्की झाली आहे आणि त्याचा परिणाम लोकसभा निवडणुकीत आपल्याला भोगावा लागला आहे. तेव्हा त्यांना अगोदर युतीतून बाहेर काढा असे स्पष्टपणाने सांगितले. सर्व उपस्थित कार्यकर्त्यांनी याला पाठिंबा दिला. बैठकीला राहुल कुल आणि सुभाष देशमुख हे दोन आमदार उपस्थित होते. त्यांच्यासमोर ही सगळी चर्चा झाली. पण एकानेही कार्यकर्त्यांच्या म्हणण्याला विरोध केला नाही किंवा त्यांना थांबविले नाही. उलट कार्यकर्ते राहुल कुल यांना म्हणाले, तुमचा भीमा पाटस साखर कारखाना अजित पवारांनीच बंद पाडला. तुम्हाला पुणे जिल्हा बँकेतून कर्ज मिळू दिले नाही. शरद पवारांनी तुम्हांला वारंवार मदत केली आहे. त्यामुळे अजित पवारांच्या बाजूने तुम्ही काही बोलू नका. परिणामी कुल यांची बोलतीच बंद झाली. लोकसभा निवडणुकीतही लोकांनी दौंड व इंदापूर तालुक्यातून सुप्रिया सुळे यांनाच मताधिक्य देऊन अजित पवारांच्या धमक्या व दमदाटीला आणि प्रलोभनाला भीख घातली नाही. अशी स्थिती इंदापूर तालुक्यातल्या बैठकीतही झाली. दस्तुरखुद्द हर्षवर्धन पाटील यांनी आगामी विधानसभा निवडणुकीत इंदापूर तालुक्यातल्या उमेदवारीचा निर्णय देवेंद्र फडणवीस घेणार आहेत असे सांगून तसे पूर्वीच अजित पवारांच्या समोर ठरले आहे असे सांगून स्वतःच्या उमेदवारीचा खुंटा हलवून मजबूत केला. एवढंच नव्हे तर इंदापूरचा उमेदवार ठरविण्याचा काहीमात्र अधिकार अजित पवार यांना नाही हेही त्यांनी आडवळणाने का होईना सांगून टाकले. विद्यमान आमदार दत्तामामा भरणे यांना बंडखोर म्हणून अजित पवार उभे करणार हा आजपर्यंतचा तीन वेळचा अनुभव आहे. तेव्हा अजित पवारांवर विश्वास ठेवू नका आणि त्यांना महायुतीतून लवकर बाहेर काढा अशी मागणीही काही कार्यकर्त्यांनी केली.

४) गैरव्यवहार व भ्रष्टाचाराच्या प्रकरणी अजित पवार यांच्या ज्या चौकशा चालू आहेत त्या बंद करण्यात येऊ नयेत अशी भूमिका सरकारी यंत्रणांनी व ज्येष्ठ समाजसेवक आण्णा हजारे यांनी घेतली आहे. यावरून अजित पवार यांना पुन्हा एकदा घेरण्याचा व महायुतीतून बाहेर काढण्याचा भाजपचा प्रयत्न सुरू झाला आहे असे बोलले जाते. आगामी निवडणुकीत अजित पवार यांच्या गटाचा आपल्याला फारसा

काहीही फायदा होणार नाही हे लक्षात आल्यामुळे अजित पवारांची कोंडी करण्याचा भाजपचा प्रयत्न आहे. ही कोंडी ते कशी फोडतात यावरच त्यांचे राजकीय भवितव्य अवलंबून आहे.  राष्ट्रवादीतून बाहेर पडलेल्या व अजित पवार गटात गेलेल्या एकाही गद्दार आमदाराला पुन्हा पक्षात घेऊ नये असा आग्रह तरूण कार्यकर्त्यांनी व रोहित पवार, यांच्यासह काही आमदरांनी पवार साहेबांकडे धरला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा (शरदचंद्र पवार) १० जूनला अहमदनगरमध्ये जो रौप्यमहोत्सव व विजयी मेळावा साजरा झाला त्यात असंख्य वक्त्यांनी गद्दारांना पुन्हा पक्षात घेऊ नका असे आवर्जून वारंवार सांगितले. त्यामुळे अजित पवारांची अवस्था आता 'कुत्ता ना घर का, ना घाट का' अशी होण्याची शक्यता व्यक्त केली आहे.

अजित पवार यांची अवस्था ही पिंजऱ्यात कोंडलेल्या एखाद्या प्राण्यासारखी झालेली आहे. विधानसभेच्या आगामी निवडणुकीत भाजपला जागा वाटपात स्वतःला मोठा वाटा हवा आहे. त्यासाठी त्यांना तीन वाटेकरी त्या जागांमध्ये असणे फारसे व्यवहार्य वाटत नाही आणि म्हणूनच एकनाथ शिंदे गट किंवा अजित पवार यांचा गट यापैकी एकाला बाहेरची वाट दाखविणे हे भाजपला क्रमप्राप्त झाले. विधानसभेच्या निवडणुकीपर्यंत भाजप हे शिंदे किंवा पवार यांच्यातील एकाला आपल्या वाटेतून दूर करणार असे भाकीत आम्ही पूर्वीही केलेले होते. त्या भाजपची जी रणनीती आहे त्यात अजित पवारांचा नंबर पहिला लागताना दिसतोय. त्यामुळे विधानसभा निवडणुकीपर्यंत अजित पवारांच्या विरोधात शक्य होईल तेवढे रान उठविण्याची मोहीम भाजपने हाती घेतलेली दिसते. एका बाजूला भाजपचे राज्यातले नेते असे काही होणार नाही असे सांगत असले तरी दुसऱ्या बाजूला मात्र अजित पवारांविरुद्धची प्रकरणे बाहेर काढण्याचे काम सुरूच आहे व कार्यकर्त्यांमार्फत अजित पवारांविरुद्ध प्रचार मोहीम सुरू केली जाते याचा अर्थ स्पष्ट आहे की भाजपला आता अजित पवार ओझे वाटू लागले आहे आणि त्यामुळे त्यांना लवकरात लवकर दूर कसे करायचे या कामाला ते लागले आहेत.

■■■




**इंदापूरचा विधानसभा निवडणुकीचा उमेदवार देवेन्द्र फडणवीस हेच ठरवणार आहेत आणि लोकसभा निवडणुकीच्या वेळेला अजित पवार यांनी याला मान्यता दिलेली आहे.**
**– हर्षवर्धन पाटील**



# पश्चिम आशियात शांतता हवी शस्त्रे नव्हे

**जतिन देसाई**

सलग तिसऱ्यांदा पंतप्रधान झालेल्या नरेंद्र मोदींसमोर आंतरराष्ट्रीय स्तरावर अनेक आव्हाने आहेत. रशिया-युक्रेन युद्ध, इस्रायलने गाझावर केलेला हल्ला व पॅलेस्टाईनचा मुद्दा, तैवान आणि तिबेट संदर्भात चीनची आक्रमक भूमिका, पाकिस्तानचा कायमचा मित्र म्हणून चीन घेत असलेली भूमिका, चीन -रशिया-नोर्थ कोरियाचं जवळ येणं, चीन व असोसिएशन ऑफ साऊथ ईस्ट एशियन नेशन्स (आशियान) यांच्यातील तणावाचे संबंध यासारखे अनेक मुद्दे आहेत की ज्यामध्ये भारताने स्पष्ट भूमिका घेऊन ते मिटवण्यासाठी पुढाकार घेतला पाहिजे. एक शीतयुद्ध १९९० मध्ये संपलं तर आता वेगळ्या स्वरूपाचं नवीन शीतयुद्ध सुरू झाले आहे. एका बाजूला अमेरिका, नॉर्थ अटलांटिक ट्रीटी ऑर्गनायझेशन (नाटो) आणि पाश्चात्य राष्ट्र आहेत तर दुसऱ्या बाजूला रशिया-चीन-नोर्थ कोरिया सारखी राष्ट्र आहेत. रशिया आणि चीन त्यांच्या विस्तारवादी धोरणासाठी प्रसिद्ध आहेत. रशियाने २०१४ मध्ये युक्रेनचा क्रिमिया परिसर जिंकून त्याला रशियाचा भाग बनवला. २०२० मध्ये लडाखच्या गलवान खोऱ्यातील भारताच्या जमिनीवर चीनने कब्जा मिळवला आहे. भारत सरकार हे मान्य करत नसलं तरी अनेक तज्ञ मंडळीने या संदर्भात खूप लिहिले आहे. माजी केंद्रीय मंत्री आणि भाजपचे नेते सुब्रमण्यम स्वामी यांनी तर चीनने लडाख येथील ४,०५७ चौरस कि.मी. जमिनीवर (एप्रिल २०२० पासून) कब्जा मिळवला असल्याचा आरोप केला आहे. चीनचा डोळा तैवानवर आहे आणि तिबेटमध्ये चीनची दादागिरी आहे. दलाई लामा यांना भारतात कोणी भेटलं किंवा पंतप्रधान मोदी यांनी अरुणाचल प्रदेशची भेट घेतली तरी त्याची चीन टीका करतो किंवा त्याचा निषेध करतो. अलीकडे रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांच्या दोन दिवसाच्या (१८-१९ जून) नोर्थ कोरियाच्या दौऱ्यात दोन्ही देशात संरक्षण बद्दल महत्त्वाचे करार करण्यात आले आहेत. २०२२ च्या फेब्रुवारी महिन्यात रशियाने युक्रेन वर हल्ला केला आणि ते युद्ध थांबण्याची चिन्हे दिसत नाही. आता रशियाला अधिक शस्त्राची आवश्यकता आहे. नॉर्थ कोरियाकडून रशियाला शस्त्र पुरवली जातात. इराणकडून रशियाला ड्रोन विकली जातात. पॅलेस्टाईनवर इस्त्रायलचे हल्ले सुरूच आहेत. संयुक्त राष्ट्र (यूएन) किंवा सुरक्षा परिषदेच्या ठरावाला इस्त्रायल महत्त्व देत नसल्याचं



स्पष्ट झाले आहे. शेजारील बांगलादेश सोबत भारताचे खूप जवळचे संबंध असले तरी चीन त्याचा प्रभाव बांगलादेशात वाढविण्याच्या प्रयत्नात आहे. एकूण यातून जागतिक परिस्थिती अशांत किंवा स्फोटक असल्याचं दिसतं. त्यात भारताने काय भूमिका घेतली पाहिजे आणि आंतरराष्ट्रीय समुदायाची भारताकडून काय अपेक्षा आहे, त्याचा विचार करण्याची आवश्यकता आहे. भारताने कोणा एका राष्ट्राच्या बाजूने भूमिका घेण्याऐवजी विचारपूर्वक तटस्थ भूमिका घेतली पाहिजे.

तिबेटचे धार्मिक गुरु आणि खरंतर राजकीय देखील दलाई लामा १९५९ पासून भारतात राहत आहेत. तिबेट हा चीनचा भाग आहे असं सांगून १९५१ मध्ये चीनने तिबेटवर कब्जा केला. १९५९ मध्ये तिबेटी लोकांनी चीनच्या विरोधात मोठ्या प्रमाणावर बंडखोरी केली पण त्याला चीनने चिरडून टाकलं. तेव्हा अतिशय कठीण प्रवास करून दलाई लामा भारतात आश्रयासाठी आलेले. तेव्हाचे पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांनी त्यांचं आणि त्यांच्यासोबत आलेल्या लोकांचं स्वागत केलं होतं. धर्मशाला येथे ते आणि हजारो तिबेटी राहतात. एकूण काही लाख तिबेटी भारतात राहत आहेत. दलाई लामा यांना भारताने दिलेल्या आश्रयामुळे चीन नाराज आहे. अमेरिकेच्या एका उच्चस्तरीय शिष्टमंडळाने धर्मशाला येथे दलाई लामा यांची गेल्या महिन्यात भेट घेतल्यामुळे तर त्यांची नाराजी वाढली. या शिष्टमंडळाने तिबेटच्या प्रश्नाबद्दल व चीनच्या आक्रमक धोरणाबद्दल दलाई लामा आणि त्यांच्या सहकाऱ्यांशी चर्चा केली. १६ ते २० जूनच्या दरम्यान भारतात आलेल्या या शिष्टमंडळात मेकॉल, नेन्सी पेलोसी सारखे प्रतिनिधी होते. पेलोसी यांनी २०२२ च्या ऑगस्ट महिन्यात तैवानची भेट घेतलेली. त्या जेव्हा तैवान गेल्या होत्या तेव्हा चीनने त्यांचा मोठ्या प्रमाणात विरोध केलेला. चीनने युद्ध सारखी परिस्थिती निर्माण केलेली आणि अमेरिकेला धमकी दिलेली. पेलोसी तैवानला सुखरूप पोहोचतील का? अशी पण चर्चा होती. त्या तैवानचे कट्टर समर्थक आणि चीनविरोधी आहेत. पेलोसी दलाई लामा यांना भेटल्याबद्दल चीनने त्यांची प्रचंड टीका केली. अमेरिकेच्या एका उच्चस्तरीय शिष्टमंडळांनी दलाई लामा यांची भेट घेतल्याबद्दल चीनने जाहीर नाराजी व्यक्त केली. चीनच्या राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांच्याबद्दल पेलोसी यांनी केलेल्या एका वक्तव्याचा शी जिनपिंग आणि चीनला

प्रचंड संताप आला असणार. "अनुकंपा आणि सगळ्यांशी आदराने वागण्याचा दलाई लामा यांचा वारसा कायम ओळखला जाणार. पण चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग, तुम्ही निघून जाल आणि तेव्हा तुम्हाला कोणीही कुठल्याही गोष्टींचं श्रेय देणार नाही," असं पेलोसी यांनी म्हटलेलं. अमेरिकेत परत गेल्यानंतर मेकोल यांनी सांगितलं "दलाई लामा यांच्यासोबत झालेल्या माझ्या मीटिंगमुळे शी जिनपिंग नक्कीच व्यथित झालेले. आमच्या भेटीचा जमीनीवर काही परिणाम होणार नाही हे दाखवण्यासाठी ते लगेच तिबेटला गेले. अत्याचार आणि अनियंत्रित राज्यकारभाराच्या विरोधात लोकशाही आणि धर्म पाळण्याच्या स्वातंत्र्याचा विजय होईल". धर्माच्या नावाखाली दलाई लामा चीन विरोधी प्रवृत्ती करत असल्याचा आरोप चीनचा आहे. दलाई लामा यांचा उत्तराधिकारी ठरवण्यात चीनला हस्तक्षेप करू देणार नाही, असेही मॅकॉल यांनी म्हटलं. अमेरिकेच्या शिष्टमंडळाच्या धर्मशाला भेटीमुळे लगेच शी जिनपिंग तिबेटला गेले. त्यांचा आधी हा कार्यक्रम ठरला नव्हता. लोकांना देखील त्याबद्दल माहिती नव्हती. आपण तिबेट येथे आहोत असा संदेश फोटो मार्फत देण्याचा त्यांचा प्रयत्न होता.

पेलोशी आणि मेकोल यांनी त्यांच्या दौऱ्यात तिबेटची समस्या सोडवा या कायद्याचा उल्लेख केला. संसदेने त्याला मंजुरी दिली आहे. त्याची प्रत मेकोल यांनी दलाई लामा यांना दिली. राष्ट्राध्यक्ष जो बायडेन यांची त्यावर सही बाकी आहे. पेलोसी यांनी तिबेटी लोकांना सांगितलं की चीनला यातून संदेश देण्यात आला आहे की तिबेटच्या स्वायत्ततेचा मुद्द्यावर आमची भूमिका स्पष्ट आहे. चीनच्या अपप्रचाराला उत्तर देण्यासाठी आवश्यक फंड या कायद्याखाली उपलब्ध करून देण्यात येईल. त्यात दलाई लामा, तिथली लोक, तिथल्या संस्था, तिबेटचा इतिहास बद्दल यातून चीनला उत्तर देण्यात येईल. मात्र एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की तिबेट हा चीनचा भाग आहे अशी भारत आणि अमेरिकेची भूमिका राहिली आहे. दलाई लामा यांची पण पूर्ण स्वातंत्र्य ऐवजी अधिक स्वायत्ततेची मागणी आहे.

दलाई लामा यांना भेटल्यानंतर २० जूनला मेकोल, पेलोसी आणि त्यांच्या शिष्टमंडळातील इतर लोक पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना भेटले. या बैठकीला भारताने विशेष महत्त्व दिलं होत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ट्विट करून अमेरिकेन शिष्टमंडळासोबत चांगली चर्चा झाली असं म्हटलं. या बैठकीत राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल पण उपस्थित होते. त्यापूर्वी शिष्टमंडळ परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर, परराष्ट्र सचिव विनय मोहन क्वात्रा यांना भेटलेल.

अमेरिकेच्या या उच्चस्तरीय शिष्टमंडळाने दलाई लामा यांच्या घेतलेल्या भेटीची लगेच चीनने टीका केली. तिबेटच्या बाहेरून कार्यरत असलेलं तिबेट सरकार अनधिकृत आहे आणि अधिक स्वायत्ततेच्या मागणीचे समर्थन करण्याचा अर्थ चीनच्या अंतर्गत बाबींमध्ये हस्तक्षेप करणे आहे, असे चीन नेहमीच सांगत आला आहे. तिबेटचा उल्लेख चीन नेहमी शीजांग असा करतो. भारतातल्या चिनी दूतावासाने काढलेल्या पत्रकात म्हटलेलं, "दलाई लामा आणि त्यांच्या गटाचं चीन विरोधी फुटीरतावादी स्वरूप अमेरिकेने लक्षात घ्यावं, अशी आमची त्यांना विनंती आहे. शीजांगच्या संदर्भातल्या मुद्द्यांवर अमेरिकेने चीनला दिलेल्या वचनाचा आदर केला पाहिजे आणि जगाला चुकीच्या गोष्टी सांगणे बंद केले पाहिजे." चीनने अतिशय कडक शब्दात या शिष्टमंडळाची टीका केलेली. भारताच्या परराष्ट्र मंत्रालयातील प्रवक्ता रणजीत जयस्वाल यांनी या संदर्भात त्यांच्या पत्रकार-परिषदेत म्हटलं," भारत सरकारची दलाई लामा यांच्या बद्दलची भूमिका स्पष्ट आहे आणि त्यात सातत्य आहे. ते एक धार्मिक नेता आहे आणि भारतीय लोक त्यांचा प्रचंड आदर करतात. त्यांना त्यांचे धार्मिक आणि अध्यात्मिक कार्यक्रमाच्या आयोजित करण्याचे स्वातंत्र्य आहे". अमेरिकेच्या शिष्टमंडळाने केलेल्या वेगवेगळ्या निवेदनाबद्दल विचारण्यात आलेल्या एका प्रश्नाच्या उत्तरात जयस्वाल यांनी या संबंधी तुम्ही अमेरिकेला विचारा असं पत्रकारांना म्हटलेलं.


अमेरिकन शिष्टमंडळाने दलाई लामा यांची भेट घेतली.


रशिया-युक्रेन युद्ध

चीनच्या भारतातील अलिकडे आलेल्या राजदूतांनी २५ जूनला परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांची भेट घेतली. जयशंकर यांनी शू फेहोन्ग यांना स्पष्ट शब्दात सांगितले की सरहदीवर जोपर्यंत

शांतता निर्माण होत नाही तोपर्यंत दोन्ही देशात संबंध सामान्य होणं कठीण आहे. तर चीन व्यापार आणि गुंतवणुकीला अधिक महत्त्व देत आहे. आश्चर्य या गोष्टीचे आहे की चीन सोबतच्या संबंधात तणाव असताना देखील दोन्ही देशांमधील व्यापार सतत वाढत आहे. भारत आणि चीनचा परस्पर व्यापार आता भारत-अमेरिका पेक्षा जास्त झाला आहे. आर्थिक वर्ष २०२३-२४ मध्ये भारत-चीन मध्ये ११८.४ अब्ज डॉलर एवढा व्यापार झालेला. त्यात भारताने चीन मधून १०१.७ अब्ज डॉलर एवढ्या किमतीच्या वस्तू आयात केलेल्या आणि निर्यात मात्र १६.६७ अब्ज डॉलर एवढ्या किमतीच्या वस्तू केलेल्या. निर्यात पेक्षा १०० अब्ज डॉलर एवढ्या अधिक रकमेच्या वस्तू भारत आयात करत आहे. परस्पर व्यापार चीनला प्रचंड फायदा करून देणारा आहे. भारतात एकीकडे उजव्या विचाराच्या काही संघटना चिनी वस्तूंचा बहिष्कार करण्याची सतत मागणी करते आणि दुसऱ्या बाजूला चीनमधून होणारी आयात


इस्त्राईल पॅलेस्टीनी युद्ध

सतत वाढत आहे. याचा पंतप्रधान नरेंद्र मोदींनी विचार करण्याची आवश्यकता आहे. चीनच्या काही वस्तु बंद करून फारसं काही साध्य होणार नाही. आवश्यकता आहे, चीनकडून होणारी आयात कमी करण्याची आणि निर्यात वाढवण्याची. त्या स्वरूपाचं धोरण भारत सरकारने तत्काळ बनवलं पाहिजे. चीनला अधिक फायदा करून देण्याऐवजी तैवान, साऊथ कोरिया, व्हिएतनाम सारख्या दक्षिण-पूर्वच्या राष्ट्रांसोबत संबंध वाढवले पाहिजे आणि तिथून या वस्तू आयात करता येतील. ही राष्ट्र तंत्रज्ञानात खूप पुढे आहेत.

## इस्त्रायल-गाझा आणि रशिया-युक्रेन युद्ध

या दोन युद्धामुळे आज जग अशांत आहे. सुरक्षा परिषदेत युद्धविरामसाठी झालेल्या ठरावाचा अंमल होत नाही. अमेरिका पासून जवळपास सगळ्या राष्ट्रांनी एका कुठल्यातरी देशाच्या बाजूने भूमिका घेतली आहे. सुरक्षा परिषदेत मार्च महिन्यात युद्धविरामाचा ठराव आला तेव्हा अमेरिकाने नकाराधिकाराचा (व्हिटो) उपयोग केला नाही आणि मतदानापासून वेगळं राहिलं. त्याचे अनेकांना आश्चर्य वाटलं. परंतू, अमेरिकेन सरकारवर तिथल्या लोकांचा युद्धविरामसाठी दबाव असल्यामुळे अमेरिकेने भूमिका बदलली, असल्याचं दिसतं. गूट निरपेक्ष आंदोलनाचे भारत नेतृत्व करत राहिला असल्यामुळे, साहजिकच, अनेकांची भारताकडून अपेक्षा आहे. शांततेसाठी भारताने पुढाकार घ्यावा, असं त्यांचं मत आहे. रशियाचे राष्ट्राध्यक्ष पुतिन यांना मोदींनी २०२२ च्या शेवटी "हा काळ युद्धाचा नाही" असा सल्ला दिलेला. त्याच वर्षाच्या सुरुवातीला रशियाने युक्रेनवर हल्ला करून युद्धाची सुरुवात केली होती. त्यानंतर आंतरराष्ट्रीय समुदायाने भारताकडे आशेने पाहिले पण युद्धविरामाच्या दृष्टीने अधिक प्रयत्न झाले नाही. युद्धविराम करावा यासाठी सुरक्षा परिषदेत भारताने स्पष्ट भूमिका घेतली. इस्त्रायल आणि पॅलेस्टाईन अशा दोन स्वतंत्र राष्ट्राच्या बाजूने भारताची भूमिका असल्याचा पुनरुच्चार परराष्ट्र मंत्रालयाकडून करण्यात आला.

पंतप्रधानाने एका वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत म्हटलेलं "आपण कोणाच्याही बाजूचे नाही. एकमात्र आपलीच भूमिका स्पष्ट आहे. आपण शांततेच्या बाजूने असल्यामुळे जगाचा आपल्यावर विश्वास आहे. त्यांना विश्वास आहे की शस्त्र पुरवठा करण्याची भाषा आपण करणार नाही". मात्र जमिनीवर परिस्थिती वेगळी असल्याचं जाणवतं. आपण इस्त्रायलला दारूगोळा आणि शस्त्राचा पुरवठा करत असल्याची बातमी काही प्रतिष्ठित दैनिकात छापून आली आहे. त्यावर सरकारकडून फारसे खुलासे करण्यात आलेले नाही. १५ मे ला बोरकुम नावाच्या जहाजने स्पेनच्या बंदरात जाणं टाळलं कारण तिथे निदर्शन सुरू होती. इस्त्रायलसाठी दारूगोळा आणि शस्त्र नेणाऱ्या या जहाजाला बंदरात येण्याची परवानगी देता कामा नये, असं युरोपच्या ९ खासदारांनी स्पेनच्या अध्यक्षांना लिहिलेलं. हे बोरकुम जहाज चेन्नईहून निघालेलं. त्यात शस्त्र भरण्यात आलेली आणि इस्त्रायलच्या अशदोद बंदरात जाणार होतं. गाझा पट्टी पासून ३० कि.मी. अंतरावर हे बंदर आहे. त्याच्या एका आठवड्यानंतर भारतातून मरियान डानिका नावाचं दुसरं जहाज निघालं. स्पेनच्या कार्टागेना बंदरात त्याला थांबण्यासाठी परवानगी देण्यात यावी अशी विनंती करण्यात आली. स्पेनच्या परराष्ट्रमंत्री जोश मॅन्युअल आल्बारेश यांनी तेव्हा सांगितलेलं," अश्या जहाजांना थांबण्याची परवानगी देण्यात येणार नाही. मध्य पूर्वला शांतता हवी आहे, त्यांना अधिक शस्त्राची आवश्यकता नाही". १९९९ मध्ये कारगिल युद्धाच्या वेळेस इस्त्रायलने भारताला शस्त्र पुरवठा केला होता. त्यामुळे आता भारताने इस्त्रायलच्या 'संकटच्या काळात' मदत केली असल्याचं म्हटलं गेलं. पण, आज जगाला युद्धविराम हवा आहे. मध्यपूर्व येथे शांतता हवी आहे. सुरक्षा परिषदेच्या ठरावाचा अंमल इस्त्रायलने करावा अशी भावना आंतरराष्ट्रीय समुदायात आहे. भारताने त्यासाठी विशेष प्रयत्न करण्याची आंतरराष्ट्रीय समुदायाची अपेक्षा आहे. त्या दृष्टीने भारताने अधिक प्रयत्न केले पाहिजे. यासाठी लोकांनी बोलण्याची आवश्यकता आहे.

■■■




## माफीखोरांचा आणीबाणीशी संबंध काय ?

नव्या म्हणजेच १८व्या लोकसभेची सुरुवात चांगल्या वातावरणात करण्याऐवजी त्याला जुन्या कडवट आठवणी काढून नतद्रष्टपणा करण्याचे काम करण्यात आले.

या कृतीला मराठीत चांगले शब्द आहेत. विघ्नसंतोषीपणा, खत्रुडपणा, क्षुद्र मनोवृत्ती वगैरे वगैरे.

मुळात भाजप आणि संघ परिवाराचा आणीबाणीशी काय संबंध आहे यावर प्रकाशझोत टाकण्याची गरज आहे. ज्याप्रमाणे देशाच्या स्वातंत्र्यलढ्यापासून रा..स्व.संघ अलिप्त राहिला होता तशीच काहीशी स्थिती आणीबाणीच्या संदर्भात होती.

आणीबाणी १९ महिने होती. परंतु संपूर्ण १९ महिने तुरुंगवास भोगलेले कितीजण होते याची जंत्री करावी लागेल. खुद्द रा.स्व.संघाचे त्यावेळचे सरसंघचालक जे पुण्याच्या येरवडा कारागृहात होते त्यांची आधीच सुटका झालेली होती. त्यांनी वाढदिवसानिमित्त इंदिरा गांधी यांना अभीष्ट चिंतनाची तार केलेली होती. काही पत्रे देखील लिहिली होती. आता जो किस्सा आम्ही सांगणार आहोत तो यापुढचा आहे.


आणीबाणी संपली, इंदिरा-संजय हरले आणि जनता पक्षाचे सरकार केंद्रात स्थापन झाले. या सरकारने जनमनत कौल हा आधारभूत मानून सात राज्यांमधील काँग्रेस बरखास्त करुन एक घातक पायंडा पाडला. हे कृत्य घटनाविरोधी होते.

अर्थात विषयांतर टाळण्यासाठी त्याच्या तपशीलात आता जाण्याची गरज नाही. तर या सात राज्यांमध्ये विधानसभा निवडणुका जाहीर करण्यात


कुशाभाऊ ठाकरे


आल्या. मध्य प्रदेश या राज्याचाही समावेश त्यामध्ये होता. मध्य प्रदेशात रा.स्व.संघ आणि समाजवादी पक्षाचे चांगले जाळे पसरलेले होते. परंतु केवळ स्वार्थ आणि आपल्यालाच सगळे मिळाले पाहिजे ही अप्पलपोटी मनोवृत्ती या संघ परिवारात तेव्हाही होती.

मध्य प्रदेशात तत्कालीन भारतीय जनसंघ आणि संघाचे मोठे दिग्गज नेते होते. कुशाभाऊ ठाकरे, कैलाश जोशी, सुंदरलाल पटवा अशी अनेक नावे घेता येतील. समाजवादी मंडळींमध्ये लाडली मोहन निगम, पुरुषोत्तम कौशिक वगैरे मंडळी होती. ही सर्व मंडळी जनता पक्षात एकत्र आलेली होती. तर




बाळासाहेब देवरस





कैलाश जोशी

विधानसभेसाठी उमेदवारांची निवड आणि तिकिटवाटपाची प्रक्रिया सुरु झाली. मध्य प्रदेश आपली जहागिर आहे अशा थाटात कुशाभाऊ, कैलाश जोशी या दिग्गजांनी एकतर्फी तिकिटवाटप करुनही टाकले आणि त्यामध्ये ९० टक्के तिकिटे पूर्वाश्रमीच्या जनसंघाच्या आणि संघ परिवारातील उमेदवारांना वाटूनही टाकली. समाजवादी नेते दिल्लीत गेले आणि त्यांनी या पक्षपातीपणाची तक्रार जनता पक्षाच्या केंद्रीय नेतृत्वाकडे केली. त्यावेळी नानाजी देशमुख सरचिटणीस होते आणि त्यांचा दबदबा मानला जायचा. परंतु दुसरे ज्येष्ठ समाजवादी नेते मधु लिमये हेही सरचिटणीस होते आणि त्यांचा विलक्षण दरारा मानला जायचा.

मध्य प्रदेशातील नेत्यांनी ही बाब मधु लिमयांच्या कानी घातली. मधु लिमयांना सर्व डाव लक्षात आला. कारण त्यांनी नानाजींनाही अशी एकतर्फी तिकिटवाटपाची बाब योग्य नसल्याचे सांगितले पण त्याचा काही उपयोग झाला नाही.

अखेर ही बाब पक्षाच्या केंद्रीय संसदीय मंडळापर्यंत पोहोचली. तेथेही नानाजींनी वगैरे मध्य प्रदेशात जनसंघाचेच कसे वर्चस्व आहे वगैरे मुद्दे मांडून या एकतर्फी तिकिटवाटपाचे समर्थन केले.

मग मधु लिमयांनी तिकिटवाटपासाठी काही निकष लावण्याची मागणी केली व आणीबाणीत ज्यांनी माफीनामे लिहून सुटका करवून घेतली होती त्यांना उमेदवारी द्यायची नाही असा निकष मान्य करण्यात आला.

मग काय ? कुशाभाऊ व कैलाश जोशी व इतरांनी ज्यांनाज्यांना तिकिटे दिली होती त्यांची माहिती संसदीय मंडळापुढे मांडली गेली. त्यामध्ये संघ-जनसंघाच्या नव्वद टक्के लोकांनी माफीनामे लिहून स्वतःची तुरुंगातून सुटका करवून घेतल्याचे निदर्शनास आले आणि या सर्वांची तिकिटे रद्द करण्याचे ठरविण्यात आले.




आता नानाजी, कुशाभाऊ, कैलाश जोशी यासारख्यांच्या तोंडचे पाणी पळाले. सर्वाधिक माफीखोर हे संघ-जनसंघाचे निघाले आणि त्यामुळे त्यांची तिकिटे रद्द व्हायची पाळी आली. मग मात्र ही मंडळी मधु लिमयांच्या विनवण्या करु लागली की हा निकष लावू नका नाहीतर आमची तर पुरती वाट लागेल. मग मधु लिमयांनी असला एकतर्फी तिकिटवाटपाचा उद्योग बंद करा असे सुनावल्यावर ही गुर्मीत असलेली मंडळी जागेवर आली. तेव्हा ही माफीखोरांची जमात आहे. हा इतिहास वि.दा.सावरकरांपासून सुरु होतो हेही लक्षात घ्यावे लागेल.


राजसत्तेशी जुळवून घेऊन स्वतःला फारशी तोशीस लावून न घेण्याची पण फुकटचे श्रेय घेण्याची मात्र यांना विलक्षण हौस आहे.

सुब्रह्मण्यन स्वामी यांनी तर मोदी हे आणीबाणीत कुठेच नव्हते असे सांगून त्यांचा फुगा फोडला.


म्हणूनच कधीही लढाऊ नसलेल्या या परिवाराला आणीबाणीच्या संदर्भात ठराव करण्याचा नैतिक अधिकार नाही.

फार फुशारक्या मारल्या तर त्यांचा इतिहास काढावा लागेल व मग तो त्यांना सहन न होणारा असेल.





मधू लिमये



नानाजी देशमुख

## भाजप आणि राहूल

राहूल गांधी अखेर लोकसभेतील अधिकृत विरोधी पक्षनेते झाले.

यामुळे त्यांना कॅबिनेट मंत्र्याचा दर्जा मिळणारच आहे. परंतु संसदेत त्यांना कॅबिनेट मंत्र्यांप्रमाणेच स्वतंत्र खोली, कार्यालय, सहाय्यक, सचिव असा सरकारी जामानिमाही प्राप्त होणार आहे. राहूल गांधी यांना सातत्याने पप्पू, शहजादे म्हणून हिणावणाऱ्या भाजपला राहूल गांधी यांच्या यशाची ही चढती कमान पाहून काहीसा पोटात गोळा उठल्याचे दिसते.

राहूल यांच्या या नव्या अवतारानंतर खुद्द भाजपमधील काही वरिष्ठ नेतेमंडळी देखील राहूल गांधी यांच्या मध्ये परिपक्वता दिसून येते असे खासगीत मान्य करताना आढळतात.

भाजपच्या खासदारांमध्ये राहूल गांधी यांच्याबद्दल कुतुहल निश्चित आहे.

पण भाजपच्या सूत्रधारांना मात्र राहूल यांचा हा उदय अद्याप पचनी पडणे अवघड झाले आहे.

पंतप्रधान आणि केंद्रीय गृहमंत्री हे भाजपचे सर्वोच्च नेते आहेत आणि त्यांना राहूल यांना मिळालेले स्थान पाहून ते वास्तव स्वीकारण्यात त्रास होत असल्याचे त्यांच्या देहबोली वरुनच दिसून येते. भाजप खासदार मात्र राहूल गांधी यांच्याबद्दलचे कुतुहल उघडपणे व्यक्त करताना आढळतात.



राहूल गांधी यांनी लोकसभेत नीट परीक्षा पेपरफुटीबाबत चर्चेची मागणी केली आणि नेहमीप्रमाणे लोकसभा अध्यक्षांनी ती नाकारली. त्यानंतर गोंधळ होऊन लोकसभेचे कामकाज तहकूब झाले. यानंतर राहूल गांधी आणि त्यांचे सहकारी सभागृहाबाहेर जाऊ लागले असता भाजपचे अनेक खासदार त्यांना अभिवादन करताना दिसले. काहीजणांनी तर चक्क राहूल गांधी यांच्या जवळ जाऊन त्यांच्याशी हस्तांदोलन देखील करण्याचे धाडस दाखविले. काहींनी राहूल गांधी यांना नमस्कार केले. राहूल गांधी यांनीही स्मितहास्याने प्रतिसाद देत त्यांच्या या मैत्रीपूर्ण शिष्टाचाराचा स्वीकार केला.

संसदेत आता चर्चा ही सुरु आहे की राहूल गांधी यांना जर असा प्रतिसाद मिळत असेल तर आगामी काळात जेव्हा प्रियंका गांधी यांचा लोकसभेत प्रवेश झाला तर सदस्यांची प्रतिक्रिया काय असेल ?

एक मात्र खरे की राहूल गांधी यांना ज्या प्रकारे सगळीकडून प्रसिध्दी मिळत आहे त्यामुळे भाजपच्या सूत्रधारांमध्ये मोठी अस्वस्थता आहे.

त्यामुळेच राहूल गांधी यांना सभागृहात जास्त बोलू न देण्यासाठी त्यांची धडपड सुरु आहे. लोकसभा अध्यक्षही राहूल यांना वारंवार अडवत असतातच.

परंतु काहीवेळेस राहूल गांधी हे कोणत्या नियमाखाली ते त्यांना अडवत आहेत अशी विचारणा करुन त्यांना काहीसे अडचणीत आणताना दिसतात.

एकंदरीत तुल्यबळ असे संख्याबळ प्राप्त झाल्याने विरोधी पक्षांना नैतिक बळही प्राप्त झाले आहे आणि त्यामुळेच सत्तापक्षात आता अस्वस्थता वाढू लागली आहे. आता हा संघर्ष वाढत जाणार काय हेच पहावे लागणार आहे.

## राम मंदिराची चौकशी

बिहारचे नेते लालूप्रसाद यांनी अयोध्येत बांधलेल्या राम मंदिराच्या बांधकामाच्या चौकशीची मागणी केली आहे. अयोध्येत बांधलेल्या भव्य राममंदिरातील गर्भगृहातील छतातून पाणी गळायला लागल्याची बातमी नुकतीच सर्वत्र प्रसिध्द झाली. आता



पावसाळा सुरु झालेल्या असल्याने राम मंदिर आणि त्याच्या आसपासच्या बांधकामातील त्रुटि आता नजरेस येऊ लागल्या आहेत.

रामचंद्रांच्या मूर्तीची प्रतिष्ठापना झाली त्या गर्भगृहातील छतालाच गळती लागल्याने बांधकाम निकृष्ट दर्ज्यांचे झाल्याचे जगजाहीर झाले आहे.

राममंदिर विश्वस्त संस्थेने खुलासा

करण्याचा प्रयत्न केलेला असला तरी कुणीच त्यावर विश्वास ठेवताना आढळत नाही.

उलट मंदिराकडे जाणारा रस्ता पहिल्याच पावसातच पाण्यात पार बुडाला आणि खचला देखील. या रस्त्यावरील पाण्याची निचरा करणारी सर्व गटारे चक्क निकामी ठरली आणि परिणामी हा सर्व रस्ता जलमय झाला.

आता मंदिराच्या विश्वस्तांनीही हळूहळू तोंड उघडण्यास सुरुवात केली आहे. मंदिराचे काम सर्व चाचण्या घेऊन पूर्ण करण्यासाठी २०२५चे वर्ष उजाडले असते. परंतु २०२४च्या निवडणुकीपूर्वी मंदिराचे उद्घाटन करण्याचा घाट पंतप्रधानांनी घातला होता.

त्यांना हा धार्मिक व भावनिक मुद्दा म्हणून निवडणूक प्रचारासाठी



वापरायचा होता. परंतु अत्यंत घाईघाईत निकृष्ट दर्ज्यांचे बांधकाम करण्यात आले आणि आता ते उघडकीस आले आहे.

लालूप्रसाद यांनी या सर्व मुद्यांचा उल्लेख करुन या बांधकामाच्या चौकशीची मागणी केली आहे.

भगवान रामचंद्रांबाबत ही एक प्रकारे फसवाफसवी केल्यानेच अयोध्येतील लोकांनी भाजपच्या उमेदावाराच पराभव करुन भाजपला धडा शिकवला आहे हे नमूद करण्यास लालूप्रसाद विसरले नाहीत.

आपल्या निवेदनात त्यांनी जाताजाता गोदी मीडिया किंवा पाळीव माध्यमांनी अजुन अयोध्येत रांग कशी लावली नाही याबद्दल आश्चर्य व्यक्त केले आहे. ही झाली राम मंदिराच्या गळतीची कथा. मोदींच्या सरकारचे काही खरे नाही कारण गेल्या काही दिवसात बिहारसह काही राज्यांमध्ये बांधलेले पूल कोसळल्याच्या घटना घडल्या आहेत.

मुंबईतील अटल सेतुलाही भेगा पडल्याचे निदर्शनाला आले आहे.

हे सर्व कशातून घडले आहे हेही लक्षात घ्यावे लागणार आहे.

या देशाचे नेतृत्व करणाऱ्या अवतारी पुरुषांना प्रत्येक गोष्ट घाईत पूर्ण करुन दाखविण्याच्या वेडाने पछाडलेले आहे. काम निकृष्ट झाले तरी हरकत नाही परंतु उद्घाटन मात्र झाले पाहिजे असा या अवतारी पुरुषांचा खाक्या आहे. आता घाईत पुरेशी खबरदारी न घेता बांधलेले रस्ते. पूल धडाधड कोसळायला लागले आहेत. आता लालूप्रसादच नव्हे तर इतरही विरोधी पक्षांनी या निकृष्ट कामाबद्दल सरकारला जाब विचारण्यास सुरुवात केली आहे.

थोडक्यात म्हणजे वेगाने काम करीत असल्याचे दाखविण्याच्या अट्टाहासात दर्जा घसरला आहे.

तेव्हा ही स्वार्थाने ग्रस्त अशी घाई अवतारी पुरुषांनी थांबवावी.,

## नोकरशहांच्या नव्या भूमिका

ओडीशा मध्ये अभेद्य किंवा अजेय मानल्या जाणाऱ्या नवीन पटनाईक यांचा पराभव झाला. त्यांच्या पराभवाला त्यांचे खास विश्वासू मानले जाणारे नोकरशहा व्हीके पांडियन यांना जबाबदार मानले जातात. मूळचे तमीळनाडूचे असलेले पांडियन हे ओडीशा केडरमधील आयएएस अधिकारी होते. वीस वर्षांहून अधिक काळ त्यांनी ओडीशाच्या मुख्यमंत्रीपदी असलेल्या नवीन पटनाईक यांचे खासगी सचिव म्हणून काम पाहिले.

पटनाईक यांच्या अनेक यशस्वी योजनांमध्ये त्यांचे मोठे योगदान राहिले होते. यामुळेच नवीनबाबू यांचे ते खास विश्वासू मानले जात. अगदी नवीनबाबूंच्या राजकीय निर्णयांमागेही त्यांचा प्रभाव जाणवत असे अशी चर्चा ओडीशात सुरु झाली होती.

एखाद्या नोकरशहाला एखाद्या राजकीय नेत्याने अतिजवळ केल्यानंतर त्याचे दुष्परिणाम कालांतराने दिसू लागतात. कारण त्या नेत्याच्या पक्षातूनच अशा नोकरशहांच्या विरोधात आवाज उठू लागतात. यापूर्वीही अशी उदाहरणे घडलेली आहेत.

राजकीय नसलेल्या निकटवर्ति सहाय्यकांमुळे अनेक नेते अडचणीत आलेले आहेत.

इंदिरा गांधी यांना आरके धवन यांच्यामुळे तर राजीव गांधी यांना व्ही जॉर्ज यांच्यामुळे टीकेचे धनी व्हावे लागले होते. तोच प्रकार नवीन पटनाईक यांच्याबाबत होऊ लागला होता.

नवीनबाबूंचा पक्ष बिजु जनता दल व त्या पक्षाचे नेते पांडियन यांच्या नवीनबाबूंवरील वाढत्या प्रभावामुळे अस्वस्थ झाले होते. परिणामी पक्षात पांडियन यांच्याबद्दल मोठी नाराजी निर्माण होऊ लागली होती.

यातच निवडणुकीच्या ऐन तोंडावर पांडियन यांनी प्रशासकीय सेवेचा राजीनामा देऊन चक्क राजकारणात प्रवेश केला आणि बिजु जनता दलाचे काम त्यांनी सुरु केले. यामुळे तर पक्षात प्रचंड असंतोष निर्माण झाला.

अखेर ओडीशा विधानसभा निवडणुकीत व लोकसभा निवडणुकीतही बिजु जनता दलाचा दारुण पराभव झाला. पक्षांतील अनेकांनी याचे खापर पांडियन यांच्यावर फोडले आणि एकंदरीतच त्यांच्या भूमिकेबद्दल शंका

व्यक्त करण्यास सुरुवात केली.

अखेर पांडियन यांनी निवडणुकीनंतर राजकारणाचा त्याग केला व राजकारणातून ते निवृत्त होत असल्याचे जाहीर केले. पण आता त्याचा उपयोग काय ? जे व्हायचे ते होऊन गेले. नेमकी अशीच हुबेहूब परिस्थिती सध्या बिहारमध्ये आहे. मुख्यमंत्री नीतीशकुमार असेच एका



नोकरशहाच्या नको इतके आहारी गेले आहेत. ते इतके त्याच्या आधीन आहेत की राजकीय निर्णयातही त्याचा सल्ला घेत असल्याचे समजते. यामुळे त्यांच्या पक्षात म्हणजेच जनता दल (संयुक्त) प्रचंड अस्वस्थता आहे. या अस्वस्थ नेत्यांना ओडीशात जे घडले ते पाहून आणखी भीतीने ग्रासले आहे.

नवीनबाबूंप्रमाणेच नीतीशबाबूही वागायला लागले तर बिहारमध्येही ओडीशाची पुनरावृत्ती होईल काय या कल्पनेने ते धास्तावलेले आहेत. परंतु काही नेत्यांनी याबाबत वेगळीच शंका बोलून दाखवली आहे.

भाजपच्या पाताळयंत्री नेत्यांनी सरळ व उघडउघड एखाद्या पक्षात फूट पाडण्याने त्यांच्या प्रतिमेची हानि होते हे लक्षात आल्याने संबंधित नेत्याच्या निकटच्या नोकरशहांना हाताशी धरुन त्यांच्याकरवी आपले मनसुबे तडीला नेण्याची नवी युक्ति शोधली आहे. यामुळे फूटपाडे म्हणून भाजपचे जे प्रतिमाहनन होते ते होणार नाही आणि परस्पर त्या पक्षाचा काटा निघून भाजपला राजकीय लाभ करुन घेणे शक्य होते.

यामुळेच आता भाजपने नोकरशहांच्या मार्फत विविध राज्यांमध्ये म्हणजेच जेथे विरोधी पक्षांची सरकारे आहेत तेथे घुसखोरी, करणे तेथील नोकरशाही पोखरुन कपटाने सत्ता हस्तगत करण्याची नवी रणनीती आखलेली आहे असे या नेत्यांचे म्हणणे आहे. याचा प्रयोग त्यांनी ओडीशात केला व आता ते तोच प्रयोग बिहारमध्ये करु पहात आहेत असे या नेत्यांचे म्हणणे आहे. त्यामुळेच नीतीशबाबूंच्या पक्षात मोठी अस्वस्थता आहे.

नवीन पटनाईक यांच्याप्रमाणेच त्यांची प्रकृतीही बरी नसल्याने अगदी ओडीशासारखीच स्थिती बिहारमध्ये तयार होत असल्याने ही अस्वस्थता आहे. नवीन पटनाईक यांच्यासारखीच नीतीशकुमार यांची गत तर होणार नाही ना या शंकेने ते धास्तावलेले आहेत.

सत्तेची आसुरी लालसा असलेले राजकीय नेते राजकारणात असले की असेच होणार.

## बदलता सूर?

लोकसभा निवडणुकीत मतदारांकडून पीछेहाट झाल्यानंतर स्वतः अवतारी पुरुषांची भाषा फारशी बदललेली नाही.

पडलो तरी नाक वर अशा थाटत ते वावरत आहेत. मतदारांनी भाजपला बहुमताचे संख्याबळही नाकारलेले असले तरी अवतारी पुरुष ते पूर्ण बहुमतात असल्याचाच आव आणत आहेत. कदाचित ते अवतारी पुरुष असल्यानेच त्यांना या कोडग्या मनोवृत्तीचे वरदान प्राप्त झाले असावे.

त्यामुळे त्यांच्या चेहऱ्यावरील भाव फारसे बदलल्याचे दिसत नाहीत.

परंतु त्यांच्या मंत्रिमंडळातील सहकाऱ्यांमध्ये काही मर्त्य जीव आहेत. त्यांना पराभवाचे शल्य कुठेतरी बोचत असावे आणि जनतेने आपल्याला नाकारल्याने आपण थोडे नम्र होणे आवश्यक आहे अशी भावना त्यांना



होत असावी.

बहुधा यामुळेच शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी चक्क नीट परीक्षा पेपरफुटी प्रकरणाची नैतिक जबाबदारी ते घेत असल्याचे म्हणून सर्वांनाच काहीसे चकित केले आहे. पण, येथे हेही लक्षात घेतले पाहिजे की हे तोंडदेखलेच होते. नैतिक जबाबदारी घेण्याचे तोंडाने बोलून

दाखविलेले असले तरी प्रत्यक्षात कृति काहीच करण्यात आली नाही.

तरीही या गैरव्यवहाराच्या निषेधार्थ जेव्हा शिक्षण मंत्रालयावर विद्यार्थ्यांचा मोर्चा आल्यानंतर चक्क मंत्रालयाचे अधिकारी त्यांना भेटायला गेले आणि त्यांनी त्या विद्यार्थ्यांचे म्हणणे

ऐकून घेऊन त्यांना कारवाईचे आश्वासन देऊन शांतही केले. हे काहीसे आधीच्या दहा वर्षांच्या मोदी कारभाराच्या विपरीत मानावे लागेल.

मोदींच्या पहिल्या दहा वर्षात सत्तेचे अत्यंत उन्मत्त असे दर्शन लोकांना घडले. आंदोलन करणे म्हणजे देशविरोधी कृत्य केले जात असल्याचे मानले जाऊन आंदोलनकारी लोकांवर कठोर कारवाई केली जात असे.

आता मतदारांनीच श्रीमुखात भडकविलेली असल्याने ही मंडळी काहीशी ताळ्यावर आलेली असावीत असे वाटते.

तोंडदेखला का होईना पण असा काही बदल झालेला असेल तर त्याचे स्वागतच करावे लागेल.

सरसंघचालकांनीही अलीकडेच सेवकांमध्ये विनम्रभाव असणे आवश्यक असल्याचे सांगितले होते आणि अहंकार हा घातक असतो असा इशारा दिलेला होता. धर्मेंद्र प्रधान हे संघप्रणित अभाविपच्या तालमीतले आहेत व त्यामुळे कदाचित त्यांनी ही विनम्रता दाखविण्याचा देखावा केला असावा.

गृहमंत्री अमित शहा यांनी देखील फौजदारी कायद्यांच्या नव्या संहिता लागू झाल्याच्या निमित्त बोलताना विरोधी पक्षांना चर्चेसाठी आमंत्रित केले. विरोधी पक्षांच्या सूचना असतील, शंका असतील तर त्या विचारात घेण्याची तयारी त्यांनी दर्शविलेली आहे.

वरवरचा का होईना हा बदल आहे हे मान्य करावे लागेल. हा देखावा किती काळ चालतो तेही पहावे लागेल.

## भर्तृहरी मेहताब यांच्या हाती धुपाटणे

तेल गेले तूप गेले हाती धुपाटणे राहिले अशी एक म्हण सर्वांनाच माहिती आहे. लोकसभेचे हंगामी अध्यक्ष म्हणून काम पाहिलेले भर्तृहरी मेहताब यांची अवस्था काहीशी अशी झाली असावी असे वाटते.



मेहताब हे बिजु जनता दलात होते. ओडीशातून ते सात वेळा निवडून आले आहेत. परंतु बिजु जनता दलात त्यांनी भाजपबरोबर आघाडी करण्याची भूमिका मांडल्याने त्यांना नवीन पटनाईक यांनी बाजुला केले. भाजपबरोबर फक्त कामकाजापुरते संबंध ठेवायचे, त्यांच्याशी संघर्ष करायचा नसला तरी त्यांच्या आघाडीचा भाग कधीही व्हायचे नाही अशी नवीन पटनाईक यांची भूमिका होती. त्यामुळे मेहताब हे पक्षात एकाकी पडले. परंतु पक्षांतरबंदी कायद्यामुळे त्यांना पक्षांतर करता आले नाही. २०२४च्या निवडणुकीच्या ऐन तोंडावर त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला आणि ते सातव्यांदा निवडूनही आले व हंगामी अध्यक्षही झाले.

मेहताब हे चांगले संसदपटु आहेत. उत्तम व मुद्देसूद बोलतात. अभ्यासू आहेत. संसदीय नियमांचा त्यांचा चांगला अभ्यास आहे. त्यामुळेच १७व्या लोकसभेत भाजपबरोबर हातमिळवणी करताना लोकसभेचे उपाध्यक्षपद आपल्याला मिळावे अशी त्यांची अपेक्षा होती पण त्यावर पाणी पडले. आता भाजपमध्ये प्रवेश केल्यानंतर आतातरी किमान आपली ही इच्छा पूर्ण व्हावी अशी त्यांची इच्छा होती. लोकसभेच्या अध्यक्षपदासाठी ते चांगले उमेदवार ठरले असते परंतु अद्याप ते नवे आहेत आणि पुरेसा विश्वास संपादन न केल्याने त्यांची केवळ हंगामी अध्यक्षपदावरुनच बोळवण केली असावी असे वाटते.

लोकसभेचे उपाध्यक्षपद अद्याप भरण्यात आलेले नाही. परंतु मेहताब यांची ज्येष्ठता असल्यानेच त्यांना हंगामी अध्यक्षपद देण्यात आले आणि त्यांच्या अध्यक्षतेखाली नवनिर्वाचित सदस्यांना शपथ देण्यात आली.

आता त्यांना उपाध्यक्षपद देणे हा अन्याय ठरेल. ओम बिडला यांची ही लोकसभेची तिसरी कारकिर्द आहे म्हणजेच ते मेहताब यांच्यापेक्षा खूपच कनिष्ठ आहेत. परंतु ते सरकारचे हितसंबंध राखत असल्याने त्यांची फेरनिवड करण्यात आली.

आता मेहताब यांच्यासारख्या ज्येष्ठ नेत्याचे काय होणार हा प्रश्न आहे.

केंद्रीय मंत्रीपदासाठी त्यांचा विचार होऊ शकतो. परंतु पुन्हा प्रश्न तोच उरतो की त्यांच्या ज्येष्ठतेनुसार त्यांना कोणते मंत्रीपद द्यायचे असा प्रश्न आहे. त्यामुळे मेहताब यांची चांगलीच गोची झाली आहे. बिजु जनता दलातून भाजपमध्ये जाऊनही त्यांच्या हाताला काहीच लागलेले नाही. त्यामुळेच त्यांचा हाती केवळ धुपाटणे राहिले असेच म्हणावे लागते.

पक्षांतर हे दरवेळीच फायदेशीर ठरते असे नाही हे मेहताब यांच्या उदाहरणावरुन सिध्द होते.

महाराष्ट्रातील पक्षबदलूंनी यापासून काहीतरी धडा घेतलेला बरा!

■■■

# महायुती सरकारने लोटले महाराष्ट्राला अधोगतीकडे

(पान ४ वरून) दलित समाजमध्ये खोटे कथानक पसरवल्यामुळे महाराष्ट्रात भाजपचा पराभव झाला. राज्यातील मुस्लिम आणि दलित समाजाला तुम्ही दुधखुळे समजता का ? कि कोणीही येऊन काहीही बोलेल आणि ते त्यांच्यावर विश्वास ठेवतील ? मुस्लिम आणि दलित समाजाला स्वतःची विचार करण्याची शक्ती आहे, बुद्धी आहे.. त्यांनी कोणाचे एकूण नाही तर स्वतःच्या स्वतंत्र बुद्धीने मतदान केले आहे. पण फक्त मुस्लिम आणि दलित समाजाने इंडिया आघाडीला मतदान केले हे चुकीचे आहे. इंडिया आघाडीला सर्वाधिक मतदान हे सच्चा हिंदूंच्या कडून झालेले आहे. खऱ्या रामभक्तांनी इंडिया आघाडीला मतदान केले आहे. म्हणून महाराष्ट्रात आम्ही ३१ जागांपर्यंत पोहोचलो.

* लोकांनी सत्ताधाऱ्यांना गेली दहा वर्ष जनतेला गृहीत धरण्याची शिक्षा दिली आहे. ही नोटबंदींची शिक्षा आहे, चुकीच्या पद्धतीने कोरोना हाताळणीची शिक्षा आहे, वाढलेल्या बेरोजगारीची शिक्षा आहे. याच निकालाची पुनरावृत्ती राज्यातील जनता विधानसभा निवडणुकीत करणार आहे.
* नागपूरच्या मागच्या अधिवेशनात आमचे उपमुख्यमंत्री म्हणाले की पीएचडी करून मुलं काय दिवे लावणार आहेत ? डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे पीएचडी होते. रिझर्व्ह बँकेचे पहिले गव्हर्नर देशाचे पहिले अर्थमंत्री चिंतामणराव देशमुख हे सुद्धा पीएच डीच होते, अशी कितीतरी नावे सांगता येतील. आज पीएचडीचे शिक्षण घेणारे विद्यार्थी मानधनासाठी आंदोलन करत आहेत. फुलेवाडा ते विधानभवन असा लॉन्ग मार्च या विद्यार्थ्यांनी काढला आहे, त्यांच्याकडे सुद्धा आपण लक्ष द्यावे, अशी माझी विनंती आहे.
* एकीकडे मोदीजींचे धोरण आहे कि जी महामंडळे सरकारी पांढरे हत्ती बनले आहेत ती बंद करू शासनाचे पैसे वाचवायचे तर दुसरीकडे आपली जी आत्ताची महामंडळे आहेत, त्यांचाही खर्च आपल्याला जड झालेला आहे, तिसरीकडे तुम्ही रोज नवनवीन महामंडळे स्थापन करत आहात. जितके हे सरकार महामंडळ जाहीर करेल तेवढे महामंडळांचे महत्त्व कमी होईल.
* सुधीरभाऊ मुनगंटीवार डिसेंबर २०२२ मध्ये म्हणाले होते कि आम्ही २०२३ च्या राज्यभिषेक सोहळ्याच्या आधी छत्रपती शिवाजी महाराजांची वाघनखे आणि तलवार भारतात आणू, आता २०२४ चा राज्याभिषेक सोहळाही होऊन गेला मात्र अजूनही शिवाजी महाराजांची वाघनखे आणि जगदंबा तलवार भारतात आलेली नाही. २०२३ च्या राज्यपाल अभिभाषणात देखील या बाबीचा उल्लेख होता आणि २०२४ च्या राज्यपाल अभिभाषणात देखील या बाबीचा उल्लेख आहे. राज्यपालांना किती अवघडल्यासारखे करणार.

राज्यानं गमावलेल्या प्रकल्पांची यादी सभागृहापुढे मी जाणीवपूर्वक मांडतो आहे.

**उर्जा आणि अक्षय ऊर्जा उपकरणांसाठी उत्पादन क्षेत्र :** शिंदे-फडणवीस सरकारच्या काळात राज्यानं एक मोठी संधी गमावली. उर्जा आणि अक्षय ऊर्जा उपकरणांसाठी उत्पादन क्षेत्र म्हणून मध्य प्रदेशाची निवड झाली आहे. केंद्रीय ऊर्जा मंत्रालयानं सुरू केलेल्या योजनेअंतर्गत, या झोनसाठी आंध्र प्रदेश, बिहार, गुजरात, महाराष्ट्र, ओडिशा, तामिळनाडू आणि तेलंगणा या राज्यांनी प्रयत्न केला होता. अखेर मध्य प्रदेशानं बाजी मारली. मंत्रालयानं झोनच्या स्थापनेसाठी ४०० कोटी रुपयांची आर्थिक मदत देऊ केली आहे.

**वेदांत-फॉक्सकॉन प्रकल्प :** काही दिवसांपूर्वी वेदांत फॉक्सकॉनचा प्रकल्प गुजरातमध्ये गेला होता. देशात सेमीकंडक्टरच्या उत्पादनासाठी महत्वाचा असलेला हा प्रकल्प १.५४ लाख कोटी रुपयांचा आहे. तो प्रथम पुण्यात येणार होता, मात्र नंतर तो गुजरातला गेला. महाविकास आघाडी सरकारच्या काळात वेदांतसोबत झालेल्या चर्चेनुसार पुणे जिल्ह्यातील तळेगाव येथे अर्धवाहिनी प्रकल्प सुरू होणार होता. या प्रकल्पामुळे ८० हजार ते १ लाख रोजगार निर्माण होणार आहेत. यापैकी ३० टक्के रोजगार थेट रोजगार असेल

**बल्क ड्रग्ज पार्क प्रकल्प :** या प्रकल्पाचा उल्लेख राज्यपालांच्या अभिभाषणात. राज्यपाल म्हणतात की या प्रकल्पासाठी रायगड जिल्ह्यातील दिघी येथे १००० एकर जमीनसंपादित केली आहे. यातून २२०० रोजगार उपलब्ध होणार पण हा प्रकल्प कधीच राज्याबाहेर निघून गेला आहे. 'बल्क ड्रग पार्क' प्रकल्प आता गुजरातमधील भरूच येथे उभारला जाणार आहे. या प्रकल्पाची मागणी सप्टेंबर महिन्यात पहिल्यांदा महाराष्ट्रानंच केली होती. सुमारे ३००० कोटी रुपयांच्या या प्रकल्पात ५०,००० प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष नोकऱ्या निर्माण करण्याची क्षमता आहे. यासाठी महाराष्ट्र हा प्रमुख दावेदार होता. हा प्रकल्प फार्मास्युटिकल क्षेत्रासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे.

**वैद्यकीय उपकरण पार्क प्रकल्प :** सप्टेंबरच्या शेवटच्या आठवड्यात मेडिकल डिव्हाइस पार्क प्रकल्प रद्द करण्यात आला. छत्रपती संभाजीनगरमध्ये होणाऱ्या या प्रकल्पांमध्ये महाराष्ट्रात ४२४ कोटी रुपयांची गुंतवणूक होणार होती. तसेच यातून तीन हजार लोकांना प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रोजगार मिळणार होता. मात्र, महाराष्ट्रातील प्रकल्पांना मंजुरी मिळाली नाही. मात्र दुसरीकडे तामिळनाडू, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश आणि हिमाचल प्रदेशात मेडिकल डिव्हाईस पार्क प्रकल्पांना मंजुरी देण्यात आली आहे. तत्कालीन महाविकास आघाडी सरकारनं ऑक्टोबर २०२० मध्ये विशेष सवलती देऊन यास मान्यता दिली

# दलित, मुस्लिमांचा 'बदला घेणारा' अर्थसंकल्प

या अर्थसंकल्पाला 'बदला अर्थसंकल्प' असेही म्हणता येईल. कारण या अर्थसंकल्पात दलित, आदिवासी आणि मुस्लीम समाजासाठी काहीही नाही. या तिन्ही समाजांनी लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला भरभरून मतदान केल्याचा बदला महायुती सरकारने घेतला आहे. दलित, मुस्लीम आणि आदिवासी बांधवांच्या साठी या सरकारने मुद्दाम काहीही दिलेले नाही. एकही नवीन योजना अथवा घोषणा या अर्थसंकल्पात दलित, मुस्लीम व आदिवासी बांधवांच्या साठी नाही.. या सरकारने दलित आणि मुस्लीम बांधवांना असा संदेश दिलाय कि आम्हाला मते दिली नाहीत तर आम्ही तुम्हालाही काहीही देणार नाही. सन २०२२-२३ मध्ये आदिवासी विकास विभाग आणि सामाजिक न्याय व विशेष सहाय्य या विभागाच्या खर्चात अनुक्रमे १४.३२% आणि १०.५% कपात करण्यात आली. या अर्थसंकल्पात मुंबईसाठी काहीही नाही, पुण्यासाठी काहीही नाही, नाशिकसाठी काहीही नाही, नागपूरसाठी काहीही नाही... मुख्यमंत्री ठाणेसाठी काही नाही. महाराष्ट्रासाठी काही नाही. मागील वेळी जेव्हा देवेन्द्रजी यांनी अर्थसंकल्प सादर केला होता, तेव्हा ते म्हणाले होते कि हा अमृत काळातील अर्थसंकल्प आहे. २०२३ साली... आता या अमृत काळाचे नक्की काय झाले याचा परामर्श या अर्थसंकल्पात यायला हवा होता.

देवेन्द्रजींनी पंचामृत सुद्धा याच अर्थसंकल्पात दिले होते, त्या पंचामृताचे पुढे काय झाले.. तेही माहिती नाही. २०१३ साली जेव्हा देवेंद्र फडणवीस विरोधी पक्षातील आमदार होते तेव्हा त्यांनी अशी सूचना केली होती कि दरवर्षी मागील बजेट मधील घोषणांचे काय झाले, याचा अभ्यास करावा आणि त्यावर एक पुस्तिका काढावी. तशीच पुस्तिका आत्ताही आपण काढावी अशी माझी सूचना आहे. ज्या आपण योजना घोषित केल्या आहे त्यांना पैसे कसे उपलब्ध करुन देणार आणि राज्याची एकंदरीत अर्थस्थितीबाबत श्वेतपत्रिका काढावी अशी माझी मागणी आहे. राज्य सरकारने मागच्या वर्षी मोदी आवास योजनेचा प्रारंभ केला. याअंतर्गत दरवर्षी ३ लाख घरकुल देणार अशी घोषणा केली. परंतु प्रत्यक्षात फक्त ११,३७५ घरे बांधली आहेत. २०१९ - २० मध्ये आपल्या राज्यावर ४ लाख ५१ हजार कोटींचे कर्ज होते, ते आता २३-२४ मध्ये ते ७ लाख ८२ हजार ९९१ कोटी रुपये होण्याचा अंदाज आहे. आजच्या घडीला आपल्या राज्यावर ०७ लाख ८२ हजार ९९१ कोटींचे कर्ज झालेले आहे. राज्यातील प्रत्येक नागरिकाच्या डोक्यावर जवळपास ६२ हजार ९४१ रुपयांचे कर्ज आहे. दोन हजार २०२२-२३ च्या तुलनेत या दरडोई कर्जात तब्बल साडे बारा हजार रुपयांची वाढ झाली आहे. जन्मलेल्या बाळावरही सरकारने कर्ज करून ठेवले आहे, सत्ताधारी सरकार कर्ज काढूनच चालवत आहेत की काय अशी परिस्थिती आहे बजेटमध्ये कशाचा कशाशी ताळमेळ नाही. शहरांचे बजेट तर आयुक्तच फायनल करत आहे. संविधान गुंडाळून आपण काम करतोय का अशी परिस्थिती आहे. मुख्यमंत्र्यांना चादर वाला डायलॉग खुप लागला. पण ती खरी परिस्थिती आहे. लोक खुप परेशान आहेत. आपल्या राज्याचे ग्रामीण भागातील PER CAPITA EXPENDITURE हे राजस्थान पेक्षाही कमी आलेले आहे. हे मी सांगत नाहीये, भारत सरकारचे आकडे सांगत आहेत. हे का कमी झाले आहे तर आपल्या ग्रामीण भागातील शेतकऱ्याचे उत्पन्न घटले आहे. आजच्या घडीला शेतकऱ्याला उत्पन्नच नाही तर तो खर्च कुठून करणार..??



होती.

**टाटा एअरबस प्रकल्प :** एअरबस-टाटा प्रकल्प महाराष्ट्रात सुरू होणार होता. या प्रकल्पांची किंमत २२ हजार कोटी रुपये आहे. मात्र नागपुरातील मिहानमध्ये हा प्रकल्प सुरू करण्याचा शिंदे-फडणवीस सरकारचा प्रयत्न फसला आहे. हा प्रकल्प आता महाराष्ट्रात नसून गुजरातमध्ये होणार आहे. कंपनीनं गुजरातमध्ये हा प्रकल्प उभारण्याची घोषणा केली. एअरबसच्या अधिकाऱ्यांच्या मते, या प्रकल्पातून सुमारे १५,००० प्रत्यक्ष आणि १०,००० अप्रत्यक्ष नोकऱ्या मिळतील.

**SAFRAN चा MRO प्रकल्प :** महाराष्ट्राचा आणखी एक मोठा प्रकल्प तेलंगणातील हैदराबादमध्ये गेला. भारतीय आणि विदेशी विमान कंपन्यांसाठी १,२३४ कोटी रुपयांची देखभाल, दुरुस्ती आणि ओव्हरहॉल (MRO) सुविधा एका फ्रेंच बहुराष्ट्रीय कंपनी SAFRAN Group ने प्रस्तावित केली होती. तो प्रकल्प नागपूरहून हैदराबादला हलवण्यात आला आहे. भूसंपादनाला झालेल्या विलंबामुळे हा प्रकल्प रखडला होता. १११५ कोटींच्या सुरुवातीच्या गुंतवणुकीनं हा प्रकल्प हैदराबादला गेला. हा प्रकल्प निघून गेल्याने राज्यातील ५०० ते ६०० कामगारांचा रोजगार बुडाला आहे.

* महाराष्ट्र हा अधोगतीकडे वाटचाल करत आहे असे आम्ही म्हणतो तर हे म्हणतात महाराष्ट्राची बदनामी करत आहे. पण सरकारच्या भीषण परिस्थितीकडे या सरकारचे लक्ष नाही. शेतकरी, शेतमजूर यांना न्याय देणारे भाष्य नाही. यांचे लक्ष मोठे टेंडर काढायचे, रस्त्यांची घोषणा करायची पण ज्यांचे आयुष्य अडीच महिन्यांचे आहे त्यांच्या आश्वासनांवर विश्वास ठेवायचा कसा याचे भान जनतेला आहे.

# शेवटचे पान



दिल्लीमध्ये लोकसभेचे अधिवेशन सुरू आहे. आपल्या नेहमीच्या पद्धतीप्रमाणे देशाचे पंतप्रधान विरोधकांवर आरोप करत सुटले आहेत. खा. राहुल गांधी यांनी जेव्हा खासदारकीची शपथ घेतली. त्यावेळेला त्यांच्या हातामध्ये भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानाची प्रत होती. पंतप्रधानांची अपेक्षा होती की त्यांनी घोषणा दिली होती की अबकी बार ४०० पार. पण निकालानंतर त्यामुळे NDA आणि UPA यामध्ये अंतर खूप कमी राहिले. याचाच अर्थ असा की देशाला हुकूमशाहीकडे नेण्याच्या पंतप्रधानांच्या प्रयत्नांना वेळीच रोखले गेले आणि आता मोदी सरकारचे NDA सरकार मध्ये रूपांतर झाले आहे. मोदी सरकार गेली १० वर्षाहूनही अधिक काळ सत्तेमध्ये आहे. या देशात आपला एकछत्री अंमल असावा म्हणून त्यांनी जो मार्ग अनुसरला आहे तो हिटलरच्या हुकूमशाहीची आठवण करून देणारा आहे. फार मोठा मध्यम वर्ग आज पंतप्रधानांना पाठिंबा देतो असे चित्र रंगविले जात आहे. या मध्यम वर्गाला त्यांच्या सुख दुःखा पलिकडे फारसे काही व्यापक दिसत नाही. आज म्हणूनच खा. राहुल गांधींचे अभिनंदन एवढ्यासाठी की ज्यांचा 'पप्पू' म्हणून हिटलरशाहीच्या स्वरात उल्लेख केला जात होता, तोच चेहरा आज देशाला एक आश्वासक नवे नेतृत्व देऊ शकेल. आपल्या पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष आदरणीय खा. श्री. शरदचंद्रजी पवार यांनीही सोनिया गांधी काँग्रेस, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे या पक्षांना बरोबर घेऊन महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीला सामोरे जायचे ठरविले आहे.

इतिहासात डोकावले तर सहज कळते की महाराष्ट्र हा देशाचे राजकारण फिरवू शकतो. म्हणूनच आपण सगळ्यांनी सज्ज व्हायला हवे संविधान वाचविण्यासाठी. म्हणूनच आज 'पप्पू' नुसता पास झाला नाही तर 'distinction' सह पास झाला. म्हणून पुनः एकदा अभिनंदन !

